विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ९

# संशोधनलेखसंग्रह

## [ भाग पहिला ]

ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र. ११५९२
१३५७

प्रस्तुत पुस्तकांत 'ज्ञानेश्वरी' व 'पंचोपाख्यान' या प्राचीन मराठी ग्रंथांवर पांच, आणि विविध महानुभावीय ग्रंथांवर आठ संशोधनात्मक लेख आहेत.

" कै. हरि नारायण नेने यांनी केलेलें संशोधनकार्य अनेक वर्षांच्या अभ्यासाने अधिकारयुक्त असें झालेलें आहे. ज्यांना प्राचीन मराठी भाषेचा आणि प्राचीन महानुभावीय वाङ्मयाचा सखोल अभ्यास करावयाचा आहे त्याला हरिभाऊंचे लेख अभ्यासिल्याशिवाय या अभ्यासाला पूर्णता यावयाची नाही. "

डॉ. य. खु. देशपांडे

REFBK-0009285

लेखक

कै. हरि नारायण नेने

किंमत चार रुपये

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ९

# संशोधनलेखसंग्रह

## भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ८२८५

लेखक

कै. हरि नारायण नेने, एम्. ए., एल्. टी.
माजी प्राचार्य, प्रशिक्षण

REFBK-0009285

मराठी
अनुक्रम 2*22 ... 1764
9242 ... 3-01-2215

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति ] किंमत चार रुपये [ १९५७

प्रकाशक :

देवीदास गोविंद लांडगे,
बी. ए., एल्एल्. बी.
चिटणीस, विदर्भ संशोधन मंडळ,
नागपूर.

(सर्व हक्क लेखकाच्या वारसांच्या स्वाधीन)

मुद्रक :

पां. ना. बनहट्टी, बी. एस्सी.,
नारायण मुद्रणालय, धनतोली,
नागपूर.



कै. प्राचार्य हरि नारायण नेने



कै. प्रा. नी. व. भवाळकर

कै. हरिभाऊ नेने यांचे

प्रिय मित्र व सहसंशोधक

कै. प्रा. नी. ब. उर्फ बापूसाहेब भवाळकर

यांच्या पूज्य स्मृतीस

सादर समर्पण

# अनुक्रमणिका

| विषय | पान |
|---|---|
| प्रारंभीं | (५) |
| डॉ. य. खु. देशपांडे यांची प्रस्तावना | (७) |
| कै. हरि नारायण नेने यांचें जीवनचरित–म. म. वा. वि. मिराशी | (१६) |

**संशोधनपर लेख**

**प्राचीन मराठी वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वरकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण | १ |
| २. | राजवाडे–ज्ञानेश्वरीचें पुराणत्व ... | ३४ |
| ३. | ज्ञानेश्वरींतील 'कातले' शब्दाचा अर्थ | ४६ |
| ४. | 'श्लेष' शब्दाच्या अर्थावर नवीन प्रकाश | ५७ |
| ५. | पंचोपाख्यानाची महानुभावीय प्रत ... | ६७ |

**महानुभावीय वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| ६. | नरेंद्रकवीच्या रुक्मिणीस्वयंवरावर अधिक प्रकाश | ८२ |
| ७. | सैहाद्रवर्णन किंवा सैहाद्रीमाहात्म्य ... | १०६ |
| ८. | स्थानपोथी ... | १२५ |
| ९. | अन्वयस्थळ व वृद्धाचार ... | १४१ |
| १०. | कृष्णमुनीचें अन्वयस्थळ ... | १४६ |
| ११. | हयग्रीवाचार्यकृत गद्यराज ... | १६८ |
| १२. | गोपाळकविकृत रुक्मिणीस्वयंवर ... | १८४ |
| १३. | प्रश्नार्णव ... ... | १९६ |

परिशिष्ट : कै. प्रा. ह. ना. नेने यांच्या संशोधनपर ग्रंथांची व लेखांची यादी — २०५

सूची — २०८

# प्रारंभीं

कै. हरिभाऊ नेने यांच्या स्फुट संशोधनपर लेखांचा संग्रह प्रसिद्ध व्हावा अशी उत्कट इच्छा त्यांच्या अनेक मित्रांना व चाहत्यांना होती. प्रस्तुत लेखसंग्रहाच्या प्रकाशनाने ती पूर्ण करतां येत आहे, याबद्दल विदर्भ संशोधन मंडळास अत्यानंद होत आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील लेखांचे दोन विभाग केले आहेत. पहिल्या विभागांत 'ज्ञानेश्वरी' व 'पंचोपाख्यान' या प्राचीन मराठी ग्रंथांवर पांच लेख घातले आहेत. दुसऱ्या विभागांत महानुभावीय वाङ्मयावरील आठ लेख आले आहेत. महानुभावीय ग्रंथ हेंहि प्राचीनच वाङ्मय. पण मराठी वाङ्मयांत त्यांचें एक स्वतंत्र दालन असल्यामुळे त्यावरील लेखांचा निराळा विभाग केला आहे. शेवटीं कै. हरिभाऊंच्या ज्ञात अशा संशोधनपर ग्रंथांची यादी जोडली आहे. ही यादी पूर्ण आहे अशी आमची खात्री नाही. याखेरीज त्यांच्या लेखांची कोणी माहिती दिल्यास त्यांची यादी त्यांच्या दुसऱ्या लेखसंग्रहास जोडतां येईल.

महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधनांत हरिभाऊंचा प्रवेश कै. प्रा. नी. ब. ऊर्फ बापूसाहेब भवाळकर यांच्या प्रोत्साहनाने व साहाय्याने झाला. आरंभींचे कांही ग्रंथ दोघांनी मिळून संपादिले. हरिभाऊंना कै. बापूसाहेब यांच्याबद्दल सदैव वाटत असलेला आदर लक्षांत घेऊन प्रस्तुत पुस्तक त्यांच्या पूज्य स्मृतीस अर्पण केलें आहे.

हरिभाऊंचे बहुतेक लेख भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकासारख्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाले होते. अशा लेखांचीं मुद्रितें सामान्यतः लेखकांकडे पाठविलीं जात नाहीत. ज्या महानुभावीय ग्रंथांविषयी हे लेख आहेत ते पाहून लेखनाची शुद्धयशुद्धी ठरविणें आता शक्य नाही. महानुभावीय लेखक उच्चारानुसारी लेखन करीत असत. उदाहरणार्थ 'सैहाद्री', या सर्व गोष्टींचा विचार करून प्रस्तुत पुस्तकांतील

महानुभावीय ग्रंथांच्या उताऱ्यांचें शुद्धलेखन हरिभाऊंच्या लेखांतल्याप्रमाणें असावें असें ठरविलें. इतर ठिकाणीं तें महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नियमांनुसार आहे.

आमच्या संशोधन मंडळाच्या स्थापनेपासून हरिभाऊंनी त्याच्या कार्यांत उत्साहानें भाग घेतला आणि त्याच्या सभांत अनेक संशोधनपर निबंध वाचले. प्रस्तुत लेखसंग्रह प्रकाशित करून मंडळाला त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होतां येत आहे, याबद्दल त्यास समाधान वाटत आहे.

महानुभावीय वाङ्मयाचे या प्रदेशांतील आद्य ख्यातनाम संशोधक डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनी आमच्या विनंतीस मान देऊन हरिभाऊंच्या संशोधनाविषयी चिकित्सक प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों. तसेंच डॉ. वि. भि. कोलते व प्रा. सुरेश डोळके यांनी हरिभाऊंच्या संशोधनपर ग्रंथांची व लेखांची यादी करण्यांत साहाय्य केलें, याबद्दल त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानतों.

जुन्या मध्यप्रदेश शासनानें मध्यप्रदेश (आता विदर्भ) संशोधन मंडळानें गेल्या दोन तपांत केलेलें संशोधन कार्य लक्षांत घेऊन १९५६–५७ सालाकरिता कांही अनुदान मंजूर केलें आणि राज्यपुनर्घटनेनंतर मुंबई शासनानें तें मंडळास प्रत्यक्ष दिलें. त्यांतून प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशन होत आहे. या आर्थिक साहाय्याबद्दल उभय शासनांचें मनःपूर्वक आभार मानतों.

**वा. वि. मिराशी**

अध्यक्ष,

कार्यकारी समिति,

विदर्भ संशोधन मंडळ.

नागपूर,

१ जून १९५७.

# प्रस्तावना

**१ प्रास्ताविक**—कै. हरि नारायण नेने यांच्या स्मृत्यर्थ त्यांच्या संशोधनात्मक निवडक लेखांच्या संग्रहाचा हा प्रथम भाग प्रकाशित करावयाचें विदर्भ संशोधन मंडळाच्या कार्यकारी समितीने ठरविलें आणि त्याला प्रस्तावना लिहिण्याची कामगिरी माझ्याकडे सोपविली. तिला आपुलकीने संमति देऊन मी ती लिहावयास घेतली आहे.

प्रस्तुत भागामध्ये कै. हरिभाऊंच्या प्राचीन मराठी वाङ्मयावरील, बहुतांशी महानुभावीय प्राचीन मराठी वाङ्मयावरील, संशोधनात्मक अशा तेरा लेखांचा संग्रह आहे. त्यासंबंधाने लिहिण्यापूर्वी विदर्भांतील महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधनाची कथा देणें अप्रस्तुत होणार नाही.

**२. वाङ्मय गुप्त ठेवण्याची प्रवृत्ति व त्याचा परिणाम**—वास्तविक महानुभावीय वाङ्मयाला प्रारंभ तेराव्या शतकांतील ज्ञानेश्वरीपूर्वी वीसपंचवीस वर्षें झाला. परंतु हें विस्तृत वाङ्मय पंथाच्या बाहेर एकोणिसाव्या शतकाचे अंतापर्यंत अज्ञातच होतें. इतरांना कळूं नये म्हणून तें वाङ्मय पंथांतच गुप्त ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आला. भगवद्गीतेंत (अ. १८, श्लोक ६७) 'इदं ते नातपस्काय नाभक्ताय' इत्यादि श्लोकांत वर्णिल्याप्रमाणे 'ज्यांना तपश्चर्या नाही, जे अभक्त आहेत, ज्यांना ऐकण्याची तळमळ नाही किंवा जे माझी असूया करतात त्यांचे समोर हें ज्ञान प्रकट करूं नये' अशी पंथांत वृत्ति निर्माण झाली. त्यामुळे आणि महानुभावांच्या एकट वृत्ति, वगैरेमुळे या पंथासंबंधाने महाराष्ट्रांत अनेक गैरसमज निर्माण झाले, आणि या समाजाकडे बघण्याची दृष्टि सहानुभूतिशून्य झाली. कै. विष्णुबोवा जोग यांनी या पंथासंबंधाने कांही विधान केलें. त्यावरून त्यांच्यावर सन १९०८ च्या सुमारास धुळें येथे फौजदारी खटला भरण्यांत आला. तो त्यावेळीं फार गाजला. शेवटीं त्यांतून ते निर्दोष सुटले. धुळ्याचे कै. चांदोरकर यांना महानुभावांचा एक हस्तलिखित ग्रंथ सापडला.

त्यांनी या पंथाच्या विरुद्ध त्या ग्रंथाच्या आधारावर लेखमाला लिहिली. कै. वि. का. राजवाडे यांचेंहि लक्ष या पंथाच्या वाङ्मयाकडे गेलें. तथापि त्यांच्याहि आरंभींच्या लेखांचा सूर विरोधीच होता. परंतु जसजसा त्यांचा या वाङ्मयाशीं परिचय वाढत गेला, तसतसा महानुभावीय वाङ्मयाच्या उच्चत्वाची जाणीव पटत गेली. मडगांव येथे कै. वा. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र साहित्य संमेलन भरलें होतें, त्या वेळीं यशवंत मासिकाने संमेलन–विशेषांक काढला होता. या अंकांत कै. राजवाडे यांच्या मतांचें कसकसें परिवर्तन होत गेलें, तें मी त्यांच्याच लेखांतील उतारे देऊन दाखविण्याचा प्रयत्न केला होता.

**३. वाङ्मय उघड करण्यास सुरवात**—महानुभावीय वाङ्मय प्रसिद्ध नसणें हें पंथीयांना अनिष्ट असल्याची कांही महंतांना जाणीव झाली. त्यांनी ठाण्याचे कै. वि. ल. भावे यांना वाङ्मयासंबंधाने माहिती पुरवली. ती कै. भावे यांनी आपल्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथात १९२४ सालीं ग्रथित केली. या कामासाठी कै. दत्तलक्षराज महंत, संस्थान देवदेवेश्वर, माहूर, आणि महात्मा हरिराज करसालकर (हल्लींचे महंत गोपीराजबुवा) हे उभयता किती तरी दिवस या कामाकरिता ठाण्यास वास्तव्य करून होते.

**४. विदर्भांत वाङ्मयसंशोधनाचा उपक्रम**—यानंतर सन १९२१ पासून गेल्या ३५ वर्षांत विदर्भांत महानुभावीय वाङ्मयसंशोधनाचें फार महत्त्वाचें क्षेत्र निर्माण होऊन अनेक विद्वान् संशोधकांनी परिश्रम करून विविध प्रकारचें वाङ्मय उजेडांत आणून मराठी वाङ्मयांत अमोल अशी भर टाकली आहे. त्या कार्यांत कै. हरिभाऊंचा फार मोठा वाटा आहे. त्याची हकीकतहि संक्षेपतः देणें उद्बोधक होईल.

महानुभाव वाङ्मयाकडे माझें लक्ष वेधण्यास सन १९२१ मध्ये कारणें घडलीं. नेहमीच्या सवयीप्रमाणे हस्तलिखित ग्रंथ आणि कागदपत्र मिळविण्याकरिता एका ठिकाणचा गळाठा तपाशीत असता एका लिपींत लिहिलेली जीर्ण पोथी आढळली. 'महाराष्ट्र सारस्वतां'त दिलेल्या किल्लीवरून ती सकळ लिपींत लिहिलेली सूत्रपाठाची पोथी असल्याचें आढळून आलें. त्याच सुमारास रिद्धपूर येथे एका शेतांत एक प्राचीन विहीर उघडकीस

आली. ती तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहिली. त्यावेळीं महंत दत्तलक्षराज यांचें वास्तव्य चांदूर बाजार येथे होतें. त्यांना या विहीरीची हकीकत सांगितली, तेव्हा त्यांनी 'स्थानपोथी'ंची हस्तलिखित प्रत काढून त्यांत आलेल्या 'केशव विहिरी'चें वर्णन वाचून दाखविलें व तीच 'केशव विहीर' असून त्याठिकाणीं श्रीगोविंदप्रभूंनी लीला केल्या म्हणून ती पंथांत पूज्य असल्याचें सांगितलें. एवढेंच नव्हे तर त्यांनी महानुभाव वाङ्मयाच्या रूपरेषेसंबंधानेहि लिहावयास प्रोत्साहन दिलें. अनेक ठिकाणचे लिखित ग्रंथ पाहून व त्याकरिता पंजाब पेशावरकडे प्रवास करून सन १९२९ सालीं 'महानुभावीय मराठी वाङ्मय' हें पुस्तक प्रकाशित केलें. विदर्भ साहित्य संघाचा पुरस्कृत ग्रंथ म्हणून त्याचा संघाने स्वीकार केला.

**महानुभावीय वाङ्मयप्रकाशनाचा इष्ट परिणाम**—तो ग्रंथ छोटाच आणि जवळजवळ सूचिवजाच आहे, ही गोष्ट मान्य करूनहि त्या ग्रंथाने फार मोठी कामगिरी केली. त्याने महानुभाव पंथ, समाज आणि त्यांचें वाङ्मय, यांची यथार्थ कल्पना जनतेपुढे ठेवली. प्रस्तुत वाङ्मय विदर्भ नागपूर भागांत उपलब्ध होण्यासारखें असल्याचें उघडकीस आलें. सत्यान्वेषणपूर्वक सहानुभूतीने अभ्यास करणाराला तें दाखविण्यास आणि पडेल तें सहकार्य करण्यास महानुभावीय मंडळी तयार आहेत, हें दिसून आलें. विद्यापीठांनीहि महानुभावीय वाङ्मयाचा मराठी अभ्यासक्रमांत समावेश करण्यास सुरवात केली. त्याचा परिणाम असा झाला की शारदाश्रम, यवतमाळ, केंद्र होऊन कांही विद्वान् चिकित्सक आणि आस्थेवाईक अशा तरुणांचें लक्ष या वाङ्मयाच्या संशोधनाकडे वळलें. या मंडळींत श्री. वा. ना. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते यांचें नांव प्रामुख्याने नमूद करावें लागेल. त्यांच्या परिश्रमाचें फलस्वरूप म्हणून केवढा ग्रंथसंभार प्रकाशित झाला तो सर्वांच्या समोर आहेच.

**६. नागपूर येथील संशोधनकेंद्राचा आरंभ**—यवतमाळ-उमरावतीकडे हे प्रयत्न सुरू असतां नागपुरासहि अशाच तऱ्हेचा उपक्रम सुरू झाला. त्याचें श्रेय कै. नी. ब. ऊर्फ बापूसाहेब भवाळकर आणि कै. हरि नारायण नेने यांच्याकडे आहे. कै. बापूसाहेब मराठीचे मुरलेले साहि-

त्यिक होते. त्यांनी केलेली मराठी भाषेची सेवा तर सर्वश्रुतच आहे. कै. ह. ना. नेने हे नागपुरास संस्कृतचे अध्यापक म्हणून आले. पटवर्धन हायस्कूलमध्ये एक पट्टीचे शिक्षक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. अभ्यासास उपयुक्त म्हणून त्यांनी संस्कृत पुस्तकेंही लिहिलीं. कै. बापूसाहेब भवाळकर यांच्या सहकार्याने नुकत्याच उजेडांत येऊं घातलेल्या महानुभावीय प्राचीन वाङ्मयाच्या संशोधनाकडे त्यांचें लक्ष वेधलें. महानुभावांचा तत्त्वज्ञानविषयक आणि विचारनिदर्शक आद्य ग्रंथ जो सूत्रपाठ तो 'श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रें' या नांवाने कै. भवाळकर आणि कै. हरिभाऊ या उभयतांनी संपादन करून सन १९३१ च्या सुमारास प्रसिद्ध केला. महानुभावविषयक संशोधनाचा हा त्यांचा प्रथम ग्रंथ होय. त्यानंतर कै. हरिभाऊ यांनी सतत उद्योग करून अनेक महंतांना आपल्या सौजन्याने आपलेसें करून जवळ जवळ पंचवीस वर्षें अनेक ग्रंथ अभ्यासपूर्वक संपादित केले आणि अनेक ग्रंथांवरील विचिकित्सक निबंध निरनिराळ्या मासिकांतून, विशेषतः भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांतून, प्रकाशित करण्यांत आले आहेत.

**७. श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रें आणि हरिभाऊंचा परिचय**— चक्रधरसिद्धांतसूत्रें हा ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वी बापूसाहेब भवाळकर यांचा परिचय होता, परंतु हरिभाऊ नेने यांच्या परिचयाचा कधी योग नव्हता. तें पुस्तक हातीं पडल्यांवर मला फार आनंद झाला. त्या आनंदाच्या भरांत मी त्या पुस्तकावर परीक्षण लिहून प्रसिद्ध केलें. महानुभाव-संशोधनाकडे वळल्याबद्दल आणि महानुभावांचा हा महत्त्वाचा प्राचीन मराठी ग्रंथ अभ्यासपूर्वक आणि आस्थावाईकपणाने संपादन केल्याबद्दल उभय संपादकांना धन्यवाद दिले. त्याचबरोबर प्रस्तावनेमध्ये मला अन्याय होईल अशीं विधानें केल्याबद्दल त्याच लेखांत मी यथास्थित हजेरी घेतली. तो लेख दृष्टीस पडतांच हरिभाऊ माझ्याकडे यवतमाळला आले. दोन दिवसांच्या सहवासांत हृदयाविष्करण होऊन एकमेकाविषयीं निर्माण झालेलें किल्मिष नाहींसे झालें. तेव्हापासून त्यांच्या मृत्युपर्यंत सरासरी २५ वर्षें आमचा संबंध अगदी स्नेहभावाचा होता. महानुभाव संशोधनाच्या कार्यक्षेत्रांत आम्ही या काळांत अनेक तास एकत्र घालविले आहेत.

२-८-२२ ... ४४२ ... ३३९

महानुभाव वाङ्मयाच्या विदर्भांतील संशोधनाची प्रारंभींची हकीकत कळावी, म्हणून आत्मकथनाचा दोष पत्करूनहि हें थोडक्यांत निवेदन केलें आहे.

**८. हरिभाऊंचा संशोधनात्मक लेखनसंभार**--कै. हरिभाऊ यांनी या २५ वर्षांत चक्रधरसिद्धांतसूत्रें, दृष्टांतपाठ, बत्तीस लक्षणांची टीप, प्राचीन गद्यग्रंथ, लीळाचरित्र इत्यादि ग्रंथ संशोधन करून अभ्यासपूर्वक प्रसिद्ध केले आहेत. त्याहूनहि महत्वाचें असें कार्य हरिभाऊंनी केलें आहे. तें म्हणजे त्यांनी निरनिराळे महानुभावीय ग्रंथ मिळवून व त्यांचा अभ्यास करून त्यांवर त्यांनी चिकित्सापूर्वक निबंध लिहून ते प्रकाशित केले, हें होय. त्यांतच मराठी वाङ्मयाच्या भाषेसंबंधानें ज्ञानेश्वरींतील भाषेवर तौलनिक पद्धतीचा अवलंब करून जे निबंध प्रकाशित केले, त्यांचा अंतर्भाव करतां येईल.

अशा प्रकारचे अनेक निबंध मासिकांतून आणि त्रैमासिकांतून विखुरलेले आहेत. त्यांपैकी प्रस्तुत पुस्तकांत फक्त तेरा निबंधांचा अंतर्भाव केला आहे व ते (१) प्राचीन मराठी वाङ्मय आणि (२) महानुभावीय वाङ्मय या दोन भागांत विभागले आहेत.

या भागाची पृष्ठमर्यादा सरासरी दोनशें असल्यामुळे त्यांत फक्त तेरा निबंध येऊं शकले. त्यांत पहिलीं ८१ पृष्ठें प्राचीन मराठी वाङ्मयांत गुंतलीं असून पुढील १२३ पानें महानुभावीय वाङ्मयांत गुंतलीं आहेत.

**९. प्राचीन मराठी भाषेवरील निबंध**--अगदी पहिलाच लेख 'ज्ञानेश्वरी' आणि ज्ञानेश्वरकालीन मराठी वाङ्मयाच्या व्याकरणाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. तत्कालीन जे महानुभावीय वाङ्मय उपलब्ध आहे त्याचाहि अभ्यास करून आणि ज्ञानेश्वरींतील व अनेक ग्रंथांतील उदाहरणें देऊन तत्कालीन शब्दांची आणि रूपांची चर्चा केली आहे. या निबंधाच्या वाचनाने तत्कालीन मराठी भाषेची यथार्थ कल्पना प्राचीन मराठीच्या अभ्यासकांस येईल.

दुसऱ्या लेखांत सर्व ज्ञानेश्वरीच्या प्रतींत राजवाडे-प्रत कशी प्राचीन आहे व तिचा मराठी भाषेच्या अभ्यासास कसा उपयोग होऊं शकतो हें

निरनिराळ्या प्रतींतील शब्दांची आणि रूपांची तुलना करून सांगितलें आहे. निबंध नं. ३, ४ व ५ हे ही प्राचीन मराठी भाषेच्या अभ्यासास पोषक आहेत. नं. ३ मध्ये 'कातलें' या शब्दाचा प्रचलित असा अर्थ कसा चुकीचा आहे व त्याचा खरा अर्थ काय आहे हें निरनिराळ्या प्राचीन ग्रंथांतील उतारे देऊन विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें 'श्लेष' या शब्दाचा ज्ञानेश्वरीमध्ये आणि महानुभाव प्राचीन वाङ्मयांत काय अर्थ अभिप्रेत आहे तें निरनिराळ्या ग्रंथांत तो शब्द कोठे कोठे आला व त्याचा काय अर्थ अभिप्रेत आहे तें द्वात्रिंशल्लक्षण या संस्कृत ग्रंथाच्या आधारें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पांचव्या निबंधांत महानुभावीयांच्या 'पंचोपाख्याना'च्या पोथीशीं उपलब्ध व प्रसिद्ध अशा दोन प्रतींतील अवतरणांची तुलना करून प्राचीन पाठ कोणता याची तौलनिक दृष्ट्या चिकित्सा केली आहे. हे पांचही निबंध प्राचीन मराठी भाषेच्या अभ्यासकांस उपयुक्त होतील.

**१० नरेंद्राचें रुक्मिणीस्वयंवर, सैहाद्रवर्णन आणि स्थानपोथी**—प्रस्तुत संशोधनलेखसंग्रहाच्या दुसऱ्या भागांत एकूण ८ निबंध निरनिराळ्या आठ महानुभावीय प्राचीन ग्रंथांच्या चिकित्सक अभ्यासाकरितां उपयोगांत आणले आहेत. सहाव्या निबंधांत नरेन्द्राच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'-वर चिकित्सक अशी चर्चा केली आहे. नरेन्द्राच्या 'रुक्मिणीस्वयंवरा'-संबंधाने अनेक जटिल प्रश्न उपस्थित झाले आहेत. पण ते प्रश्न कोणाही चिकित्सक विद्वानाला समाधानकारक रीतीने सोडवितां आले नाहीत.

'स्मृतिस्थळां'तील उताऱ्याप्रमाणे अपूर्ण असा हा ग्रंथ केवळ १८०० ओव्यांचा अपूर्ण ग्रंथ सादर करण्यांत आला होता. तो ग्रंथ राजास अर्पण न करतां तो अपुरा ग्रंथ नरेन्द्राने पंथाची दीक्षा घेऊन पंथांत आणला. आज जो पंथांत अपुरा ग्रंथ आहे त्याच्या फक्त ८४० की ८४९ इतक्याच ओव्या असून त्यांत सुदेव ब्राह्मण पत्रिका घेऊन द्वारकेस गेला, एवढाच मजकूर आहे. तेव्हा १८०० पैकीं बाकीच्या ओव्यांचें काय झालें, हें कळावयास मार्ग नाही अनेक पोथ्या पंथांत उपलब्ध आहेत, पण त्यांत फक्त इतक्या तोटक्याच ओव्या आहेत. कै. हरिभाऊ म्हणतात तेवढी एकच प्रत संपूर्ण 'रुक्मिणी-स्वयंवर' जींत आहे अशी व एकूण २८३९ ओव्या आहेत अशी कृष्णराज

पारमांडल्य या नांवाचे गृहस्थाजवळ आहे. २० वर्षांपूर्वी ती मजजवळ होती व तिची संपूर्ण प्रति तयार केलेली शारदाश्रमांत आहे. नरेन्द्राच्या या संपूर्ण पोथीसंबंधीं हरिभाऊंनी आपल्या अभ्यासाचें फलस्वरूप म्हणून विवेचन केलें आहे, ते अभ्यासकांस मार्गदर्शक होईल. संपूर्ण 'रुक्मिणीस्वयंवरा'चा कर्ता कोण हा प्रश्न विवाद्य आणि अनिर्णीत असा असला तरी या ग्रंथाचें महत्त्व कसें आहे, यासंबंधी हरिभाऊनी केलेली चर्चा फारच उद्बोधक आहे. सर्व विवेचन पूर्ण झाल्यावर हें संपूर्ण 'रुक्मिणीस्वयंवर' प्रकाशित होणें कसें आवश्यक आहे हें त्यांनी निःसंदेहात्मक शब्दांत सांगितलें आहे.

यापुढील निबंधांत नं. ७ व ८ मध्ये अनुक्रमें 'सैहाद्रवर्णन' आणि 'स्थानपोथी' या ग्रंथांसंबंधाने अभ्यासपूर्ण माहिती दिली आहे. हे निबंध प्रसिद्ध झाल्यानंतर डॉ. कोलते यांनी स्थानपोथी प्रसिद्ध केली असून आता अभ्यासकांस ती उपलब्ध आहे. ते दोन्हीहि प्राचीन मराठी वाङ्मयाच्या कक्षेतीलच ग्रंथ आहेत.

निबंध नं. ९ अन्वयस्थळ आणि वृद्धाचार व नं. १० कृष्णमुनीचें अन्वयस्थळ हे दोन्ही ग्रंथ महानुभावीय प्राचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. महानुभावीयांनी आपले ग्रंथच रक्षण करून ठेविले नाहीत तर धार्मिक दृष्टीनेच कां होईना ग्रंथकारांच्या परंपरा, त्यांनी लिहिलेले ग्रंथ आणि त्यासंबंधींच्या आख्यायिकाहि संरक्षून ठेविल्या आहेत, हें या निबंधांच्या वाचनाने कळून येईल. अशा तऱ्हेचा प्रयत्न मराठींतच काय पण संस्कृतमध्येहि झालेला दिसून येत नाही.

निबंध नं. ११ हयग्रीवाचार्यकृत 'गद्यराज' आणि नं. १२ गोपाळ कविकृत 'रुक्मिणीस्वयंवर' ह्या दोन अप्रकाशित ग्रंथांवर टिपणें दिलीं आहेत. पहिल्या ग्रंथाचें नांव 'गद्यराज' असलें तरी तो निर्यमक श्लोकबद्ध आहे. त्या या ग्रंथाचा वर्ण्य विषय भागवत दशमस्कंधांतील पूर्वार्धांत आलेलें विशेषतः बालचरित्र हा होय. ग्रंथ अप्रकाशित असला तरी पंथामध्ये त्याचें फार महत्त्व आहे. त्याचप्रमाणे गोपाळकवि याने वर्णिलेला ग्रंथ म्हणजे महानुभाव वाङ्मयांतील सर्वसाधारण विषय जो रुक्मिणीस्वयंवर तो आहे. कै. हरिभाऊंना केवळ या ग्रंथाची पांचच प्रकरणें मिळालीं. अद्याप तो ग्रंथ संपूर्ण उपलब्ध झाला नाही, तथापि त्या त्रुटित ग्रंथाचाच अभ्यास करून

त्या ग्रंथाचें महत्त्व अभ्यासकांसमोर ठेवलें आहे. नगरच्या मुधोजीपंत देशपांडे यांचा पुत्र गोपीभास्कर याने १६ व्या शतकांत हा ग्रंथ लिहिला. 'राजभद्र' आणि 'भगवद्‌गीताटीका' हे ग्रंथ त्याच्या नांवावर आहेत. 'प्रश्नार्णव' या ग्रंथाची माहिती कै. हरिभाऊंच्या या निबंधाने प्रथमच बाहेर येत आहे. श्रीचक्रधरांच्या निरूपणपद्धतीवर द्वात्रिंशल्लक्षण हा एक आणि दुसरा प्रश्नार्णव हे ग्रंथ आहेत. महानुभावीयांनी हें निरुपणाचें शास्त्र कसें बनविलें हें या दोन्ही ग्रंथांवरून दिसून येईल. हरिभाऊंनी आपल्या या निबंधांत प्रस्तुत ग्रंथांतील विषयाचें सारांशरूपाने उत्कृष्ट निवेदन केलें आहे.

याप्रमाणे हे तेराहि निबंध महानुभाव वाङ्मयाच्या अभ्यासास उपयुक्त आहेत.

**१२. हरिभाऊंच्या संशोधनपद्धतीचें वैशिष्ट्यः**—संशोधनाचें मुख्य कार्य म्हणजे सत्यान्वेषण. पण तें करीत असतांना पुष्कळदा अभ्यासकांमध्ये मतभेद होण्याचा संभव असतो, आणि दुसऱ्यांचें मत चुकीचें सिद्ध करून आपलें मत बरोबर आहे, हें सप्रमाण दाखवावें लागतें. तें करीत असतांना अभिनिवेशाने तोल जाऊं न देणें, हें योग्य आहे. आपलें मत सिद्ध करीत असतांना दुसऱ्याच्या मताबद्दल योग्य तो आदर ठवणें हें संशोधकाचें प्रथम कर्तव्य आहे. ही गोष्ट उत्तम तऱ्हेने कै. हरिभाऊंच्या अंगीं बाणली होती. त्यांनी आपल्या अनेक वर्षांपासून चालविलेल्या संशोधन क्षेत्रांत अनेक थोर व्यक्तींच्या मताशीं आपला मतभेद स्पष्ट पण त्या व्यक्तींसंबंधाने आणि त्यांच्या मतांसंबंधाने आदर दर्शवून सांगितला आहे. हें त्यांच्या आजवर प्रसिद्ध झालेल्या लिखाणावरून स्पष्ट होईल.

दुसरी गोष्ट त्यांच्या लिखाणावरून दिसते ती ही की, आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ शक्य तीं प्रमाणें सादर करून त्यावर आपलें मत आधारावयाचें. केवळ अनुमानाच्या भरवशावर एखाद्या मुद्याचें समर्थन करणें ही प्रद्धति चूक आहे ही त्यांना जाणीव होती. अशीं अनुमानात्मक विधानें त्यांच्या लिखाणांत आढळावयाचीं नाहीत. जेथे एखाद्या विधानाच्या पुष्ट्यर्थ पुरावा मिळणार नाही तेथें ते स्पष्ट सांगतील. या दृष्टीने पाहिलें असतां कै. हरिभाऊंनी केलेलें संशोधनकार्य फार मोलाचें आहे. कै. हरिभाऊंच्या संशोधन-

कार्याचें मूल्यमापन करीत असतां आगामी संशोधकांना एक धोक्याची सूचना द्यावीशी वाटते, तीस वर्षांपूर्वी उमरावतीस डी. ओ. मॉरीस म्हणून एक इंग्रज सेशन्स जज्ज होते. यवतमाळला त्यांचेसमोर सेशन्सचे मुकदमे चालविण्याचा मला अनेकदा योग आला होता. त्यांना एक खोड होती. दोन्ही बाजूंच्या वकिलांचें आपल्या पक्षाच्या समर्थनाचें भाषण संपल्यावर सेशन्स जज्ज ज्यूरीला मुकदमा समजावून सांगत, त्यावेळीं ते सांगत की, दोन्ही बाजूच्या वकीलांच्या बुद्धीच्या कक्षेंत येऊं शकली नाही ती महत्त्वाची गोष्ट अशी अशी आहे. सत्यान्वेषणापेक्षा त्या जज्ज साहेबाचा अट्टाहास हा होता की, दोन्ही पक्षांच्या वकिलांपेक्षा आपली बुद्धिमत्ता अधिक आहे व मी ही गोष्ट प्रथम उजेडांत आणतों. वाङ्मयसंशोधनाच्या क्षेत्रांतही आपल्या पूर्वी ज्यांनी एका विवक्षित विषयावर संशोधन केलें तें कमी प्रतीचें असून माझ्याच प्रयत्नाने ती गोष्ट सिद्ध होऊं शकली, अशासारखी वृत्ति संशोधनक्षेत्रांत क्वचित् दिसून येते. पण ती स्पृहणीय नाही. कै. हरिभाऊंचें संशोधनकार्य अशा प्रकारच्या दोषांपासून अलिप्त आहे.

१३. **समारोप**—कै. हरिभाऊंनी प्राचीन भाषा आणि प्राचीन महानुभावीय वाङ्मय या विषयांवर लेखन विपुल केलेलें असून तें निरनिराळया ठिकाणीं विखुरलेलें आहे, त्यांनी केलेलें संशोधनकार्य अनेक वर्षांच्या अभ्यासाने अधिकारयुक्त असें झालेलें आहे. ज्यांना प्राचीन मराठी भाषेचा आणि प्राचीन महानुभावीय वाङ्मयाचा सखोल अभ्यास करावयाचा आहे त्याला हरिभाऊंचे लेख अभ्यासिल्याशिवाय या अभ्यासाला पूर्णता यावयाची नाही, हें या भागांत प्रकाशित केलेल्या निबंधांवरून कोणाचीहि खात्री होईल. विदर्भ संशोधन मंडळाने हरिभाऊंच्या संशोधनलेखांचा प्रथम भाग एकत्र प्रकाशित करून अभ्यासकांची सोय करून दिली आहे, त्याबद्दल मंडळ धन्यवादास पात्र आहे. त्याचप्रमाणे मंडळ हरिभाऊंच्या बाकीच्या लेखांचे खंडहि प्रकाशित करून अभ्यासकांची सोय करतील अशी आशा आहे. प्रादेशिक सरकार आणि या विषयाची आवड असणारी जनता मंडळास या कामीं उत्तेजित करतील, असा विश्वास प्रदर्शित करून ही प्रस्तावना पुरी करतों. इति शम्.

**यशवंत खुशाल देशपांडे**

# कै. हरिभाऊ नेने यांचें जीवनचरित

हरिभाऊंचा जन्म मुंबई राज्याच्या सातारा जिल्ह्यांतील पाटण या गावीं ८ डिसेंबर १८९२ या दिवशीं झाला. त्यांचे वडील तहसील-दार होते. ते हरिभाऊ दहा वर्षांचे असतांच निधन पावले. त्यामुळे कुटुंबाचा सर्व भार त्यांच्या मातु:श्रीवर पडला. हरिभाऊ व त्यांच्या दोन लहान बहिणी अशा तीन मुलांना घेऊन त्यांच्या शिक्षणाकरिता त्या पुण्यास येऊन राहिल्या. मिळवता मनुष्य दिवंगत झाल्यावर एवढ्या कुटुंबाचा भार सहन करणें व मुलांच्या शिक्षणाची योग्य ती तजवीज करणें त्या माउलीला किती कठीण झालें असेल, याची आपणास कल्पनाहि करवत नाही. अशा परिस्थितींत धीर न सोडतां मिळेल तें काम करून त्यांनी मुलांचें पालनपोषण केलें. मुलांच्या शिक्ष-णांत हरिभाऊंच्या वडिलांचे स्नेही श्री. रामचंद्र वामन पेठे, डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर, यांचें त्यांना साहाय्य झालें. त्यांनी हरिभाऊंकडून घरींच एका वर्षांत तीन इयत्तांचा अभ्यास करवून घेऊन नंतर तेराव्या वर्षीं त्यांना पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये चौथ्या इयत्तेंत घातलें. हरिभाऊ बुद्धिमान् असल्याने त्यांना शाळेंत प्रथमपासून नादारी (फ्रीशिप्) मिळूं लागली. कुटुंबाच्या पोषणाकरिता व आपल्या शिक्षणा-करिता आपल्या मातु:श्रीला किती कष्ट पडतात तें पाहिल्यावर हरि-भाऊंनीहि चौथ्या इयत्तेपासून शिकवण्या व इतर कामें करून आपल्या मातु:श्रीला शक्य ती मदत करण्यास आरंभ केला. हरिभाऊंच्या उत्तर-कालीन आयुष्यांतील निरलसतेचें व अविश्रांत परिश्रमांचें बीज ह्या त्यांच्या बालपणाच्या परिस्थितींत सापडतें, यांत संशय नाही.

हरिभाऊंना मॅट्रिकच्या परीक्षेंत चांगलें यश मिळाल्यामुळे फर्ग्यु-सन कॉलेजांत त्यांना शिष्यवृत्ति मिळूं लागली व त्यांच्या उच्च शिक्षणाची सोय झाली. इंटरमध्ये असतो हरिभाऊंवर दु:खाचा दुसरा घाला आला. ज्या मातु:श्रीने त्यांना हालअपेष्टा सोसून वाढविलें होतें,

ती निधन पावली व हरिभाऊ असहाय झाले. या परिस्थितींत पुण्याचे डॉ. गणपतराव सहस्रबुद्धे यांनी त्यांना वहुमोल साहाय्य केलें. त्यायोगें त्यांना आपला शिक्षणक्रम पुरा करतां आला.

हरिभाऊ बी. ए. च्या वर्गांत गेले त्या वर्षी मुंबई विद्यापीठांतील शिक्षणक्रमांत बदल होऊन ऑनर्स कोर्स सुरू झाला. १९१४ सालीं बी. ए. ऑनर्सची पहिली परीक्षा झाली, तिच्यांत हरिभाऊ उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाले. पुढे पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत शिक्षकाची नोकरी धरून ते एम्. ए. चा अभ्यास करूं लागले. या कालांत त्यांचा व माझा प्रथम परिचय झाला. आमचे एक समान स्नेही, आता दिवंगत झालेले, मिरजेचे श्री. पारखी यांच्यावरोबर हरिभाऊ एम्. ए. परीक्षेच्या पाठ्यपुस्तकांविषयी कांही माहिती विचारण्यासाठी मजकडे डेक्कन कॉलेजांत आले होते. प्रथम भेटींतच त्यांचा ऋजु स्वभाव व अभ्यासु वृत्ति यांनी माझें मन आकृष्ट झालें. पुढे दैववशात् आम्ही दोघेहि या प्रांतांत नोकरीच्या निमित्ताने आल्यावर परस्परांचा जास्त संबंध येऊन ओळखीचें मैत्रींत रूपांतर झालें. असो.

## स्वाभिमानी वृत्तीमुळे विदर्भांत आगमन

पुण्यासारख्या पुढारलेल्या शहरीं शिक्षकाची नोकरी असतां ती सोडून त्याच प्रकारच्या नोकरीसाठी विशेष लाभ नसतांहि हरिभाऊ इतक्या दूर कां आले, हें कोडें मला बरेच दिवस पडलें होतें. त्यांच्या निधनापूर्वी एका दिवशीं सहज गोष्टी निघाल्या असतां त्यासंबंधी विचारतां हरिभाऊ म्हणाले, 'मी एम. ए. पास झाल्यावर नूतन मराठीमध्ये माझी झालेली नोकरी लक्षांत घेऊन मला कायम केलें जाईल व पगारांतहि योग्य ती बढती मिळेल अशी मला अपेक्षा होती. पण तें बाजूलाच राहून माझ्यानंतर नोकरीला लागलेल्या एका शिक्षकाला कायम करण्यांत आलें; व त्याचा पगारहि वाढविण्यांत आला. या अन्यायाची चीड येऊन मी पुणें सोडण्याचें ठरविलें; व या प्रांताच्या शिक्षणखात्याकडे अर्ज केला. या प्रसंगाने मी इकडे आलों.' या घटनेवरून हरिभाऊंच्या स्वाभिमानी वृत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो.

## यदल्पमपि तद् बहु

या प्रांताच्या शिक्षणखात्यांतील हरिभाऊंची बहुतेक नोकरी नागपुरासच पटवर्धन हायस्कूलमध्ये झाली. ते इंग्लिश व संस्कृत विषयांत एम्. ए. झाले होते. पुढे मराठीचा अभ्यास वाढल्यावर त्यांनी मराठी विषयांतहि एम्. ए. पदवी घेण्याचें ठरविलें; व मुंबई विश्व-विद्यालयाची ती परीक्षाहि ते उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले. त्यापूर्वी स्पेन्स् ट्रेनिंग कॉलेजांतून अलाहाबाद विद्यापीठाची शिक्षणशास्त्रविषयक एल्. टी. परीक्षाहि ते पास झाले होते. पटवर्धन हायस्कुलांतील अध्या-पनकार्यामुळे उत्तम शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक झाला होता. कै. नीळकंठराव भवाळकर यांच्याशीं स्नेह झाल्यावर महानुभाव वाङ्मयाचें परिशीलन सुरू होऊन कांही ग्रंथ व लेख त्यांच्या साहाय्याने व कांही स्वतःच प्रसिद्ध करून त्यांनी संशोधक म्हणूनहि कीर्ति मिळविली होती. इतके गुण संपादन केल्यावर संधि आली असतां आपणास कॉलेजांतील प्राध्यापकाची जागा मिळावी, अशी त्यांची अपेक्षा असणें साहजिक आहे. अशा दोन तीन प्रसंगीं त्यांनी अर्जहि केले होते. पण त्यांत त्यांस यश आलें नाही. शाळेंत शिक्षकाची नोकरी एकदा पत्करल्यावर अंगीं कितीहि गुण असले तरी वरिष्ठ पद मिळविणें कठीण जातें, याचा अनुभव त्यांना आला. दैव हेंहि त्यांच्या अपयशाचें दुसरें कारण असावें. कारण एकदा निवडणूक कमिटीने मराठी प्राध्यापकाच्या जागेसाठी त्यांची शिफारस केली असतांहि तत्कालीन अधिकाऱ्यांस ती पसंत न पडल्यामुळे कांही तांत्रिक दोष काढून त्या कमिटीचेंच विसर्जन करण्यांत आलें, असें म्हणतात. तथापि या प्रसंगाने निराश न होतां त्यांनी आपलें सामाजिक कार्य व संशोधन चालू ठेवलें. हरिभाऊ गुणी असले, तरी मितभाषी होते. अधिकारीवर्गाची खुशामत करून आपली बढती करून घेण्याची त्यांची प्रवृत्ति नव्हती. म्हणून शाळाखात्यांतील वरिष्ठ जागाहि त्यांच्या नोकरीच्या अखेरीअखेरीपर्यंत त्यांस मिळाली नाही. पण त्याचा विषाद त्यांनी कधीहि मानला नाही. "अकृत्वा परसन्तापमगत्वा खलनम्रताम् । अनुल्लंघ्य सतां मार्गं यदल्पमपि तद्बहु ॥" या सुभाषितांत

वर्णिल्याप्रमाणे दुसऱ्यास त्रास न देतां, कोणाची हांजी हांजी न करतां व सज्जनांचा मार्ग न सोडतां जें कांही मिळेल त्यांत ते संतुष्ट असत.

## अखेर मिळालेली वढती

शेवटीं १९४६ मध्ये नोकरीचें एक दीड वर्ष उरलेलें असतांना, प्रथम जबलपूरच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून व नंतर सहा महिन्यांनी अमरावती येथे नवीनच काढण्यांत आलेल्या पुरुषांच्या डिप्लोमा इन्स्टिटयूट्चे पहिले प्राचार्य म्हणून त्यांची नेमणूक झाली. एखादी नवी शिक्षण संस्था चालविणाऱ्या प्रमुखाला प्रथम प्रथम अतिशय काम पडतें, विविध प्रकारच्या कार्याचा प्रारंभ करावा लागतो. हरिभाऊं- नी पटवर्धन हायस्कूलमध्ये एक दोन प्रसंगीं स्थानापन्न मुख्याध्यापकाचें काम केलेलें असल्यामुळे त्यांना त्या कामाची पूर्ण माहिती होती. त्यांनी अल्पावधींतच आपल्या नवीन संस्थेची घडी नीट बसवून आपल्या सहा- ध्यापकांचा तसेंच शिक्षक विद्यार्थ्यांचा आदर व प्रेम संपादन केलें. पुढे मध्यप्रदेश शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे त्यांची अमरावतींतील नोकरी दोन वर्षें आणखी लांबली. शेवटीं ते १९५० च्या एप्रिलमध्ये सेवा- निवृत्त झाले.

## नागपुरांत ३० वर्षें केलेलें कार्य

सन १९१७ पासून १९५४ पर्यंत मधलीं तीन चार वर्षे सोडल्यास हरिभाऊंचें नागपुरास सतत वास्तव्य होतें. या काळांत राजाराम वाच- नालय, भिडे कन्याशाळा, सहकारी संस्था, सूतिकागृह, शारीरिक शिक्षण- मंडळ, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, अभिनव नाटयमंदिर, महाराष्ट्र साहित्य परिषद्, सार्वजनिक उत्सव मंडळ, विदर्भ साहित्य संघ इत्यादि अनेक संस्थांत त्यांनी उत्तम प्रकारची कामगिरी केली. शाळाखात्यांतला शिक्षक म्हणजे तीस तीस तास शाळेंत काम करून व घरीं विद्यार्थ्यांच्या वह्यांचे गठ्ठे तपासून बेजार झालेला असावयाचा. पण अशाहि परिस्थितींत हरिभाऊंनी किती विविध प्रकारांनी विद्येची व या प्रांतांतील जनतेची सेवा केली हें पाहिलें म्हणजे मन आश्चर्याने थक्क होतें. ते इतकें कार्य करूं शकले, याचें कारण त्यांची निरलस वृत्ति आणि ज्ञानार्जनाविषयीं

व सार्वजनिक कार्याविषयी त्यांची आंतरिक तळमळ हेंच होय. 'क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्' या संस्कृत सुभाषितांतील विद्यार्जन-विषयक उपदेश त्यांच्या अंगीं पूर्णपणे बाणला होता. त्यांनी इतकें कार्य केलें, पण त्याविषयी अहंकाराचा एकहि शब्द त्यांनी कोठेहि काढला नाही यांत त्यांची थोरवी आहे. पडेल तें काम निःस्वार्थी बुद्धीने करीत राहावयाचें, हा त्यांचा नेहमीचा बाणा. त्यामुळे त्यांचा कोणाशींहि खटका उडाला नाही व कोणी त्यांचा हेवा केला नाही. ते खरे अजातशत्रु होते.

## विविध वाङ्मयसेवा

हरिभाऊंनी लिहिलेल्या पुस्तकांचे व लेखांचे तीन विभाग करतां येतात—(१) शालोपयोगी, (२) शिक्षणशास्त्रविषयक आणि (३) संशोधनपर. या तीनहि विभागांतील त्यांची कामगिरी स्पृहणीय झाली आहे.

(१) **शालोपयोगी पुस्तकें**—हरिभाऊंना लहापणापासून इतरांस शिकविण्याचा अनुभव होता. ट्रेनिंग कॉलेजांत त्यांना शिक्षणतत्त्वांचा उत्तम परिचय झाला होता. व त्यावर त्यांनी 'शिक्षणकला व मानस-शास्त्र' या नांवाचें पुस्तकहि लिहिलें होतें. इतर विषयांच्या अध्यापनांत ज्या शिक्षणतत्त्वांचा अवलंब करण्यांत येतो, त्याचा संस्कृत विषयाच्याहि अध्यापनांत उपयोग करून तो विषय विद्यार्थ्यांस सुबोध व मनोरंजक करावा, या हेतूने त्यांनी संस्कृत पहिलें पुस्तक (१९२५) व संस्कृत दुसरें पुस्तक (१९२८) हीं दोन पुस्तकें लिहिलीं. या दोन्ही पुस्तकांच्या चार पांच आवृत्त्या आतापर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यावरून तीं लिहिण्यांत हरिभाऊंचा हेतु साध्य झाला, असें म्हणण्यास हरकत नाही. याखेरीज त्यांनी 'संस्कृतपुष्पहार' नामक संस्कृत वेंच्यांचें पुस्तक तयार केलें होतें, ते या प्रांतांतील हायस्कूल सर्टिफिकेट परीक्षेस पाठ्यपुस्तक म्हणून कांही वर्षें नेमलें होतें.

(२) **शिक्षणशास्त्रविषयक**—हरिभाऊंच्या 'शिक्षणकला व मानसशास्त्र' या पुस्तकाचा उल्लेख मागे आला आहे. या पुस्तकाची रूपरेखा व कच्ची प्रत १९२४ सालींच तयार झाली होती. पण त्याच्या

प्रकाशनाचा योग येण्यास त्यानंतर सहा वर्षे लागलीं. या पुस्तकांत हरिभाऊंनी शिक्षणकला व मानसशास्त्र यावरील इंग्रजींतील प्रमाणभूत ग्रंथांचें परिशीलन करून व मराठींतीलहि तद्विषयक ग्रंथ व लेख अभ्यासून बनलेलीं आपलीं मतें स्वतंत्रपणे मांडलीं आहेत. या ग्रंथाला अलाहाबाद विद्यापीठाचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक रामभाऊ रानडे यांची प्रस्तावना लाभली आहे.

## संशोधनकार्य

**(३) संशोधनपर ग्रंथ व लेख**—वरील ग्रंथांपेक्षा महानुभावीय व इतर संशोधनकार्यामुळेच हरिभाऊंचें नांव या प्रांतांत व इतरत्र असलेल्या विद्वानांस परिचित झालें; व त्यांच्या योगेंच त्यांची कीर्ति चिरकाल टिकेल. कै. नीळकंठराव भवाळकर या विद्वान्, साक्षेपी, बहुश्रुत व संशोधनप्रिय गृहस्थांच्या सहवासांत हरिभाऊंचें लक्ष महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासाकडे वळलें. महानुभावपंथाचे लोक आपले ग्रंथ इतरांस दाखविण्यास तयार होत नसत. पण भवाळकर–नेने या जोडीने आपल्या संशोधनविषयक आस्थेने व चिकाटीने कांही महानुभावांचें प्रेम संपादन करून महानुभावीय वाङ्मयाच्या अभ्यासास प्रारंभ केला. त्याचें पहिलें फळ 'श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रें, भाग पहिला' या ग्रंथाच्या रूपाने सन १९३१ मध्ये बाहेर पडलें. हा ग्रंथ भवाळकर व नेने या दोघांच्या नांवावर प्रसिद्ध झालेला आहे. यांतील प्रस्तावनेंत भवाळकरांनी हरिभाऊंच्या भागाविषयीं लिहितांना पुढील उद्गार काढले आहेत. 'त्यांनी (हरिभाऊंनी) सांकेतिक लिपीचा अभ्यास करून प्रत्येक हस्तलिखित स्वतः तपासलें आहे; व प्रायः दुर्बोध, कित्येकदा अस्पष्ट व अनेकदा अशुद्ध अशा लिपि व भाषा आत्मसात् करण्याच्या उत्साहांत त्यांनी आपली दृष्टि मध्यंतरीं बिघडवून घेतली. . . . भाषाविषयक टीपा सर्वस्वी त्यांच्याच आहेत व या दिशेने प्राचीन मराठी ग्रंथांचें अध्ययन करण्याची प्रथा पाडण्याचें श्रेय त्यांना देणें योग्य व न्याय्य होय.' या ग्रंथाने हरिभाऊंचें नांव संशोधक म्हणून सर्वांस परिचित झालें. यानंतर आचारस्थळ, लक्षणरत्नाकर, दृष्टांतपाठ, रत्नमालास्तोत्र (पूर्वार्ध व उत्तरार्ध), लीळाचरित्र इत्यादि अनेक महानुभावीय ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांपैकी

दृष्टांतपाठाखेरीज इतर सर्व हरिभाऊंनी एकट्यांनी संपादून प्रसिद्ध केले आहेत. यां सर्व ग्रंथांस उपोद्घात, टीका, टिप्पण्या इत्यादिकांनी परिष्कृत केलें आहे.

## मध्यप्रदेश संशोधन मंडळांतील कार्य

महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अधिवेशन नागपुरास भरलें, त्या प्रसंगीं मध्यप्रांत (आता विदर्भ) संशोधन मंडळाची स्थापना होऊन १९३४ सालीं मकरसंक्रांतीस त्याच्या कार्यास आरंभ झाला. मंडळाच्या संस्थापकांमध्ये कै. भवाळकर व नेने हे प्रमुख होते, किंबहुना त्यांच्यासारख्या ख्यातनाम संशोधकांचें साहाय्य नसतें, तर इतरांस ती संस्था काढण्याचें धैर्य क्वचितच झालें असतें. पुढे मंडळाच्या सभांत व वार्षिक–दिन–प्रसंगीं हरिभाऊंनी अनेक निबंध व टिपणें वाचलीं. आरंभीं आरंभी या सभांना चांगलाच रंग येई. नागपुरांत महानुभावीय वाङ्मयाच्या चिकित्सक अभ्यासाची ती प्रभात होती. त्या वाङ्मयाच्या स्वरूपाविषयीं, काळाविषयीं व कर्तृत्वाविषयीं भिन्न भिन्न मतें प्रचलित असल्यामुळे हरिभाऊ आपल्या निबंधांत व भाषणांत प्रतिपक्षांच्या आक्षेपांना उत्तर देण्याकरिता प्रमाणांमागून प्रमाणें मांडीत व श्रोत्यांची खात्री करण्याकरिता त्यांना प्रत्यक्ष पोथ्या दाखवीत. त्यांचें भाषण दोन दोन तास चाले. त्यावेळचा त्यांचा अभिनिवेश व महानुभावी वाङ्मयावरील त्यांचें निस्सीम प्रेम पाहून त्यांचे मित्र त्यांना थट्टेने 'महानुभाव' म्हणू लागले; व कांहींना तर ते महानुभाव पंथाची दीक्षा घेतात काय असेंहि वाटू लागले.

## महानुभावीय वाङ्मयाचें संशोधन हरिभाऊंच्या इतकें कोणीच केलें नाही

याशिवाय भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक संमेलनप्रसंगीं प्रतिवर्षी त्यांना निमंत्रण येई; व तेहि एखादा निबंध पाठविण्यास चुकत नसत. अशा निबंधांपैकी कांही त्या मंडळाच्या त्रैमासिकांत प्रकाशित झालेले आहेत. आणि अन्वयस्थळ, वृद्धाचार व लक्षणरत्नाकर यांवरील लेख मंडळाच्या स्वीय ग्रंथमालेंत (क्र. ४४) समाविष्ट केले

आहेत. दृष्टान्तपाठ हा भवाळकर–नेने यांनी संपादिलेला ग्रंथ मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत प्रसिद्ध झाला आहे. लीळाचरित्राचा 'एकांक' नामक प्रथम भाग विद्यापीठाच्या परीक्षेस लावला असल्यामुळे त्याच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. महानुभावीय वाङ्मयाचे सुप्रसिद्ध संशोधक प्रा. डॉ. वि. भि. कोलते यांनी एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे 'महानुभावीय वाङ्मयाचें आस्थेवाईकपणाने संशोधन करून तें प्रसिद्ध करण्याचें कार्य हरिभाऊंच्या इतकें कोणीच केलें नाही.'

## ज्ञानेश्वरीचा अभ्यास

महानुभावीय वाङ्मयाप्रमाणे ज्ञानेश्वरी हाहि हरिभाऊंचा आवडता ग्रंथ होता; व त्याचें परिशीलन ते सदैव करीत असत. अहमदनगरच्या वाङ्मयोपासक मंडळाने १९३४ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'श्रीज्ञानेश्वदर्शन' ग्रंथांत (भाग १, पृ. २९–५३) हरिभाऊंचा 'ज्ञानेश्वरकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण' या विषयावर विस्तृत लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून त्यांच्या ज्ञानेश्वरीविषयक खोल अभ्यासाची प्रतीति येते.

## विदर्भ साहित्य संघाची सेवा

१९५० सालीं सेवानिवृत्त झाल्यावर नागपुरासच उर्वरित आयुष्य घालविण्याचा संकल्प करून ते येथे स्थायिक झाले. यानंतरचा त्यांचा बहुतेक वेळ विदर्भ साहित्य संघांच्या सेवेंत गेला. सन १९५० पासून तीन चार वर्षांत झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या प्रगतीसाठी ज्यांचे अविश्रांत परिश्रम कारणीभूत झाले आहेत त्यांमध्ये हरिभाऊंची गणना प्रामुख्याने करावी लागेल. ते त्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद व चिटणीस होते. त्यांनी केलेले परिश्रम व त्यांची साहित्यसेवा लक्षांत घेऊन विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांनी १९५५ च्या अध्यक्षपदासाठी त्यांची अविरोध निवड केली; व त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें १९५४ च्या एप्रिल महिन्यामध्ये विदर्भ साहित्य मंदिराचें उद्‌घाटन मोठ्या थाटाने झालें. त्यानंतर लवकरच

होऊं घातलेलें अचलपूरचें विदर्भ साहित्य संमेलनहि त्यांच्या अध्यक्षत्वाखाली निर्विघ्नपणें पार पडेल व त्यांच्या अध्यक्षीय भाषणाने त्यांच्या साहित्यसेवेवर कळस चढेल याविषयीं कोणासहि शंका नव्हती. कारण हरिभाऊंची प्रकृति उत्तम दिसत होती. पण ईश्वरी संकेत निराळा होता. नोव्हेंबर महिन्याच्या आरंभीं विदर्भ साहित्य संघांत झालेल्या 'महाभारतसार' ग्रंथाच्या प्रकाशनसमारंभांत ते उपस्थित होते. पण त्यानंतर त्यांच्या प्रकृतींत बिघाड उत्पन्न झाला; व दोन आठवड्यांच्या अल्पावधींत रोगाने त्यांचें शरीर पोखरून काढलें. प्रकृति अत्यंत क्षीण झाली असतांहि त्यांनी विदर्भ साहित्यसंघाच्या अध्यक्षपदाचें कार्य चालू ठेवलें. अगदी शेवटल्या दिवशींहि (ता. २१–११–५४) आपल्या निवासस्थानीं कार्यकारी मंडळाची सभा भरवून चर्चा केली; व रात्रीं त्यासंबंधीच्या कागदपत्रांवर स्वाक्षरीहि केली. त्याच रात्रीं पहाटे त्यांचें देहावसान झालें. अंगीकृत कार्याचें अगदी शेवटच्या क्षणापर्यंत परिपालन करणारे त्यांच्यासारखे कर्तव्यनिष्ठ गृहस्थ क्वचितच आढळतील.

## बहुगुणी कार्यकर्ता हरपला

हरिभाऊ बहुगुणी होते. तरुणपणीं त्यांना कुस्तीचा नाद होता. वेताच्या मलखांबावरचें त्यांचें आश्चर्यकारक काम नागपुरास पाहिलेलें अनेकांना आठवत असेल. ते अभिनयकुशल होते. सहकारी संस्थेच्या विद्यमानें झालेल्या अनेक नाट्यप्रयोगांचें त्यांनी दिग्दर्शन केलें होतें, इतकेंच नाही, तर त्यांत स्वतः कामहि केलें होतें. वक्तृत्वांत–विशेषतः विनोदी वक्तृत्वांत–त्यांची बरोबरी करणारे क्वचितच आढळतील. कोट्या करण्यांत त्यांचा हातखंडा होता. सभेच्या शेवटीं हरिभाऊ आभार मानतांना कोणती कोटी करतात याविषयीं श्रोत्यांचें कुतूहल असे. विद्वत्ता, संशोधकत्व, वक्तृत्व, कलाभिज्ञता इत्यादि गुणांप्रमाणेच साधेपणा, मनमिळाऊ वृत्ति, आनंदी स्वभाव, निरपेक्षता इत्यादि गुणांचें मधुर मीलन हरिभाऊंच्या ठिकाणीं वसत असल्यामुळे त्यांच्या अकालीं निधनाने आपला जिवलग स्नेही दिवंगत झाला, असें वाटून सर्वांस अपरिमित दुःख झालें, यांत नवल नाही.

**वा. वि. मिराशी**

२२२२५ वि: १२७
९९५२ नों: दि: १२

# संशोधनलेखसंग्रह

## भाग पहिला

६२७४

## विभाग १ : प्राचीन मराठी वाङ्मय

### ज्ञानेश्वरीकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण*

उदैलेयां भावा रूप । करितां लागे रसवृत्तीचें वडप ।
चातुर्य म्हणे हें पडप । जोडलें आम्हां ।।
तैसें देशियेचें लावण्य । हरौनि रसां आणिजैल तारुण्य ।
मग म्हणिपैल अगण्य । गीतातत्त्व ।। १०-४५-४६.

'श्री-ज्ञानेश्वर-दर्शना'च्या भव्य, पवित्र व रमणीय प्रासादांत अनेक विस्तृत दालनें असून, ज्ञानेश्वरीसंबंधीच्या अनेक प्रेक्षणीय वस्तु त्यांत आकर्षक रीतीने व कुशलपणाने मांडलेल्या आहेत. प्रेक्षकांना आंतील वस्तूंची माहिती करून देण्यासाठी, आपल्या गाढ विद्वत्तेने, दीर्घ व्यासंगाने व ज्ञानेश्वरीवरील प्रेमाने लोकांच्या आदरास व प्रेमास पात्र झालेल्या कांही परिचित व्यक्ति, कांही दालनांच्या मुखद्वारांजवळ आतुरतेने उभ्या आहेत;

* 'ज्ञानेश्वर-दर्शन', साहित्य खंड, पृ.२९-५३. या लेखांत असलेले उतारे राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरींतील आहेत.

हें पाहून, प्रेक्षकांचा घोळका त्यांच्या मागोमाग जाऊन, आंत डोकावून, आपल्या नेत्रांचें पारणें फेडल्याशिवाय कसा राहील? कांही दालनांच्या शिरोभागीं असलेल्या नामनिर्देशक पाट्या पाहूनच कोणाला आंत जाण्याचा मोह झाला तर त्यांत काय नवल! पण प्रस्तुत दालनाच्या तोंडाशीं असलेली पाटी पाहिल्यामुळे म्हणा किंवा मार्गदर्शक व्यक्ति अपरिचित म्हणून म्हणा, प्रेक्षकांना बुजल्यासारखें होण्याचा संभव आहे. पण शिरोभागीं म्हटल्याप्रमाणे कोणताहि मनोभाव उत्पन्न होऊन जरा आकारास येऊं लागला की, रसाळपणाची झड सुरू करणारी, चातुर्यालाहि खुलविणारी व देशी बोलांचें सौंदर्य लुटून आणून सरसतेने गीतातत्त्व गळीं उतरविणारी ही ज्ञानेश्वरांची वाणी 'व्याकरणदृष्टीने' देखील प्रेक्षकांना रमविल्याशिवाय राहणार नाही. ज्ञानेश्वरीरूपी भाषातरंगिणीच्या कोणत्याहि घाटावर बसून तेथील देखावे पाहूं लागल्यास हृदयास आनंदच होतो.

म्हणौनि महाकाव्या राउ । ग्रंथु गरुवतिचा ठाउ
एथौनि रसां जाला आवो । रसाळपणांचा ।।
तेंवि चि आइकां आणिक हो एक । एथौनि शब्दश्री भली
शास्त्रिक । आणि महाबोधीं कोंवळिक । दुणावली ।।
एथ चातुर्य सिहाणें जालें । प्रेम रुचीसि आलें ।
आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ।। अ. १-३३-३५.

महाभारतग्रंथाचें गौरव वरीलप्रमाणे वर्णन करीत असतां, अनायासाने ज्ञानेश्वरीचें अनेक दृष्टीने महत्त्व त्यांनी जणो काय वर्णिलें आहे असें वाटतें. ज्ञानेश्वरीमुळे मराठी बोलांना शास्त्रशुद्धता प्राप्त झाली; आत्मबोधाचा कोमलपणा दुणावला; चातुर्याला शहाणपण लाभलें; भक्तिरस स्वादाला चढला; सुखाचें सौभाग्य पुष्ट झालें. म्हणूनच इंग्रजी, संस्कृत व मराठी या भाषेंत ज्ञानेश्वरीचे उतारे आले असले तरी मूळ ज्ञानेश्वरीची गोडी व महत्त्व कांही अपूर्व आहे. अशा योग्यतेचा हा ग्रंथ नसता तर त्याच्या व्याकरणाबद्दल सामान्य जनता उदासच राहिली असती. मराठी भाषेचा विकास कसा झाला हें पाहणाऱ्या कांही थोडया विद्वानांनी फार तर या ग्रंथाकडे कांही दिवस दृष्टि दिली असती.

२. वास्तविक पाहतां ज्ञानेश्वरीकालीन श्रोत्यांना व्याकरणशास्त्राच्या ज्ञानाशिवाय कळण्याजोगा हा ग्रंथ होता. आबालवृद्धांपैकी कोणीहि हा आनंद लुटावा अशी या ग्रंथाची निरूपण–पद्धति होती.

**तीरें संस्कृताचीं गहनें । तोडूनि मऱ्हाटिया केलीं शब्दसोपानें ।**
**रचिलीं धर्मनिधानें । निवृत्तिदेवें ।। ११-९.**

**म्हणौनि भलतेणें एथ न्हावें । प्रयागीं माधवीं विश्वरूपातें पाहावें।**
**एतुलेनि संसारा देयावें । तिलोदक ।। ११-१०.**

वरील ओव्यांत म्हटल्याप्रमाणे अत्यंत सुबोध असा हा ग्रंथ असतां, ६००–६५० वर्षांचा दीर्घकाल लोटल्याने तोच विद्वानांनाहि दुर्बोध वाटतो; त्या वेळची लोकांची प्रत्यक्ष व्यवहारांतील ही बोली आज पुष्कळांना अवघड व अपरिचित वाटते. तथापि ज्ञानेश्वरीची महती ओळखून एकनाथांनी आपल्या महत्प्रयत्नाने चालना दिल्यामुळे एकनाथानंतरच्या संतांनी तिची परंपरा कायम ठेवली. पण पुढे पुढे या परंपरेंत भावनेला प्राधान्य मिळाल्याने 'केवळ धार्मिक पुस्तक म्हणून वाचावयाचें' असे वाचक फार झाले. अलीकडे तर जुन्या कवींचें वाचन पूर्वीसारखें नसल्याने, ज्ञानेश्वरीची भाषा फारच अपरिचित झाली. 'माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके ।।' अशा कांही ठराविक ओव्यांशिवाय नव्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या समाजाला ज्ञानेश्वरीचें प्रत्यक्ष ज्ञान नाही. ज्ञानेश्वरीच्या रसाळपणाबद्दल त्यांनी या ओव्या इतर प्रचलित ग्रंथांत वाचलेल्या असतात. तेव्हा प्रत्यक्ष ज्ञानेश्वरीचें दर्शन होण्यास व्याकरण-शास्त्राची थोडीशी कास धरणें जरूर आहे. तेव्हा प्रस्तुत लेखांत अशा वाचकांना ज्ञानेश्वरी वाचण्यास मदत व्हावी म्हणून ज्ञानेश्वरीव्याकरणाचें तेवढयापुरतें स्वरूप यथाशक्ति दाखविण्याचें योजिलें आहे. मराठी भाषेचा विकास अथवा ज्ञानेश्वरीचें ऐतिहासिक व्याकरण अशा प्रकारचा हा लेख नव्हे; तेव्हा प्रेक्षकांनी या दालनाजवळ आल्यावर बुजून न जातां, इतर दालनें पाहून झाल्यावर, त्या त्या वस्तूंचा अनुभव, ज्ञानेश्वरी मूळ स्वरूपांत वाचून घ्यावा, या उद्देशाने या ठिकाणीं थोडा वेळ घालविला तर इष्ट अशीच गोष्ट होईल.

३. खरें पाहिलें असतां ज्ञानेश्वरीची भाषा वाटते तितकी अवघड नाही. एकनाथ, मुक्तेश्वर इत्यादिकांच्या ग्रंथांचें अध्ययन केल्यास ज्ञानेश्वरी इतकी अपरिचित वाटणार नाही. भाषेची दुर्बोधता वरील ग्रंथांच्या थोडयाशा अभ्यासानें नाहीशी होण्यासारखी आहे. व्याकरणाचा हात धरून थोडा वेळ गेल्यास या ग्रंथांत अधिक प्रवेश खास होईल. संस्कृत, प्राकृत इत्यादि भाषांचा ज्यांना अभ्यास आहे त्यांना हा ग्रंथ कठीण वाटण्याचें कारण नाही. कै. म. पां. ओक यांच्या 'संस्कृतज्ञानेश्वरी'मुळे संस्कृत जाणणाऱ्यांची सोय उत्तम झाली आहे. तौलनिक भाषाशास्त्राचें अध्ययन करणाऱ्यांना प्राचीन मराठीचा हा ठेवा अमूल्य आहे. पण ज्यांना संस्कृताचें ज्ञान नाही व जुन्या कवींच्या ग्रंथांचें ज्यांचें वाचन नाही अशांना ज्ञानेश्वरीच्या साक्षाद्दर्शनाची कांही तरी सोय पाहिजे आहे. प्रस्तुत ठिकाणीं विशेषतः त्या उद्देशानें अल्पसा प्रयत्न केला आहे.

४. ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय वाचायला सुरवात करावी तोंच २–३ पानांत कितीतरी गोष्टी अवघड व अपरिचित वाटूं लागतात व मूळची ज्ञानेश्वरी वाचण्याची हौस एकदम थंडगार पडते. गणेशु, निवृत्तिदासु वगैरे रूपें पाहून गंमत वाटते, तर अवधारिजो, रंगाथिलें, म्हणिपति, वास पाहिजे, पुडुतीं पुडुतीं, वसैठ, ग्रंथगरुवति, पांतां, नावेक, बीक वगैरे शब्द पाहून वाचक बुचकळयांतच पडतो. 'नानाप्रमेयाची परि', 'पल्लव सडका मिरविति,' 'मियां गुरुकृपा नमिलें,' 'तेणें संसारापुरु तारलों,' 'दृष्टीसि पाटा फुटे,' 'जाणतेन गुरु भजिजे,' 'सोभाग्य पोखलें' 'रंगीं सुरंगतेची आगळिक,' 'हळुवारपण चित्तां । आणूनियां' इत्यादि वाक्प्रचार व प्रयोग वाचतांना शब्दांच्या उच्चाराबरोबर परि, सडका, मियां, पाटा, आगळिक इत्यादि शब्दांशीं संलग्न असलेले प्रचलित अर्थ मनांत आले तर वाचकांचा घोटाळाच उडतो. तेव्हां ज्ञानेश्वरी वाचतांना वाचकांनीं आपली वृत्ति तन्मय केली पाहिजे.

**जैसें भ्रमर पराग नेति । परि कमलदलें नेला नेणती ।**
**तैसी परि आहे सेविती । ग्रंथीं इये ।। १–५९.**
**ऐसेनि गंभीरपणें । थिरावलेनि अंतष्करणें ।**
**आथिला तो जाणे । मातु इये ।। १–६१.**

सारांश, वाचकांनी आपलें मन नाजुक करून, गंभीरपणाने, सावधान वृत्तीने या ग्रंथाचें वाचन करणें हीच या ग्रंथाची 'सेविती परि' म्हणजे आस्वादनाची पद्धति होय. तेव्हा ग्रंथाच्या वातावरणांत मन प्रविष्ट झाल्याशिवाय शब्दाचे अर्थ कळणें कठीण होईल.

५. वीक, वसट, चोखड, विसणैला, सुरवाडले, सांदुकला, दळवैपणा, दुवाडपण, वेंथु, मीनले, इत्यादि शब्द अगदीच अपरिचित असल्याने पुनः पुनः वाचून त्यांचे अर्थ ध्यानांत ठेवणें याशिवाय गत्यंतर नाही. एक अध्याय वाचून झाल्यावर तोच अध्याय मुळांतूनच अनेक वेळां वाचल्यास या शब्दांचा सराव होऊन जाईल व दुसरा अध्याय वाचण्याचे वेळीं, या घेतलेल्या त्रासाचा उपयोग होइल. पुनरावृत्ति हाच राजमार्ग वरील शब्दांचे अर्थ ध्यानांत ठेवण्यास होय.

६. एकनाथी भागवत, मुक्तेश्वर भारत इत्यादि ग्रंथ वाचनांत ठेवल्यास, नावेक, पुढुतींपुढुतीं, कीजे, दीजे, साहिजैल, केउतें, कें, आथि, जियावें, आंतौरियां, सांघे, जवं, तवं, अशेख, पारुखे, सूये, सूद्ले इत्यादि शब्द व त्यांचीं रूपें बरीचशीं परिचित होतील.

७. मराठी भाषेच्या घटनेचें ऐतिहासिक दृष्टया परीक्षण केल्यास तिच्यावर संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादि निरनिराळ्या भाषांची छाया पडलेली आहे. केवळ वरवर पाहिलें तरी संस्कृत ही मराठीची प्रत्यक्ष माता नव्हे. वर्णांमध्ये होणारा फरक, उच्चारांतील बदल, वाक्प्रचार व प्रयोग यांची भिन्नता, शब्दांच्या व धातूंच्या रूपांत दिसणारा निराळेपणा इत्यादिकांवरून ही गोष्ट स्पष्ट होणारी आहे. तेव्हा संस्कृत जाणणाऱ्या वाचकांनी वरील मुद्दा विशेष लक्षांत ठेवला पाहिजे. संस्कृतांतील नियम मराठीला लावतांना त्यांनी काळजी घेतली पाहिजे.

८. एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत शब्द उतरतांना त्या त्या भाषा बोलणारांना तो उच्चार करण्यास ज्या रीतीनें सोपें जाईल, त्या रीतीने शब्दाच्या उच्चारांत फरक होत जातो. प्राचीन मराठी व प्रचलित मराठी या दृष्टीने पुढील ठोकळ नियम ध्यानांत ठेवल्यास ज्ञानेश्वरींतील पुष्कळसे अपरिचित वाटणारे शब्द व त्यांचीं रूपें सोपीं वाटतील.

( अ ) **वर्णागम** ( नवीन वर्ण येणें ):-पंगत-पंक्ति; रगत-रक्त; युगत-युक्ति. दरिसन-दर्शन.

( आ ) **वर्णविपर्यय**-( वर्णांची उलटापालट ):-हळु-लघु; समोर-मोहरें; कुऱ्हाड-कुराड-कुटार; टिकला-तिलक.

( इ ) **वर्णनाश** ( वर्णलोप ):—सुई-सूची; सवत-सपत्नी; रान-अरण्य; वंगाळ-अमंगल; वरि-उपरि; थोडें-स्तोकम्.

( ई ) **वर्णविकृति** ( वर्णांत बदल ): —गाव-ग्राम; कोवळा-कोमल; सावळा-श्यामल; कीव-कृपा. या सर्व शब्दांत **म** च्या जागीं **व** आलेला आहे.

पुढील शब्दांत प्रचलित **ठ** बद्दल मूळचा ष्ट आहे असें दिसून येईल. मूठ-मुष्टि; पीठ-पिष्ट; ओठ-ओष्ठ; आठ-अष्ट.

पुढील शब्दांचें निरीक्षण केल्यास शब्दामध्ये असणाऱ्या जोडाक्षरांतील एक अक्षर गाळून उपान्त्य स्वर दीर्घ झालेला आहे. कान-कर्ण; पान-पर्ण; हात-हस्त; वाक-वक्र; कापूर-कर्पूर. ( कर्ण-कण्ण-कान; हस्त-हत्थ-हात; वक्र-वक्क-वाक अशी ही शृंखला आहे. )

पुढील शब्दांवरून ध्यानांत येईल की, मूळच्या **ख**, **घ**, **थ**, **ध** व **भ** यांच्या जागीं **ह** आलेला आहे. पाहाट-प्रभात; मेहुण-मिथुन; बहिरा-बधिर; बहीण-भगिनी; काहणी-कथानक.

पुढील उदाहरणांवरून असें दिसून येईल की शब्दांतील आरंभींच्या **श्** व **स** चा लोप होतो.

ठाण-स्थान, मसण-श्मशान, फोड-स्फोटक, थळ-स्थळ, थर-स्तर.

पुढील शब्दांत मूळ **य** बद्दल **ज** आलेला आहे. अद्य-आज, कार्य-कज्ज-काज, मद्य-मज्ज-माज, गर्भ-गब्भ-गाभा, योगी-जोगी.

पुढील शब्दांत **क्ष** व **ष** याच्या स्थानीं **ख** झालेला आहे. तोख-तोष, दोख-दोष, विख-विष, खार-क्षार, खीर-क्षीर, आख-अक्षि, पंख-पक्ष.

पुढील शब्दांत **स** च्या जागीं **ह** दिसेल; दिहं-दिवसा, ताहान-तण्हा-तृष्णा.

आतापर्यंत सांगितलेल्या ठोकळ नियमांचें अवलंबन केल्यास ज्ञानेश्वरींतील बरेचसे शब्द परिचित वाटतील. जसें–कहि–कधी, काइ–कांही, दा–दीयेत–दीजेत–दीजे–दिलें जाईल, अतिशो–अतिशय, दीधला–दीन्हला, लक्ष्मीचा नाहो–लक्ष्मीचा नाथ, हिये–हृदय, दिठी–दृष्टि, गोठी–गोष्टी, म्यां–मियां, त्वां–तुवां, सरिसें–सदृश, हरिख–हर्ष, आखर–अक्षर, खेंव–क्षम, विश्राम–विसांवा, सीस–शीर्ष, साच–सत्य, नीच–नित्य, पालव–पल्लव, माथा–मस्तक, राउळ–राजकुल, विस्मो–विस्मय, आन–अन्य, गहीर–गंभीर, वरिस–वर्ष, भूई–भूमी, ठेलें–स्थित, वानितां–वर्णितां, वाखाण–व्याख्यान, भाख–भाष, विजू–विद्युत्, वानी–वर्ण, पन्हरे–पंधरे, सुनें–स्वन्, ऊन–उष्ण, इत्यादि.

९. जुन्या शब्दांतील आणखी एक प्रकारची लकब जर ध्यानांत आणली तर आणखी कांही रूपें सोपीं होतील. कुणबी लोक बोलतांना जरा हेल काढून बोलतात. जसें—पातळ बद्दल पाताळ, अमंगल–मंगल–वंगळ–वंगाळ, तेव्हां–तवां, जेव्हां आला–जवा आलाया, इत्यादि. याप्रमाणेच पूर्वीच्या शब्दांत **हकार** जास्त येतो. पुढील शब्दांचें निरीक्षण केल्यास ही गोष्ट ध्यानांत येईल. शृंगार–श्रिंघार, सांग–सांगे–सांगै–सांघै, कोण–कवण–कव्हण, पावलें–फावलें, एकी वेळां–एकीएळां–एकीहेळां, ते वेळीं–तेहवेळीं–तेव्हेळीं–तेव्हळीं, झालें–जाहालें–जालें, एवढी–येवढी–येव्हढी, चतु–चहूं, दोनी–दोन्ही, परत–परतां–परुता–परोता–परौतें–पऱ्हां, तरी–तऱ्ही, सहस्रवरि–सहस्रवेरि–सहस्रवेऱ्ही, त्यास–त्यासि–तयासि–तेयासि–तेआसि–तेहासि, नवीन–नवाळी–नव्हाळी, इत्यादि.

१०. हीच लकब जरा निराळ्या प्रकाराने पुढील रूपांत दिसून येईल. ज्ञानेश्वरकालापासून आतापर्यंतचा मराठीभाषेचा ओघ लक्षांत आणल्यास अंत्य वर्णांचा उच्चार करितां करितां कांही शब्दांतील अंत्यवर्ण लोप पावलेले दिसतात. जसें–भणौनि–म्हणौनु–म्हणौन–म्हणौनियां–म्हणुनियां (ज्ञानेश्वर)–म्हणोनु–म्हणोनि (एकनाथ)–म्हणोन (शिवकाल–पेशवेकाल)–म्हणून (प्रचलित), स्मरौ–स्मरों–स्मरुं (ज्ञानेश्वरी)–स्मरूं (एकनाथ–प्रचलितकाल), लागैला–लागेला (ज्ञानेश्वरी)–लागेला (एकनाथ)–लागला

(प्रचलित), वर्णिजैलु-वर्णिजेल (ज्ञानेश्वरी)-वर्णिजेल (एकनाथ)-वर्णिलें जाईल (प्रचलित), जन्मैली (ज्ञानेश्वरी)-जन्मेली (एकनाथ)-जन्मली-जन्म पावली, जाणेति-जाणति-जाणतात, तेंचि-तेंच, दास्यमोचक-दास्येमोचक, तेयावरि-तयावरि-त्यावरि-त्यावर, यशस्-यश, जन्मन्-जन्म, पितृ-पिता, स्वामिन्-स्वामी, इत्यादि.

११. अशाप्रकारें मूळ शब्दांची अडचण दूर झाल्यावर मग त्यांच्या रूपप्रक्रियेकडे नजर देणें जरूर आहे. पण 'ज्ञानेश्वरीची शब्दप्रकिया' यासंबंधी रा. रा. कानिटकर यांचा लेख या पुस्तकांत दुसरीकडे असल्याने त्याचा विचार संक्षेपाने येथे करूं.

१२. व्याकरणकारांनी नाम, सर्वनाम, इत्यादिप्रकारें शब्दांच्या आठ जाती ठरविल्या आहेत. त्यांपैकी कांहींना 'सव्यय' म्हणतात म्हणजे विभक्ति-वचन-लिंग इत्यादि विकार होतात; व कांही जाती 'अव्ययें' म्हणजे ज्यांना हे विकार होत नाहीत अशा आहेत. पण भाषेच्या विकासाचा थोडा विचार केला तर आज दिसणारीं अव्ययें पूर्वी अव्ययेंच होतीं असें म्हणतां येणार नाही. तयालागौनि-तयालागोनि-तयालागीं-तयाला-त्याला' यामध्ये 'लागौनि' यांत 'लाग' धातूच्या पूर्वकाळवाचकाचा, शब्दयोगी अव्ययासारखा उपयोग होतां होतां, 'ला' असा प्रत्यय बनला; झटकरौनि-झटकर; बहुतकरूनि-बहुतकरून, हीं मूळचीं पूर्वकालवाचकें असतां क्रियाविशेषणें बनलीं. म्हणौनि' हें मूळचें पूर्वकालवाचक असतां, प्रस्तुतकालीं उभयान्वयी अव्ययासारखा त्याचा उपयोग होत आहे. 'पाहिजे' म्हणजे 'पाहिलें जावें' असा मूळ अर्थ असतां, कालाच्या ओघाबरोबर त्याचा अर्थ नाहीसा होऊन, 'गेलें पाहिजे' म्हणजे 'जाणें जरूर आहे' अशा प्रकारें तें साहाय्यक क्रियापद बनलें आहे.

कांही केवलप्रयोगी अव्ययांचा हाच प्रकार; 'बापु बापु, ग्रंथ गीता' यांतील आश्चर्य प्रगटवणारे 'बापु बापु' हे शब्द मूळचे 'नाम' आहेत. सारांश, उत्पत्ति-स्थिति-संहार हे कोणाला सुटले नाहीत. भाषेच्या टांकसाळींत अनेक ठशांचीं नाणीं पाडलीं जातात; व्यवहारांत कांही काळ त्यांचा उपयोग झाल्यावर तीं झिजतात व त्यावरील ठसे नाहीसे झाल्यावर त्या

नाण्यांना पुनः गाळून नवीन साच्याचीं नाणीं पाडलीं जातात. 'तेयालागौनि' यांत 'लागौनि' हा शब्द वापरतांना प्रत्ययाची कल्पना मनांत येत नसून पूर्ण शब्द आपण वापरीत आहों असें उघड दिसून येतें. पण दुसऱ्या अवस्थेंत हा शब्द झिजत झिजत 'लागौनि-लागि-लाग-ला' अशा रीतीने प्रत्ययाच्या अवस्थेला जाऊन पोहोचतो. पुढे पुढे तर हा प्रत्यय कोणत्या कारणामुळे झाला हें विसरून जाण्यापर्यंत पाळी येते; आणि मग 'साठी,' 'करिता' इत्यादि स्वतंत्र शब्द योजून प्रत्ययाच्या ऐवजीं काम भागविलें जातें. अशा प्रकारची ही मोड-तोड-जोड मोठी मनोरंजक आहे.

१३. शब्दांच्या आठ जातींपैकी 'नामाचा' विचार करूं लागलें की, नामांचा अफाट पसारा पाहून आश्चर्य वाटतें. गोल, बोल, डोल; कोवळिक, सोइरिक, आगळिक; रहावा, वाहावा, रिघावा; धांव, हांव, भाव; राणीव, सिहाणीव, वाटीव; जाहलेपण, आहाचपण, धालेपण; चाड, पाड, होड; आयणी, लाणी, वाहाणी; आवडी, गोडी, सांडीमांडी; पाठार, पैसार, वोवर; पायवणी, कडसणी, बोलणी; असमाई, नवलाई, गोवाई; ऊहापोही, उखीविखीं, सांडीविखुरी; कामठा, वसैठा, पाणोठा; शिरयाळें, पाणियाळें; झाडा, चाळा, चारा; आराणुक, वरिपडा, टाकी, झोंबी, तळवट, जैत हारी, पाहुणेर, धिंवसा, आडदरु, फुलोरा, इत्यादि अनेक तऱ्हेचीं उदाहरणें आढळून येतात.

१४. 'सर्वनामांचा' विचार विशेष करण्याचें कारण नाही; कारण सर्व प्रकारचीं उदाहरणें मुक्तेश्वर, एकनाथ, इत्यादिकांच्या ग्रंथांत विपुल सापडतात. भलतेणें-वाटेल त्याने; नेणों कोण-सांगतां येत नाही असा कोणी तरी; हीं उदाहरणें विशेष लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

१५. 'विशेषणांचा' विचार करूं लागलें. म्हणजे अनेक प्रकारचीं उदाहरणें सापडतात. **सपूर** वाणें, **सधीर** मन-सखोल हृदय; गोमटें, वोखटें, चोखटें; डोळस वेळस; स्नेहाळ, मांसाळ; वरिचिल, तळिचिल, अविट, अधीर; बोवडीं, शेंबुडी; थोकडें, चांग, गहीर, भलें, अचाट, निकें, भलतैसें, आवडेतेसणा, सोज्वळ, उजाळ, तेजाळ, नागर, आगळें अनारिसें इत्यादि.

१६. विशेषणांच्या उपयोगाच्या दृष्टीने पुढील कांही प्रकार मननीय आहेत:—

(अ) पुढील उदाहरणांत विशेषण व विशेष्य यांचें लिंग, वचन व विभक्ति एकच दिसतील:—

**तैसीं अद्‌भुतें भयासुरें। तेथ वदनें देखिलीं वीरें।**
**आणिकें असाधारणें सालंकारें। सौम्यें बहुवें ॥११-२०१.**
**तैसीं चंद्रसूर्यादि थोरें। इयें तेजें जियें अपारें।**
**तियें जयाचेनि आधारें। प्रकाशति ॥१५-२७१.**
**जरी माह्लेरें श्रीमंतें होंति ॥९-३.**
**सबीजें तृणें जैसीं। सुलीनें होंती ॥९-१००.**
**पाणिलगें हंसें ६-१७७; भलतेसें कोरडें १-२०१.**

(आ) वर्तमानकालवाचक विशेषणें:—

**सेविती** परी १-५१ = सेवा करण्याचा प्रकार; **असतें** पौरुष = असणारें पौरुष; **निरुपती** परी = निरुपणाची पद्धति; **वर्तती** परी = वागण्याची रीति; **नधरत** अश्रुपात = न आवरणारी अश्रूंची धार; **नधरतचि** गहिवर = न सावरणारा गहिवर.

(इ) भूतकालवाचकें:—प्रचलित भाषेंत येणारीं भूतकालवाचक विशेषणें पाहिलीं म्हणजे त्यांत नुसता 'ला' प्रत्यय नसून, 'लेला' असा प्रत्यय आहे. जसें:—केलेला, बसलेला, उठलेला इत्यादि;

ज्ञानेश्वरापासून पेशवाई सुरु होईपर्यंत केवळ 'ला' असाच प्रत्यय दिसतो. 'धावीन्नला, गीळीनला, खेळीनला, दीन्हला' असलीं रूपें त्या वेळीं थोडथोडीं दिसतात.

(ई) 'आथिला' म्हणजे 'असलेला' 'युक्त' अशा अर्थी 'अस्' या धातूचें भूतकालवाचक विशेषण लावून अनेक शब्द बनविले जातात; जसें—तेजाथिलें (तेजयुक्त); रंगाथिलें (रंगयुक्त);

**पद्यबंध नागर। तेंचि रंगाथिलें अंबर ॥१-६.**

**ऐसेनि गभीरपणें । थिरावलेनि** अंतष्करणें ।
**आथिला** तो जाणे । मातु इये ॥१–६१.
**शिखराथिलेयां** सर्वां उपरि । मेरु तो मीं ॥१०–२०६.
**सत्वाथिलेयां** आतु । सत्व तें मी म्हणे अनंतु ॥१०–२६०.
येणें नासैल **जोडलें** बहुत ॥५–२२.

१७. नामें, सर्वनामें यांचा विभक्तींशीं संबंध येत असल्याने विभक्तिविचाराकडे आपण वळूं.

विभक्तिप्रत्ययांकडे व्याकरणाच्या ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याचें हें स्थळ नसल्याने ते प्रत्यय पूर्वी कोणत्या स्वरूपांत होते व त्यांचा विकास कसा झाला हें सांगण्याची जरूरी नाही. ला (लागौनि–लागीं), त (आंतौनि–आंत), एं (पुत्रेण–पुत्तेण–पुत्तें–पूतें–पुत्राने), शीं (समम्–सवि–शीं) इत्यादि कांही प्रत्ययांचा निर्देश करून विभक्तींच्या मुख्य कार्याकडे आपण वळूं.

## विभक्ति

विभक्तिप्रत्ययांची चर्चा अनेक व्याकरणांतून आलेली असल्याने विशेष खोल पाण्यांत न शिरतां, ज्ञानेश्वरी वाचतांना जेथे विशेष अडचण वाटते अशाच स्थळांचा विचार या ठिकाणीं केला जाणार आहे.

प्रथमाः—एकवचनी व बहुवचनी रूपें पुढीलप्रमाणे आढळतात.

रावो, देवो, आग्रहो, उपावो, गजु, हस्तु, दासु;
दोंदें, उपनिषदें, ठाये, गुंडे, लेणी, डोळे.

द्वितीयाः—काउळें **चंद्रातें** नोळखति, संजयो **रायातें** म्हणे, आम्ही **विवस्वतां** योग कथिला, जे विवेकाची भाष नेणति ते **ईश्वरातें** केंवि जाणति, तेणें **मनुप्रति**, योगस्थिति सांघीतली, तपें **फळां** आलीं, दुराशा **यशां** येतिना.

टीपः—द्वितीयेला त्यावेळीं 'ला' प्रत्यय लागत नव्हता; त्याऐवजीं 'लागौनि' 'लागी' हे शब्द येतात. दोन कर्मे असतांना प्रधान कर्माला प्रत्यय लावत नव्हते; गौण कर्माला प्रत्यय लावला जात असे.

संस्कृताप्रमाणे गतिवाचक क्रियापदांना द्वितीयेची अपेक्षा प्राचीन मराठींत दिसून येते.

तृतीया:— १ जनाचेनि पायरवें = लोकांच्या पावलांच्या धुळीनें; अमृताचेनि पाडें ६-१७३; उभारलेनि दंडें ६-६०२; त्वचेचेनि पदरें ६-२३१; तुझेनि प्रसादें ६-४४; **जाणतेनि** गुरु भजिजे १-२५; अवधानाचेनि दानें ६-४९५.

२ **कृपा** आकळिला = कृपेने व्याप्त झाला. २-४; स्वयें **वाचा** केंवि निंदिजे; मंत्रज्ञ न बधिजे। **भूतबाधा**। २-२३४.

३ **सिंहासीं** झोंबे कोल्हा। २-१६; पदा आलें परिपाकें। आमोदासी॥ १-५२; बोला आधीं झोंबिजे। **प्रमेयासि** १-५८; जे सनकादिकीं सेविजे। आद्ररेंसीं १-५५; परि मियां कवणेंसीं झुझावें १.७१.

चतुर्थी:—ना तरि पवनु **मेघासि** विहे। कि **अमृतासि** मरण आहे २-१४. जेयातें कामधेनु ऐसी माये। **तेयासि** अप्राप्य कांही आहे १.७९. हृदयाचें ढिलेपण। येथ **निकेयासि** नव्हे कारण २-१८

पंचमी:—**स्वप्नौनि** जागृतीं येतां ९-१११; समुद्रौनि काढावा ६-१४१; आगी **आंतौनि** रिगे ६-१४२; **नखौनि** केशवरि १३-१३५; जे बुद्धीचिये **ठावूनि** देहीं ५-६२; **मेघांनि** धारा ६-८७.

षष्ठी:—**वापाचां** तार्टी = बापाच्या ताटीं; द्रुमाचां बुडी ६-१९३; माझां ठाइं ६-३९०; सुखाचां साम्राजीं ६-३६७.

सप्तमी:—१ शब्दब्रह्माब्धी **मथिलेयां** = शब्दब्रह्माब्धी मथिते = शब्दब्रह्मरूपी सागराचें मंथन झाल्यावर (सति सप्तमी); देहे **गलेयां** = देहे गति आगी **लागलैयां** = अग्नौ लग्ने;

२ **पाउलां पाउलां** उदकें = **प्रत्येक** पावलास.

## विभक्तींचीं अव्ययें

द्वितीयाः—मनू**प्रति**; तुज**लागौनि**; मजचि**लागीं**; मज**प्रति**.

तृतीयाः—१ शस्त्र**वरि** तोडलेयां = शस्त्राने तोडल्यास; घडेया**वरि** सारस्वतें पढों सिकिजे ९-८;

२ श्रोतेविण; उपायेंविण; स्वधर्मेंहीन; वस्त्रेंहीन;

३ तरी मज**करवीं** हें हिंसक कां करविसी ३-४;
मज मुकया**करवीं** बोलविलें १०-३७

४ इंद्रियें लाळविना **कौतुकें करुनि** ३-२८२;

५ **कृपावशें** अवलीळा रक्षैल २-७३;

चतुर्थीः—१ द्वितीयेप्रमाणेच 'लागी लागौनि' हीं अव्ययें चतुर्थीला लागतात. स्नेहालागि माये । २-४२; वरि आम्हांलागि कृपावंतु २-४४; नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं १-४६.

२ साठीं, स्तव यांचा प्रचलित मराठींत जो अर्थ केला जातो तसा प्राचीन मराठींत नाही हें विशेष लक्षांत ठेवावें.

मागां दूध दे म्हणतलिया**साठीं** १०-१७ = 'मागें दूध दे असें म्हटल्यामुळे,' कारणाने, म्हणून; हा ठायवरि किरिटी । आम्ही प्रेमळु घेवों आपणयासाठी; शाखा**स्तव** देखां । पल्लव पानें १०-९९ = शाखा**मुळे**; प्रकाश आणि कडवसें । हें सूर्याची**स्तव** १०-८८; (सूर्यापासून).

३ दोषें—साठी, करितां, हें अव्यय फार जुनें आहे, हें पुष्कळ टीकाकारांच्या ध्यानांत आलेलें नाही. याच्याबद्दल सविस्तर पुढे लिहिल्यामुळे येथे जास्त लिहिण्याचें कारण नाही.

तेंही करावेया **दोसें** । मज सामर्थ्य असे कीं नसे ।।१८-६२१

पंचमीः—अदिला**पासौनि**; मनुष्या**लागौनि** स्थावरांतवेर्‍हीं; चंद्रा**पासौनि** निववितें; तेया**ठावूनि**; आंगी**आंतौनि**; तेया**पासाव**; तेया**परिस**.

सप्तमीः—मध्ये, माजीं, माझारि, ठायीं, विषयीं, भीतरी.

## शुद्ध शब्दयोगी अव्ययें

(१) शुद्ध शब्दयोगी अव्यय हें शब्दयोगी अव्ययाच्या पूर्वी देखील येतें:—

प्राप्ती**चि** अधीन ३-६४० = प्राप्तीच्याच स्वाधीन;
पती**हीं**हूनु काइ न वनिजे । पतिव्रता ।। ६-१२९ = पतीहीपेक्षां;
तें नवमीयाचि ऐसें मी म्हणें ।।१०-३९;
अर्जुना भावाभाव मानी । भावांचिमाजी ।।९-८४;
**मजचि**यासुनि आघवा । निर्वाहो यांचा १०-११२;
विश्वाही सकट आपणचि जाला १०-३३५. वासरू देखिलेया**चि**साठी ११-४०.

(२) कधी कधी पूर्ण रूपानंतरही हें अव्यय येतें:—

**अमृतातेंही** पैजा जिंके ।। ६-१४;
**येरांही** रसां पांतिकरां । जाहला मानु ।। ११-२;
हें **अल्पचि** परि उघडे । कैवल्य एथ ।। ११-१२;
परि अर्जुन सदैवाचा रावो । जे **एथही** पातला ।। ११-१३;
आजि **आवडतयाही** सुकाळु जाला ।। ११-१४.

१८. **तारतम्यभाव**:-विभक्तिविचार व विशेषणें यांची चर्चा पूर्वी झाल्यामुळे विशेषणांचा तारतम्यभाव ज्ञानेश्वरकाळीं कसा दर्शविला जात असे तें आता समजणें सोपें आहे.

(अ) पुढील उदाहरणांत दोन वस्तूंची तुलना केलेली आहे. तुलना कोणत्या प्रकारें दाखविली जाते त्याचें निरीक्षण करावें.

१ तरि आता **चंद्रापासौनि** निवविते । जें **अमृताहूनि** जिवविते ।। ९-२४; **चंद्रापेक्षा** निवविणारें (थंड करणारें) व **अमृतापेक्षा** चैतन्य देणारें.

२ जें **पतीहीहूनु** काइ न वनिजे । पतिव्रता ।। ६-१२९.

३ मेरूपासौनि थोरें १५-४९८; क्षराक्षरा**पासौनि** आनचि १५-४९८.

४ परि नीकें काय ययापरौतें ॥ २-५२.

५ गुरुसेवे**परौता** । मार्गु नेणे १३-४४६; चंद्रसूर्यां**परिस** श्लाघ्यु केला । ११-१०३.

**टीप:**—वरील वाक्यांत ज्या वस्तूंपेक्षा आधिक्य अगर कमीपणा दाखवावयाचा आहे त्या वस्तूची पंचमी लागते. कधी कधी प्रत्ययाऐवजीं पंचम्यर्थक शब्दयोगी अव्ययाचा उपयोग केला आहे. **पासौनि, परौता, परिस** इत्यादि अव्ययें उदाहरणांवरून दिसतील.

( आ ) पुढील वाक्यांत स्वतंत्र शब्द योजून हेंच काम साधलें आहे.

१ जो आकाशाहि **वरि** उरता ॥ १५-५१६;

२ दुणेंहि **वरि** प्रेमबळें । उल्हासितु ११-११४.

( इ ) दोहोंपेक्षा अधिक वस्तूंमध्ये तुलना कर्तव्य असल्यास षष्ठी व सप्तमी या विभक्तींचा उपयोग करितात; विभक्तिप्रत्ययाबद्दल कधी कधीं शब्दयोगी अव्ययें येतात.

१ जें सकल **गुह्यां** गोसावी । **पवित्रां** रावो । **उत्तमाचें** उत्तम ॥ ९-४७-४८.

२ तारां**माझि** चंद्रु १०-२०३; रुद्रगणांमाझारि शंकरु १०-२०४; वृक्षजातां **अंतु** अश्वत्थु १०-२१५; धेनू**मध्यें** कामधेनु १०-२२१; यज्ञाचा पैकी जपयज्ञु १०-२१३.

१९. एथपर्यंत नाम, सर्वनाम, विशेषणें, व त्याचबरोबर शब्दयोगी व शुद्ध शब्दयोगी अव्ययें, आणि विशेषणांचा तारतम्यभाव यांचा विचार झाला. आता प्रथम क्रियाविशेषणें, उभयान्वयी व केवलप्रयोगी अव्ययें यांचा विचार करूं.

**क्रियाविशेषणें:**—कांही क्रियाविशेषणांचा नामनिर्देश करण्यापेक्षा जास्त विस्ताराची जरूरी नाही. झणें (क्वचित्), अळुमाळ (थोडे), नावेक (थोडें), निकें (खरोखर), कीरु (किल, खरोखर), पुढुतींपुढुतीं (पुनः-पुनः), सापें (सांप्रत), मा (मग), नावानावा (वरचेवर), निरौतें, परौतें, मागौतें, अरौतें इत्यादि.

**उभयान्वयी अव्ययें**—बहुतेक उभयान्वयी अव्ययें सांप्रत चालू आहेत. पण कांहींचा विशेष निर्देश करणें जरूर आहे.

(१) **जे** = कारण, कां की.

तैसें तुम्हां आम्हां जालें । **जे** आठमुठी तत्त्व फावलें ॥ ६–४.
निकियापरि संतोषला । **जे** संवादु फावला ६–८.
न लगे श्रोतेयांसि कडसावें ॥ **जे** अधिकारिये ॥ ६–२७.
तैसा अर्जुनचि विशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा ।
**जे** तो त्रिभुवनीचेया दैवां । एकायतनु जाला । ६–१३०.

(२) **म्हणौनि** = यासाठी.

तेव्हींचि येरु से घेईल । **म्हणौनि** विहे ॥ ६–७.
जें बुद्धीहि आकळितां सांकडे ॥ **म्हणउनि** बोली विषायें सांपडे ॥ ९–३२.

(३) वरि–शिवाय; आणखी असें की; तशांत.

तो अध्याय सहावा । **वरि** साहित्याचिया बरवा ॥ ६–१३.
हे असो तथा बोलांचीं ताटें भलीं । वरि कैवल्यरसें वोगरलीं ॥ ६–२२.
हें राज्य **वरि** सांडिजे । मग निवांता एथेचि असिजे ॥ ९–१७०.

(४) **की** – तसा–जसा, तितका–जितका.

ऐका रसाळपणाचेया लोभा । की श्रवणीचि होति जिभा ॥ ६–१६.
ऐसिया भावनेचिया पडे खोडां । की मोकळिया पायाचा चवडा ।
गोवी अधिकें ॥ ६–७८.

(५) **तरी करितां**.

तैसी गुरुकृपा होए । तरी करिता काय आपु नोहे ॥ ९–३५.

(६) **कां** – अथवा, किंवा, **ना तरि**.

तेथ सुहृद आणि शत्रु । कां उदास आणि मित्रु ६–९४.
दिठींचि पाहतां निविजे । **कां** तोंड भरौनि बोलिजे ।
**ना तरि** दाटूनि खेंव दीजे । ऐसें कवण आहे ॥ ६–११७.
हो कां आत्मनिवेदनातळींची । जे पीठिका होय सख्याची ॥६–१२७.

**केवलप्रयोगी अव्ययें**—नमुन्यासाठी पुढील उदाहरणें पाहावीं.

पाहा **पां** नवल कैसें चोज । कें उपदेशु केउतें जूझ । ६-१२३.

**हां हो** नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरी ऐसी ॥ ६-१३३.

**हो हो** नेणों कवणाची काहाणी । ९-१४२.

**बापु बापु** ग्रंथ गीता; धन्य धन्य; हा कटकटा;

सावध रे सावध; भला रे भला; आगा, गा, अरे;

जी जी; हो कां जी; सृष्टी गेली रे गेली;

**गा, अगा** (पुल्लिंगी व्यक्तींच्या बाबतींत); **ओ, अवो** (स्त्रियांसंबंधी);

**हो, होजी, अहोजी, अरे** (सामान्यपणें); **हं हो, हां** ('होय' असें उत्तर दाखविण्यास); **हा कटकटा** (दुःख अद्‌भुतपणा); **बापु बापु** (महदाश्चर्य); **धन्य धन्य जय जय** (विजय, मंगलपणा); **भला** (शाबासकी).

२० शब्दांच्या आठ जातींपैकी 'क्रियापदा'खेरीज सर्वांचा विचार झाला. आता क्रियापदाकडे वळूं.

क्रियापदविचाराचा ऐतिहासिक-व्याकरण-दृष्टीने येथे विचार करण्याची जरूरी नाही व हें स्थळहि नव्हे. भाषेच्या तुलनात्मक दृष्टीने लिहिण्याचा विचार येथे नाही हें प्रारंभींच सुचविलें असल्याने, कांही महत्त्वाच्या गोष्टींचा थोडक्यांत परामर्श घेण्याचें येथे योजिलें आहे.

(अ) **मुख्य क्रिया दाखविणारीं क्रियापदें**—

कल्पना **निमे** । प्रवृत्ति शमे ।

आंगें मन **विरमे** । साव्हियांचि ॥ ६-२१२

तेथे हाहाकार **उठिला** । तिहीं लोकीं । १-५८

तो गाजत जवं आइकति । तवं उभेयांचि हियें **घालिति** । १-६३

जिये उत्तमे कुळिंचिया **होंति** । आणि गुणलावण्यें **आथि** ।

तिया आणिकीतें न **साहाति** । सुतेजपणें ॥ १-८६

ना तरि नगरांतरीं **वसिजे** । तरि नागरांचि **होइजे** । १-४१.

(आ) **धातुसाधितें व सहायक्रियापदें—**

भावांचा फुलौरा होत जाए । मति वरी ॥ ९-२७.

अवधारा कृष्ण ऐसें । **बोलते जाले** ॥ ९-३३.

**गेले असति** व्याजें । जूझाचेनि ॥ १-८५.

मीति नेणिजे अपार । **मीनले असति** ॥ १-१०२.

सलगि **करितु आहों** ॥ ९-७.

तेथ वर्णवपु निर्दोष । **मिरवत असे** ॥१-३.

जेया मी अंतःकरण । **बैसों** घाली ॥ १२-६४.

परि **वेचावें लागे** शरीर । तिये गांवीं ॥१२-७४.

हें तुज पासाव अशेष । **इच्छितु असें जाणों** ॥ १३-६.

( इ ) **नामसाधितें—**

रोषें प्रेम **दुणावटे** । पढियंतेयाचेनि ॥९-१८; सुखाडलें ११-१७०; महाबोधीं कोवळीक । **दुणावली** ॥ १-३४; व्यवस्थिलें ११-१५९ भानुतेजें **ढवललें** ॥ जैसें त्रैलोक्य **उजळलें** ॥ १-३९; पुंजाळति ६-२०३.

( ई ) **अनुकरणात्मक—**

तेणें महाघोषगजरें । **दुमदुमति** गिरिंदरें ॥ १-१३०.

जेणें **दचकला** कृतांत । आंग नेघे ॥ १-१३२.

**घडघडित** अंबर । उचंबळत सागर ॥ १-१२९.

( उ ) **काल** दर्शविण्यासासाठी ( वर्तमान, भूत, भविष्य), **प्रयोग** दर्शविण्यासाठी (कर्तरि, कर्मणि, भावे), **रूप** दर्शविण्यासाठी (करणरूप व अकरणरूप ), **सहायक्रियापदांचा** जरी उपयोग होत असला—तो सांप्रतकाळींहि होत आहे—तरी **विशेष अर्थ** दर्शविण्याच्या दृष्टीने त्यांचा उपयोग मननीय आहे.

( १ ) **जा**—भावाचा फुलौरा **होंतु जाए** । मति वरी ॥ ९-२७; (आवेग)

सागर **आटौनि गेलेयां** १५-४७३; मेण **निगौनि जाए** ७-२४९; (क्रियापूर्ण) चित्तपण **विरौनि जाए** ६-३६७; प्राणातें **घेऔनि जाए** ३-२१४; (पूर्ण).

(२) **दे**-तुज ज्ञान विज्ञान तैसें । **वाटूनि देऔं** ॥ ९-४४ (आवेश); उरों **नेदी** । ६-२१७; (परवानगी).

(३) **पड**-तुटौनि **पडला** १५-३५२) (आवेश).

(४) **घाल**-अमरपण उचितां । देऊनि **घाली** ॥ १५-५५० (आवेश); मोकलूनि **घालावें** । ६-३८०; निर्दालूनि **घाली** । ३-२६८.

(५) **ये**-लपौं **नैए** (लपवूं शकत नाहीं) ९-४१; झोंप **नैए** ९-९४; तरि सांडोविखुरीं गेले । **म्हणों ये** काइ ॥ ९-३९ (शकणें); अहंभावमसुरें । **मौडौनि आलें** ॥ ६-१४९ (आवेग).

(६) **ठाण**-आड **रिगौनि ठाके** । ९-१४४; संसारु मोक्षमय । **होऊनि ठाके** । १५-२४; पुनरावृत्तीची वाट । **मोडौनि ठेली** ॥ १५-२२८ दरकुटा **भरौनि ठाके** । १५-३२६; लग्न **लागौनि ठेले** । ६-४७०; अहंता **बुडौनि ठेली** । १५-३९४.

(७) **राह**-बुंथि करूनि **राहे** । ६-२५१; सौम्य होंऊनि **राहे** । ६-२४०.

(८) **पाह-घोंठ** भरू **पाहे** । १५-७० (इच्छा करणें); निघों **पाहे** । ६-२६७; कवाडें लागों **पांति** । ६-२०२.

(९) **लाग-नाचों लागे** । ६-१२१; **पाहों लागला** । ६-८८; **पडों लागे** । १५-१६८ (प्रारंभ होणें).

**(ऊ) नकार किंवा अकरणरूप दाखविण्याचे मार्ग—**

(१) उरवी-नुरवी; होता--नव्हता; आंकळे--नाकळे; मोडे-नोमोडे; होता--नोहता; संडी--संडीना--न संडी; उमटे-नुमटे; दे-नेंदी; घे-नेघे; ए-नैए;

(२) तैसें नका हो । १५-२४३;
एथ फळ ना चुंब्रतां । फुल ना तुरंब्रितां ॥ १५-५२.

(३) 'झणें' या अव्ययाची योजना करून निषेध प्रदर्शविला जात होता; प्रचलित भाषेंत झणि याचा अर्थ 'लवकर' असा केला जातो.

ऐसा अभिमानु। झणें चित्तां रिगों देसि ॥ ३–१८७.
परि पार्था हें झणें। सायास घेसि हो मनें ॥ ६–३५.
म्हणौनि अझुइं अर्जुना। झणें चित्त देसी या हीना ॥ ०–१७.
एथ झणें अंतःकरण। रिगों देसी ॥ २-५८.

**टीप**—रावबहादुर हिरालाल यांच्या 'छत्तीसगडी बोलीच्या' व्याकरणांत 'झिन' या अव्ययाचा वरीलप्रमाणेच उपयोग सापडतो.

उदाहरणें

(पान ८३) करत काम-का **झिन** रोकौ = चालतें काम थांबवूं नकोस.

(पान १४४) चल भाई, बिलम **झिन** = भाई, उशीर करूं नको.

(पान १४५) **झिन** मडा, नहीं तो ओकर दाई गारी देही = त्याला त्रासून सोडूं नको; नाहीतर त्याची आई तुला शिव्या देईल.

(पान १४२) मोर-मेंर लबारी **झिन** गोठीया = माझ्यापुढे खोटें बोलूं नको.

**(ऋ) काळ व अर्थ—**

(१) धातुसाधित विशेषणांपासून काळ सिद्ध करण्याची प्रवृत्ति 'अपभ्रंश' भाषेपर्यंत आपण मागें पहात चाललों तरी सापडते.

ज्ञानेश्वरीकालीन वर्तमानकाळचीं रूपें प्रचलित भाषेंत उपयोगांत आणलीं तर वर्तमानकाळाऐवजी रीतिवर्तमान काळाचा बोध होतो.

तेथ वर्णवपु निर्दोष। **मिरवत असे** ॥ १-३;
बोधमदामृत मुनी। अली **सेविती** ॥ १-१६;
जैसें डोळेयां अंजन **भेटे**। तेव्हळीं दृष्टीसि पाटा **फुटे** ॥ १-२३;
मग अळंकारीं बरवेपण। निवाडु **दावी** ॥ १-४४;

जैसें भ्रमर परागु **नेती** । परी कमळदळें **नेणती** । १-५९.

वरील उदाहरणांतील रूपें सध्या वापरली तर त्याचा अर्थ रीतिवर्तमान दाखविण्यासाठी करितात, असें दिसेल.

(२) वर दाखविलेल्या वर्तमानकाळापासूनच मराठींतील भविष्यकाळ झाला आहे.

जें **अपेक्षिजे** विरक्तीं । सदा **अनुभविजे** संतीं ।
सोहंभावें पारंगतीं । **रमिजे** जेथ ॥ १-५३.
जें **आकर्णिजे** भक्तीं । जें आदिवंद्य त्रिजगतीं ।
ते भीष्मपर्वी संगती । **सांघिजैल** ॥ १-५४.
एथ पृथ्वीतळ आपु **होईल** । हें महेंद्रपदही **पाविजैल** ।
परि मोह हा न **फिटैल** । मानसींचा ॥ २-६५

वरील उदाहरणांत वर्तमानकाळी रूपांना **ल** लावला आणि भविष्यकाळी रूपांचा **ल** काढला तर काळांची अदलाबदल होईल. म्हणजे अपेक्षिजैल, अनुभविजैल, आकर्णिजैल इत्यादि भविष्यकाळचीं रूपें होतील; व होई, पाविजे, फिटे हीं वर्तमानकाळचीं रूपें होतील.

(३) **आज्ञार्थ**—देइजो, अवधारिजो, कीजो इत्यादि रूपें नेहमी येतात.

तयापरी श्रीजनार्दना। **विचारिजो** माझी संभावना ।११-९३;
आता **देइजो** अवधान । १-८१;

(४) **शक्यार्थ**—तूं करूं जाणसी। ९-३६ (कर्तुं जानासि-शक्नोषि);
न **शके धरूं** । सैधवाचा लोटूं । ९-१२३ (न शक्यते);
लपौं नै ए । ९-४१ = लपवितां येत नाही;
म्हणौं नै ए । ९-३९ = म्हणतां येत नाही.

(क) **कर्मणिरूपें**—दीजे, कीजे, पाहीजे, नाशिजे, देइजति, सांगिजति इत्यादि रूपें नेहमी दिसतात. दीयते-दीएज-दीजे.

आता आमुचेया दळीं नायक । जे रूढवीर सैनिक ।
ते प्रसंगें आइक । **सांगिजति** ॥ १-१०३.

उद्देशें एकदोनी । **जाइजति** बोलौनि ।
तुम्ही आदिकरूनि । मुख्य जे जे ॥ १-१०४;
विचारीं तूं अर्जुनु । कारुण्यें **कीजसी** दीनु ॥ २-१३;
देखें मातापितरें **अर्चिजति** । सर्वस्वें तोष पावविजति ।
तियें पाठीं कैंवि **वधिजति** । आपुलिया हातीं ॥ २-३२.

(लृ) पुढील **लाग** धातूचा रूपविस्तार नमुन्याकरिता दिला आहे. त्यावरून ६००–६५० वर्षांपूर्वी प्राचीन मराठींत रूपें तयार करण्याचें कसें अपूर्व सामर्थ्य होतें, तें स्पष्ट करून येईल.

## लाग धातूचीं विविध रूपें

| | |
|---|---|
| १ प्रेमसुखा**लागौनि** रंकु । ६-११५. | १ सुखा**साठीं.** |
| २ मनुष्या**लागौनि** अन्नधारी । वृद्धि स्थावरांत वेऱ्हीं ॥ १५-१७३. | २ पासून–पर्यंत. |
| ३ चरण**लागौनि** विनविलें । | ३ चरणा**पाशीं.** |
| ४ कां डोळा **लागौनि** उघडे । तव कोडिवरि घडे मोडे । १५-१३३. | ४ डोळे **मिटून** उघडावें तों. |
| ५ कृष्णकृपें पात्र । एयाचि **लागी** ॥६-१२६. | ५ यासाठीं; या**कारणानें.** |
| ६ **नाचो लागे** । ६-१२१. | ६ नाचण्यास **प्रारंभ** केला. |
| ७ संताचां हृदइं लागे । ६-४९०. | ७ हृदयाला **भिडणें.** |
| ८ स्थान **पाहावें लागैल** ॥ ६-१६३. | ८ पाहणें **जरूर** आहे. |
| ९ तेयाचियें दिठीचा झणें कलंकु । **लागे** प्रेमा ॥ ६-११५. | ९ कलंक **लागूं देऊं नको.** |
| १० उदकीं पावो **न लगे.** | १० पाय **लागत नाहीं.** |
| ११ कवाडें लागों पांति ॥ ६-२०२. | ११ कपाटें लागण्याची **इच्छा** करितात. |
| १२ लग्न लागौनि ठेलें । ६-४७० | १२ लागलें (**क्रियासमाप्ति**). |
| १३ वैराग्य पाठीं लागे । १५-३९. | १३ **मागें लागणें.** |

| | |
|---|---|
| १४ आगी **लागलेयां** । १४-२५८. | १४ आग **लागल्यावर** (सति स.). |
| १५ **सलगि** । ९-२. | १५ लगटपणा. |
| १६ न संडी कथा **लाग** । | १६ कथासंबंध. |
| १७ डोळा **लागतखेंवो** । ९-२. | १७ डोळां **मिटतांच**. |
| १८ प्राप्ती **अलग** ठेली । ६-३४. | १८ **निराळी** राहिली; बाजूलाच राहिली. |
| १९ **लागवेगें** । १८ १६४१. | १९ त्वरेनें, **लगबगीनें**. |
| २० वारेंलगें पाखरूं । १३-२१५. | २० **वाऱ्यावर उडत** असलेलें. |
| २१ नीलागें निसरडा । ६-४७४. | २१ पाय **ठरत नाहीं** असा. |
| २२ लाउनि बैसवी पाटीं । ९-४६. | २२ लावून (**प्रयोजक**). |
| २३ खलालेयांचां **लगबगीं** । १५-३५४. | २३ ओघाच्या **जोराच्या वाहण्याने**. |
| २४ एथ लागु । कांहीं भूतभेदाचा ।। ९-८६. | २४ अवकाश, जागा. |
| २५ मोक्षीं **लावावयाचिया** आशा ६-९०; | २५ लावण्याच्या आशेनें. |

आतां कांही कृदन्त रूपें सांगून क्रियापदाच्या विचाराचें प्रकरण आटपतें घेऊं

वर्तमानकालवाचक—देत, बेत, उलंडत, नेत इत्यादि.

भूतकालवाचकें—गेला, नेला, बोलिला इत्यादि;
पव्हासिला, धाविन्नला इत्यादि.

पूर्वकालवाचकें--म्हणउनि, म्हणौनि, म्हणौनु, म्हणौनियां, असे चार प्रकार आढळून येतात.

**टीपः**—ज्ञानेश्वरीच्या वेळीं करुनि–करून अशीं रूपें नव्हतीं. रूपांच्या अखेरची इ ज्ञानेश्वरकालानंतर लोप दावूं लागली; 'पंचतंत्रांत' (भारत इ. सं. मंडळ, वर्ष ३, अंक २–३–४) 'आइकोनिया' अशीं रूपें शेंकडा तीन सांपडलीं, तर 'लागौनि', 'पाहौनि' अशीं शेंकडा ३३ सापडतात;

'करुनि', 'म्हणउनि' अशीं शेंकडा ५० च्या वर आढळतात; 'पासोनि,' 'करोनि' अशीं शेकडा १५ सांपडतात; एक नाथकाळीं 'करोनि', 'पाहोनि' अशीं रूपें अधिक सापडतात. पेशवेकाळीं 'करोन, 'पाहोन' अशीं रूपें आढळतात. प्रचलित काळचीं रूपें 'करून', 'देऊन', 'म्हणून' अशीं आहेत.

हेत्वर्थक—करौं–करों–करूं; बोलैं–बोलों–बोलुं.

**२२. समास**—ज्ञानेश्वरींतील समास संस्कृतपद्धतीवरच आहेत. कांही विशिष्ट प्रकारचीं उदाहरणें येथें नमूद केलीं आहेत.

येऱ्हवीं **नबोलणेनि** बोलणें। १५-५०७; **पाहिजेतेनिविण** पाहिजे । १५-२४५;

**अमोडी** कुशांकुर ६-१८२; भलतेउतें १६-२८८; आवडेतैसे ३२२५; शरीरसांडोवा ९-३८१; सत्वाथिला १०-२८७;

मोकळवादी १-१५७; सनोळख १३-१५८; ठसैंठोंवसें १५-५१३;

शिखराथिला १०-२२७; सांडीविखुरी ९-३०; सानेंमोठें ७-८;

दिवोराती १८-३१७; रिगोनिगी १८-३३७; भलैतैसा १-८२;

**अघडती** मात १-२३५; **नधरत** अश्रुपात १-२७२.

**२३. वाक्प्रचार व सांप्रदायः**—आतापर्यंत शब्दांचा अलग विचार वाक्यांश व पूर्ण वाक्य या दृष्टीने विचार करूं.

कोणत्याही भाषेतील वाक्प्रचारांत व सांप्रदायांत त्या त्या भाषेचें गूढ रहस्य वास करीत असतें. पुढें दिलेल्या उदाहरणांवरून मराठीने आपली पूर्वपरंपरा कशी अबाधित ठेविली आहे हें कळून येईल. या उदाहरणांतील कांहीं वाक्प्रचार व संप्रदाय मूळच्या स्वरूपांत अजून दिसतात; कांहींची घाटणी जुन्या वळणावर आहे पण कल्पना अथवा रूपक निराळया प्रकारनें घेतलेलें आहे; कांही आता मुळीच प्रचलित नाहीत.

(अ) डोहळे पुरवणें, पाठ पुरवणें, तोंड देणें, हातीं येणें, अंगें रावणें, कपाळ पिटविणें, तिलोदक देणें, आज्ञा शिरीं वाहणें, पोटचें पाणी न हालणें, कुरौंडी करणें, घर करून राहणें इत्यादि.

(आ) मोक्षश्रियेच्या पाटीं बैसवी, ज्ञानाची दिवाळी करणें, प्रतिज्ञेचें पोकळ देणें, दोदें पेलतीं अक्षरां प्रमेयांचीं, ब्रह्मानंदाची जीवा राणीव जाली, देवा मोकळवादी जाली इत्यादि.

(इ) वीजें करणें = जाणें; रूप करणें = वर्णन करणें; म्हणिये करी = आज्ञा पाळणें; वास पाहणें = अवलोकन करणें; निकेनि आहाति = खुशाल आहेत; मज पांतां = मला वाटे; वरिपडा होणें = प्राप्त होणें इत्यादि.

## वाक्यरचना

राजवाडे लेखसंग्रह, भाग २ रा, यांत वाक्यरचनेची चिकित्सा बरीच विस्तृत केली असल्याने जागा फारशी न अडवितां कांहीं नमुन्यादाखल उदाहरणें देत आहे; सारांश इतकाच की, मराठीची रचना संस्कृत गद्याच्या वळणावर बहुतेक झालेली आहे. रा. गो. गो. मुजूमदार यांचें 'मराठी सजावट' हें पुस्तक पाहिल्यास ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत येईल. तसेंच कै. म. पां. ओक यांची 'संस्कृत ज्ञानेश्वरी' पाहिल्यास हीच गोष्ट सिद्ध होते.

१ हे **वरि भलते** करितु । १-२३५; एते **तावत् किमपि** कुर्वन्तु ।

२ हा कोपे **की** निवांतु साहे । हा रुसे **तरी** बुझावितु आहे ।११-१७२;

हा रागाने बोलला **तरी** तूं मुकाट्याने सहन करतोस; हा रुसला तरी तूं त्याला समजावतोस.

३ मितलां बोलीं बोलिजे । ३-६५०; परिमितैः शब्दैः वक्तव्यम् ।

४ साच विश्वरूप जरि दावावें । तरि देखावेया सामर्थ्य की देयावें ॥ ११-१६१.

खरोखर विश्वरूप दाखवावयाचें जर होतें, तर अगोदर तें पाहण्यास सामर्थ्य द्यावयास पाहिजे होतें.

५ इयें लाजसि ना घोरीं । कर्मीं सूतां ॥ ३-३.

अस्मिन् घोरे कर्मणि योजयन् न लज्जसे ।

६ आता आमुतें **गोडां** करावें । ९-१०.

**अस्मान्** तावत् भवान् **सुभगान्** करोतु ।

७ काये फेणु पीतां । जल सेविलें होये ।। ९-१५३.
**फेणे पीयमाने** जलं सेवितं भवति किम् ।

८ देखतखेवों, ६-१७० = पाहिल्याबरोबर; पाहतांच.
उपजत खेवों, ६-४६९ = उपजल्याबरोबर, उपजतांच.

९ ऐसें देखतु होतों तों प्रभु चेविला । (यावत्-तावत्).

१० येकां दों उत्तरासवें विश्वरूप दावी ।
एक दोन शब्द मुखांतून पडतात न पडतात तोंच.

११ जन्मलां सांतां-जन्मल्याबरोबर,
टेकली सांती-टेकल्याबरोबर, ७-४.
सूदली सांती सागरीं, १५-१८६, पाण्यांत घातल्याबरोबर.

१२ कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपुलिया परी विस्तारलें ॥ १-४०.
सत्क्षेत्रे पातितं बीजं स्वैरं विस्तारमश्नुते ।

१३ पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचूनि न स्पर्शे ।
मी सर्वस्व या तैसें । सुभटासीं ॥१-१११.
यथा पतिव्रताचित्तं पत्युरन्यं स्पृशेन्न हि ।
तथा सर्वस्वमेतेषां सुभटानामहं द्विज ॥

१४ माझा मराठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंकें ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥६-१४.

कामं मे प्राकृता वाणी हृद्यां तु वचनावलीम् ।
एवंविधां विधास्यामि यत्सुधाप्यधरीभवेत् ॥

२५ येथपर्यंत व्याकरणदृष्टीने विचार झाला. आता मराठी भाषेतील संशोधनामुळे कोणती परिस्थिति उत्पन्न झाली आहे त्याचा विचार करूं.

प्रो. बीम्स, प्रो. स्टेन कोनौ, डॉ. ग्रीयरसन, जे. ब्लॉश इत्यादि पाश्चात्य संशोधकांनी व डॉ. भांडारकर, रा. राजवाडे, राजारामशास्त्री भागवत इत्यादि प्राच्य संशोधकांनी मराठी भाषेच्या उद्गमाबद्दल व विकासाबद्दल प्रयत्नपूर्वक विविध प्रकारची माहिती गोळा करून सर्वमान्य ग्रंथांतून आपली त्याविषयींची मतें प्रगट केलेलीं आहेत. तीच संशोधनाची

परंपरा अजून देखील चाललेली असून, बंगाली, हिंदी, गुजराथी इत्यादि भाषांच्या संशोधनाचें पाणी या पाटास येऊन मिळाल्याने व महानुभवीय वाङ्मयांतील संशोधनाचें साहाय्य याच कार्यास पुष्टिदायक होईल अशी परिस्थिति उत्पन्न झाल्याने, ही परंपरा अशीच नेटाने पुढे चालविली जाईल अशीं सुचिन्हें स्पष्ट दिसूं लागली आहेत.

२६. कै. राजवाडे व कै. माडगांवकर यांचे प्रयत्न 'ज्ञानेश्वरी-व्याकरणाच्या' दृष्टीने अत्यंत प्रशंसनीय आहेत. त्यांनी संपादिलेल्या 'ज्ञानेश्वरींचें' **रूपसिद्धीच्या** दृष्टीने अत्यंत महत्त्व आहे. भाषाशुद्धते-विषयींची एकनाथकालीन कल्पना व भाषाशुद्धतेविषयींची अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांची कल्पना यांत पुष्कळ फरक आहे. ज्ञानेश्वरीची भाषा म्हणजे काव्यासाठी मुद्दाम 'मशकु, गजु, उपाजो, आग्रहो, पै,' असले शब्द कृत्रिम तऱ्हेने योजून केलेली नसून, सामान्य जनतेच्या प्रत्यक्ष व्यवहाराची तशीच भाषा होती हें महानुभावीय वाङ्मयांतील उपलब्ध झालेल्या गद्य-ग्रंथांवरून स्पष्ट सिद्ध होत आहे. येवढेंच नव्हे तर वाक्प्रचार, सांप्रदाय, वाक्यरचना, शुद्धलेखनाचे नियम या दृष्टीने महानुभावीय वाङ्मय राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरींतील भाषेला पुष्टि व पुरवणी देत आहे.

२७. राजवाडे व माडगांवकर यांनी छापलेल्या ज्ञानेश्वरींतील रूपें व आम्हांस पहावयास मिळालेल्या (शके १४७६ मध्ये आनंद संवत्सरांतील श्रावण वद्य ९, मंगळवार रोजीं लेखन समाप्त झालेल्या) 'लीळाचरित्रा-च्या' एका जुन्या हस्तलिखित पोथींतील रूपें हीं तंतोतंत जुळतात, एवढेंच नव्हे तर दोघांनाही शुद्धलेखनाचे नियम एकाच प्रकारचे मान्य आहेत, असें दिसतें. वाक्यरचना, प्रयोग, शब्द, वाक्प्रचार इत्यादि दृष्टीने हें महानुभावीय प्राचीन मराठी गद्य व ज्ञानेश्वरीचें प्राचीन मराठी यामध्ये अनेक प्रकारचें साम्य आहे. याबद्दलची विस्तृत माहिती वाचकांना लवकर पहावयास मिळेल, इतकेंच तूर्त आश्वासन येथे देऊन ठेवतों.

२८ ज्ञानेश्वरीमध्ये येणाऱ्या शब्दांचा पडताळा महानुभावीय प्राचीन मराठींत पहावयास सापडतो एवढेंच नव्हे, तर कांही विशिष्ट शब्द, वाक्प्रचार व वाक्यरचना या महानुभावीय वाङ्मयांत आढळल्याने त्या

ज्ञानेश्वरींत आल्या असत्या पाहिजेत असा तर्क करावा तर तो खरा ठरतो अशीं कांही उदाहरणें आहेत. पूर्वी ज्ञानेश्वरी वाचणारांना देखील त्या गोष्टी कळल्या नव्हत्या असेंच म्हणणें भाग पडतें. पुढील उदाहरणांवरून हें स्पष्ट होईल.

(अ) 'सुरवाड' असा शब्द नसून 'सुखाड' असा शब्द असावा असें राजवाडे यांनी ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत आपलें मत नमूद केलेलें होतें; पण पुढील प्रमाणांवरून तें खोटें ठरतें, एवढेंच नव्हे, तर महानुभावीय वाङ्मयांत 'सुरवाड' असेंच रूप सापडतें.

पुढील ओव्यांतील यमक ध्यानांत आणिल्यास वरील म्हणणें सत्य आहे हें उघड होय.

**सुरवाड** (ज्ञानेश्वरींतील ओव्या)

ऐसी निजपुण्याची **जोडी** । वाढिनली सर्व सुखांची कुलवाडी ।
तिए जन्में ती सुर**वाडी** । योगच्युतु ।। ६-४४६.
तेंचि आवडेतैसा **सांकडु** । आचरतां जऱ्ही **दुवाडु** ।
तऱ्ही स्वधर्मेंचि **सुरवाडु** । पारत्रिकीं ।। ३-२२०.
तेया बोलाचा हान **पाडु** । कां रसवृत्तिचा **निवाडु** ।
जेणें श्रोतेयां होईल **सुरवाडु** श्रवणसुखाचा ।। ३-२७०.
आता कृष्णवाक्यबीजा **निवाडु** । आणि संजयो सात्विकाचा **बिवडु** ।। म्हणौनि सत्रयांचि होइल **सुरवाडु** । प्रमेयपिकाचा ।। ९-५२८.

**सुरवाडु** (वत्सहरण–पंडित दामोदर कृत, शके ११९४ ते १२०७)–

या काजां देओ नेणता जाला । तवं ब्रह्मा निजभुवनां गेला ।
गोपवासरुवां **सुरवाडु** केला । राउळींची भणौनि ।।२६४.

(आ) **दोसें**=उद्देशें, करितां, साठीं. हें अव्यय ज्ञानेश्वरींत येत असूनहि लक्षांत आलेलें नव्हतें.

हें एकैक ऐसें । नाना परिं भापावसें ।
स्तोत्र करुनि तुज **दोसें** । निर्विशेषा ।। १८-११.

तें हि करावेया **दोसें** । मज सामर्थ्य असे ।
किं नाहिं हें ऐसें । न पांत करी ॥ १८-६१८.
जें असौनि त्रिशकु**दोसें** । धात्रेया ही आणावें वोसें ।
तें नासतें कीजे कि ऐसें । निर्वावें ना हीं ॥ १८-१७६६ (ज्ञानेश्वरी).

ज्ञानेश्वरीचा मराठी अर्थ देणाऱ्या निरनिराळया आवृत्तींत या शब्दाचा अर्थ पाहिल्यास टीकाकारांचे अर्थ चुकलेले आहेत असें दिसून येईल. पण महानुभावीय काव्यांत हा शब्द नेहमी येतो. प्रो. पंगू यांनी 'वत्सहरण' काव्यावर टीपा लिहिल्या त्यावेळीं त्यांचे लक्षांत ही चूक आली नाही.

वत्सहरणांतील पुढील ओव्या पहा.

तुझें सहजगुण ऐसें । अवतरलासी मायावेषें ।
कैवल्य देयावेआं **दोसें** । शरणागतांसीं ॥४०४.
जेथ सानुरागें सुमनसें । मकरंद आस्वादनमिषें ।
श्रीकृष्ण पावावेआं **दोसें** । मुनी षट्पदु जाले ॥१६१.
कीं दी असतां तारा न दिसे । तें उणें फेडावेआं **दोसें** ।
वनश्रिया वेढिलें जैसे । अंबरू नक्षत्रेसीं ॥१३३.

ऋद्धपूरवर्णनांतील पुढील ओवी पहा—

स्फुरण स्फुंदनाचेनि मिषें । प्राण एरझारा करीतु असे ।
सौरभ्यें गिवसावेआं **दोषें** । गर्भ सुमनाचा ॥४४. दोषें=कारणें.

(इ) भविष्यकाळ—होउनि, राहुनि, सांघौनि, दाउनि, पाहुनि हीं रूपें पूर्वकालवाचकासारखीं वाटतात; पण तीं प्रथमपुरुषी भविष्यकाळी बहुवचनी रूपें आहेत.

१ आम्ही पूर्णकाम **होउनि** । नरि आत्मस्थिति **राहुनि** ।
तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरैल ॥ ३-१६४.
(**भूत्वा** वयं चेदिह पूर्णकामाः । आत्मस्थितावेव रतिं **भजेम** ।
प्रजास्तदेमाः सकला विमूढाः । कथं नु संसारमिमं तरेयुः ॥ )

२ आतां केती नावां नावां गूज । म्हणतां कानडें हान आवडैल तुज ।
तरि **सांघौनि** ज्ञान सहज । विज्ञानेंसीं ॥ ९-४२.

३ म्हणौनि इये नीदेची वाट मोडे । निखल उद्बोधाचेंचि आपणपें
घडे । ऐसें सुवर्म जें आहे फुडें । तें दाउनि पाइं ॥ ९-९५.
४ ते वस्तु मज स्वामीं । एकीहेळा दीधली तुम्हीं ।
हें ब्रोलों म्हणतों तरि **आम्हीं** । तूं **पाहूनि** कैचें ॥ ११-४८.

टीप—निरनिराळ्या आवृत्तींत या ओव्यांचा मराठी अर्थ दिलेला पहावा. म्हणजे हीं रूपें टीकाकारांना कशीं फसवतात तें कळून येईल. महानुभावीय गद्यांत हीं रूपें मधून मधून आढळतात; त्यावरून हीं रूपें लक्षांत आलीं.

'आम्ही गोसावियापासी राहुनी' (लीळाचरित्र ३३६ लीळा)
'आम्ही तुजलागीं एक दामु देउनी' (लीळा, ३४७);
'आम्हां विमानावरि बैसोनि जाऊनी' (लीळा, ३०९);
'चांगदेओ राउळाचेया दरिसना जाउनि' (लीळा, ७५);

(ई) **एथ** हा शब्द 'अहम्' या अर्थीं प्रथमपुरुषी महानुभावीय गद्यांत वारंवार येतो. पुढील उदाहरणें पहाः—

**एथ** पां दाखवा = **आम्हांला** दाखवून द्या (लीळा ३३५);
**एथचेया** आंगुठेयासि त्रिटाळु जाला (लीळा ३३४);
**एथौनि** तुझें पोट राहाविजैल (लीळा ७०);
एथौनि पाठविलें ऐसें म्हणा (लीळा ५५).

ज्ञानेश्वरींतील पुढील ओवींत कै. म. पां. ओक यांनी केलेलें संस्कृत भाषांतर पाहिल्यास हेंच स्पष्ट होईल.

(१) **एथ** ज्ञानाची आस काइसी । अर्जुन म्हणे ॥ ३-१३.
का **वास्माक**मिहाशा स्याज्ज्ञानं प्रति जनार्दन ॥
(२) **एथ** आथि म्हणितलें देवें । मानूं बापा ॥ ११-१६०.
तूं म्हणतोस तसें **आमच्या ठिकाणीं** लागूं पडतें.
(३) तया विजयवृत्ती कांही । मज सर्वथा काज नाही ।
**एथ** राज्य तरी काइ । पावौनियां ॥ १-२१०.

प्राप्तेन विजयेनैवं न मे कार्यं मनागपि ।
एवं चाविगतेनापि किं राज्येन करोम्यहम् ॥

(३) ळ

(१) राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेल्या ज्ञानेश्वरींत सर्व ठिकाणीं 'ळ' च्या जागीं 'ल' घातलेला आहे. पोथीच्या एका पानाचा फोटो दिलेला आहे, त्यावरून हें स्पष्ट दिसतें.

(२) माडगांवकरांना सापडलेल्या पोथ्यांतून 'ळ' आढळतो ( पैठण येथील जुनी पोथी शक १५५१).

(३) महानुभावीय जुन्या पोथ्यांतून सर्वत्र 'ळ' आढळतो; एवढेंच नव्हे तर सांकेतिक लिपीत 'ग' व 'ळ' यांना 'ळ' व 'ल' असा संकेत बसविलेला आहे. तेव्हा संकेत प्रथम ज्यावेळीं केला त्यावेळीं 'ळ' खास होता. (सकळ लिपी, शके १२७५; सुंदरी, शके १२८५). शिवाय पुढील शब्द महानुभावीय वाङ्मयांत नित्याचे असल्याने मननीय आहेत. लीळा, गुळळा, सागळ, माळा, सरवळा, वेळ, विळा, राउळ, सकळ, फळ, सोळा लक्ष, आद्यमळ, मैळे, टिळा, वेगळा, तळचील, डोळा, झोळी, गळे, पळे, गळा.

(४) वत्सहरणांतील (शके १२०० सुमारें) यमकाचे दृष्टीने पुढील ओव्या मननीय आहेत—६३, ६४, ७५, ७९, १३५. यांत आलेल्या शब्दांचा उच्चार पाहतां 'ळ' अक्षर येथे योग्य दिसतें.

गोकुळें । सावळें । खेळेमेळे ॥६३;
गोकुळ । बाळ । वेल्हाळ ॥६४;
गोपाळी । वेगळी । पाबळी ॥७५;
सोनेसळा । सांवळा । पातळा ॥७९;
ओळीं नारीएळीं । पोफळी ॥१३७.

(५) 'महाराष्ट्र कवि' मालेंतील मराठी पंचतंत्रांत 'ळ' आहे.

'पूर्वि महिळारोप्य नाम नगरि' (पृष्ठ १);
**वोळवितु** (पृष्ठ २); **पिंगळकु** (पृष्ठ २);

कळ लागलि (पृष्ठ ३); पोकळ (पृष्ट ३).

(६) Gujarathi Language and Literature, (Wilson Philological Lectures) by N. B. Divatia, B. A.

उत्सर्ग १० (पान ३६३–३६४) यांत गुजराथीमध्ये ळ कसा आला असावा याचा विचार केला आहे तो मननीय आहे.

फल–फलु–फळ, कला–कला–कळ, कदली–केली–केळ, अन्धक–अंधलउ–अंधळो, षोडश–सोलह–सोळ, शीतलकं–सीअलउ–शीळु, झोलिया–झोळी.

हा फरक पुढील नियमानुसार होतो—

समानपदांत दोन स्वरामध्ये असलेल्या ल चा 'ळ' होतो. Intervocalic ल is changed to ळ.

मराठींत 'ळ' चा प्रवेश द्राविडी भाषेच्या संपर्कामुळे झाला, असें मत सध्या प्रचलित होऊं पाहात आहे. तथापि या प्रश्नाला दुसरी एक बाजू असून, तिचा विस्तार प्रो. दिवेटिया यांनी आपल्या 'विलसन व्याख्यानां'त केलेला आहे; त्याकरूत 'पैशाची' भाषेचा संपर्क गुजराथ, राजपिपळा (भिल्लप्रांत) वगैरे प्रांतांतील भाषांवर जसा झाला, तसाच तो निकटवर्ती मराठी बोलणाऱ्या लोकांवर होण्याचा तितकाच संभव आहे व त्या द्वारें मराठींत 'ळ' चा शिरकाव झाला असावा. हीच उपपत्ति प्रो कोनौ यांनी 'Maharashtri and Marathi' या निबंधांत विवेचिली आहे.

२९. सारांश, व्याकरणाची ऐतिहासिक दृष्टि घेऊन, हिंदी, गुजराथी, बंगाली इत्यादि भाषांच्या व्याकरणांचा तौलनिक विचार करून व प्रस्तुत कालीं उपलब्ध होणाऱ्या महानुभावीय अत्यंत जुन्या अशा हस्तलिखित पोथ्यांचें तुलनात्मक अध्ययन करून जुन्या मराठीच्या व्याकरणाची इमारत बनविली पाहिजे; म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्या मुखांतून निघालेल्या वाणीच्या द्वारांने त्यांची मूर्ति आपणासमोर उभी राहून सुखाच्या साम्राज्यांत आपणांस लोटील.

ज्ञानेश्वरीची रचना होऊन आज ६००-६५० वर्षे गेलीं तरी ती इतकी सुबोध राहिली, यांतच तिचें अलौकिकत्व व महत्त्व आहे; व म्हणूनच तिच्या व्याकरणाची इतकी धडपड अजूनहि करावीशी वाटते. थोडयाशा व्याकरणाच्या अभ्यासाने ज्ञानेश्वरी मूलत: वाचण्यासाठी वाचकांना अल्पमात्र जरी या लेखाचा उपयोग झाला तरी त्याचें चीज झालें, असें मी समजेन. निदानपक्षीं हा प्रश्न महत्त्वाचा आहे असें समजून दुसऱ्या एखाद्या अधिकारी व्यक्तीने अशा प्रकारची व्याकरणाची मांडणी वाचकांच्या दृष्टीने केली तर उत्तमच होईल. कै. राजवाडे, भांडारकर इत्यादिकांच्या स्मरणाने वाट चालत चालत गोळा केलेली दूर्वांकुरांची ही ओंजळ श्रीज्ञानेश्वरांच्या चरणीं अर्पण करून वाचकांची रजा घेतों.

---

... ग्रं. स्थळप्रत.
अनुक्रम 26228 वि: ...
क्रमांक ...9.9.42 नों: दि: 30/7/45

# २. राजवाडे—ज्ञानेश्वरीचें पुराणत्व*

भारत इतिहास संशोधन मंडळाच्या गेल्या सालच्या त्रैमासिकांत (पृ. १३—२८) श्री. गो. कृ. मोडक यांचा 'राजवाडे—ज्ञानेश्वरीचें पुराणत्व' हा निबंध छापला आहे. त्यामध्ये श्री. मोडक यांनी आपलीं मतें राजवाडे यांच्याशीं कोठें कोठें जुळत नाहीत, हें निर्भीडपणें सांगून, त्या मुद्यांसंबंधी आपलें स्वतःचें स्पष्टीकरण दिलेलें आहे. प्रस्तुत स्थळीं श्री. मोडक यांनी घेतलेल्या कांहीं आक्षेपांची चर्चा करण्याचें योजिलें आहे. मी राजवाडे प्रतच उपयोगांत आणली आहे.

श्री. मोडक यांचा पहिला आक्षेप, **जुनी वाक्यरचना** या परिच्छेदांत (पृ. १४-१५) दिसून येतो. त्यांचें म्हणणें असें की, **जेणें कृतकार्या होइजे** (१.२५) **निश्चळां बैसिजे** (३-६०) इत्यादि वाक्यरचनेचा विशेष प्रकार राजवाडे यांना दिसला, पण स्पष्टीकरणाच्या बाबतींत मात्र राजवाडे घसरले आहेत.

राजवाडे यांचें म्हणणें असें की, **येन कृतकार्येण भूयेत** या संस्कृत वाक्याचें **जेणें कृतकार्या होइजे** हें मराठी अवतरण आहे. भावे प्रयोगाच्या मूळ संस्कृत रचनेला धरून मराठींतही उद्देश्य व पूरक हें **तृतीयेंत** असावें. म्हणून 'कृतकार्या' हें रूप तृतीयेचें आहे. वर्तमान मराठींत 'कृतकार्य' असेंच रूप वापरलें जातें.

रा. मोडक याविरुद्ध असें म्हणतात, 'ज्ञानेश्वरी मराठींत भावे प्रयोगांतील पूरक **आ-प्रत्ययान्त प्रथमा** असते. राजवाड्यांनी अशा रूपास **तृतीया** गणिलें हें चिन्त्य आहे' (पृ. १८).

---

* भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक, वर्ष १६, अंक १

रा. मोडक यांच्या म्हणण्याचा रोख असा की 'कृतकार्यां' यासारखीं रूपें तृतीयेचीं आहेत, असें धरल्यास मोठा घोटाळा होईल. एं-एनि (वेगें, सुधाकरें, आपुलेनि, जाणतेनि इत्यादि रूपांतील प्रत्यय) या नित्यपरिचित प्रत्ययांपेक्षा **आं** हा एक निराळाच प्रत्यय कल्पावा लागेल. शिवाय हा प्रत्यय सर्वोपाधिभेदातीत ठरण्याचा प्रसंग येईल (पृ. १६).

आता वरील आक्षेपांचा विचार करण्यापूर्वी जीं रूपें तृतीयेचीं आहेत याविषयीं सर्वांचें एकमत होईल, अशीं उदाहरणें आपण पाहूं.

तैयापरी **श्रोतां** । अनुभवावी हे कथा । (१-५७).

**वाटिवांवीण** हाव । बांधती झुंझी । (१-७२).

जिहीं विचाराचां **डोळां** । पाहिलासि । (१६-२९).

जो सर्व **नेणिवां** जाणिजे । (१६-१९).

सर्व प्रकारीं धावा । करी पां **वेगां** । (१७;१७३८).

**नवरसां** भरवी सागर । (१२-११).

मियां इहींचि दोहीं **डोळां** । झोंबावें विश्वरूपा सकळा । (१०-३०७).

आगा **डोळां** वीण मोतियें । वेता पाडु मिळे विपायें । (१८-७७८).

पायाचें चालणें **डोयां** । केलें जैसे । १८-९२८).

गुरुवाक्य **श्रवणांचि** सवें । (१८-९८२).

**श्रवणांसवें** सुमना । समाधि जोडे । (१३-११५३).

जी येकां दों **उत्तरांसवें** । (११-३९).

य-हवि **न बोलणें** न बोलणें । जेथिचें सर्व नेणिवां जाणणें ।
(१५-५०५).

हीं राजवाडे-ज्ञानेश्वरींतील उदाहरणें पाहिल्यास स्थूलाक्षरीं रूपें तृतीयेंत आहेत यांत संशय नाही.

यावरून असें स्पष्ट ठरतें की, तृतीयेचीं **श्रोतां** '१-५७), **श्रोतेनि** विण (९-२९) अशीं दोन्ही प्रकारचीं रूपें ज्ञानेश्वरींत आढळून येतात; मग व्याकरणकारांना अडचण पडो, अगर न पडो.

महानुभावीय वाङ्मयाचा विचार केल्यास हीच गोष्ट आढळून येते. 'शिशुपालवध' या काव्यांतील पुढील उदाहरणें पाहा—

तें आइकावें **श्रोतां**। (शि. १६); फुन **वाचां रसाळां**। गर्वु सांडवीन **कोकिळां**। (शि. २७); कां बांधलेति आरोचकें **झोंविआं विणूं**। (शि. ११९); दानवरुधिराचिया **उ्ला**। यादवप्रतापतरूं वाढीनला। (शि. २); परि पडिलों फांदा। बहुतां **दिसां**। (शि. २०१), सखेयाचियां **बोलां**। वर्मैली। (शि. २७७) इत्यादि.

फरक इतकाच दिसतो की, जुन्या मराठींत **आंकारान्त** तृतीयेचीं रूपें, **ए, एनि** या प्रत्ययांनी होणाऱ्या रूपांपेक्षा **कमी प्रमाणांत** आढळतात; पण त्या रूपांचें अस्तित्वच नाही, हें म्हणणें प्रत्यक्ष प्रमाणास सोडून होईल.

वरील मुद्दा एकदा पटला म्हणजे राजवाडे यांचें स्पष्टीकरण चुकीचें म्हणणें कठीण जाईल; कारण मूळ संस्कृत रचनेला धरून मराठींत रचना उतरली असें त्यांचें म्हणणें सयुक्तिक वाटतें. म्हणून, 'अमरीं **भाटां** होईजे' (६–४५४), 'तिहीं **मनुष्यां** होइजे' (१४-२७०) इत्यादि वाक्यांतील **भाटां** व **मनुष्यां** हे पूरक शब्द, उद्देश्यानुसार तृतीयेंत योजिले, हें बरोबरच आहे असें वाटतें.

आता **आंकारान्त** तृतीयेच्या रूपांचें, क्रियाविशेषणांच्या कांही रूपांशीं **साम्य** दिसतें म्हणून तीं दोन्ही एकच, असा तर्क करणें चुकीचें होईल.

(अ) स्वभावें वाटा येतां। जरि वरपडा जालां **अवचितां**। (६-१६८);
येयालागि आतां। स्तुति सांडुनि **निवांतां**। (१४-१५);
हा क्षेत्र वृत्तांतु। **उगेयां** आइकां ।। (१३-४२).

या उदाहरणांतील **अवचितां** व **निवांतां** हीं क्रियाविशेषणें आहेत.

अमरीं **भाटां** होइजे (६-४५४).
**राजसां तामसां** होइजे (१६-११७).
तिहीं **मनुष्यां** होइजे (१४-२७०).

**ब्रह्मायुषां** होइजे । मग **निजैलेयां** चि असिजे ॥ (१४·१८६).

या उदाहरणांत **भाटां** व **मनुष्यां** इत्यादि नामें आहेत व तीं तृतीयेंत आहेत. यांना कांही झालें तरी क्रियाविशेषण कसें समजावयाचें ?

कांही वाक्यांत दोन्ही गोष्टी संभवतील. जसें—'पुरुषें **निश्चलां** बैसिजे' या वाक्यांत **निश्चलां** हें क्रियाविशेषण मानलें, तर त्याचा संबंध 'बैसिजे' या क्रियेचा गुण दाखविण्यांत दिसतो, असें म्हणावें लागेल. पण **निश्चलां** हा शब्द जर पूरक समजला गेला, तर तो तृतीयेंत आहे असें मानणें प्राप्त आहे व त्याचा उपयोग **पुरुषें** या नामाचा गुण दाखविण्याकडे आहे. तेव्हा श्री. मोडक यांचें म्हणणें बरोबर आहे, असें अजून पटत नाही.

श्री. मोडक हे दुसरें असें विधान करितात की, स्वयंवर्ती तृतीया जुन्या मराठींत दिसते, पण 'स्वयंवर्ती **सप्तमी**' जुन्या मराठींत नाही (पृ. २२).

प्रथमतः स्वयंवर्ती तृतीयेंत काय विशेष दिसतें, याचा आपण पुढील उदाहरणांवरून विचार करूं.

उदितें राईमराजें (१४–४६); उदैलेनि सुधाकरें (११–२४८);
बैसतेन आनंदें (१८–१५९०); तेणें आलबलेनि (१८–११४६);
कापुरें वेचलेनिहि (१८–४२०); कामें नासलेनि (१८–१०५४).

वरील उदाहरणांत भूतकालवाचकें व त्यांचीं विशेष्यें दोन्हीही तृतीयेंत स्पष्टपणें योजिलेलीं असून, भूतकालवाचकांना **एनि** प्रत्यय लागून रूप झालेलें आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

आता पुढील उदाहरणांतील रचना व त्यांचा अर्थ लक्षांत घेतल्यास आपणाला संस्कृतांतील स्वयंवर्ती सप्तमीची आठवण होते काय, याचा विचार करावा.

जैसे **प्रगटलेयां गभस्तीं** । अशेषही मार्ग दिसति ॥ २–२६१.
**विरूढलेयां जोन्हला** । कणिसाचा निवाला ॥ १४–१२५.
जैसा **कीस फीटलेयां** आभाळीं । दीठि रिगे सूर्यमंडळीं ॥ ११–७८.

वरील ओव्यांचें जर संस्कृत कोणी बनविलें, तर स्वयंवर्ती सप्तमीच घालण्याचा त्याला मोह पडेल. ज्ञानेश्वरींत वरील रचना पुष्कळ ठिकाणीं दिसते.

**प्रगटलेयां, विरूढलेयां, फीटलेयां** यांच्या रूपसाम्यामुळे जर श्री. मोडक हीं रूपें तृतीयेचीं म्हणतील, तर त्यांना तृतीयेचीं **आंकारान्त** रूपेंच कबूल नाहीत; पण **माथां** (डोक्यांवर), **पायां** (पायांत), अशीं सप्तमीचीं रूपें सर्वांच्या परिचयाचीं असल्याने वरील रूपें सप्तमीचीं म्हणण्यास मुळीच हरकत नाही. तसेंच स्वयंवर्ती तृतीयेंत भूतकालवाचक विशेषणांचीं रूपें **एनि** प्रत्यय लावून केलेलीं असून, येथे तींच भूतकाल-वाचकें **आं**-प्रत्ययान्त कां यावीं याचें स्पष्टीकरण श्री. मोडक यांना करणें प्राप्त आहे. तेव्हा सोपा मार्ग म्हणजे स्वयंवर्ती सप्तमी जुन्या मराठींत आढळते, हें कबूल करणें हा होय.

**महाराष्ट्री प्राकृत व जैन अपभ्रंश ग्रंथ यांची वरील कल्पनेस पुष्टि**—व्याकरणाची ऐतिहासिक दृष्टि पत्करली, तर स्वयंवर्ती सप्तमीची परंपरा जुन्या मराठीने पुढे चालविली, हें स्पष्ट दिसून येतें.

**गाथा सप्तशती** (महाराष्ट्री प्राकृत ग्रंथ)—

प्राकृत—**साहीणे** वि **पिअअमे पत्ते** वि **खणे** ण मण्डिओ अप्पा।

संस्कृत—**स्वाधीनेऽ**पि **प्रियतमे प्राप्तेऽ**पि **क्षणे** न मंडित आत्मा। (शतक १-३९).

प्राकृत—नइऊरसच्छहे जोव्वण**म्मि**। (श. १. ४५).

संस्कृत—नदीपूर सदृ**शे** यौव**ने**।

**पाहुडदोहा** (जैन अपभ्रंश)—

अपभ्रंश—धम्मि **णट्ठिं** णरइगइ। (दो. ६०).

संस्कृत—**धर्मे नष्टे** नरकगतिः।

अपभ्रंश—अब्भिंतरचि**त्ति** वि मइल**यइं** बाहिर काइं तवेण। (दो. ६०).

संस्कृत—अभ्यन्तर**चित्तेऽ**पि **मलिने** बाह्यतपसा किम्)।

अपभ्रंश—मणसुद्धइं णिच्चलठियइं पाविज्जइ परलोउ। (दो. ६).

संस्कृत—मनसि **शुद्धे** निश्चल**स्थिते** च प्राप्यते परलोकः।

**सुरवाड या शब्दाचा स्वरूपनिर्णय**—श्री. मोडक यांना हा निश्चय करण्यास **यमकाचा** आधार सापडलेला नव्हता; तेव्हा तो पुढें सादर केला जात आहे. यावरून सुर-वाड शब्द असावा असें अनुमान करण्यास एक प्रकारें मदत होईल. ज्ञानेश्वरीच्या सर्व आवृत्तींत पुढील ओव्या सापडतात; त्यामुळे या प्रमाणाला विशेष बळकटी येते असें म्हणणें चुकीचें होणार नाही.

आता कृष्णवाक्यबीजा **निवाडु**।
आणि संजयो सात्त्विकाचा **विवडु**।
म्हणौनि सवयांचि होइल **सुरवाडु**। प्रमेयपिकांचा ॥ (९-५२८).

तयां बोलाचा हान **पाडु**। कां रसवृत्तीचा नि**वाडु**।
जेणें श्रोतेया होइल सुर**वाडु**। श्रवणसुखाचा ॥ (३-२७०).

ऐसी निजपुण्याचीया **जोडी**। वाढीनली सर्व सुखाची कुल**वाडी**।
तिए जन्मे तो सुर**वाडीं**। योगच्युतु ॥ (६-४४६).

आणि आत्मेयाचिया आ**वडी**। कर्म करितां सुर**वाडीं**।
देह सुखाचिये पर**वडी**। येवों न व्हाए ॥ (१८-६३६).

जेथ उंचावते न प**वाडे**। सुखाचा पैसाऊ **जोडे**।
आपुलेनि सुर**वाडे**। उडों ये ऐसा ॥ (७-१५१).

**सुरवाड म्हणजे काय?** पुढील ओव्या वाचल्या म्हणजे ज्ञानेश्वर स्वतःच **सुरवाड** शब्दाचें चित्र रंगवीत आहेत की काय, असें भासतें. कारण वर्णनाच्या शेवटीं '**ऐसा अवघाचि सुरवाड** आहे' असें ज्ञानेश्वर म्हणतात.

तरि पवित्र होए आणि रम्य। तेविंचि सुखोपायेंचि अवगम्य।
आणि स्वयंसुख परि धर्म्य। वरि आपणपां जोडे ॥ (९-५४).
**ऐसा अवघाचि सुरवाड आहे** ॥ (९-५५).

आधीच पवित्र, त्यांत रमणीयपणाची जोड, शिवाय कष्ट नाहीत, त्यांतल्या त्यांत धर्माला सोडून नाही, त्यावर असली गोष्ट आपल्या पायाने आपणांकडे चालत येणारी, अशा प्रकारें 'सार' अलंकाराच्या झोकांत एकाहून एक वरचढ पायरीने सुखाचा उत्कर्ष दाखविला आहे, व सुरवाड म्हणजे हेंच, असें शेवटीं ज्ञानेश्वर सांगत आहेत. म्हणून अनुकूल गोष्टींची विपुलता, सुखसंपन्नता, बहर, संपन्नता व ऐश्वर्य चढत्या पायरीने कळसास पोचणें हा अर्थ सुर-वाड शब्द ध्वनित करतो असें वाटूं लागतें.

बाराव्या अध्यायांतील १५८–१६३, या ओव्या वाचूं लागलें म्हणजे तीच कल्पना दृढ होते. या ओव्यांत उपमा जशी वेगाला चढत आहे, त्याप्रमाणे एकावर एक लाटा येऊन 'भलेया सुखा मीनलों' असें उद्गार निघाले म्हणजेच सुर-वाड झाली असें म्हणण्यास हरकत नाही.

**सुर-वाड शब्दाची व्युत्पत्ति**—वरील अर्थ लक्षांत आणल्यास सु-वृद्धि किंवा समृद्धि (सम्+ऋद्धि) या शब्दांशीं सुर-वाड याचा संबंध असावा असें वाटतें. सुवृद्धि-सुरवड्ढी-सुरवाढि-सुरवाढ-सुरवाड-अशी परिवर्तनें या शब्दाचीं कदाचित् झालीं असावीं.

सुर-वाड याच्या अर्थांतील सुखाची चढती कमान पाहून जर पुढील ओवी आपण वाचली तर आणखी एक व्युत्पत्ति संभवते.

'ऐसं प्रेमरसें **सुरस्फुरें**। बोलिलें जव यादवेश्वरें ॥' (१५-६८).

प्रस्तुत ओवींतील सुरस्फुरें हा शब्द मननीय आहे. स्फुरत्-स्फुर-सुर अशा पायरीने 'स्फुरत् वृद्धि' म्हणजे सुरवाड असेंही कदाचित् रूप झालें असेल.

वरील विवेचन सुर-वाड या शब्दाच्या स्वरूपनिर्णयास मदतीचें होईल, अशी आशा आहे. आता आपण दुसऱ्या शब्दाकडे वळूं.

**अढंच शब्दाची अडचण**—श्री मोडक यांचें असें म्हणणें आहे की, **आढ्यं** हा शब्द चुकीने **आढंच** असा केव्हा तरी वाचला गेला व तीच चुकीची परंपरा पुढे चालविली गेली.

प्रथम दर्शनीं श्री. मोडक यांचें म्हणणें बिनतोड दिसतें, पण विचारान्तीं तें पटत नाही. वाचण्यांत चूक झाली असें म्हणतांना शब्दांतील अक्षरांच्या वळणाचा, घाटाचा, नीट विचार केला पाहिजे, व हें वळण म्हणजे अलीकडील वळण न घेतां जुन्या हस्तलिखिताच्या काळांतील घेतलें पाहिजे. संस्कृतमधील तेराव्या चौदाव्या शतकांतील पोथ्यांत आढळून येणाऱ्या 'ढय' शब्दाचें वळण आपण पाहिलें पाहिजे. तसेंच अगदी जुन्यांत जुन्या मराठी हस्तलिखित पोथ्या पाहिल्या पाहिजेत.

माझेजवळ महानुभावी मराठी व संस्कृत जुन्या पोथ्या आहेत. त्यांतील अक्षरांचें वळण पाहिल्यास वरील चूक संभवत नाही. **च** व **य** यांचें वळण अगदी स्पष्ट असून वाचतांना चूक होण्याचा संभव नाही. चूक झाली तर वाचन **अढंच** असें न होतां **अढंय अढयं** असें होईल.

तसेंच राजवाडे प्रतींत आरंभीं मूळ प्रतीच्या नमुन्याचें एक छापील पान आहे. त्यांतील **च** व **य** या अक्षरांचें वळण पाहण्याजोगें आहे. हें वळण अगदी वर वर्णिल्याप्रमाणेच आहे. त्यांत 'य' जोडून होणारीं जोडाक्षरें पाहावीं. विशेषतः त्या पानांतील पुढील अक्षरें सूक्ष्मपणें पाहावीं—

ओळ २ नित्यकर्म (त्य)
,, ६ पथ्य (थ्य)
,, ७ अन्यथा (न्य)
,, ८ याचिये (च)
,, ,, चोखडे (च)
,, ९ काम्य (म्य)
,, १३ चुके (च)

**अढंच याचें दुसरें उदाहरण**—हा शब्द आणखी एका ओवींत ज्ञानेश्वरीमध्ये आलेला असून त्या ठिकाणीं **आढ्यता** हा सुचविलेला अर्थ लागत नाही.

ऐसें **अढंचे** आंतुचि रिचे। बाहिरील माघौते न वचे।
म्हणौनि राहणें आधिं ए दीठीचें। तेथेंचि होये॥ (६-२०५).

योग्याच्या नासाग्रहदृष्टीचें वर्णन चालू असतां वरील ओवी आली आहे. 'डोळयाचीं वरलीं पातीं मिटतात, पण खालचीं विकास पावतात; मग दृष्टि आंतल्या आंत बाजूला सरून जरा बाहेर डोकावते, तोंच ती नासाग्रावर अडते. अशाप्रकारें दृष्टि **वरून आंत** कुचंबल्यामुळे पुनरपि बाहेर जाणें कठीण झाल्याने, त्या अर्धविकसित दृष्टीला नासाग्रावर स्थित होणें अवश्य होतें.'

म्हणून वरील ओवींत 'अढंचे आंतुचि रिचे' म्हणजे 'वरिलीकडून आंत कुचंबली जाते', असा अर्थ दिसतो.

यावरून अढंचे म्हणजे वरची, असा अर्थ दिसतो. हाच अर्थ 'धात्रेया ही अढंच करणें' यांत लागू होतो. अढंच करणें म्हणजे वरचा, श्रेष्ठ करणें, उच्च पदवीला नेणें. त्यावरून गुरु-लघु, भारी-हलका, उच्च-नीच, स्तुत्य-निंद्य, संपन्न-हीन, प्रशस्य-तिरस्कार्य असे, अढंच व त्याचे विरोधी शब्द, यांचे अर्थ ध्वनित होऊं लागतात.

या दृष्टीने पुढील दोन उताऱ्यांकडे लक्ष दिल्यास अर्थनिर्णयास मदत होण्यासारखी आहे.

पहिल्या उताऱ्यांतील आशय असा आहे की, सृष्टिरचनाकालीं प्रथम ब्रह्मदेवाची बुद्धि गुंग होऊन गेली. त्याला कांही सुचेना; पण प्रणवाक्षराचा जप केल्याबरोबर त्याच्या अंगीं अलौकिक सामर्थ्य आलें व त्याने विविध प्रकारची सृष्टि निर्माण केली. अशा प्रकारें या प्रणवाने विधात्याला **गौरवास्पद** केलें.

'पै सृष्टिचेया उपक्रमा। पूर्वि गा धीरोत्तमा।
वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता ॥१७-३३४.
जेयाचा अर्थु जीविं ध्यातां। जं वर्णत्रय जपतां।
विश्वसृजना योग्यता। आली तेया ॥१७-३३५.
ऐसें नाममात्रें जेणें। धात्रेया **अढंच** करणें ॥१७-३३८.

याच्या उलट कल्पना पुढील ओव्यांत दिसून येते. अटराव्या अध्यायांत ज्ञानेश्वर पुढीलप्रमाणे वर्णन करितात. 'महाराज, माझ्यासारख्या

दुबळयासाठी, हे गुरो, तुम्ही ग्रंथाची जी अद्भुत सृष्टि केली ती पाहून विश्वामित्राला आम्ही तुच्छ मानतों; कारण त्रिशंकूचा अभिमान घेऊन ब्रह्मदेवाच्या निर्माणशक्तीला कमीपणा आणण्यासाठी नाशवंत सृष्टि निर्माण करण्यांत काय बरें अर्थ आहे ?'

जी मजलागि ग्रंथाची स्वामि । दूजी सृष्टि केली तुम्ही ।
तें पाहुनि हांसों आम्ही । विश्वामित्रातें ॥१८-१७६५.
जें असौनि त्रिशंकुदोसें (उद्देशें) । **धात्रेयाही आणावें वोसें ।**
तै नासतें की जे किं ऐसें । निर्मावें नाहीं ॥१८-१७६६.

वरील उताऱ्यांतील 'धात्रेयाही आणावें वोसें' याची, पहिल्या उताऱ्यांतील 'धात्रेया अढंच करणें', या भागाशीं तुलना केल्यास उलटसुलट अर्थ दिसूं लागतात. तेव्हा **अढंच** म्हणजे वर, थोर, श्रेष्ठ, असा अर्थ असून **वोसें** म्हणजे खाली, नीच, तिरस्कार्य असा व्हावा असें वाटतें.

तेव्हा श्री. मोडक यांच्या म्हणण्याप्रमाणें आढय शब्दाच्या अर्थाशीं संबंध असल्यामुळे, आढंच-अढंच असें चुकीचें वाचन झाल्यामुळे, हा शब्द झाला, हें म्हणणें पटत नाही. शिवाय त्या काळचें अक्षरांचें वळण वरील तर्कास कसें बाध आणीत आहे, हें मागे सांगितलेंच आहे.

राजवाडे-ज्ञानेश्वरीचें पुराणत्व दाखवितांना श्री मोडक यांनीं घेतलेल्या कांही आक्षेपांचें येथपर्यंत यथामति निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे. राजवाडे-ज्ञानेश्वरीचा जुनेपणा दाखविणाऱ्या आणखी कांही गोष्टी 'ज्ञानेश्वरीदर्शन' या पुस्तकांतील 'ज्ञानेश्वरीचें व्याकरण व भाषा' या माझ्या लघुनिबंधांत दाखविण्याचा प्रयत्न केला असल्याने येथील जागा आडवत नाही. तसेंच राजवाडे ज्ञानेश्वरींत जसे कांही पाठ सरस आहेत, त्याचप्रमाणें तीमध्ये मुद्रणदोष कांही ठिकाणीं असल्याने एकनाथी पाठ त्या ठिकाणीं उपयोगी पडण्यासारखा आहे, हेंही कांही खोटें नाही. तेव्हा दोन्ही प्रकारचीं कांही उदाहरणें देऊन हा निबंध पुरा करतों.

राजवाडे यांनी नवव्या अध्यायावर विशेष श्रम घेतले आहेत, असें दिसतें; अर्थात मूळ प्रतीवरून उतारा करितांना विशेष काळजी घेतली गेली असली पाहिजे. तेव्हा त्यांतीलच **एक उदाहरण** घेऊं.

तरि अवधान एकलें देइजे । मग सर्व सुखांसि **पत्र घेइजे** ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइकां ॥ (९–१), राजवाडे–पाठ.

तरि अवधान एकलें दीजे । मग सर्व सुखांसि **पात्र होइजे** ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइकां ॥ (९–१), एकनाथी पाठ.

**राजवाडे अर्थ**--आपण माझें बोलणें एकाग्र चित्ताने ऐका. मग मला सर्व **सुखाची सनदच मिळाली**, असें मी समजेन.

**एकनाथी अर्थ**--माझें बोलणें एकाग्र चित्ताने ऐका; म्हणजे आपल्यास सर्व सुख लाभेल.

वरील पाठांत 'पत्र घेइजे' हा जास्त बरा दिसतो. **होइजे** यांतील ह चा खालचा भाग जर पुढील रेघेला चिटकला तर घे सारखा दिसूं शकेल. शिवाय 'पत्र घेइजे' असा वाक्प्रचार पुढील ओवींत आपणांत आढळून येईल.

आणि तियाच्रि स्थिती तमीं । जे वाढौनि मोडौनि क्षमीं ।
ते **घेती नरकभूमी । मूलपत्र** ॥ (१४–२७२), (राजवाडे प्रत).
(१४–२७४), (एकनाथी प्रत).

येथे 'मूलपत्र घेती' म्हणजे (नरकभूमीची) ते सनद घेतात, असाच अर्थ या वाक्प्रचाराचा आहे. त्यावरून 'पत्र घेइजे' हा पाठ जास्त सयुक्तिक वाटतो. इतर प्रतींत हा पाट नाही.

**दुसरें उदाहरण**–ईश्वर बुद्धि पूजिला । चोरु म्हणौनि गाजिला ।
वृषगर्जी **वेझिला** । केला राउ ॥
(१४–३५), (राजवाडे प्रत).

यांतील 'वेझिला' याच्या जागीं 'वेढिला' असें रूप एकनाथी प्रतींत आहे. हत्तीच्या बाबतींत 'वेंझणें' हा शब्द जुन्या वाङ्मयांत आढळून येतो म्हणून 'वेढिला' हा अर्वाचीन पाठ ग्राह्य वाटत नाही.

**तिसरें उदाहरण**--

अवधानाचेनि हातें । नेया पां हृदया आंतौतें ।
हे रिझवितील आणितें । जाणांचिए ॥ (६–४९२), (राजवाडे प्रत).

एकनाथी प्रतींत 'जाणांचिए' याबद्दल 'सज्जनाचिए' असा पाठ आहे. जुन्या मराठींत **ज्ञानी** याबद्दल **जाणी** असा शब्द येतो. तेव्हा 'ज्ञानीयाचिए' या जागीं 'जाणाचीए' असें होणें शक्य आहे.

महानुभावी वाङ्मयांतील पुढील उदाहरणें याला पुष्टि देतील.

'तरी **जानाची** मनो नासिका । सुपरिमळ करीन ।। (उद्धवगीता, १०).
तैसा **जानाचीया** सभा । शोधिजे शब्दरत्नाचा गाभा ।। (कित्ता, २१).

सज्जनांना तृप्त करण्यापेक्षा विद्वान् श्रोतेजनांना, ज्ञानी लोकांना, तृप्त करणें, रिझवणें, हा अर्थ अधिक श्रेयस्कर वाटतो.

याच्या उलट पुढील ओव्यांत एकनाथी पाठ बरोबर वाटतो, यामुळे मूळ पोथी उतरतांना कांही हस्तदोष झाले असावे, असा संशय येतो.

(१) ऐसि मुक्ति असे सहज । आता परियसौं तुज ।
तें तूं **ज्ञाना वूझ** । **द्विरेफु** कीं ।। राजवाडे प्रत (१४-२८४).
जें तूं **ज्ञानांवुज** । **द्विरेफु कीं** ।। एकनाथी पाठ (१४-२८६).
'ज्ञानरूपी कमलांतील तूं भृंग आहेस' हा अर्थ निःसंशय ग्राह्य आहे.

(२) ऐसी ज्ञानाची गोडी । वानिली देवें आवडी ।
तेविंचि पार्थां **सिचडी** । लावावेया ।। (१४-६०), (राजवाडे प्रत).
ऐसी ज्ञानाची वाडी । वानिली देवें आवडी ।
तेविंचि पार्थांही **गोडी** । लावावया ।। (एकनाथी पाठ).

राजवाडे प्रतींत मुद्रणदोष उघड उघड दिसत आहे. 'पार्थां सिचडी' याचे जागीं 'पार्थासि चडी (चाड) लावावेया' असा पाठ असला पाहिजे हें एकनाथी प्रतीवरून दिसतें.

सारांश, रूपप्रक्रियेच्या दृष्टीने राजवाडे प्रत निस्संशय महत्त्वाची आहे. म्हणून जेथे संशय उत्पन्न होईल त्या वेळीं मूळ प्रत उपलब्ध असणें किती जरूरीचें आहे, हें वाचकांचे लक्षांत येईल. तोंपर्यंत निरनिराळया प्रती चिकित्सक रीतीने अभ्यास करण्यास परस्परपोषक होण्यासारख्या आहेत, हेंही तितकेंच खरें आहे.

# ३. ज्ञानेश्वरींतील 'कातले' शब्दाचा अर्थ*

हो का निजसार विजयाचें। कीं तें भांडार महातेजाचें।
जेथ गरुडाचिये जावळिचे। कातले चाऱ्ही ॥

ज्ञानेश्वरी, १०-१३८

१. गीतेंतील पहिल्या अध्यायायाच्या चौदाव्या श्लोकावर श्री ज्ञानेश्वरांनी ज्या तेरा ओव्या लिहिल्या आहेत, त्यांपैकीं ही ओवी, जुन्या मराठींतील शब्दार्थाच्या दृष्टीने, प्रतिपादनासाठी घेतलेली आहे.

२. गीतेचा मूळ श्लोक व त्याचा सरलार्थ पुढील प्रमाणें आहे. 'ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ। माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः॥ पांढऱ्या घोडयांनी युक्त (श्वेतैः हयैः युक्ते) अशा मोठया रथांत बसलेले (महति स्यंदने स्थितौ) श्रीकृष्ण व अर्जुन (माधवः पाण्डवः च एव) यांनीहि आपले दिव्य शंख वाजविले (दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः).'

३. या मूळ श्लोकांवरील ओव्यांचा अर्थ लावतांना, ज्ञानेश्वरांची निरूपण-पद्धति लक्षांत घेणें अवश्य आहे. 'मूळ शास्त्रपदें वाखाणीन'; 'अक्षरा अक्षरांतील, पदापदांतील दडलेला अर्थ बाहेर काढीन'; 'अर्थरसाने दाटलेलीं व सद्भावनेच्या सुगंधाने दरवळणारीं तीं पदें व शब्द यांचा आस्वाद श्रोत्यांना घेतां येईल,' अशा प्रकारें ज्ञानेश्वर निरूपण करीत असतात; तेव्हा प्रस्तुत गीताश्लोकांतील मूळ पदांचा अर्थ कोणत्या प्रकारें

---

* 'युगवाणी', नागपूर, मार्च १९४७. हा निबंध मध्यप्रांत संशोधक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक उत्सवांत (ता. २६-१-४७, रविवार रोजीं) वाचला गेला.

त्यांनी विवेचिला, हें आपण पाहूं. रथाच्या वर्णनाच्या ओव्या जरी एकंदर तेरा असल्या, तरी सर्व ओव्यांशी आपणाला कर्तव्य नाही. '**श्वेतैः हयैः युक्ते** (महति स्यंदने)'-या पदांचा विचार करणारी आरंभीं दिलेली ओवी आपणांस विचारांत घ्यावयाची आहे; व आज जो तिचा अर्थ केला जातो, तो मूळ पदांना धरून, प्राचीन मराठीच्या दृष्टीने आहे काय व तसा नसल्यास खरा अर्थ कोणता व त्याला पुरावा काय-इत्यादि गोष्टींचें विवेचन आपणांस पहावयाचें आहे.

४. ' हो का निजसार विजयाचें । की तें भांडार महातेजाचें । '

हें रथाचें वर्णन आहे. मूळ पद 'महति' या शब्दांतील अर्थाचा उलगडा, येथे सुरू झाला आहे. रथाचें 'मोठेपण' कोणत्या दृष्टीने, हा प्रश्न घेऊन त्याचें स्पष्टीकरण या भागांत चालू आहे व पुढील दहाबारा ओव्यांत अत्यंत काव्यपूर्ण असें वर्णन ज्ञानेश्वरांनी केलें आहे. 'जणूं काय विजयाचें सारसर्वस्व, किंवा महातेजाचा भांडारखाना'-असा ओवींतील अर्धभागाचा अर्थ आहे.

'जेथ गरुडाचिये जावळिचे । कातले चान्ही'

या राहिलेल्या अर्ध ओवीचा अर्धभाग, रथाला जोडलेल्या घोड्यांचें वर्णन करीत आहे. 'ज्या ठिकाणीं (ज्या रथाला) (वेगवत्तेच्या बाबतींत) गरुडाचे जुळे भाऊ शोभणारे चार घोडे **जुंपले** आहेत (कातले चान्ही)' असा या भागाचा सरलार्थ सध्या सर्व टीकाकारांकडून केलेला आढळतो. साखरे, भिडे-इत्यादि सर्व जण असाच अर्थ देतात. म्हणजे मूळ श्लोकांतील 'श्वेत' म्हणजे 'पांढरा' हा शब्द ज्ञानेश्वरांच्या टीकेंत सुटलेला दिसतो, व 'कातले' हा शब्द क्रियापद म्हणून समजला जाऊन त्याचा अर्थ 'जुंपले' अशा अर्थाने केला असावा, असें दिसतें, एवढेंच नव्हे, तर रा. भिडे यांनी तळटीपांत तो अर्थ दिला आहे. तेव्हा ज्ञानेश्वरांनी मूळपद 'श्वेत' हें गाळलें की काय व 'कातले' म्हणजे 'जुंपिले' असा अर्थ प्राचीन मराठींत करीत होते की काय, असे दोन प्रश्न उद्भवतात.

५. ज्ञानेश्वरांनी मूळ शब्द 'श्वेत'-जो घोड्याचें विशेषण आहे-तो गाळलाच असेल की नसेल, हें सांगणें कठीण आहे. कारण कांही उल्लेख

असे सापडतील की, ज्यांत 'मूळपद' गाळलेलेंहि आढळेल. त्यांचें म्हणणें भावार्थाने घ्यावयास पाहिजे. अगदी अक्षराक्षरांकडे, पदापदांची कोर पाहून, आंतील गूढार्थ त्यांनी अनेक ठिकाणीं स्पष्ट केला आहे, ही गोष्ट खरी; पण प्रत्येक ठिकाणीं तसें केलें असेलच, असें म्हणण्याचें कारण नाही. पांढरे घोडे होते की, ते आणखी इतर रंगाचे होते, हें सांगण्यात विशेष कांही नसल्याने 'श्वेत' शब्द सुटून गेला, तरी कांही बिघडत नाही, असा एक पक्ष संभवतो.

पण हा पक्ष पूर्णपणें निर्विवाद आहे, असेंहि धरून चालणें कठीण आहे. 'गरुडाला वेगामध्ये जुळे भाऊ शोभणारे' असें घोड्याचें वर्णन जेथे येतें, त्या ठिकाणीं 'श्वेत' शब्द चुकून राहिला, असें वाटत नाही. तसेंच रथासंबंधीं पुढील १० १२ ओंव्या वाचल्या, तर या म्हणण्याला अधिक पुष्टि मिळते. तेव्हा जर 'श्वेत' शब्द गाळला नसेल, तर दुसऱ्या कोणत्या शब्दाने त्याचा अर्थ स्पष्ट झाला, हें दाखविल्याशिवाय वरील उपपत्तींत कांही अर्थ नाही, असें ठरतें. तेव्हा पहिल्या शंकेचा विचार–निर्णायक स्वरूपाचा असा –पूर्ण तडीस जाऊं शकत नाही.

६. आता 'कातणें' म्हणजे 'जुंपणें' हा अर्थ तरी प्राचीन वाङ्मयांत इतरत्र उपलब्ध होतो काय, याचा विचार करूं.

'कातणें' म्हणजे 'कोरणें' (कृत्–कृन्तन्ति) या धातुपासून तयार झालेला **कोरीव** शब्द अनेक ठिकाणीं उपलब्ध होतो.

**(अ) उद्धवगीता अथवा एकादशस्कंद—**

तो वैराग्याचा **कातिउ** । कि महातपाचा वोतिव ।
कि निवृत्तीचा थळिउ । वोडवला तो ॥२५१॥

तो अवधुत यति, जणु काय, वैराग्यांतून कोरून तयार केलेला होता; जणु काय, महातपाचा रस साच्यांत ओतून बनविला होता, किंवा संसार–निवृत्तिरूपी पत्रावर ठसा उमटवून सिद्ध झाला होता.

(आ) **नरेन्द्र कविकृत रुक्मिणीस्वयंवर**

हीमावतीचें आटिलें हीव
तें दळवाडें काढुनि चिरीव ।
दामोदर केलें कातीव
हीमोदकाचे ॥४१६॥

कल्पतरुचिये हिंदोळा कातिवे
भीमकी देखिली वासुदेवें ।
जैसी चंद्रकला वोसावे
कृष्णपक्षालागोनी ॥६५१॥

वरील ओव्यांत कातिव म्हणजे कोरून बनविलेले असाच अर्थ होतो.

७ 'कातले' म्हणजे 'जुंपले' या अर्थी उल्लेख पाहण्याचा प्रयत्न केला; पण ज्ञानेश्वरींत तर दुसरा उल्लेख नाहीच; पण इतरत्रहि उपलब्ध झाला नाही. कोणाला तसें उदाहरण सापडल्यास त्यांनी कळवावें, आभारी होईन; तसें उदाहरण सापडेल, असें वाटत नाही. तेव्हा 'कातले' याचा अर्थ ज्या अर्थी 'जुंपले' जमत नाही, त्या अर्थी 'रथाला जोडलेले घोडे कातिव होते, रेखीव होते,' असा अर्थ केल्यास तो समाधानकारक वाटत नाही.

(इ) ज्ञानेश्वरी, अध्याय १७, ओवी ९६.

'आपुलेया पुढिलाचेया । आंगीं घालूनि **कातिका** ।
रक्तमांसा प्रणीतया । भरभरों ॥'

'जे आपल्या व दुसऱ्याच्या अंगांत **कातिका** म्हणजे **कोयता** घालून रक्तमांसाचें यज्ञपात्र काठोकाठ भरतात'–असा अर्थ या ओळींत आहे. कात्रीने कातरलेल्या तुकडयांना 'कातर, चकत्या' वगैरे शब्द लावतात. 'कोन्त' म्हणजे 'भाल्यासारखें शस्त्र' असाहि शब्द जुन्या मराठींत येतो. 'कातेकार,' भालेवाले, असा शब्द पुढील ओव्यांत दिसून येतो.

**शिशुपाळवध**—कवीश्वर भास्करकृत

ऐसे धनु रे धनु म्हणत । पातले जादवांचे राउत ।
मारि रे मारिजैल पळत । **कातेकारू** हे ॥९६०॥

तें देखौनि राउताळें । पुढील **कातेकारू** मुरडैले ।
थीरू रे थीरू म्हणत वाइलें । पारक **विदुरथाचां** ॥९६१॥

सारांश, कृत्–कृंतति म्हणजे **काप** काढणें, बारीक तुकडे करणें, या धातूशीं वरील अर्थ जुळतो. 'जुंपणें किंवा जोडणें' या अर्थी जमत नाही.

९. आता, आणखी निराळ्या प्रकारें याचा विचार करणें शक्य आहे. 'जुंपणें,' 'जोडणें' या अर्थी जुन्या मराठींत कोणते शब्द वापरले जातात, या दृष्टीने कांही उल्लेखांचा विचार करूं.

(अ) **महानुभावीय गीता** (सुमारें १५-१६ वें शतक):--

"तया नंतर येराकडे । महारथी **जुंतले** होते श्वेत घोडे ।
तया वरि माधव पांडव संवगडे । महादिव्य ॥"

येथें युक्त या अर्थी 'जुंतले' असें रूप योजिलें आहे.

(आ) **एकनाथ रुक्मिणीस्वयंवर** (शके १४९३), अध्याय १२, ओवी १६:--

सैन्य पालाणा रे पालाणा । घाव घाला रे निशाणा ।
रथ **संजोगोनि** आणा । रणांगणा जाऊं वेगीं ॥

वरील उदाहरणांवरून 'युज्–युञ्ज्' 'जोडणें' या धातूशीं संबंध असलेले शब्द 'जुंपणें', 'जोडणें' या अर्थी वापरले जात होते, असें दिसतें. 'युक्ति, युगत, जुगत, संयोग, संयोजित, संयुक्त'–यांत 'य्' च्या जागीं 'ज्' येणें व अंत्य 'ज्' चा 'ग्' होणें, हे भाषाशास्त्राच्या नियमाला धरून आहे.

'श्वेतैः हयैः **युक्ते,** महति स्यंदने' या ठिकाणीं 'युज्' धातूशीं संबंध असल्याने व एका टीकाकाराने प्रत्यक्ष 'युक्त' च्या जागीं 'जुंतले' शब्द वापरल्याचें आढळून आल्याने येथे 'कातले' शब्दाच्या जागीं 'जुंतलें' असा दुसरा **पाठ** कोणी सुचविण्याचा संभव आहे, इतका हा शब्द मूळ शब्दांना अनुसरून जुळतो.

पण ज्ञानेश्वरीच्या कोणत्याहि प्रतींत असा पाठ नसल्याने हा पाठ स्वीकारणें शक्य नाही. एखाद्या महत्त्वाच्या प्रतींत पाठ असता, तर तो

स्वीकारला असता; कारण 'कातले चाऱ्ही' याच्या जागीं 'जुंतले चाऱ्ही' हे शब्द अगदी नीट बसतात. पण आधारावाचून नुसती उपपत्ति, ही सिद्धान्त होऊं शकत नाही. तेव्हा आपली शंका अजूनहि दूर झाली नाही. 'श्वेत' शब्द गाळला की नाही, हें कळत नाही, व 'कातले' म्हणजे 'जुंपले' हें जमत नाही. तेव्हा 'कातले' याचा दुसरा कांही अर्थ असूं शकतो काय की, ज्याच्यामुळे आपल्या शंकांचें समाधान होईल.

१२. आणखी एक उपाय अजून राहिला आहे. जुन्या मराठींत जेथे 'घोडया'चीं वर्णनें आलीं असतील, ते उल्लेख तोलून पाहणें हा तो मार्ग होय. पुढील स्थळें पहा—

(अ) **शिशुपालवध—भास्करकविकृत,** छापील प्रत, पान ८३.

शिशुपाळावरोबर सामना करण्याच्या उद्देशाने श्रीकृष्ण घोडयावर स्वार होऊन निघत असतां त्याच्या घोडयाचें वर्णन पुढीलप्रमाणे कवि करीत आहे—

तो वनितां वारू । निऱ्हा न करी विस्तारू ।
साउमा असिका वीरू । म्हणावा असे ॥९९०॥
तेजियाचेनि दळभिडे[1] । **गरुड नव्हे तेणें पाडें ।**
तो पौवाळिताए[2] वेगाडे । मनोहरां गतीं ॥९९१॥
गरुड होए चालनां[3] । फुनं[4] रूपें रेखां उणा ।
वरि वागेचिया खुणां[5] । कांही नेणें ॥९९२॥
मन होए वेगाडे । फुण तें अणु एव्हडे ।
भणउनि उपमा न घडे । तेआं वारुओंसि ॥९९३॥
**तो कैसा दिसताहे कातळा ।**
**जैसा अमृतरसाचा ओतिला ।**
की स्रष्टेनि[7] धर्डा[8] घातला । रेवांतासि[9] ॥९९४॥

---

(१) घोडयांचा समूह. (२) उसळत आहे. (३) वेगवान्. (४) पण. (५) लगामाची इशारत, सूचना. (७) ब्रह्मदेवाने. (८) ताजव्यांत दुसऱ्या बाजूला घातलेली वस्तु. (९) एका घोडयाचें नांव (स्वर्गीय).

**तो कापुरें उटिला[1] । की चांदणेनि चुभळिला[2] ॥**
की पाखरां गवसिलां[3] । मौक्तिकाचियां ॥११५॥
झळाळितेयां सूर्यमंडळा । वरि सावळा मेघ ढमढला ।
तैसा मुरारि मिरविला । **कातळे** यावरि ॥११६॥

वरील उताऱ्यांत 'कातळा' 'कातळिया' यांचा घोडयाच्याकडे निःसंशय संबंध आहे. रेवांतक घोडा, मन, गरुड, इत्यादि वेगवान् वस्तूंशीं तुलना करून त्या उपमेला कमी पडतात असें कवीनें चातुर्यानें दर्शविलें आहे. या घोडयाला आपल्या मालकाचें हृद्गत लगामाच्या सूचनेवरून जसें कळत आहे, तसें गरुडाला जमत नाही; मन वेगाडें असेल, पण अगदीच अणूएवढें. रेवांतक घोडा पासंगालाहि पुरणार नाही. पण नंतरच्या उपमांवरून तर हा घोडा 'कातळ' म्हणजे 'पांढरा' असावा, असें निश्चित वाटतें. कापराची उटी, चांदणें, सूर्यमंडळ हे 'पांढरे चकाकणारे' पदार्थ आहेत; त्या वस्तू घेऊन जणु काय, हा घोडा घडविला आहे, असें कवि वर्णन करीत आहे. त्याला मोत्याची झूल असून सूर्यमंडळावर आरूढ होणारा श्यामल मेघ जसा शोभायमान दिसतो, तसा पांढऱ्या चकाकणाऱ्या घोडयावर श्रीकृष्णाची सावळी मूर्ति मिरवत आहे, असें मोठया कुशलतेनें कवि वर्णन करीत आहे.

यावरून **कातळे**[4] म्हणजे 'चकाकणारा', 'पांढरा' असा अर्थ दिसतो.

(आ) **दुसरें उदाहरण**—( शिशुपाळवध, पान ७८, ओवी १३४-१३६).

वारेआं[5] पासौनि वेगाडे । पर्वताहौनि[6] दळवाडे ।।
ते वारू उंचवडे । काई वाणौ ।।१३४।।

× × ×

---

(१) कापराची उटी दिली. (२) बुचकळून काढला. (३) मोत्याच्या झुलीनें आच्छादिला. (४) 'कम्-कान्त-चकचकित' या धातूशीं संबंध असावा, असें प्रि. पांढरीपांडे सुचवितात. (५) वाऱ्याहून अधिक. (६) पर्वताहून-पेक्षा.

उच्चश्रवाचिये जावळिचे । **कातळे** सांब्रायणीचे[1] ।
पंचकल्याण कल्हारीचे । राजवाहकु ॥१३६॥

वरील ओव्यांत राजवाहन घोडयांच्या वर्णनावरून निरनिराळया **रंगाचे घोडे** वर्णिले जात आहेत, हें स्पष्ट आहे, म्हणून 'कातळ' शब्द रंगवाचकच आहे.

१३. 'कातळ' म्हणजे 'पांढरा' हा अर्थ आपल्या दोन्ही शंकांचें एकाच वेळीं निवारण करणारा ठरतो. 'ल–ळ' हे समसमान धरावे लागतात; या गोष्टीला भाषाशास्त्र विरुद्ध जात नाही. तेव्हा 'श्वेतैः हयैः युक्ते महति स्यन्दने' यांच्या जागीं मराठीमध्ये 'गरुडाचिये जावळिचे कातळे चाऱ्ही' हे शब्द असून त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे—

'ज्या रथाला पांढरे, चकाकणारे, पांढरे शुभ्र, असे चार घोडे (आहेत)'. 'जेथ' शब्द योजल्यामुळे 'युक्ते' शब्द सोडला गेला.' 'ज्या रथाच्या ठिकाणीं श्वेत घोडे **आहेत**,' असें म्हटल्याने 'युक्त' शब्दाची अडचण भासत नाही. आणि केलेल्या अर्थाला जुन्या मराठी काव्यांतील उल्लेखांचा भरपूर पुरावा आहे. जुन्या मराठीच्या अर्थांच्या वापराकडे पाहून जे जे आक्षेप आले, ते सर्व नाहीसे झाल्याने श्वेत या जागीं 'कातळ' हा शब्द आहे, असें सिद्ध होतें. महानुभावाच्या टीपग्रंथांत 'शिशुपाळवध' यावरील टीपेंत तो अर्थ दिला आहे, असें वाटतें. पण आज ती पोथी माझ्याजवळ नाही.

सारांश, जुन्या मराठीच्या तुलनात्मक अभ्यासाला महानुभावीय वाङ्मय कसें पोषक आहे हें यावरून श्रोत्यांच्या प्रत्ययाला येईल.

## नवीन पुरावा*

(अ) 'कातळे' या शब्दासंबंधी ज्या महानुभाव काव्यांतील म्हणजे 'शिशुपाळवधां'तील अवतरणें मी दिलीं होतीं, त्या काव्यांतील कटीण

(१) एक प्रकारचें द्वीप.

* 'युगवाणी', नागपूर, एप्रील-मे १९४८.

शब्दांचा अर्थ सांगणारी 'टीपग्रंथा'ची हस्तलिखित प्रत मला पुन्हा वाचा-वयास मिळाली. आणि तेथे 'कातळे' म्हणजे पांढरा, श्वेत असाच अर्थ आहे.

(आ) आणखी एका महानुभाव काव्यांत 'कातळे' शब्द आढळला व तेथील प्रसंगावरून माझ्याच प्रतिपादनाला अधिक पुष्टि मिळते. पंधराव्या शतकाच्या अन्तिम चरणांत झालेल्या 'संतोषमुनि कृष्णदास' याच्या 'रुक्मिणीस्वयंवर' ग्रंथाच्या चौदाव्या 'प्रसंगांत' (अध्यायांत) पुढील ओव्या आढळतात.* प्रसंग असा आहे की, श्रीकृष्णच 'नोवरा' आहे असें पाहून सर्व देवतागणांचे 'वऱ्हाड' निघालें आहे व त्यांतील हत्ती, घोडे, रथ, इत्यादिकांचें वर्णन कवि करीत आहे. येथे अवतरण देतांना अनावश्यक ओव्या सोडून बाकीचा भाग दिला आहे. हा ग्रंथ महानुभाव लोकांच्या नेहमीच्या वाचनांत असल्याने या ग्रंथाचें महत्त्व आहे.

'जाणोनि नोवरा रावो मुरारी । हाकारा झाला त्रीभुवना माझारी ।
तें वऱ्हाड आलें सपरीवारी । सकळ देवतागणें ॥

× × ×

सैन्य मीनलें[1] अद्भुत । गज रथ घोडे आमीतें[2] ।
पायेदळ अंसक्षांत[3] । कवण जाणे ॥

× × ×

आणि जे रागावागां[4] नीपुर्ण[4] : रूपस तुरंगम समगुण ।
ते देयाचे घोडे आसाहाने : वर्णुं कवण जाणे ॥
ते उच्चश्रव्योपस्ये[5] गाढे : बळें पराक्रमें दळभीडे ।
आन[6] मनापस्ये वेगाडे : गती चाल्णें ते ॥

---

* माझ्याजवळ सध्या असलेली जुनी हस्तलिखित प्रत शके १७१२ मधील आहे. त्यांतून वरील ओव्या घेतल्या आहेत.

(१) मिळालें. (२) पुष्कळ. (३) असंख्यात, अगणित. (४) स्वाराची लगामाने दिलेली सूचना जाणण्यांत कुशल. (५) एक नामांकित घोडा. (६) अधिक, आणिक.

ते जैसे चंद्रबींबाचे वोतीले : की क्षीरसागरीं क्षीराचे मुर्त जाले ।
तैसे ते उजळ गांगे मीर्वले : तेजी श्रीकृष्णाचे ॥[1]

× × ×

[यानंतर अनेक रंगांच्या घोडयांचें वर्णन आलें आहे, त्यांतहि 'कातळ' हा रंग आहे.]

आन येक पुसे वर्ण निळे : वर जैसी नीळोत्पळाची कीळे[2] ।
नाना ते पाचाचे[3] वोतीले केवळ : मज पातां ॥
येक घोडे पीवळे कनकवर्ण : जैसे जांबुनदाचे सुवर्ण ।
पुटी दीधले तैसे वर्ण : येका तेजीयाचे ॥

× × ×

येक बहुत वर्ण मीश्रित : श्वेत हारित आन पीत ।
येक आर्ध काळे आलोहित : तेजी मीर्वताती ॥
येक बोर एक जर्दे जाल्हौरे : येक श्वेत कुमैत आती खरे ।
येक कर्डे **कातळे** उचासीरे : येक काळे राजवाहान ॥

× × ×

हेमगिरीचे कनकवर्ण : मानस सरोवरीचे मांगसे तुरंगम ।
काश्मीरीचे कुमैत उत्तम : करडे कळींग देशीचे ॥
सींध देशीचे सबळ घोडे : जाज नगरीचे जरदे गाढे ।
बद्रीकाश्रमीचे बोर आती वेगाडे : चालने मनापस्ये ॥

× × ×

आन कैसे रथ मीर्वती : जैसी गीरी दुर्गे चालती ।
ध्वजस्थंबीं टके[4] उभारीले नीगुती : घनघनीती महाघंटा ॥

× × ×

---

(१) हें वर्णन 'शिशुपाळवधां'तील वर्णनाशीं तंतोतंत जुळणारें आहे. 'श्वेत' म्हणून प्रसिद्ध असलेल्या, चंद्रबिंब, क्षीरसागर व गंगा या तीहींशीं त्यांचें सादृश्य वर्णिलें आहे.

(२) किरण (३) पाचूचे (४) निशाणें, ध्वज.

स्थलमत. वि: १९

तेथ च्यार च्यार घोडे **जींतीले**[1] : रथीं तयावरी पाखरा शोभती ।
ते आप म्हणती तया सरीसे घोळगती : गगन मंडळासी ॥
ऐसे रथ **संजोगीले**[2] सारथी : वर आयुधें
आभरणें लेईले महारथी ।
तेथ ध्वजस्थंबीं बैसले निगुती : वर चवरें ढळताति ॥

अशा प्रकारें वरील ओव्यांवरून हें स्पष्टतर सिद्ध आहे की 'कातळे' शब्द रंगवाचक म्हणून विशेषण असून क्रियापद नाही; व अर्थ 'पांढरा, श्वेत' असाच महानुभावीय काव्यांत परंपरेने आढळतो. तसेंच 'रथाला जोडणें' या अर्थीं 'कासिलें' 'कातिले' असे शब्द वापरले जात नाहीत. अद्यापि तसें इतर उदाहरण मला तरी आढळलें नाही.

(इ) 'ज्ञानेश्वरीं'त इतर अध्यायांतील उल्लेख पाहिल्यास याच म्हणण्यास पुष्टि मिळते. जसें:—तरी संसार पांती **जुंतलिया** । भंवतचि असावें ॥ ८.२४४; म्हणौनि व्यापारा हातीं । उसंत दीहा न राती । तैसीयाचिये पांती । जुंपिजे जो ॥ १४.२४१; चतुरंगा परिवारा । **संजोडिया** रहंवरा ॥ ११.३९७. तसेंच. 'बांधणें' यांतील सूक्ष्म अर्थाच्या छटा दाखविण्यास इतर शब्द योजलेले यादवकालीन काव्यांत आढळतात. **कांसणे** (पीतांबरासारखें वस्त्र ओढून खोचणें, घट्ट बांधणें); **दाटणें** (दोन वस्तू एकमेकाला अगदी खेटून बांधणें); **कळासणें** (खुंटी मारून घट्ट बसविणें, जोडून देणें); **आकळणें** (स्वाधीन करून घेणें, वश करणें); **आळिला** (साखळीने खांबाशीं घट्ट बांधून टाकला). पण 'रथाला, गाडीला जोडणें' या अर्थीं वरील शब्द वापरलेला 'ज्ञानेश्वरीं'त आढळत नाही, एवढेंच नव्हे, तर इतरत्र काव्यांतहि तसा उल्लेख आढळला नाही.

---

(१) जुंतले. (२) युक्त केले. 'रथाला जोडणें' अशा अर्थीं संजोगिलें, (जींतीले), जुंतले हे शब्द मननीय आहेत.

# ४. 'श्लेष' शब्दाच्या अर्थावर नवीन प्रकाश*

१. ज्ञानेश्वरीकडे साहित्यदृष्टीने पाहूं लागलें म्हणजे प्रस्तुत विषयाची चर्चा उद्भवते. उपमा, श्लेष, रूपक, उत्प्रेक्षा, दृष्टान्त, विदग्ध रसवृत्ति, व्यंकटी, काकु, कक्षा, उपलवण, आवाका इत्यादि साहित्यक्षेत्रांतील विविध पारिभाषिक शब्द ज्ञानेश्वरीच्या जिज्ञासु वाचकांना ज्ञानेश्वरीमध्ये आढळतील. ज्ञानेश्वरीचें निरूपण श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या प्रत्यक्ष मुखांतून ऐकणाऱ्या, त्यावेळच्या श्रोत्यांच्या पंक्तींत आपण बसलेलों आहों, अशी मनोवृत्ति ठेवून वरील शब्दांचें मनन करूं लागलों म्हणजे जे कांही विचारतरंग मनांत येतात त्यांची स्थूल कल्पना येण्यासाठी नमुना म्हणून 'श्लेष' शब्दाची चर्चा वाचकांना सादर करीत आहें.†

२. तेराव्या अध्यायाच्या ओव्या राजवाडे प्रतींत एकंदर ११६४ आहेत. त्यांत अध्यायाच्या अगदी शेवटीं शेवटीं पुढील ओवी आली आहे.

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, व. १९, अंक १, पृ. १९. हा लेख त्या मंडळाच्या शके १८६०च्या २५ व्या संमेलनांत वाचला होता.

† संस्कृत साहित्यग्रंथांत पुढीलप्रमाणे श्लेषाच्या व्याख्या आढळतात. 'श्लिष्टमिष्टमनेकार्थमेकरूपान्वितं वचः । तदभिन्नपदं भिन्नपदप्रायमिति द्विधा ।। दंडी–काव्यादर्श, २-३१०. 'एकप्रयत्नोच्चार्याणां तच्छायां चैव बिभ्रताम् । स्वरितादिगुणैर्भिन्नैर्बन्धः श्लिष्टमिहोच्यते ।। ' उद्भट–काव्यालंकारसारसंग्रह, ४–५०. 'श्लेषः स वाक्य एकस्मिन् यत्रानेकार्थता भवेत् ।' मम्मट–काव्यप्रकाश, १०।१४७. 'नानार्थसंश्रयः श्लेषो वर्ण्यावर्ण्योभयाश्रितः । ' अप्पयदीक्षित. 'श्रुत्यैकयानेकार्थप्रतिपादनं श्लेषः ।'– जगन्नाथ पंडित.

म्हणौनि आखरी सुभेदिं । उपमा श्लेष कोंदाकोंदी ।
झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासि ।--राजवाडे प्रत

'गीतोक्तीमध्ये असलेल्या प्रत्येक पदांत, उपमा, श्लेष इत्यादि दृष्टीने अर्थाचा जो जो ध्वनि खेचून भरलेला आहे, तो तो ( श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपाप्रसादाने ) स्पष्टपणे पूर्णतः श्रोत्यांना सादर करीन' असें ज्ञानदेवांचें 'प्रतिज्ञोत्तर' उघडपणें वरील ओवींत आपणास ऐकूं येतें. वरील ओवी वाचतांच आपलें मन क्षणमात्र अगदी दिपून जातें व 'महाराज, हें आपणांत सामर्थ्य आहे' असें म्हणून आपण आदराने मान खाली लववितों. गेल्या ७-८ वर्षांत वरील ओवी किती तरी वेळां मी वाचली, प्रत्येक वेळीं 'उपमा', व 'श्लेष' यांचा रूढार्थच माझे मनांत येत असे; त्याविषयी कधी शंकाहि आली नव्हती. पण एकदा वरील 'प्रतिज्ञोत्तराचा' पडताळा पाहण्याची कल्पना मनांत येऊन पाहूं लागलों व ११६४ ओव्यांचें बारकाईने निरीक्षण केलें, पण आश्चर्याची गोष्ट अशी की, या एवढया मोठया अध्यायांत 'श्लेष' अलंकार असणाऱ्या ओव्या—अतिशयोक्तिपूर्वक म्हणावयाचें तर—जवळ जवळ नाहीत असें दिसून आलें. तेव्हा ज्ञानेश्वरांच्या प्रतिज्ञेचा अभिप्राय, आपण जसा घेतों, तसा नसून 'श्लेष' शब्द दुसऱ्या कोणत्या तरी अर्थाने वापरलेला असावा व तो अर्थ ज्ञानेश्वरकालीन श्रोत्यांच्या परिचयाचा असावा अशी कल्पना मनांत आली.

३. 'श्लेष' अलंकार म्हणतांच बाणभट्टाची 'कादंबरी' जशी डोळयांपुढे उभी राहते, त्याचप्रमाणें वरील तेरावा अध्याय समग्र वाचून ज्ञानेश्वरी उभी राहत नाही, असा कोणाहि वाचकाला अनुभव येईल. कादंबरीच्या कोणत्याहि पानांत दोन चार तरी श्लेषांचीं सुंदर उदाहरणें आढळलीं नाहीत, असें होत नाही. 'हा राजा राज्य करीत असतां वर्णसंकर होता, पण चित्रें काढतांनाच तो दिसे; घरें ओसाड होतीं, पण सारीपटांतलीं; कलंक असे पण चंद्र, तरवार व कवच यांवर!' अशा प्रकारचीं अनेक रमणीय वर्णनें पानोपानीं दिसतात. पण त्याच अर्थी वरील अध्यायांत ज्ञानेश्वरांनी 'श्लेष' शब्द योजला नाही असें स्पष्ट दिसतें. तेव्हा तो अर्थ कोणता ? संशोधकांच्या नेहेमीच्या पद्धतीला अनुसरून हा शब्द ज्ञानेश्वरींत आणखी कोठे

सापडतो कां, हें पाहण्यास सुरुवात केली. सबंध ज्ञानेश्वरींत आणखी एकाच ओवींत तो शब्द सापडला व अर्थाकडे लक्ष देऊन पाहतां, पूर्वीची शंका जास्त दृढ झाली.

४. सोळाव्या अध्यायांत प्रारंभींच्या भागांत पुढील २८ वी ओवी आहे. 'तेवि भेदबुद्धिचिये तुळें। घालूनि **सूर्य श्लेषांचें** काटाळें। तूकिलासि तें अल्हें। पुरें करीं जी ॥'–राजवाडेप्रत. या ओवीपूर्वी असलेल्या सर्व ओव्या अगदी बारकाईने वाचल्या तरी देखील 'श्लेष' अलंकार प्रचलित रूढार्थाने त्यांत दिसत नाही. 'मावळितु विश्वाभासु। उवल उदैजेला चंडांशु। अद्वय-अब्जिनी–विकाशु। वंदूं आता ॥' अशी या अध्यायाची सुरुवात आहे. 'जगद्रूपी भास नाहीसा करून अद्वयरूपी कमल विकसित करणारा हा (श्रीसद्गुरु निवृत्तिनाथरूपी) सूर्य उगवला आहे, त्याला मी वंदन करतों,' असा प्रारंभ करून पुढील ओव्यांत या 'चंडांशू'चा प्रताप वर्णिलेला आहे. शेवटीं २८ व्या ओवींत ज्ञानेश्वर म्हणतात, 'हे सद्गुरो, भेदबुद्धीच्या ताजव्यांत, एका पारड्यांत सूर्याला व दुसऱ्या पारड्यांत आपणाला घालून आपलें वजन करण्याचें मी धारिष्ट केलें म्हणून आपण मला क्षमा करा.' तेव्हा वरील एकंदर अठ्ठावीस ओव्यांतील विवेचनाचा ओघ लक्षांत आणल्यास 'श्लेप' शब्दाचा अनेकार्थाशीं कांही संबंध नसून, सादृश्याशीं कांही तरी संबंध असावा असें अनुमान केल्यास तें चुकीचें होणार नाही. येथपर्यंत मजल आल्यानंतर ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'दि ग्रंथांत तो शब्द पाहण्याची आवश्यकता विशेष न वाटल्याने पुढच्या पायरीकडे लक्ष दिलें.

५. महानुभावीय वाङ्मयांतील आरंभीचे काव्यग्रंथ ज्ञानेश्वरीच्या भाषेच्या दृष्टीने तुलनेसाठी निःसंशय अभ्यसनीय आहेत, असा अनुभव आल्याने त्या काव्यांचें वाचन 'श्लेष' शब्दाच्या दृष्टीने केलें. पूर्वी हीं काव्यें वाचतांना वरील संशय उपस्थित न झाल्यामुळे 'श्लेष' शब्द ओवींत आला असतां, रूढार्थानेच घेतला गेला होता. पण आता मात्र त्यावर नवीनच प्रकाश पडला. 'वत्सहरण' काव्यांत पुढील १४ वी ओवी आढळली. '**उपमाश्लेषवर्णक**। तिहीं रंजतु, सकळैक लोक। किं पवाडे संसारमोचक। वाणुं मुकुंदाचे ॥'. या काव्याच्या ५०३ ओव्या आहेत व

ज्ञानेश्वरांप्रमाणेच दामोदर पंडितहि असें म्हणतात की, 'उपमा, श्लेष, वर्णक यांनी, श्रीकृष्णाचे संसारमोचक पवाडे वर्णन करून आम्ही सर्व लोकांचें रंजन करूं.' प्रस्तुत काव्याची सूक्ष्मपणें छाननी केल्यास ज्ञानेश्वरी-प्रमाणेच वाचकांना अनुभव येईल. दामोदर पंडितांच्या या काव्यांत रूढार्थाने 'श्लेष' आढळत नाही. तेव्हा ही 'निरूपती परी' म्हणजे निरू-पणाची पद्धत कोणती, असा येथेहि प्रश्न उपस्थित झाला; पण कोडें उलगडलें नाही. 'ऋद्धपुरवर्णन' नामक काव्यांत पुढील दोन ओव्यांत 'श्लेष' शब्द आढळला. वस्त्रें, व्राह्रें, पांवुरता । तरि हा **श्लेषु** घडतां ।– ओ. ४२७; सरो हे **उपमाश्लोकें** (पाठभेद–उमाश्लेषवर्णकें) । जरि गुंपला राहे चोकें । जरि स्थान महिमा वरि टिके । वैसवावि असें ॥ ओ. ४९७. प्रस्तुत दोन ओव्यांपैकी ४२७ ओवीवर पुढीलप्रमाणे टीप आढळते. –(य खु. देशपांडे यांनी संपादिलेलें 'ऋद्धपुरवर्णन', पान ६९) **श्लेष-उपमा देउनि दूषिजे**'. या उदाहरणांवरून एवढेंच अधिक स्पष्ट झालें की, श्लेषाचा संबंध सादृश्याशीं आहे; साम्य प्रथम दाखवून, मग त्यांत उणीव पडली असें दाखवणें म्हणजे श्लेष होय. तथापि कल्पना जशी पटावयास पाहिजे तशी वरील टीपेवरून पटली नाही; पण अनपेक्षितपणें याचा धागा दुसऱ्याच एका प्रसंगीं लागला.

६. 'यशोदाचिंतामणि ट्रस्ट' या संस्थेच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत, क्रमांक ७ म्हणून, 'लक्षणरत्नाकर' नामक ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा अर्थ-निर्णयशास्त्रविषयक यादवकालीन एक संस्कृत प्रबंध असून तो महानुभावीय पंडित आनेराज यांची कृति होय. प्राचीन मराठींतील तीन टीपांसहित तो आता संपादित झालेला आहे. या लक्षणरत्नकाराचें प्रकाशन चालू असतां, 'द्वात्रिंशल्लक्षणटीका' नांवाची एक संस्कृत मराठी मिश्रित टीका आम्हाला उपलब्ध झाली. तिच्यांतील महत्त्वाचे उतारे 'लक्षणरत्नाकर' ग्रंथाचे शेवटीं पान १६९ ते १८४ वर दिले आहेत. प्रस्तुत चर्चेच्या दृष्टीने, पान १७१ वरील 'उपपत्ति' या लक्षणाचें विवेचन चालू असतां आलेलें व पुढे दिलेलें अवतरण विशेष महत्त्वाचें आहे.

[ 'तैंचि सदृशत्वं त्रिधा । **गुणोत्कृष्टं प्रसिद्धं यदुपमानं तदुच्यते । तन्न्यूनमुपमेयं स्यादेतयोस्तुल्यतोपमा** ॥ सानयासि

थोराची उपमा, तें **उपमान** बोलीजे : यथा मनुष्यमुखासि चंद्रोपमा : ।: आणि सानयाची थोरासि दीजे तें **उपमेय** : यथा चक्रवर्तीचेया स्कंधासि वृषभस्कंधाची उपमा दीजे : ।। : सदृशत्वें कां समानत्वें : तेंचि **उपमा** बोलीजे : यथा सुवर्ण : पितळ : दुग्ध : तक्र : वर्णसाजात्यान्वयें : गोंडिया अप्रत्यन्वयें : यथा नेत्रासि भ्रमरोपमा : मीनोपमा : चपलार्थी : आकृत्यार्थी कमलोपमा; उपमा तें **साहित्य** : उपमान तें **वर्णक** : उपमेय तो **श्लेष**–द्वात्रिंशल्लक्षणटीका]. वरील अवतरणाचा अभिप्राय थोडक्यांत असा की, 'सादृश्य' तीन प्रकारचें आहे; उपमान, उपमेय व उपमा. जें गुणाविषयी श्रेष्ठ व लोकमान्य असतें तें उपमान; उपमेयापेक्षा कमी, तें उपमेय; उपमान–उपमेयांत जेव्हा तुल्यता असते तेव्हा ती उपमा. लहान दर्जाच्या वस्तूंशीं उच्च दर्जाची वस्तु जेथे तुलली जाते तें उपमान. जसें मनुष्यमुखाला चंद्राची उपमा; उलटपक्षीं लहानाची उपमा थोर वस्तूस जेथे दिली जाते तें उपमेय; जसें, राजाच्या खांद्याला बैलाच्या खांद्याची उपमा; केवळ सारखेपणा किंवा समानत्व जेव्हा उपमान व उपमेय यांत असतें तेव्हा ती उपमा होय. **उपमा म्हणजे साहित्य, उपमान म्हणजे वर्णक, व उपमेय म्हणजे श्लेष.** सारांश **उपमे**मध्ये, सादृश्य, किंवा समानत्व हा गुण प्रामुख्याने 'उपमान–उपमेय' यांत दिसतो, त्यांत कमीजास्तपणा नसतो. उपमानापेक्षा उपमेयाला कमीपणा जेव्हा असतो तेथे **वर्णक** समजावें व जेव्हा उपमान हें उपमेयापेक्षा कमी असतें तेव्हा **श्लेष** समजावा.

७. वरील उताऱ्यावरून, '**श्लेष**' शब्दाचा 'सादृश्याशीं' संबंध आहे, या विधानाला चांगली पुष्टि मिळाली, येवढेंच नव्हे तर; दोन वस्तूंमधील सादृश्य दाखवीत असतांना त्या वेळीं कवीचा अभिप्राय असा असतो की, उपमानापेक्षा उपमेय जास्त दर्जाचें आहे. तथापि ती परिस्थिति रमणीय आहे. बैल हा राजापेक्षा कमी योग्यतेचा असला, तरी खांद्याच्या बाबतींत चक्रवर्तिस्कंधाना वृषभस्कंधाची उपमा दिली तरी ती आल्हादकारकच वाटते. वरील विवेचनांत उपमान व उपमेय यासंबंधी आलेल्या कल्पना संस्कृतसाहित्यग्रंथांतील परिचित कल्पनेपेक्षा निराळ्या दिसतात. वर आलेला संस्कृत श्लोक हा कोणत्या संस्कृत साहित्यशास्त्रीय ग्रंथांतील असावा,

यासंबंधी छडा लावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. माझ्या कांही स्नेही संस्कृत प्राध्यापकांना व पंडितांना हा प्रश्न विचारला, पण अजून त्याचा तपास लागत नाही. तेव्हा तो श्लोक कोणाचा, हें कोडें अजूनहि अनिर्मित आहे.

८. प्रसिद्ध साहित्यशास्त्रज्ञ 'काव्यालंकार'कर्ता 'भामह' याच्या 'श्लेष' शब्दाच्या व्याख्येकडे पाहिलें, तर तिच्यांतील थोडेसें साम्य वरील श्लेष शब्दाच्या चर्चेस पोषक ठरतें, असें म्हणण्यास हरकत नाही. 'उपमानेन यत्तत्त्वमुपमेयस्य साध्यते। गुणक्रियाभ्यां नाम्ना च श्लिष्टं तदभिधीयते'॥ ३-१४. उपमान व उपमेय यांचा एकरूपपणा, गुण-क्रिया-नांव यांच्यामुळे जेव्हा साधतो, तेव्हा तेथे श्लेष आहे, असें म्हटलें जातें. वरील व्याख्येचा रूपकाच्या व्याख्येशीं घोटाळा होऊं नये म्हणून, 'भामह' पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करतो. 'लक्षणं रूपके ऽपीदं लक्ष्यते काममत्र तु। इष्टः प्रयोगो युगपदुपमानोपमानयोः॥ ३-१५'. याचा अर्थ असा की, रूपकांमध्ये श्लिष्टाप्रमाणे वरवर परिस्थिति भासत असली, तरी श्लिष्टामध्ये उपमान व उपमेय यांच्यांत एकाच वेळीं स्थानभेद होऊ शकतो, म्हणजे मनाप्रमाणे कोणतेंहि उपमान व कोणतेंहि उपमेय अशी आलटापालट होऊं शकते; अशी गोष्ट रूपकांत होत नाही. भामहाखेरीज इतर साहित्यशास्त्रज्ञांच्या 'श्लेष' संबंधीच्या व्याख्या प्रचलित रूढार्थाला पुष्टि देतात, तर भामहाची व्याख्या ज्ञानेश्वरकालीन 'श्लेष' शब्दाच्या अर्थाशीं जवळजवळ येते. तेव्हा ज्ञानेश्वरकालीन श्रोत्यांना मराठी बोलींत परिचित असलेली कल्पना कोणत्या साहित्याचा आदर्श पुढे ठेवून बनली होती, हा एक महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाकडे अलंकारशास्त्रज्ञांचें लक्ष वेधेल अशी आशा आहे.

'श्लेष' शब्दाचा प्राचीन मराठींत प्रचलित असलेला अर्थ कोणता, हें आपणांस वरील प्रमाणावरून स्थूलतः कळलें; पण त्याचा पूर्णपणे निश्चय 'हातच्या काकणास आरसा कशास पाहिजे' या न्यायाने, महानुभावीय वाङ्मयांतील 'साती काव्यांच्या टीपग्रंथांवरून' झाला.* 'वत्सहरण' काव्यांतील

* हे टीपग्रंथ निबन्धवाचनाच्या वेळीं सभासदांस दाखविण्यांत आले.

१४ व्या ओवीवर, एका टीपग्रंथांत पुढील टीप आहे, 'उपमा देऊनि वीट भनेला नाही : श्लेश भणीजे : उपमा देउनि हेळसुनि सांडिजे : वर्णक भणीजे : तोकडा गुण असता : वर बहुत उपमा चढावणी कीजे ते ते वर्णक।' याचा अर्थ असा की, उपमेमध्ये सादृश्य दाखवितांना कमीजास्त दोष दाखविला जात नाही; केवळ सादृश्याकडेच मन खेचलें जातें. उपमा देऊन तींत दोष दाखवून, कमीपणामुळे ती बाजूला सारणें हें श्लेषाचें लक्षण; व जेथे उपमांचा एकसारखा वर्षाव करून शब्दचित्र उत्कृष्टपणे मूर्तिमंत उभें केलें जातें तें वर्णक होय (वर्ण्-वर्णयति, वर्णन करणे). दुसऱ्या एका टीपग्रंथांत १४ व्या ओवीवर टीप देत असतांना जरा विस्तृतपणे विचार केलेला आढळतो. तेथे द्वात्रिंशल्लक्षणटीप या ग्रंथांतील वर उल्लेखिलेला उतारा देऊन पुढील-प्रमाणे विवरण आहे. 'उपमा देउनि दूषिजे आणि पदार्थ निर्धारिजे तो श्लेष : तो कडा गुण असतां उपमा चढावणी कीजे तें वर्णक।'. ऋद्धपूर-वर्णनांतील दिलेल्या टीपेवरून अधिक कांही निघत नसल्याने तें विवेचन येथे देणें इष्ट वाटत नाही. नरेन्द्राच्या रुक्मिणीस्वयंवरावर टीप देत असतां पुढीलप्रमाणे विधान आढळलें. ओव्या ७८-८२ यांना उद्देशून तें केलेलें आहे. 'रुक्मिणीचेया सख्या वर्णक निरूपण.' तो उतारा वाचकांनी पाहिल्यास **वर्णक** शब्दाच्या अर्थाची कल्पना सहज कळेल.

रुक्मिणी ही आपल्या धाकट्या मैत्रिणीसह आपल्या बापाच्या सभेंत आली, त्या वेळचें वर्णन कवि करीत आहे.

सवें धाकुटियांचा थोवा। जैसीया पुतळीया सानीवा।
कीं कुळदेवता लेपिवा। रतिमदनाचीया ॥७७॥
कीं चंद्रसरोवरीचीया यक्षिणी। कीं अमृताचीया वीणी।
कीं मूर्तीसि आलीया जीणि। डोळियाचिया ॥७९॥
कीं लावण्यलोकीचीया विद्याधरा। कीं सुखसर्गीचीया अप्सरा।
ना ना ते आवयेव निघाले हातियेरा। आनंगाचीया ॥८०॥
दीसती मुखचंद्र गोरे। जैसे चंद्राचे भाऊ सावधारे।
लक्ष्मीये सवे पाठविले क्षीरसागरे। आंग वळया¹ ॥८९॥

---

१ सेवेसाठी.

आंगभरे चालती राजसा । हासेनि उजळती दीशा ।
दाटती डोळे[1] यांचा वळसा । सभेचे लोक ।।९०।।
काश्मीरीचीये[1] करंडीये जैसे । भीतरील मूर्ति प्रकाशे ।
पातळ लुगडीयांत तैसे । आवयेव दीसती ।।८२।।

**नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर.**

निरूपणाच्या वरील प्रकाराला टीपकाराने **वर्णक** हें नांव दिलें आहे. वरील निरूपणांत रुक्मिणीच्या मैत्रिणीसंबंधी केलेली 'उपमांची चढावणी' फारच रमणीय असून त्यांचें चित्र डोळयासमोर आपण प्रत्यक्ष पाहात आहों, असा क्षणभर भास कवीने आपल्या निरूपणपद्धतीने निर्माण केला आहे.

आतापर्यंत महानुभावीय वाङ्मयाच्या आधारें केलेलें विवेचन ज्ञानेश्वरांच्या 'निरूपती परी'च्या विषयांत लागू पडतें, हें पाहिलें म्हणजे चर्चा पूर्णतेस गेली असें म्हणण्यास हरकत नाही. विस्तारभयामुळे एकएकच उदाहरण घेऊं.

**श्लेषाचें** उदाहरण (ज्ञानेश्वरी, अध्याय १२–राजवाडे प्रत)

(भक्ताचें वर्णन)

जेयाचां ठांइं पांडवा । अपेक्षे नाहिं रिगावां ।
सुखासि चडावा । जेयाचें असणें ।।१७२।।

गंगा शुचि होये । पाप ताप जाये ।
परि तेथ आहे । बुडणें येक ।।१७३।।

मोक्ष देउनि उदार । कासी होये किर सधर ।
परि वेचावें लागे शरीर । लिये गावि ।।१७४।।

हिमवंति दोष जाये । परि तेथ जीविताची हाणि होए ।
तैसें सुचित नव्हे । सज्जनाचें ।।१७५।।

(१) स्फटिकाच्या.

खोलिये पारु नेणिजे । तऱ्हीं संतीं न बुडिजे ।
रोकडेया आणि लाहिजे । मोक्षु फुका ॥१७६॥

संताचेनि आंगलगें । पापातें जिणणें गंगे ।
तेयांचें नि सांगें । सुचित्व कैसें ॥१७७॥

**वर्णकाचें** उदाहरण

(भक्तिहीनाचें वर्णन)

कणेंविण सोपटें । कणिसें लागलीं आथि एक दाटें ।
काइ कराल गोमटें । वोस नगर ॥४२९॥

नां तरि सरोवर आटलें । रानी दुःखिया दुःखियें भेटलें ।
कां वांझां फूलीं फूललें । झाड जैसें ॥४३०॥

तैसें सकल तें विभव । अथवा कुलज्ञान गौरव ।
जैसें शरीर आहे सावयव । परी सीसचि नाहिं ॥४३१॥

तैसे माझेया भक्तीविण । जलो तें जियालेंपण ।
आगा पृथ्वीवरि पाखाण । नसति काइ ॥४३२॥

पैं हींवरांची दाट साउली । सज्जनीं जैसी वाळिली ।
तैसिं पुण्यें डावलूनि गेलीं । अभक्तातें ॥४३३॥

नींबु नींबोली मोडोनि आला ।
तरि काउलेयांसि सुकालु जाला ।
तैसा भक्तिहीनु वाढिनला । दोषांचि लागि ॥४३४॥

कीं खंडरसीं खापरीं वाढिलें । वाढूनि राति चौहटां सांडिलें ।
तेथ सुणेयांचां ऐसें जालें । जेया परीं ॥४३५॥ अध्याय ९ वा.

वरील उदाहरणांवरून ज्ञानेश्वरांच्या निरूपणांत, महानुभावीय काव्यांप्रमाणे उपमा–श्लेष–वर्णक अशी त्रिगुणात्मक पद्धति कशी दिसून येते, याची वाचकांना कल्पना येऊन, आरंभींच्या परिच्छेदांत उपस्थित केलेल्या प्रश्नाचें उत्तर सहज देतां येईल.

९. आतापर्यंत केलेल्या चर्चेवरून लक्षांत येईल की, ज्ञानेश्वरी व महानुभावीय वाङ्मय यांचा तुलनात्मक अभ्यास, प्राचीन मराठीच्या दृष्टीने अत्यंत अवश्य असून, त्या थोर वाङ्मयाचा मार्मिकपणें आस्वाद घेण्यास अशा अभ्यासाचें चांगलें साहाय्य होईल. वरील चर्चेवरून असेंहि वाटावयास लागतें की, यादवकाळांत मराठीमध्ये ज्ञानेश्वरीसारखे थोर काव्यग्रंथ निर्माण झाले, तसाच लहानसा कां होईना पण एखादा साहित्यशास्त्रविषयक ग्रंथ निर्माण झालेला असावा. प्रस्तुत अनुमान संभवनीय आहे, असें जर वरील चर्चेवरून वाचकांना वाटत असेल, तर त्या अज्ञात प्रदेशांत आज एक पाऊल आपण टाकलें, हें निःसंशय होय.

# ५. पंचोपाख्यानाची महानुभावीय प्रत*

१. मंडळाच्या त्रैमासिकांत, वर्ष १९, अंक ३, पान ९२-९७, प्रस्तुत पोथीचें सामान्य दिग्दर्शन आलें आहे. उमरावतीजवळील चांदूरबाजार येथील प. म. पाहेवण (पायघण) बुवा यांच्या मठांतील एका जीर्ण पोथीची ही नकल असून, शक १६९७ मध्ये ती पोथी नकलली असल्यानें, मूळ जीर्ण पोथीबद्दल चवकशी करितां असें कळलें की, महंत पायघणबुवा काळधर्मास जाऊन बरींच वर्षें झालीं, व ही पोथी त्यांच्या अनेक शिष्यांपैकी कोणाजवळ असेल तें कळत नाही. तथापि चवकशी करणें चालू आहे. मूळ पोथीचा शोध लागल्यास, प्रस्तुत प्रतीप्रमाणेच मूळ पोथी अशुद्धस्वरूपांत आहे कीं शुद्ध स्वरूपांत काळजीपूर्वक लिहिली आहे, हें कळून येईल. त्याचप्रमाणे संस्कृत भाग अपभ्रष्ट स्वरूपांत आहे की नाही, याचाहि उलगडा होईल.

गेल्या नाताळांत ही मंडळांतील पोथी जरा अधिक सावकाशपणें व तौलनिक दृष्टीने वाचली; तेव्हा वाटलेला निष्कर्ष प्रस्तुत निबंधांत सादर करण्याचें योजिलें आहे.

२. मागच्या खेपेचा उतारा मधून मधून त्रुटित घेतला होता, पण या वेळीं तो पूर्णपणें आहे. फक्त संस्कृत श्लोक न देतां, श्लोकारंभींचा भाग सूचनार्थ दिला आहे. संस्कृताचा बहुतेक भाग अपभ्रष्ट स्वरूपांत असल्याने, उगीच जागा अडवूं नये असें वाटलें. मराठी भागांत मात्र ही काटकसर केली नाही.

तुलनेसाठीं संस्कृत पंचतंत्र (आपटे-आर्यभूषण प्रत) व भावे यांचें मराठी 'पंचतंत्र' (महाराष्ट्र काव्यग्रंथ, ठाणें) अशा दोन प्रती घेऊन, प्रस्तुत महानुभावीय पोथींत जेथे फरक आढळला, अथवा कमी अधिक भाग

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष २२, अंक २.

दिसला, तो मूळ उताऱ्याच्या तळटीपांत स्पष्ट केला आहे. या तुलनेमुळे पूर्वीच्या निबंधांत जीं विधानें केलीं तीं अधिक दृढ झालीं असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

३. सर्वांत महत्त्वाची नवीन गोष्ट म्हणजे दोन्ही मराठी 'पंचतंत्रें' आपटे यांच्या संस्कृत प्रतीशीं अनेक ठिकाणीं जुळत नाहीत. कांही ठिकाणीं मराठी 'पंचतंत्रां'त अगदी नवीनच मजकूर आहे; व तो सुसंगत असल्याने मूळ संस्कृतांत नसेल, असें वाटत नाही. तेव्हा ज्या संस्कृत प्रतीवरून मराठी भाषांतरें झालीं ती प्रत आपटे यांच्या प्रतीपेक्षा निराळी असावी, असें दिसतें; एवढेंच नव्हे, तर मराठी पंचतंत्रांनाहि प्रत्येकीं निराळीच प्रत समोर असावी, असेंहि कांही कांही श्लोकांवरून वाटतें. तेव्हा या मूळ प्रती कोणत्या, हा एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे.

वरील प्रश्नामुळे साहजिकच, 'ओरिएंटल बुक एजन्सी'नें प्रसिद्ध केलेल्या व 'येल' युनिव्हर्सिटींतील तौलनिक भाषाशास्त्राचे तज्ज्ञ प्रो. फॅंक्लिन् एडगरर्टन यांनी संपादिलेल्या 'पंचतंत्र' ग्रंथाची प्रत मीं पाहिली; त्यांतील कथामुखाचे आरंभींचे श्लोक मराठी पंचतंत्रासारखे आहेत असें दिसून आलें. 'मनवे वाचस्पतये' हा श्लोक या संस्कृत पंचतंत्रांत आहे. भावे यांच्या प्रतींत हा दिलेला आहे. पण राजांच्या मुलांचीं नांवें देतांना, भावे यांच्या प्रतीप्रमाणे 'अनंतशक्ती' असें न देतां, 'अनेकशक्ति' असें नांव दिलें आहे; व प्रस्तुत महानुभावीय पोथींत 'अनेकशक्ति' असेंच अभिमान आढळतें. तसेंच महानुभावीय लेखक संस्कृतानभिज्ञ असल्याने, 'वसुशक्ति-रुग्रशक्तिरनेकशक्तिश्चेति' असा मूळभाग वाचून, त्याने 'सुशक्ति', 'रुद्र-शक्ति' ('रुग्र' हें चूक असावें असें वाटून 'रुद्र' असा जावईशोध त्याने केला), असें भलतेंच त्याने लिहिलें. तथापि याहि प्रतीशीं हीं मराठी भाषांतरें कांही कांही ठिकाणीं जुळत नाहीत. तेव्हा मराठी प्रतींत उल्लेखिलेले व त्याच अनुक्रमाने येणारे असे संस्कृत श्लोक ज्या मूळ संस्कृत प्रतींत येतात ती कोणती, हा प्रश्न तसाच अनिर्णीत राहतो.

मूळ पोथी शक १६९७ मध्यें 'अंकुरनेर दत्तमुनि' याने लिहिली असल्याने त्या पोथीला पडताळा पाहावयाचा असल्यास, संस्कृत पंचतं-

त्याची प्रत शक १६९७ च्या पूर्वीची पाहिजे; तशी प्रत आढळल्यास वरील गोष्टींचा उलगडा होईल.

४. महानुभावीय प्रतींतील अक्षरवटिकेसंबंधीं पूर्वीं सांगितलेंच आहे. (पान ९३, वर्ष १९, अंक ३). वरील पोथींत शब्द विलग न लिहिल्याने वाचतांना बराच घोटाळा होतो. त्यांतून संस्कृत भाग तांबडया शाईत लिहिल्याने जरा मार्गदर्शन होतें. पण लेखकाच्या अज्ञानाने कांही वेळां संस्कृत भाग काळया शाईत लिहिला गेल्याने व तोहि अपभ्रष्ट स्वरूपांत असल्याने गोंधळ वाढतो. पोथीलेखनाची सर्व पद्धति सांकेतिक लिपीप्रमाणे असल्याने, सरळ बाळबोध लिपींत जरी ती लिहिली असली, तरी चुका व त्यांची दुरुस्ती सांकेतिक लिपींतील पोथीप्रमाणेच आहे; यामुळे ही पोथी वाचणें मोठें त्रासाचें काम आहे.

५. या पोथीच्या आधारें भावे–प्रतींतील चुका दुरुस्त करणें शक्य आहे. '**रडि** माथेनें घासे' या जागीं '**दरडी** माथेनें घासे'; **वाटे** जेवावयासि घरासि गेले' याच्याबद्दल '**वाढे** (सुतार)...गेले', इत्यादि. भावे यांचे प्रतींतील कांही शब्दांचा व वाक्प्रचारांचा अर्थहि या महानुभावीय प्रतीमुळे अधिक स्पष्ट होऊं शकतो; जसें—वेव्हारा (वानिया, व्यापारी), दाणिं (आता, इदानीम्), नायिला (नसता, भलताच), बोळकंट-बोळंकत–बोळंगत–(संस्कृत–विलंबितवृषणः), काठिकार (प्रतीहारी), जोहार करुनि (नमस्कार करून), निकेनि आहासि (क्षेम आहे कां ? ), फांटे (फांद्या, डहाळ्या), इत्यादि.

६. प्रस्तुत पोथींत बाळबोध लिपी असल्याने सतराव्या शतकांत, 'वचण, जानतें, जेंनें–तेंनें, नेंनें–जाने, धरूणी–करूणी, नेंनौनि–जानौनि, येथोणि-तेथौणि, सास्त्र–वस्य, प्रतला, कारिया' इत्यादि शब्दांचे उच्चार, 'वचन, जाणतें, जेंणें–तेंणें, नेंणें–जाणें, धरूनि–करूनि, नेणौनि–जाणौनि, येथौनि–तेथौनि, शास्त्र–वश्य, परतला, कार्य' असे करीत असत की नाही, हा प्रश्न उत्पन्न होतो. हा प्रश्न सोडविण्यास लेखकाचा अज्ञाणतेपणा हें निर्णायक कारण होऊं शकत नाही. रामदासांच्या दासबोधांत असे शब्द पुष्कळ येतात.

७. कांही एकनाथकालीन छटा कांही शब्दांत दिसतात. आरण्य (अरण्य), आवघड (अवघड), आसे (असे), होये (होय, होए), येकाचे (एकाचे), येकांतीं (एकांतीं), केव्हडाक (केव्हडातरी), कोण्हेके (कोणीएक, कोणीतरी), व कितीक (कित्येक) हीं रूपें केव्हडा, कोणी, किती या प्रश्नार्थक सर्वनामांना 'एक' प्रत्यय लावून झालीं असून त्यांचा अर्थ सामान्य सर्वनामाप्रमाणे आहे.

८. भय फटिलें (भय गेलें), जुहारिला (नमस्कारिला), हे यादवकालीन वाक्प्रचार, त्याच स्वरूपांत या पोथींत आहेत. 'जुहारिला' यावर मुसलमानांची सावली पडलेली नाही (पहा, भा. इ. सं. मं. त्रै., वर्ष १७, अंक १). कै. शिवरामपंत परांजपे यांनीं 'जीव इति व्याहारः' अशी व्युत्पत्ति दिली आहे. ज्ञानेश्वरीकालीन महानुभावीय वाङ्मयांत हा शब्द येतो, यावरून या शब्दाचा संबंध मुसलमानी शब्दाशीं नसावा असें निःसंशय वाटतें. मिस्किल (लुच्चा) हा शब्द मात्र चिन्तनीय आहे. 'खीळ उपटणाऱ्या' वानराला हा हा शब्द लाविलेला आहे. हा शब्द अरेबिक आहे व त्याचा अर्थ 'वरवर भोळा दिसणारा पण आंत मोठा लुच्चा' असा आहे.

९. भावे-प्रतींत 'जाणौनु' 'सांगौनु' अशीं रूपें मधून मधून येतात; पण महानुभावीय पोथींत सर्वत्र 'जाणौनि—जाणौनी' अशीं रूपें येतात.

१०. कांही वाक्यांची रचना लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

१ मज द्रव्यें चाड नाही = ( मम द्रव्येण क उपयोगः । )

२ चीता यक उपनली जे मज द्रव्य बहुसाल आसे = ( चिन्ता कापि उत्पन्ना यत् मम द्रव्यं भूयः अस्ति । )

३ दोन्ही ठाय दुःखाकारणें = ( यतस्तौ स्वल्पदुःखाय । ).

११ एकनाथपूर्वकालीन एका विशेषाचा उल्लेख करून हें प्रकरण संपवूं. प्रस्तुत पोथींत बरेच वेळां पुढीलप्रमाणें उदाहरणें येतात. जसें—**तिय** नगरीं (तिये नगरीं), चीता **यक** उपनली (चींता एक उपनली), तुज **बोलावआ** कारण (तुज बोलावेया-बोलावया कारण), इत्यादि. वरील उदाहरणें हीं लेखनप्रमादाचीं नसून तो एक एकनाथपूर्वकालीन विशेष आहे, असें वाटतें.

एका महानुभावीय 'सातीग्रंथाच्या पोथीं'तील 'सैह्याद्रीवर्णन' या काव्यांतील पुढील ओंव्यांत असलेलीं कांही रूपें लक्षांत घेण्यासारखीं आहेत.

**तीय** हीरांबिकेचा सुतु : राम **यणें** नामें विख्यातु :
तेणें हा निर्मिला ग्रंथु : वीतरागांसि ॥५१६॥ ओवी.

जऱ्ही संध्यारागाचे सदा : काळे दीजति जांबुनदा :
तऱ्ही **तीय** आंगकांतीसी कदा : उपमुं न **य** ॥२१॥

म्हणौनि **दत्ताचिय** अंगकांति : उपमा नाहीं जगतीं :
जीवचकोरा नित्यतृप्ती : मोहांधकारा ठाव नाहीं ॥३७॥

आता सव्यभागे ध्वज दीसे : तो जैसा परमार्ग पढियासे :
की संसारखायि वीझवत **यत** असे : गंगोघ जीवसागरावरि ॥५११॥

वरील सर्व ठिकाणीं 'तीयें, येणें, तीये, ये, दत्ताचियें, येत' अशीं रूपें नसून त्यांची मात्रा नाहीशी झाली आहे. वरील पोथीचा लेखनकाल —रचनाकाल नव्हे—शक १६२५ चा आहे. [शक १६२५ शुभाननाम संवत्सरे : चैत्रमासाभ्यंतरीं कृष्णपक्षीं शुक्रवारीं : तीथ पंचीम चतुर्थ प्रहरीं : पुस्तक संपूर्ण केलें नांदुरीं : आंकुलनेरकर : कृष्णराज तत्सुत शिवमुनि :] पंचोपाख्यानाचा लेखक 'आंकुळनेर'चा दत्तमुनि आहे, त्यावरून एकाच परंपरेंतील दोघे लेखक असल्याने वरील विधानाला अधिक बळकटी येते. (त्रै. वर्ष १९, अंक ३, पान ९३ पाहा.) तेथे शके १६९७ मध्ये 'आंकुरनेर' दत्तमुनीने हें पंचोपाख्यान लिहिल्याचा उल्लेख आहे.

१२. अशा प्रकारें तौलनिक दृष्टीने विचार करण्यास या पोथीचा पुष्कळ उपयोग होईल असें वाटतें. विशेषत: पोथी कोठेहि त्रुटित नसल्याने पांची तंत्रांचा तौलनिक अभ्यास मराठीच्या दृष्टीने होऊं शकतो, हें 'भावे-प्रती'पेक्षा या पोथीचा विशेष होय. ही पोथी ज्या जीर्ण पोथीवरून नकलली गेली, ती पोथी उपलब्ध झाल्यास, प्राचीन मराठी गद्यवाङ्मय ग्रंथांत अमोलिक भर पडेल असें म्हणण्यास हरकत नाही.

# ‘पंचोपाख्यान’ किंवा ‘पंचतंत्र’ याच्या महानुभावीय प्रतीचा उतारा

*श्रीकृष्णायेन्मा[१] :।: श्रीदत्तात्रयेन्मा :।: सकळ शास्त्रार्थ सार : जगती सामालोक्य विष्णुशर्मेदत्तात्रें :।: पंचभिटतुळं वकारं सुमनोहरं शास्त्रं ॥१॥:

[२]दक्षण देशामध्ये महिळारोप्य नाम नगर आसें[३] : तिय[४] णगरी

---

* या पोथींतील संस्कृत भाग अगदी अपभ्रष्ट स्वरूपाचा आहे हें वरील श्लोकावरून दिसेल. नमुन्यासाठी श्लोक पूर्ण उतरला आहे; पण पुढे मात्र संस्कृत भागाचा केवळ आरंभ दिला आहे; नाहीतर बरीच जागा व्यर्थ अडली असती. मूळ श्लोक असा आहे. ‘सकलार्थशास्त्रसारं जगति समालोक्य विष्णुशर्मेदम्। तंत्रैः पञ्चभिरतुलैश्चकार सुमनोहरं शास्त्रम् ॥१॥’ या पोथींत संस्कृत भाग तांबडया शाईने लिहिला आहे; पण कांही ठिकाणीं संस्कृत कोणतें हें न कळल्याने, कधी कधी तो मराठी समजून काळया शाईनें लिहिला आहे.

१ भावे यांच्या ‘पंचतंत्रांत’ नमन पुढीलप्रमाणे आहे. ‘श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः। श्रीमार्तंडभैरवाय नम:’ ।... ...इत्यादि. संस्कृत मूळ भाग–‘ॐ नमः श्रीशारदागणपतिगुरुभ्यः। नमोस्तु बृहस्पति–व्यास–वाल्मीकि–प्रभृतिभ्यो महाकविभ्यः’। सारांश, दोन्ही मराठी पंचतंत्र ग्रंथांत मूळ संस्कृताला अनुसरून रूपांतर नाही. भावे प्रतींतील ‘मनवे वाचस्पतये शुक्रांगिरसे पराशरायाथ।’ मूळ पंचतंत्रांत दिसत नाही. तेव्हा हीं दोन्ही मराठी पंचतंत्रें कोणत्या मूळ प्रतीवरून झालीं, हा प्रश्न उत्पन्न होतो.

२ भावे-प्रतींत ‘पूर्वि’ एवढाच शब्द आहे.

३ भावे–प्रत–क्रियापद गुप्त.

४ भावे–‘तेथे.’

आम्रसीहं[1] राजा राज करि[2] : तो सकळ सास्त्रें[3] जाणें[4] : तया राजयासि तीवे पुत्र जाले : परंतु ते तीवे मुर्ख : येकाचे नाम सुशक्ति : रुद्रशक्ती : आनेकशक्ती[5] : ते वडील जाले[6] : परांतु ते मुर्ख : आम्हामागे राज्य जाईल[7] : तर पुत्र सुवीद्य होये : ऐसें वीचारिजें : आनीक येक आसें ॥ उक्तं च : ॥ : आजातमृतमुर्षेभ्यो[8]...॥२॥ म्हणौनी पुत्र नोहे ते बरवें : परि मुर्ख पुत्र कामा न येती : अथवा पुत्र होउनी तात्काळीक मरे तें बरवें : हे दोन्ही ठाय थोडिया दुखा कारणें : परंतु मुर्ख पुत्र जव जीवे तव तो पीतेयाचा देहाते जाळी : म्हणौनी आमचें पुत्र बुद्धीवंत होये तों तुम्ही उपावो करावा[9] : ऐसे रायाचें

---

१ भावे व मूळ संस्कृत यांत 'अमरशक्ति' हा शब्द आहे.

२ भावे–'राजा होता.'

३ मूळ संस्कृत—सकळशास्त्रपारंगत :'; भावे–प्रतींत हा भाग गाळलेला आहे.

४ शुद्धलेखनाच्या दृष्टीने 'जाणें' येथे अनुस्वार नको. पण अशा अनुस्वाराच्या चुका पुष्कळच या पोथींत दिसतात.

५ भावे–वसुशक्ति, अनंतशक्ति, उग्रशक्ति.

६ भावे–'प्रबुद्ध थोर जाले.'

७ भावे–ही कल्पना गाळलेली आहे. 'मूर्ख जाणौनु। राजा मंत्रियासि बोलाउनि म्हणे।' असें थोडक्यांत वर्णन आहे.

८ 'आजातमृतमूर्खेभ्यो'...पासून 'रायाचें वचना आईकौनि' येथपर्यंतचा भाग भावे-प्रतींत नाही. मूळ संस्कृत–'अजातमृतमूर्खेभ्यो मृताजातौ सुतौ वरम्। यतस्तौ स्वल्पदुःखाय यावज्जीवं जडो दहेत्॥' महानुभावीय प्रतींत मधून मधून संस्कृत श्लोकांचा पूर्ण अर्थ दिला आहे, तसा भावे–प्रतींत नाही. दोन्ही मराठी प्रतींत मूळ संस्कृतांतील पुष्कळच श्लोक गाळलेले आहेत. 'वरं गर्भस्रावो' व 'किं तया क्रियते धेन्वा' हे श्लोक भाषांतरांत दोन्ही प्रतींत नाहीत.

९ मूळ संस्कृत—तदेतेषां यथा बुद्धिप्रबोधनं भवति तथा कोऽप्युपायोऽनुष्ठीयताम्।

वचण आईकौनी : मग प्रधानें विष्णुश्रमा[1] बोलाविला : मग राजे तयातें वीनवीलें : वीष्णुशर्म्रे हो आमुचें पुत्र मुर्ख जालें : तुम्ही कृपा कराल तरी जानतें होईल : आण तुम्हांसि प्रतदीनी : येक सत सोनवे देईन :ऐसें रायाचें बोलनें आईकौनी : विष्णुशर्मा[2] म्हणें राजेया : मी वीद्यावीक्रयो करित नाही : मज द्रव्यें चाड नाहीं : तुझेनी पुन्ये मज द्रव्य उदंड असें : तरि राजया माझी प्रतज्ञां आईक : राया तुझीया पुत्रातें सा महीनामध्यें : नीती-सास्त्र सकळ जांनतें करिन : जरि न करी तरिं आ[3] बोलाचें उनें आसें : मग तेनें विष्णुशर्मेनी : इये पांच तंत्रें सृजली : प्रथम मीत्रभेदु : मीत्र-संप्राप्ती : काको उलुणीयं : लब्धप्रणासण : अपरोक्षितें : ऐसें सकळ शास्त्राचें शार काढौनि पंचोपाख्यान रचीलें :॥: उक्तं च :॥: आनंतपारं कील...... ॥३॥ म्हणौनी सकळ कळामध्ये सार तें घ्यावें :॥: आत्तां मीत्रभेदु राजपुत्रा प्रती वीष्णुशर्मा सांगतां जाला : ते प्रथम श्लोकु :॥: उक्तं च :॥: वर्द्ध-

---

१. मूळ संस्कृत–अहं त्वां शासनशतेन योजयिष्यामि; भावे प्रत–हा भाग गाळलेला. (शासन म्हणजे शासनपत्र–जमिनीवगैरेबद्दलचें); येथें मुळाप्रमाणे मराठींत भाषांतर नाही.

२ 'विष्णुशर्मा म्हणे' येथपासून...'माझी प्रतज्ञा आईक' येवढा भाग 'भावे–प्रतींत' नाही.

३. 'मूळ संस्कृत–'ततः स्वनामत्यागं करोमि' माझें नांव बदलीन; भावे–प्रत–'राया तुझे पुत्र सां मासां । प्राज्ञ पढते राज्या योग्य करीन । न करि तरि माशी दुर्दशा करावि ।'

४ मूळ संस्कृत– 'मित्रभेद–मित्रप्राप्ति–काकोलुकीय–लब्धप्रणाश–अपरीक्षितकारकाणि चेति पञ्च तन्त्राणि.'

५ भावे–प्रत 'अनंतपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः । यत्सारभूतं तदुपार्जितव्यं हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात् ॥' मूळ–' सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसैर्यथा क्षीरमिवाम्बु० '.

६ मूळ–'वर्धमानो महान्स्नेहः सिंहगोवृषयोर्वने । पिशुनेनातिलुब्धेन जम्बुकेन विनाशितः ॥' भावे–प्रतींत या श्लोकाचें भाषांतर नाही.

महास्नेह ...... ॥४॥ प्रथम सीहेसी हेसी मैत्रि वाढवीली : पीशुन तो जंबुक : तेंने मीत्रभेदु करौनि : सीहाकरावी वृशभु मारवीला :॥: हे कैसी कथा राजपुत्र पुसती : वीष्णुशर्मा सांगें : परीयसी राजपुत्रा हो : ये महीतळें[1] नाम नगरी । येथे पुर्वी वर्धन नावें वानीयों[2] होता : त्या पासि आमरयाद धनें[3] होतें : तो जवें[4] त्रीरा (रात्री) पहुडला आसें : त्यासी चीतां[5] : यक उपंनली : जे मज द्रव्य बहुसाल आसें : तरी द्रव्यें करूणि उद्यमे करूनी : धनवृधितें पावें : तो उद्यम करू : जेंनें आर्थु जोडे तो प्रकारू कीजें : द्रव्यवांचौनि पुरुशु काही नाहि :॥: उक्तं च : यावद् भाग्यमहोदयो न हि भवेत्...... ॥५॥: तथा च :॥: न ही तद् विद्यते किंचित् ...... ॥६॥ तथा च :॥: यस्यार्थाः तस्य मित्राणि ..... :॥७॥: वयोवृद्धाः तपोवृद्धाः ...... ॥८॥ धन्यदपी :॥: यस्यास्ति वित्तं...... ॥९॥ तथा च :॥: वरं वनं ...... ॥१०॥ उद्यमेन हि सिध्यन्ति ......

---

१ भावेप्रत—‘ दक्षिणदेशि महिळारोप्य नाम नगरँ ’; मूळ संस्कृत-‘दाक्षिणात्ये जनपदे महिलारोप्यं नाम’ इत्यादि.

२ मूळसंस्कृत–‘ तत्र वर्धमानको नाम वणिक्पुत्रः ’ भावे-प्रत–‘ तेथें वर्धमान नामें वेव्हारा. ’

३ मूळ–‘ भूरिविभवः ’; भावे–तो अतिसंपन्न.

४ येथून तों बाराव्या श्लोकाअखेरपर्यंतचा भाग भावे-प्रतींत नाही. श्लोक ६ व ७ याखेरीज बाकीचे श्लोक मूळ संस्कृतग्रंथांत या जागीं नाहीत. भावे-प्रतींत ‘ उपार्जितानामर्थानां ’ व ‘ दैववशादुपपन्ने ’ हे श्लोक आहेत, पण ते मुळांत सापडत नाहीत, तसेंच महानुभावीय प्रतींत नाहीत. महानुभावीय प्रतींत याप्रसंगीं जे संस्कृतश्लोक आहेत, ते भावे-प्रतींत नाहीत, व त्यांपैकी कांही मूळ संस्कृतांतहि सापडत नाही. यावरून पंचतंत्राच्या या तीन्ही प्रती कांही बाबतींत वेगवेगळया दिसतात.

५ मूळ–‘ चिन्ता समुत्पन्ना.’

॥११॥ त्यजन्ति मित्रं ...... ॥१२॥ म्हणौनी द्रव्यावांचौनि पुरुश काहि नाहि : ऐसे तो वीचारौनि[1] तो वानीया : शर्कराचेया उद्यमा नीगाला : गाडा दोघे बैल जुतलें[2] : येकाचें नाव नंदकु : येकाचं नावं संजीवकु : ऐसा मार्गी जातां वांनीया यमुना पावला : तवं संजीवकु चीषलांतं[3] गुतला : तेथें आरंण्य[4] : वोश : जवळी धन बहुसाल : ऐसा तो वानीयां चींताव्रतु होउनि विचारूं लागला : उक्तं च : न स्वल्पस्य कृते...... ॥१३॥ स्वल्पास्तव बहुत रक्षीजें : हे जाणपनें वीचारौणि तो बैलु वानीये तेथें सांडिला ॥ आनीक बैलु गाडा जुतला :॥: उक्तं च : पथिच्युतं तिष्ठंति दैवरक्षितं...... ॥१४॥ तथा च :॥: वणे रणे शत्रुजलाग्नि...... ॥१५॥ एसा तो संजीवकु दैवास्तव : चीखला बाहीरी हळु हळु नीगाला : ऐसा

---

१ भावे-‘ यैसे विचारौनु । बरवें सुमुहुर्ति । वाजतां गाजतां । सोइरा स्वजनीं बोळवीतु । शर्करा आणावया निघाला । ’, मूळ संस्कृतांत ‘शर्करा’ संबंधी उल्लेख नाही; पण ‘ इत्येवं संप्रधार्य भाण्डान्यादाय शुभायां तिथौ गुरुजनाभ्यनुज्ञातः सुरथाधिरूढः प्रस्थितः ’ असें आहे; यावरून या दोन्ही मराठी पंचतंत्रांना संस्कृतांतील मूळ दुसरा एखादा ‘पंचतंत्रा’चा पाठ असावा.

२ भावे-‘ बरवे कौतुकाचे हौसिचे जुंपिले;’ मूळ-संजीवकनंदक-नामानौ गृहोत्पन्नौ धूर्वोढारौ स्थितौ ।

३ भावे-‘ तळियामध्यें कर्दमीं;’ मूळ-‘ पंकपूरमासाद्य.’

४ भावे-‘ त्याचा पावो दुखवला । यैसें देखौनि वेव्हारा दोनि दिवस तेथें राहिला । दुःख केलें......बैलापासिं । दोघेजण राखण ठेविले ।...... अरण्य भयानक देखौनि बैल संडुनि गेले : आणि मेला म्हणौनि... सांघितलें...मग तो वेव्हारा...दुःख करि : म्हणें : उत्तम मोलाचा गुण-वंतहि होता । ’ हा भाग संस्कृत भागास बराचसा अनुसरून आहे; पण महानुभावीय पोथींत हा गाळला आहे.

तो कीत्तीयेकां दीवशा [१]पुष्ट जाला[१] : चहुकडें चरें [२]सादढ डेरे[२] : तेनें नादे गगन गर्जे : तव तेथे वनीचा राजा पींगळीकु सींहु : सकळां स्वापासहीत : उदका[३] कारणें [४]जवं यें तो[४] : तव तेनें त्या बैलाचा : भयानकु[५] शब्दु आकीला : दृष्टीं[६] सांपडली : मनीं भय उपजलें : मग म्हनें : जआ स्वापदाचा शब्दु ऐसा : तो [७]केव्हडाकँ जुझार[७] होईल : ऐसे म्हणौनी उदक न घेतांचि मागुतां प्रतर्ला[८] : जाउनी आपुली [९]जाळी आंतु रिगालें[९] : ईतुका समई जुनवनु प्रधानपुत्रा भ्रष्टाधीकार कोल्हे दोघै आसती : येकाचें नावं करकंटकु एकाचें नावं दमनीकु : तीही पिंपळीकासी भयाचकीत देखौनि : तवं करकंटकु दमनीकाप्रति बोलता जाला : म्हणें हा आमचा राजा : पींगळीकु उदकाकारणें सपरिवारि गेला होता : तो मागुता उदक न घेतांचि भयाचकीत जाला : तरि येथें कांही कारण आसें : तव दमनीक म्हणें : [१०]आम्हां तेथें व्यापारू[१०] णाही : तुज बोलावआ काय कारण :॥: उक्तं च :॥: आव्यारेसु व्यापारं''॥ १६ ॥ तवं करकंटकु म्हणें हे कैसी कथा : दमनीकु सांघें : कोन्हे येक नगरीं : येक धनवंत वानीये : नगराबाहीरी [११]देवळ माडलें[११] : तवें[१२] वाढी[१३] : गांवाआतु जेवावया गेला :॥: तव तेथे वानरा समुहु[१४] आला : कोन्हेकें वानरें फळे खाउ लागली : कीतीक क्रीडा

१ तो यमुनेचे थडियेरि हरियालि चरे। भावे-प्रत.

२ येथे पाठ चुकलेला दिसतो; 'आडी दरडी चरणें' असा वाक्प्रचार महानुभावीय वाङ्मयांत आढळतो. (दृष्टांतपाठ पहा.) 'आ' बद्दल 'सा' हें सांकेतिक अक्षर आहे; येथे तें चुकून पडलें असावें. मूळ संस्कृत-'वल्मीकशिखराग्राणि शृंगाभ्यां विदारयन् प्रगर्जंश्चास्ते।' भावे प्रत-'मोटा दृढ जाला : रडि माथेनें घासे | आणि थोरें शब्देंकरुनि गर्जे।

३ भावे-'पाणीं प्यावयासि.' ४ जों येतो तों. ५ भावे 'सादु' ६ 'साशंकित जाला'-भावे; संस्कृत-'ससाध्वसम्'. ७ भावे-'तरि सादुकार कैसकैसा असेलि.' ८ परतला. ९ वडाखालीं बैसला-भावे. १० भावे-'आम्हीं दाणिं (आतां) मंत्रि न हो। तन्हि नाथिला व्यापार काईसा।'

११ भावे-देवालय करुं आदरिलें. १२ तंवं माधान्ह काळि-भावे.

१३ भावे-वाटे. १४ भावे-युथ.

करू लागली : तव तेथें : यकु वानरु : पाटीवरी[1] बैसौनी[2] : [3]खीळी हालउं लागला : हालवीतां[4] खीळी हातासी आली : वृखण मध्यें सीरलें : ते वाणरू कळ लागुनी मेलो[5] : म्हणोणी आव्यापारिं व्यापारू करू नयें : उक्तं च :॥: आव्यापारेंसु...:। १७ ॥: आपी च :॥: रा[6]जा माता च देवा च...:॥ १८ ॥: तरि रायाची माता रायाची रांणी : रायाचा पुत्रु : रायाचा मुख्य मंत्री : रायाचा परोहित : रायाचा अवसरीया : ईतुकेयातें रायासमान मानी जें : तो प्रधानु लाभालाभाते पावें : म्हणौनि राजसेवा जाणे तो नीका : करकंटक म्हणे : राजसेवा ते कैसी : दमनीक सांगें : रायापासी जर चावटी कीजें : ते राजसेवा नव्हें ॥: उक्तं च :॥: [7]मौनान्मूकः......:। १९ ॥: रायापासी मौन्य धरुणि बैसीजें : तर मुका म्हणती : दुरी बैसे तरी भेदु म्हणती : वहुत शातीपण धरे तरि मीस्कीन म्हणती : जरी रायासी उखरू बोले : तरि आकुळीन म्हनती : म्हणौनी सेवाधर्मु आवघडु आसें :।: योग आभ्यास होय : परंतु सेवाधर्म नोहें : म्हणोनी दमनीकु म्हणें : करटका :॥: तु काय जाणसी : राजसेवा वांचौनी पुरुषधर्म नाही :॥: उक्तं च :॥: सुहृदामुपकारकारणात्...:॥२०॥: राज-

---

१ भावे–येकु वान्नरु । खेळाडु । दुफोडि खांब्र करितां मध्यें खिळ घातलि होति । ते...देखिली ।

२ भावे–उकड बैसौनि. 'खीला' लिहून त्यावर टिंबें देऊन तें खोडलें आहे.

३ हा शब्द दुबार पडला आहे.

४ ते खील हालउं हालउं उपडिलि । तयाचें वृषण बोळकंट (लोंबत होतें ।......मध्यें सांपडलें ।

५ भावे–वान्नर मृत्यातें पावला ।

६ मूळ–राजमातरि देव्यां च कुमारे मुख्यमंत्रिणि । पुरोहिते प्रतीहारे वर्तितव्यं नृपे यथा ॥; भावे–प्रतींत हा श्लोक नाही.

७ हा श्लोक व त्याचा मराठींत अर्थ भावे–प्रतींत नाही. मूळ संस्कृतांत या ठिकाणीं हा श्लोक नाही.

सेवा करौनिया सोईरेयां उपकार कीजें : वैरी नीर्दाळीजें : हे दौघे प्रकारू नर्ने : तो मातेचा उदरा वांयां आला : पोट काय : स्वांनें न भरिती : यरि राजसेवा वाचौनि : पुरुशधर्मु नाही :।: उक्तं च :।: अप्रधाने प्रधानस्या...:॥२१॥: जरि रायाची सेवा कीजे तरि आप्रधानु तो प्रधानु होये : जया प्रधानासी रायाची सेवा णाही : तो पदावेगळा होये : तरी करकंटका मी राया पीगळापासी जाउनी : राजा वस्य करीण : तरि राजा भयाते पावला आसें : तयासि भयाचें कारण पुसीन : संधि वीग्रहो : याने आसन : संश्रयो द्वैधिभावो : ऐसी सड वीधी नीति बोलौनि : राजा वस्य करीण : प्रधानु होईण : तव करकंटकु म्हणें : तुवां राजसेवा नीती जांनीतली : णाही : राजा पुसैल तेंव्हां उत्तर काय देसी : §लः तैव[1] दमनीकु म्हणें : राजा पुसेल तयासी सन्मुख : बरवें उतर देईण :।:उक्तं च:।: उतरादुतरं वाक्य ...:॥२२॥: [2]बोलके जे पुरुस त्यासी : बोलतां उत्तरापाठी : उत्तर आठवें : जैसी वृष्टि करौनी : बीजापासाव बीज होय : तरि रावो भयातें पावला असें: ऐसें म्यां जानीतलें :।: उक्तं च :।: आकारैः रंगतैः...:॥२३॥: म्हणौणी जे काळीं जे बालौ ये : पुसलेया देउ यें : ते सर्वही मी जाणत आसें : तवं करकंटकु म्हणे हो का : तुं रायापासी जाये[3] : तयाचा अभीप्रावो मनासी आनी : तेधवां तो दमनीकु सीहा जवळी गेला : आती दुरी णा आती[4] जवळी उभा राहीला :।: उक्तं च :।: नातिदूरं समी-

§ येथे पोथीचे ८ वे पानाचा प्रारंभ.

१ भावे-प्रत-वैराटा जातां धौम्यें राजनीति पांडवांसि सांघितिली । ते मियां आईकिली । ते मी जाणतु असे । मूळ संस्कृत-‘ आकर्णितं मया नीतिसारं ’ मूळांत धौम्यराजनीतीचा उल्लेख नाही. तेंव्हा तो उल्लेख असलेलें ‘पंचतंत्र’ कोणतें ?

२ हा श्लोक भावे-प्रतींत आहे, पण त्याचा मराठी अर्थ तेथे दिला नाही.

३ भावे-‘तुज अवघें बरवें हो । कार्यसिद्धि हो ।’

४ भावे-प्रतींत हें नाही.

पस्थे... :॥ २४ ॥: ऐसा तो दमनीकु उभा राहुनी राजा जुहारिलों[1] : राजेनी नेत्रखुणे बोलावीला : राजा पुसे क्षम आसा : जी[2] आतां येथौणि ऐसे दमनीकु म्हणें : पींगळीकु म्हणें बहुतां दीशा भेटौ आलासी : परिवारासी म्हणें हा आ[मु]चा जुनट प्रधानाचा पुत्र : ऐसे म्हैनोनी राजे दमनीकासी सन्मानु केला : मग राजा पुसें दमनीकासी : तु कोणां कारिया आलासी : तरि आपुर्व आसेल तरि सांघ : दमनीकु म्हणे : राया येकांती[3] सांघैन :॥: उक्तं च : ॥: शटकर भीद्यतें मंत्र.. :॥२५॥: म्हणौनी द्वीकरणी मंत्र करूं णये : तेधवां पींगळकें सभा[4] विसर्जली : परिवारासी पाठवनी दीधली : दमनीकासी राजे पुसीलें : तु कवणा कार्या आलासी ते मज सांघ : तव दमनीकु म्हणे गोसावी : सपरीवारी यमुनेसी : उदक स्वीकरावया गेलेंति : तरी उदक ने घेतांचि मागुतें परतलेति : ते राजेनी कारण सांगावें : तुं[5] म्हणसील यासी गुह्य कैसें सांगावें : तरि आईक : उक्तं च :॥: दारेशु किंचित् ..[6]:॥२३॥: इतुका प्रती गोप्य सांघावें :

(येथे पोथींतील दीड पान मजकूर घेतला नाही.)

पुर्वी येक कोल्हा[7] आरंन्यामध्यें आसें : तआसी वणामध्यें हिंडतां हिंडतां रणुभुमी देखीली : तेथें अवचीता भया[न]कु शब्दु जाला : ते

---

१ भावे–'रायें दमनकातें खटाटोपें येतां देखिला । मग राजा काठिकारातें म्हणे । आमुचे जुने मंत्रियाचा पुत्रु येतो । त्यांसि तु आडवी काठि घालुं नको । येउनि उचित स्थानिं बैसों दे । नंवं तो दमनीकु येउनि । रायासि जोहार करुनि उचितस्थानिं बैसविला । रायें दक्षिणकरें परिवंसीला ।' भावे–निकेन आहासि.'

२ भावे–'राउळिचं पांयांचं प्रसादेन कृपेनं निकें असों ।'

३ भावे–'राजकार्य बहुतां देखतां न विनवावें ।'

४ भावे–'सभेचे अवघे परते सरले ।'

५ हा भाग भावे–प्रतींत नाही. 'सादु आईकिलिया जाणें हें निकें नोहे । शब्दु नानाविधु ।' अशी विचारसरणी तेथे आहे.

६ येथे पोथी पान ९ सुरू.

७ भावे–कोल्हा भुकेला ।

आकौनि कोल्हेयासि भय[1] उपजले : पळावें[2] ऐसें[2] चीती तेणें धरिलें : मग विचारौनि सामोरा जव जाय : तव दुर्दर्भी[3] येकु देखीला : वृक्षाचाँ फाटां लागलेंयां वाजीला : तव तणें कोल्हेनी आपपें वाजवीला : ते देखौनी भय फीटलें : चीता[5] हरली[5] :॥:

---

१ भावे–बिहाला.

२ भावे–मग मनिं विचारि। म्हणे पळों किं काये आहे तें पाहों ।'

३ भावे–ढोलु ।

४ भावे–वारियानें वृक्षाचे पल्लव फांटे लागले। तेणें तो वाजिन्नला।

५ भावे–'मग मनिं विचारिलें । जे यामाजि मेदमांस अपार असेलि । म्हणौनि येकीकडे फाडुनि आपण भीतरि रिघाला । तव तेथें कोरडें चर्म असे । आणि लांकुड पोकळ म्हणौनि जाणतु असे ।' अशा प्रकारचें वर्णन महानुभावीय प्रतींत नाही. संस्कृत–'ततः पुरुषचर्मावगुण्ठितं तत्कथमपि विदार्यैकदेशे छिद्रं कृत्वा संहृष्टमना मध्ये प्रविष्टः ।'

# विभाग २ : महानुभावीय वाङ्मय

## ६. नरेंद्रकवीच्या रुक्मिणस्वयंवरावर अधिक प्रकाश*

दाळिंबीचिया बीयाप्रति जैसे : फळीं वेगळाला रसू दीसे :
तैसीं ग्रंथीचीं अक्षरें पाहावीं सुरसें : तेणें पाडें ॥१८९॥

**कवि नरेंद्र-रुक्मिणीस्वयंवर**

१. महानुभावीय सप्तकाव्यांपैकी सैह्याद्रीवर्णन व रुक्मिणीस्वयंवर हीं अजून मुद्रित न झाल्याने कै. भावे व श्रीयुत देशपांडे यांनी आपआपल्या पुस्तकांत दिलेल्या थोडक्याशा माहितीनेच वाचकांना आपली भूक शमविणें भाग पडतें. कै. भावे यांनी 'महाराष्ट्र सारस्वता'च्या पहिल्या भागांत, पान १०७ ते ११३ यांवर, प्रस्तुत कवीसंबंधीं अल्पशी माहिती देऊन, रुक्मिणीस्वयंवर या काव्याची रूपरेषा दिलेली आहे; तसेंच नमुन्यासाठी ३–४ उतारेहि त्यांनी दिलेले आहेत. श्रीयुत य. खु. देशपांडे यांनी 'महानुभावीय मराठी वाङ्मय' यामध्ये, पान ३०–३१ वर, नरेंद्र कवीसंबंधी नागदेवाचार्यचरित्रांत थोडी माहिती मिळते, असें सांगून, नमुन्यासाठी काव्यांतील एक वर्णनपर उतारा दिलेला आहे.

२. परमेश्वरी कृपेने कै. भावे यांना पाहाण्यास मिळालेली रुक्मिणीस्वयंवराची पोथी आम्हास नुकतीच पाहाण्यास मिळाली. त्याचप्रमाणे

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष १५, अंक २.

नागदेवाचार्यचरित्राची पोथी अवलोकनांत आली. शिवाय 'स्मृतिस्थळ' नांवाच्या आमच्याजवळच्या पोथींतहि नरेंद्रकवीबद्दल थोडी माहिती मिळते. नागदेवाचार्यचरित्रांत असलेली १६१ वी लीळा कै. भावे यांनी दिलेल्या आख्यायिकेला आधार आहे असें वाटतें. स्मृतिस्थळांत[1] तशाच प्रकारची लीळा ११३ वी आहे. दोन्ही पोथींत आख्यायिकेसंबंधाने एकवाक्यता आहे.

३. स्मृतिस्थळांतील उतारा पुढीलप्रमाणे आहे:—

नरेंद्र बासा भेटी : अनुसरण : ।। : नरेंद्रकवि सालकवि : नृसिंहकवि : हे तीघे भाउ : नृसिंह कवीने नलोपाख्यान केलें : सालकवीने रामायण केलें : तें आपुलालें रामदेवापुढां[2] भणीतलें : तेथ नरेंद्रकवी बैसले होते : आवघें आईकौनि तिहीं भणीतलें ऐसा द्वारकेचा रामहाटु वर्णितेति तरि तुमचेया पापासि पुरश्चरण होतें : ऐसें रायादेखता नीभत्सीलें : तवं तेहीं भणीतलें : तुम्ही एक कवित्व करा : मा (मग) : तुमची युक्त पाहों : मग : नरेंद्रबासीं तेणेंचि सळें (आवेशाने) **अठरा शतें रुक्मिणीस्वयंवर ग्रंथु केला** : करूनि तया देखता राया पुढां भणीतला : वाचितां ये वोवीयेपासी आले.

देवाचेया दादुलेपणाचा उबारा :
न साहावति सातांहि सागरा :
भेण वोसरौनि राजभरा :
दीधली द्वारावती[3] ।।

यावरि रायें भणीतलें : **या ग्रंथाचा अभंगु[4] मज देयावा** (या

---

१ याच पोथीसंबंधी मध्यप्रांत संशोधन मंडळासमोर एप्रिल १२ ला निबंध वाचण्यांत आला होता.

२ रामदेवराव जाधव यांच्या दरबारांत.

३ प्रस्तुत पोथींत ही ओवी ३१२ वी आहे.

४ 'अभंग' हा शब्द येथे तरी वृत्तार्थी निःसंशय नाही. पोथी समाप्त होत असतां, नांवाचा उल्लेख करणें, असा अर्थ येथे अभिप्रेत आहे, असें वाटतें.

ग्रंथाच्या शेवटीं माझे नांवाचा उल्लेख करावा). मी : जेतुकीया वोवीया तेतुके **सोनटके** : आणि चौथरीया **आसू** वोवाळणी घालीन : नरेंद्र बासों भणीतलें : ना : राजे हो : आमचेया कविकुळां बोल लागेल : मग तयाचे गर्व हरिले : रायासि थोर चमत्कार जाला : मग ते रुक्मिणी स्वयेंवर नरेंद्र बासी भटोपासि (नागदेवाचार्यांकडे) घेउनि आलें : भटाची भेटी जाली : **तैसेंचेही भीक्षा केली** ( पंथ अनुसरला ) : तैहुनि **रुक्मिणी सैंवर ग्रंथु मार्गासि आला** ( महानुभावीयांकडे आला) : मग : भटो बासा मार्गा : केतुलेया एकां काळां : अणो बासांचा हरगर्वी (अण्णो बासांचे शिष्य हयग्रीवाचार्य, गद्यराजकर्ते, शके १२३१ ) भीक्षा केलेयां : हें आघवें आईकौनि भणीतलें : सकळा कविपरीस हा कवि चतुर : मग : आपणही श्लोकबद्ध गद्य केलें ( गद्यराज, २८० ओंव्या ) :॥: स्मृतिस्थळ–लीळा ११३.

४. वरील उताऱ्यावरून असें स्पष्ट दिसतें की, नरेंद्र कवीने १८०० ओंव्यांचा रुक्मिणीस्वयंवर ग्रंथ रामदेवराव यादवापुढे वाचून दाखविल्यावर राजा खूष होऊन त्याने कवीला आपलें नांव ग्रंथाच्या शेवटीं घातल्यास कवीला मोठी देणगी देण्याचें कबूल केलें. पण मानधन कवीने आपल्या कर्तृत्वाला कलंक लागेल म्हणून तसें करण्यास कबूल न होतां, ऐश्वर्याची एकप्रकारें किळस आल्याने वैराग्यवृत्ति पत्करून महानुभावीय पंथ स्वीकारला.

५. ' रामदेवराव राजाच्या मनांत ग्रंथ बलात्काराने घ्यावयाचा आहे असें पाहून हेमाडपंतांनी कवीला दिलेल्या सल्ल्यावरून कवीने ग्रंथ राजास अर्पण करण्याचें कबूल केलें. ' अशा आशयाचा भाग कै. भावे यांनी ' महाराष्ट्र सारस्वतां'त जो वर्णिला आहे तो मात्र वरील उताऱ्यांत दिसत नाही, एवढेंच नव्हे तर श्रीयुत देशपांडे यांनी उल्लेखिलेल्या नागदेवाचार्यचरित्रांत दिलेल्या आख्यायिकेंतहि त्याचा मागमूस नाही. तेव्हा या माहितीचा छडा अजून लागावयाचा आहे. एकदा मानीपणाने रामदेवराजाला उत्तर दिल्यावर कवीने पैशासाठी आपला अमूल्य ग्रंथ राजास अर्पण करण्यास तयार होणें सुसंगत दिसत नाही. उलट पक्षीं पैशासाठी

मनुष्य काय करण्यास तयार होणार नाही, या गोष्टीचा विचार मनांत आणून कवीनें संन्यासधर्माची दीक्षा घेणें मात्र पूर्वीच्या तेजस्वी उत्तराला पूर्णपणें धरूनच आहे, असें वाटतें.

६. कै. भावे यांनी आणखी एक चुकीची माहिती दिलेली आहे. पोथींतील शकासंबंधीची ओवी पुढीलप्रमाणे आहे—

शके द्वादशोत्तर शतें तेरोत्तरें । **नंदननाम संवत्सरें**
ग्रंथु केला एकसरें । माघ वदी चौथी ॥२९३३॥

मूळ पोथींत '**नंदन**' संवत्सराचें नांव असतां 'महाराष्ट्र सारस्वतां'त '**वृषभ**' नांव दिलेलें आहे. मूळ पोथींत **नंदन** हीं अक्षरें खोडून 'वृषभ' असा शोध दिलेला आहे.

शके १२१३ ला नंदन संवत्सर येतो, वृषभ संवत्सर येत नाही.* तेव्हा शोध चुकीचा आहे असें म्हणणें भाग पडतें. शिवाय कै. भावे यांनी, पोथीचें शेवटचें पान या दृष्टीने पाहिलें होतें की नाही, याचा संशय येतो. निदान उतारा ताडून पाहिलेला नाही असें वाटतें.

७. ओव्यांची संख्या आख्यायिकेप्रमाणे १८०० असतां प्रस्तुत पोथींत पुढीलप्रमाणे **ओवीसंख्यादर्शक** ओवी सापडते— 'ऐसी वाक्पुष्पीं माळा : **वोवींया एकोणतीस शतें एकूणचाळीस सरळा :** पुजा केली श्रीचरण कमळा : देवरायासि ॥२९२४॥'

या ओवीप्रमाणे ओवीसंख्या २९३९ पाहिजे, पण पोथींत २९३४ च ओव्या आहेत. पोथी तर पूर्ण आहे; तेव्हा पांच ओव्या कोठे गेल्या असा प्रश्न उत्पन्न होतो. तसेंच १८०० ते २९३४ म्हणजे ११३४ ओव्या मुळापेक्षा जास्त कोठून आल्या हाहि एक प्रश्न उपस्थित होतो. कवि

---

* गत श. १२१४ ला नंदन संवत्सर येतो. कित्येक मराठी पोथ्यांतून ज्या गत शकाला जो संवत्सर यावा त्या अगोदरच्या सालाचा आकडा लिहिलेला आढळतो. अशा वेळीं कालनिर्देशांत आवश्यक तो तपशील असल्याशिवाय कालनिश्चय करतां येत नाही.

महानुभाव झाल्यावर त्याने ग्रंथ वाढविला असें म्हणावें तर स्मृतिस्थळांत तसा उल्लेख नाही. तेव्हा मागाहून कोणी त्या ओव्या घातल्या का कवीने स्वतःच त्या रचल्या, याचा उलगडा होणें जरूर आहे.

८. प्रस्तुत पोथी त्या दृष्टीने वाचूं लागलें म्हणजे एक कारण उघड दिसून येतें. तें कारण म्हणजे कांही ठिकाणीं दिसून येणारी **अवास्तविक पुनरुक्ति**. उदाहरणार्थ रथ, घोडे, हत्ती, पायदळ, वाद्यें, वीरांचीं वर्णनें, कांही प्रसंगांचीं वर्णनें, एकाच साच्याचीं पुनःपुनः येतात. जसें ९३१–९३७; ९७७–१०००; १०२२–१०३५; यांत वर्णन एकसारखेंच आहे; १२७०–७५ व १४१९–२३ यांतील श्रीकृष्णाच्या रथाचें वर्णन अगदी जवळजवळ एकच आहे.

पोथीचे तेवीस प्रसंग अथवा अध्याय संपत आल्यावर कवीने ग्रंथाचा शेवट कसा केला आहे, त्याकडे 'पुनरुक्तीच्या' दृष्टीने आपण पाहूं.

> तेथ भवरपलका माचेयावरी : वोहर बैसविलें तियें अवसरीं
> पुढां नरेंद्रकवि स्तुति करी : हातु जोडौनियां ॥२९१५॥
>
> जये जये परमपुरुषा अव्यक्ता : वर्णीलासि जीवाचा प्राकृता
> रुक्मीणीसहीत श्रीजगन्नाथा : असावास माझा चीतीं ॥२९१६॥
>
> जये जये निराकारा निर्गुणा : म्यां वर्णिलासि कृपावंता सगुणा
> मज वेगळें न करावें या श्रीकृष्णचरणा : पासौनिया ॥२९१७॥
>
> जये जये कैवल्यपती देवराजा :
> **म्यां सेवकें केली वाक्पुष्पीं पूजा**
> आता ऐसा पुरवा मनोरथ माझा : जें वेगळें न करावे ॥२९१८॥
>
> जये जये सकळ गणाधिपती : सेवक मी करीत असे वीनती
> देईं आपुली निजभक्ति : नरिंद्र म्हणे ॥२९१९॥

वास्तविक पाहातां कवीने आपल्याला जें 'पसायदान' पाहिजे होतें तें मागितलें, तसेंच आपल्या नांवाची मुद्रा शेवटीं काव्याला दिली, तेव्हा ग्रंथसमाप्ति येथेच झाली अशी कल्पना केली तरी ती अगदीच असंभवनीय

ठरणार नाही. तथापि पुढील आणखी चार ओव्यांनंतर ग्रंथ संपतो असें म्हटलें तरी एकवेळ चालेल. पुढील ओव्या पाहा.

ऐसेया परीं जाले रुक्मीणी स्वयेंवर :
मग देवें अधीष्ठीलें द्वारकापुर
पाठीं नमिले समस्त कवेश्वर : आदरेसीं ॥२९२०॥

**श्रीभागवत पद्मपुराणीं : या कामधेनू दोन्ही**
दोहीलीया आदुभणी । मग केले रुक्मिणी स्वयेंवर ॥२९२१॥

म्हणौनि उपसाहावें सकळ श्रोता : म्या वर्णीली श्रीकृष्णकथा
जे पूर्वीं व्यासादिकासी कथिता :
आली होती पुराण श्रुती ॥२२२९॥

तोचि मज लाधला होता प्रसादु : म्हणौनि हा केला नेणता प्रबंधु
प्रीती पावो श्रीयशोदेसहीत गोविंदु : स्वामी माझा ॥२९२३॥

आपल्या कथेला आधार कोणता, श्रोत्यांनी क्षमा कशी करावी, वाक्पुष्प कसें वाहिलें, यशोदेसहित गोविंदाने तृप्त व्हावें, अशी विनंती कवीने कशी केली, इत्यादि गोष्टी आल्यावर तरी ग्रंथ संपावयास हवा होता. पण तसें झालेलें दिसत नाही. अजून पुढे ओव्या आहेत. त्यांत नवीन कांही आहे की काय, अथवा पूर्वीच्याच कल्पनांची पुनरुक्ति आहे, पुनरुक्ति असल्यास ती इतकी जरूरीची व सुसंगत आहे काय, याचा वाचकांनी विचार करावा. पुढील ओव्या पाहा.

ऐसी वाग्पुष्पीं माळा :
वोवीया एकोणतीस शतें एकुणचाळीस सरळा
पुजा केली श्रींचरणकमळा : श्री देवरायासि ॥२९२४॥

वरील ओवी २९१८ ओवीशी ताडून पहावी, म्हणजे कल्पनासादृश्य दिसून येईल.

हे **श्री भागवती कथा आईकत श्रोते :**
**पद्मपुराणपर्यंत येकु तेथें**
श्रवण होये जयासि जेथें : ते पावती परमगती ॥२९२५॥

ओवी २९२१ यामध्ये पहिल्या अर्धांतील कल्पना येऊन गेली आहे.

ये कृष्णाचीं चरित्रें : जे आईकती पवित्रें
**पान करिती श्रवणश्रोत्रें** : तेयासि नाही दुःख मात्र
॥२९२६॥

जेयासि परमेश्वर भक्तीची चाड : ते आईकतु हे कथा अमर गोड
**त्यासि कांहींचि नाही आवघड** : जन्म मरणाचें ॥२९२७॥

हे पुण्यपावन मऱ्हाठी : **आईकतु आदरें कर्णपुटी**
तयासि कव्हणी न पडे कामाठी : संसाराची ॥२९२८॥

वरील तिन्ही ओव्यांतील अर्थ जवळ जवळ एकच आहे असें दिसतें.

ऐसा पवित्र श्लोकाचा अर्थ : म्या बोलीला करतळामळवत
वरी श्रीकृष्णचरित्र उच्चारित : वाग्वदनी ॥२९२९॥

ऐसी प्रबंधरचना वानीता : संतोष्र मानीत श्रोते आता
**आर्पित पावो श्रीजगन्नाथा** : वीनती माझी ॥२९३०॥

ओव्या २९२३–२९२४–२९३० यांत कल्पनेच्या दृष्टीने कांहीच फरक वाटत नाही. तथापि अजून पुढे ओव्या आहेतच.

ऐसें रुक्मिणी स्वयेंवर बोलीलें : **प्रतिष्ठानें**[1] प्रांती कथीलें
गंगातटीं समाप्ती पावलें : या ग्रंथातें ॥२९३१॥

मुदगला उत्तरे प्रांती : ग्रामा नाम **वृषभराशी** निरुती
तेथे पाववीली नीहपती : हा ग्रंथ मीया ॥२९३२॥

शके द्वादशोत्तरशतें तेरोत्तरें : नंदन नाम संवत्सरें
ग्रंथ केला एकसरें : माघ वदी चौथी ॥२९३३॥

ऐसा नागार्जुनाचा गोसावी : म्यां वर्णिला नेणता स्वभावीं
**प्रीति पावो म्हणे नरेंद्रकवि : स्वामी माझा** ॥२९३४॥

ओवी २९२३ व २९३४ यांची तुलना करून पाहावी, म्हणजे साम्य किती आहे, तें उघड होईल.

---

१ पैठण.

सारांश वरील प्रकारची अवास्तव पुनरुक्ति चांगला कवि कधीच करणार नाही; म्हणून यांत प्रक्षिप्त भाग असावा, असें वाटूं लागतें. शिवाय 'नागार्जुनाचा गोसावी' असे शब्द कवि महानुभावीय झाल्याशिवाय योजूं शकत नाही. तेव्हा ही ओवी तरी पूर्वीच्या १८०० ओव्यांत नव्हती असें म्हणणें प्राप्त आहे. २९३५ ते २९३९ या ओव्या या पोथींत नाहीत हें पूर्वीच सांगितले आहे.

९. ओव्या वाढण्याचें दुसरें संभवनीय कारण आणखी एक असूं शकतें. महानुभाव पंथांतील तत्त्वज्ञान, व्यक्ति, कल्पनावर्णन करण्याची माननीय ग्रंथांतील पद्धति यांचा उल्लेख काव्यांत दृग्गोचर होऊं लागला की, त्या ओव्या १८०० ओवीसंख्येनंतरच्या असाव्यात; कारण ग्रंथनिष्पत्तीचे वेळीं कवि महानुभावीय नव्हता. या दृष्टीने पुढील ओव्यांचा विचार केल्यास काय ठरतें तें वाचकांनी पहावें.

(अ) लीळाचरित्राच्या पूर्वार्धांत श्रीकृष्णचरित्र वर्णन करितांना, रुक्मिणीस्वयंवराचें वर्णन चालू असतां, श्रीकृष्ण पाहण्यास रुक्मिणी कशी आतुर झाली होती, याचें वर्णन आलेलें आहे; भीमकी माडीवरून खाली 'झेप' टाकण्यास तयार झाली होती; सुदेव ब्राह्मणाने तिला आवरून धरलें म्हणून बरें, असा लीळाचरित्रांत कथाभाग आहे. 'जी : जी : रुक्मिणी आउसें **माडावरूनि झेप घालीती** : तरि : काइ होते' असा महदाईसाने प्रश्न केला. त्यावर चक्रधरांनी उत्तर दिलें, 'तेव्हळासीचि रथावरि पडति : देवाभक्तां भेटी होति : सुदेवें ब्राह्मणे वारिलें भणौनि : तितुका काळ लागला : (लीळा ७, श्रीकृष्ण चक्रवर्ति चरित्र). आता रुक्मिणीस्वयंवरांतील ओवी पहा—

तेव्हळा भीमकाची कुमरी : दोहीं करी जुहारी[1]
**झेंप घालावी रथावरी** : तव विप्रें धरिली हातीं ॥१६२९॥

(आ) दुसरें उदाहरण—कृष्णाने सुदेवाला विचारलें की, तुम्ही द्वारकेला येण्यापूर्वीं रुक्मिणीची अवस्था कशी होती? त्यावर सुदेव

१ नमस्कार करणें.

ब्राह्मणाने उत्तर दिलें : "जी : जी : मी नीगाला : तेव्हळीं मज वीडा दीधला : तीए हातीचीं पानें सूकलीं; दुसरा वीडा दीधला : तेंही सूकली : तेव्हळी हडपीणीसी कोपली : **पानें पळावा गेली** (करपली) : तव तीया (हडपिणीने) भणीतळें : आई : तुमचेनि हातीचेनि जाळें करपली : (लीळा ६ वी, श्रीकृष्ण०)

आता पुढील ओवी पहा—

जेतुले विडे देवों लागे : तेतुलेयां पानां धूं निगे
**हडपिणीतें म्हणे रागे : पानें पळावा गेली** ॥६८९॥

(इ) उदाहरण तिसरें—श्रीकृष्णाचें पुढील ओव्यांत केलेलें वर्णन महानुभाव तत्त्वज्ञानाला धरून आहे. या ओव्यांशीं शिशुपालवधांतील ३६६–३६७ ओव्या तोलून पाहाव्यात.

तेथ अव्यक्त परब्रह्म निर्गुण : परि अवतरौनि साकार सगुण
धरणीं ठेविलें आपण : **उद्धरण हेतु** ॥१०८३॥
तयाचें करावेया वर्णन : **शोच्या जीवासि कैसें ज्ञान**
परि अळुमाळु उघड सांघैन : जें जीवन ध्यानस्थाचें ॥१०८४॥
तें केवळ **चैतन्याची फळी वोतीव** :
मध्यें परमानंद वोतेना जवं
सावेव जालें तवं : मूर्तिधारी ॥१०८५॥ रुक्मिणी स्वयंवर ॥

(ई) उदाहरण ४ थें—नागदेवाचार्य हे महानुभावपंथाचे आचार्य असल्याने, 'नागार्जुनाचा दातारू' असे शब्द महानुभावीय कवि योजतात. हीच कल्पना पुढील ओवींत आहे.

दोहीकडे चवरधर उभे असती :
कनकदंड वरि सहस्र संख्या ढळती
ऐसा **नागार्जुनाचा दातारू** कैवल्यपती :
उपविष्ट सिंहासनी ॥११७९॥ रु. स्वयंवर.

शिशुपाळवधांत पुढील ओवी समानार्थक आहे—

**नागार्जुनाचा दातारू** : राणेरावो श्रीचक्रधरू ॥८॥

(उ) उदाहरण ५ वें—

ना ना **शांभव वेधाचा उजडु** : मिरवतसे ॥

रु. स्वयंवर. १०४३.

नादु ब्रह्माचा घडला : **शांभव वेधू मूर्तीसि आला** ॥

वत्सहरण २२६ ओवी.

(ऊ) उदाहरण ६ वें—प्रस्तुत पोथींत कांही ओव्यांत नागो उपाध्ये, माहींभट इत्यादि 'लीळाचरित्रांतील' प्रसिद्ध व्यक्तींचीं नांवें आलीं आहेत.

रुक्मिणीस्वयंवर झाल्यावर दोन ब्राह्मण बटूंत नारळ-पोफळाबद्दल भांडण झाल्याचें कवीनें विनोदपर वर्णन केलें आहे. त्या वर्णनांत वरील नांवांचे उल्लेख आढळतात.

एकासि थोडीं आलीं पोफळें : म्हणौनि येरयेरासि झोंबलें बळें
जानीवे तोडिलें तिये वेळें : **माइभटाचें** ॥२६३६॥
तवं **नागदेव उपाध्ये** दुरुनि बोलती :
हें काइ वो कैसे अवघे झोंबताति ॥२९३९॥

वास्तविक पाहातां वरील विनोदाचा प्रकार अगदी कमी दर्जाचा असून त्यांत कालविपर्यासाचा दोष पत्करून कोणतीही चांगली गोष्ट साधा- लेली नाही; व या ओव्या २६३५ ते २६४५ गाळून टाकल्या तरी काव्याच्या ओघाला कोणतीही बाधा येण्यासारखी नाही, तेव्हा नरेंद्रासारखा पहिल्या दर्जाचा कवि अशी गोष्ट करणे असंभवनीय आहे; त्यामुळे अशा ओव्या तरी प्रक्षिप्त म्हणण्याचा मोह सुटत नाही.

१०. ओव्यांची संख्या वाढण्याचें तिसरें कारण म्हणजे दुसऱ्या कवी- च्या काव्यांतील ओव्यांप्रमाणे कल्पना या काव्यांत घालण्याचा कोणातरी पोथीच्या लेखकाला मोह पडला हें होय. आश्चर्याची गोष्ट की, शिशुपाळ- वध व रुक्मिणीस्वयंवर यांतील कांही ओव्यांत फारच साम्य दिसतें. तें साम्य एखाद्या दुसऱ्या ओवींत नव्हे तर ओवीमागून ओवी याप्रमाणे ५०–७५ ओव्यांत.

नरेंद्रासारखा उत्कृष्ट कवि असें कधीच करणार नाही. जी गोष्ट तो स्वतः करूं शकतो त्यासाठी त्याला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याची जरूर नाही.

एखाद्या कवीबद्दल त्याला आदर असेल, तर त्याच्याच सारखी पण तुल्यबळ अशी सुंदर कविता तो निर्माण करील. कालिदास थोर की भवभूति थोर, अशा प्रकारें लोकांना भुरळ पाडणारा प्रश्न, असा कवि उत्पन्न करील. पण येथे सगळेंच विचित्र. मासल्यासाठी पुढील उदाहरणें पहाः--

| रुक्मिणी स्वयंवर | शिशुपाळवध |
|---|---|
| (१) गात्री यंत्राची मेळणी :<br>सप्तै स्वरा गुंफितु वेणी ॥४४॥ | यंत्रा गात्राचीया मेळणी<br>पडत सप्त अक्षराची वाणी ॥१७९॥ |
| (२) सारविलेया दाराची पांति वास[1] :<br>उंबरेयावरील सीताची[2]<br>करिती आस ॥१९९॥ | लोकांचा सारवीला उंबरा देखती<br>तरि एका सिताची आशा<br>करिती ॥१५०॥ |
| (३) बाळाणेयासी टेकोनि विद्याधरा :<br>खेळविती मयूरातें ॥१०११॥ | चंद्रकांताचेया बाळाणेया वरी :<br>घोसाळेया कांकणाचा करी<br>नाचवीताति विद्याधरीं मयूरातें<br>॥३४०। |
| (४) डाविये भुजे वसुदेवो<br>बलभद्रराणा :<br>तो परिपूर्ण दिसे आंगवना :<br>जैसा काळाग्नी रुद्रराणा<br>पाताळ फणींद्र ॥१०७०॥<br>मागें नंद सात्विक अक्रूर :<br>जयाचेया कोपाचा बडिवार :<br>क्षेत्रीपणाचा निर्धार :<br>असें तयाचा ठाईं ॥१०७३॥ | डाविये भुजे राम वसुदेवो :<br>मागिलीकडे सात्यकी अक्रूरदेवो :<br>भक्त शिरोमणी उद्धवदेवो<br>पुढिलीकडे ॥३६१॥ |

---

१ वाट पाहणें. २ शितांचीं (अन्नाचीं).

| रुक्मिणीस्वयंवर | शिशुपाळवध |
|---|---|
| (५) तेथ वार्तिककार धावणे<br>पावना ऐसे :<br>आणि सेवक सांचोळे सांघो कैसे<br>सीहाणे बोलके बृहस्पति ऐसे<br>मात सांघते ॥१०५०॥ | ईशानु अवसरी : कुबेरु भांडारी<br>इंद्र हडपु धरी : आंगाजवळी॥४९॥<br>धावना पवनु : कन्हेरी वरुणु<br>शृंघारू दे मदनु : कृष्णमेचूचा<br>॥५०॥ |
| सुधाकरासारिखा वेचकरू<br>भांडारी<br>फुलब्रडवा ऋतुपती अवधारी<br>वरुणा सारखा कन्हेरी<br>जीवनें सहीत ॥१०५१॥ | फुलबडवा रुतुपती<br>बोलिका बृहस्पति<br>आळती गानी सरस्वती<br>गंधर्वरावो ॥५१॥ |
| (६) तूं प्रतापीया रायाचा आमोला<br>दाटातीया रायाचा सीवी<br>धुळा ॥१५९८॥ | दाटदळेया देवाचा आमोला<br>दापीतेया देवाचा जगद्‌ळा<br>॥३४५॥ |
| सळवंकेयासि सळभजन<br>दाटुगे रायासि विध्वंसन<br>प्रजीते रायासि गर्वदहन<br>तुं गोपनाथा ॥१६००॥ | देटिया देवाचा बापू<br>सळवंगेया देवाचा जगथापू<br>उधटेया देवा जगझंपू<br>तूं यादवराया ॥१५४॥ |
| (७) राजगिरी राजमांडवीया<br>उभीती देव्हार चौकीया<br>तेथ होडा होताति गाडे भोइया<br>परस्परें ॥१५४५॥ | राजगिरि मांडवीया<br>सुरंगा कापड चौकीया<br>उभितां गडे भोईया<br>होडा होताति ॥५७२॥ |

रुक्मिणीस्वयंवर ओव्या १११०–११८५, यांत श्रीकृष्णाचें वर्णन करतांना कृष्णाचे अवयव, भूषणें, वस्त्रें, इत्यादिकांचें वर्णन व शिशुपाळवधांतील ३८१ ते ४१० पर्यंतचें श्रीकृष्णवर्णन वाचलें म्हणजे ही साम्यदृष्टि कोणत्या थराला गेली तें पाहून मनाला आश्चर्य वाटतें. एक वर्णन दडवावें व दुसरें काढावें, अशी अवस्था या ठिकाणीं आहे.

| रुक्मिणीस्वयंवर | शिशुपाळवध |
|---|---|
| महापापाचे डोंगर<br>भेदावया अति खडतर<br>श्रीचरणातळीं उमटलें वज्र<br>तेया हेतु ॥१०९७॥ | महापापाचे डोंगर<br>भेदावया अति खडतर<br>तैसें दिसे वज्रसुंदर<br>सुलक्षणीक ॥३८२॥ |

या नमुन्याचीं एकामागून एकसारखीं उदाहरणें या वर्णनांत ५०–७५ सापडतात. रुक्मिणीस्वयंवर ५८९–६१५ या ओव्या व शिशुपाळवधांतील ७०० ते ८५२ ओव्या यांची अशीच अवस्था आहे.

असलीं साम्यस्थळें सोडून भास्कर कवि व नरेंद्र कवि यांच्या काव्यांत प्रत्येकामध्ये स्वतंत्रपणें उत्तमस्थळें नसतीं, तर कोणीतरी कोणाचें चोरून घेतलें असें म्हणतां आलें असतें. पण तें सत्यास सोडून आहे. रुक्मिणीस्वयंवरांत इतर ठिकाणीं आढळून न येणाऱ्या गोष्टीही उत्तम प्रकारें रंगविल्या गेलेल्या आहेत. तशीच गोष्ट शिशुपाळवधाची आहे. तेव्हा हें काम नरेंद्राने केलेलें नसून दुसऱ्या कोणाचें तरी असावें असें वाटतें.

११. आतापर्यंत १८०० ओव्यांच्या २९३९ ओव्या कशा झाल्या याची चिकित्सा आपण केली. अशा प्रकारच्या ओव्या सोडून दिल्या तरी 'रुक्मिणीस्वयंवरां'त अनेक रमणीय स्थळें असल्यामुळे तो ग्रंथ उत्कृष्ट आहे असें म्हणणें भाग पडतें. तेव्हा प्रत्यक्ष ग्रंथाकडे आपण जरा वळूं.

१२. कै. भावे व श्रीयुत देशपांडे यांनी नमुन्यासाठी या काव्यांतील एकंदर ४–५ उतारे दिलेले आहेत. तेव्हा आणखी कांही मासला दाखवून वाचकांची भूक अल्पशः तरी तृप्त करण्याची—किंवा अगदी प्रज्वलित करण्याची—आशा करून पुढील वर्णनाकडे आपण लक्ष देऊं.

१३. प्रस्तुत पोथी सांकेतिक लिपींत असून, अक्षर पहिल्यापासून शेवटपर्यंत एकटाकी व घोसदार आहे. अक्षरांची लपेट समजेपर्यंत कांही अक्षरें वाचणें जरा कठीण जातें. तथापि तो अक्षराच्या वळणाचा दोष नाही. प्रत्येक पानाची लांबी-रुंदी ६" × ५" आहे. चौफेर अर्धा इंच जागा सोडलेली असून मध्यभागीं मजकूर लिहिला आहे. अशा प्रकारचीं पाठपोठ

पानें १९२ असून, प्रत्येक पानांत १८ ओळी आहेत; त्यांत प्रत्येकीं सात आठ शब्द आहेत. पोथीची बांधणी महानुभावी पोथीप्रमाणे असून, लिहिणाराने पोथी लिहिल्याचा शक शेवटीं दिलेला आहे. त्यावरून पोथी जवळ जवळ १८० वर्षांची जुनी आहे, असें ठरतें. असें असूनही ती उत्तम रीतीने ठेवल्याने अजून चांगल्या स्थितींत आहे. ग्रंथाच्या ओव्या पूर्णपणे असणारी एवढीच पोथी आहे असें म्हणतात. बाकीच्या पोथ्यांत हा ग्रंथ पूर्णपणे सापडत नाही. तशा प्रकारची पोथी अजून पाहाण्यास न मिळाल्याने त्यासंबंधी जास्त तर्क करीत बसणें चुकीचें ठरेल. पोथीचा शक पुढीलप्रमाणे आहे—

‘ विद्यानगरीहुनि ग्रंथु आणिला : तळेग्रामकर केशवदाये प्रगट केला : भणौनि : या देसासि आला: हा नरींद शके १६७७ युवानाम संवत्सरें : पुसमासे : कृष्णपक्षे : वद्य तृतीया : सोमदने : प्रथम प्रहरे : श्री रुक्मिणी-स्वयेंवर नरींद : संपूर्ण समाप्ती : ।’

१४. पद्मपुराण व भागवत यांच्या आधाराने रुक्मिणीस्वयंवराची कथा रंगविल्यामुळे, कथाभागाच्या दृष्टीने हें रुक्मिणीस्वयंवर इतर कवींच्या रुक्मिणीस्वयंवराप्रमाणेच आहे. मुख्य मुख्य वर्णनाच्या गोष्टी त्याच आहेत, पण ‘ भिन्ना वाणी मुखे मुखे ’ या म्हणीप्रमाणे नरेंद्र कवीने आपलें वैशिष्ट्य कायम राखलें आहे. तेव्हा विस्तृत विवेचन न करितां कांही नमुने दाखविण्याचा विचार केलेला आहे.

पहिल्या अध्यायांत अथवा प्रसंगांत गणेश, शारदा व गुरु यांचें स्तवन प्रथम देऊन मग श्रीकृष्णचरित्राची गोडी कशी ‘सदासुरंगमधुर’ आहे याचें वर्णन कवीने केलेलें आहे. (हा आरंभींचा उतारा कै. भावे यांनी दिलेला आहे.) त्यानंतर आपणाला काव्यरचनेची स्फूर्ति का झाली याचें वर्णन कवि करीत आहे.

‘ श्रीकृष्णाचा गुणी जीविन्नला :
माझा जीव श्रीकृष्णचरणीं विनटला
तो आंतुल आनंद वोसंडला : कवितेचेनि मीषें ।।१५।।

श्रोत्यांना आपल्या अनुभवाच्या आनंदाचे वाटेकरी करण्यासाठी कवि त्यांना पुढीलप्रमाणे विनंती करीत आहे.

मेघाचीये जवळीके : जरि ब्रापा ये नऱ्हती बोलीके
तरि भूगोळकाचीए पव्हें उदकें : कवण भरीते ॥३९॥
तैसें कळाविदाचेनि रीधराये ज : सुरंगशब्द कोकिळ कुंजे
तेया सुखाचीए वीसवतीए सेजे : रस राजसें ॥४०॥
जाणिवेचेनि चंद्रमंडळें : रससमुद्रा भरिते चढे आगळे
येऱ्हवी उपखे वडवानळें : नेणिवेचेनि ॥४१॥
सुमनु देतु आता अवधान : धमकस साहित्याचेन
जगा भोजें नाचवीन : आनंदाचे ॥४२॥

वर वर्णन केल्याप्रमाणे श्रोत्यांचें लक्ष वेधून त्यांचें अवधान परिपूर्ण आकर्षित करण्यासाठी, विद्वानांप्रमाणे अविद्वानांचेंहि लक्ष आपल्याकडे खेचण्यासाठी कवि आनंदाने डुलत राहून म्हणत आहे.

तैसे आईकिता श्रीकृष्णचरित्र : होये सर्वसुखाचें छत्र
**वरि जोडे ब्रह्मसुखाचें पवित्र : तें मऱ्हाटी बोलैन** ॥४४॥
आधीचि जगासि चंदन आवडे : वरि देवाचें अनुलेपन जोडे ।
तरि कव्हणा वालभ न पडे : तेया सुखाचें ॥४५॥
जीये भाषीयेची रसवृत्ति : **सा भाषांचे कुपे की जेति निगुती**
**ते मऱ्हाठी कवण जाणे निरुती : जें रसाचें जीवन** ॥४६॥
**ते मराठे बोल रसिक : दावीन वरि देशीयेचें वीक**
म्हणौनि सव्याख्यान श्लोक : मीषें वोवीयेचेनि ॥४७॥

मराठी भाषेची प्रस्तुत महती ऐकून कोणत्या मराठ्याचें हृदय आनंदाने उचंबळून येणार नाही ? महानुभावांचा 'ज्ञानदेव' जणु काय बोलत आहे असा भास होऊं लागतो.

दुसऱ्या प्रसंगांत विदर्भ देश, भीमक व शुद्धमती, त्यांचे पांच कुमार व रुक्मिणी इत्यादिकांचें वर्णन आलें आहे.

भीमकाचें वर्णन—

धरिणीचें धैर्य वानिजे : समुद्रु आगाध म्हणिजे
जवं तो रावो न देखिजे : भीमसेनु ॥५५॥

रुक्मिणीच्या स्वरूपाचें वर्णन--

तें हृदये क्षीरसागराचें : ध्यान करीत होतें देवाचें
तें मूर्तीसि आले साचें : माणुसपणाचीए ॥६९॥

मोतीयाचा भांग मनकरू : जैसा शृंघार गंगेचा अवतारु
आला जीवऊ अनंद सागरू : वादे चंद्रमौळीसिं ॥९७॥

तिसऱ्या प्रसंगांत भीमक राजा दरबारांत बसल्याचें वर्णिलें असून तेथे रुक्मिणी विवाहाला योग्य झालेली पाहून, भीमक राजाचे तिच्या लग्नासंबंधी विचार कवीने दर्शविलेले आहेत. यानंतर काशीश्वराचा भाट कल्याणकीर्ति आल्याबद्दलची बातमी दूतांनी राजाला सांगितली. राजाने त्या भाटाचें मोठ्या सन्मानाने स्वागत केलें. भाटाच्या बरोबरच शापभ्रष्ट असा वेदघोष नांवाचा किन्नर दरबारांत आला. तो किन्नर त्या भाटास मधुवनांत भेटल्याचें व श्रीकृष्णाकडून त्याने मानमान्यता मिळविल्याचें भाटाने राजाला सांगितलें. आपल्या मुलीला योग्य वर कोण आहे याची माहिती मिळविण्याच्या उद्देशाने भूमंडळावरील राजपुत्रांचें व राजांचें वर्णन करण्यास, भीमक राजाने किन्नरास विनंती केली. त्याने प्रथम भीमकीचें वर्णन करून मग राजांच्या वर्णनास सुरुवात केली.

भाटाने केलेलें भीमकीचें वर्णन—

बंदीजनें देखिली भीमकी : मुग्धा वयेसा मोहरैली नेटकी
पुण चांदणे न माये तिहीं लोकीं : लावण्याचें ॥१३९॥

नंतर वेदघोष किन्नराने आपल्या आलापाने सभेस चकित करून, एक एक राग आळवीत राजाच्या वर्णनास आरंभ केला. कवीने किन्नराच्या आलापांचें वर्णन फारच बहारीने केलें आहे.

पातां सपोत आकाशीं : कुंकुमाची वावडी वेल्हावे जैसी
कीन्नरू आळती करिताये तैसी : मागील धुरावरी ॥१८७॥

वरील ओवींतील उपमा फारच उत्कृष्ट व मोहक आहे.

अशाप्रकारें रागावर राग आलापीत किन्नराने निरनिराळ्या राजांचें व देशांचें वर्णन करून शेवटीं श्रीकृष्णाचें मागे सांगितलेल्या ३१२ ओवींत म्हटल्याप्रमाणे वर्णन केलें आहे. ('देवाचेया दादुलेपणाचा उवारा' इत्यादि).

वाराणसीचा काशीश्वर पुढीलप्रमाणे वर्णिला आहे—

जेणें काशीश्वरें आपुलेनि कोपें : मळयांनिळु विभांडुनि आक्षेपें
वावनेयाचा प्रसाद केला सापें : विश्वेश्वराचा ॥२४९॥

**कोंकण** पुढीलप्रमाणे रंगविलें आहे—

गंध सुगंध क्षेत्रीं कोंकणें : जेंहीं वसंत जिंतिला सुमनपणें
तेयाचे आजि पां घडैल घालणें : मेरूवरी ॥२७६॥

रुक्मिणीला कोणाचेंहि वर्णन द्वारकेच्या श्रीकृष्णाच्या वर्णनाइतकें आवडलें नाही, हें राजाच्या ध्यानांत आलें. त्यानंतर भाट व किन्नर यांना राजाने सन्मानपूर्वक देणगी देऊन त्यांची पाठवणी केली.

प्रसंग पांचमध्ये रुक्मिणीची विरहावस्था, सख्यांचा थट्टाविनोद व विरहोपचार यांचें सुंदर वर्णन आलेलें आहे. धारागृहाचें वर्णन करणारी पुढील सरस ओवी पहा—

हिमाचें देखौनि दामोदरें[1] : सीयें[2] सूर्यों कांपे नीरंतर
हो[3] काउँ वीजूसि[4] वाजत दांतौरें[5] : मीषें गजराचेनि ॥४३८॥

विरहाग्नीच्या तापाने रुक्मिणीला दिवसभर त्रास झाला. इतक्यांत **संध्याकाळ** झाली. त्यावेळच्या अस्ताचलाचें वर्णन कवि पुढीलप्रमाणे रंगवीत आहे.

---

१ धारागृह. २ थंडी. ३ जणु काय. ४ वीज. ५ दांतखिळी वाजणें.

तवं उचित चंद्रिका म्हणे : सूर्या अस्ताचलीं होत उपेणें
जैसें तेजाचें साटवंत वोपणें : मढीं पवळेयांचा ॥४६७॥

कीं कुंकमवनीं सराग : झेंपावती शृंगार विहंग
कीं त्रीनेत्रे तांतला अनंग : रीगत पश्चिम समुद्रीं ॥४६८॥

कीं ठेविला प्रकाशाचा मुडा : कीं पाताळ पेणें होत गरुडा
श्रीकृष्ण आला पश्चिमीली कडा : कमळकांतीचेनि ॥४६९॥

कीं संध्या सरोवरीं सारसीचा गीवसु :
करूं आला सोनेयाचा सारसू
तैसा सूर्य होताये प्रवेशू : अस्ताचलीं ॥४७०॥

संध्याकाळानंतर थोडया वेळाने **अंधाराचें साम्राज्य** सुरू झालें.

तेथ फुटले इंद्रनीळाचे बोरे : तैसा माथा उधवीला आंधारें
कीं डोंगर उन्मळले गरुडोद्गारें : पाचीचें हे ॥४७१॥

कीं दाटती कस्तुरीचे मेघ माजीरे : की पीली पसरली गगन सोगौरें
कीं ब्रह्मगोळकु भरला पुरें : कृष्ण गंगेचेनि ॥४७२॥

कीं भूगोळकांचां देउळीं : रति अनंगें पुजिलीं गगन काळीं
ते पुजा दीसतसे नीळीं : नीलोत्पलांचीं ॥४७३॥

अंधार पडल्यामुळे जिकडे तिकडे **दिवे दिवट्या लावल्या गेल्या**--

नगरीं उजळैले **कळैवे** : ठाइं ठाइं अखंड **लाखैवे**
जैसीं नीधानाचीं चरती सदैवें : यादवप्रतापाचीं ॥४८२॥

थोडक्या वेळाने आकाशांत **नक्षत्रें चमकूं लागलीं**--

तवं गगनीं नक्षत्रें उमटत : जैसें आकाशीं घातैली फुलत
ना तरी मेघवाणी सांतीत : मोतीयांची ॥४८६॥

कीं पाखधुणी करिती चकोरें : तैसें मंदाकिनीचे थेंब गोरे
कीं दीसत बाणलिंगें सतारें : गगन नर्मदेचीं ॥४८७॥

तव अस्तमानीं वियोग चक्रवाका : ते गर्भ गळाले आईका
कीं तीये साकुली घातली देखा : वोलावा गगनाचा ॥४८८॥

हीमाचें घडतां दामोदर : अवकण उसळले थोर
ते रुतले कर्पूरगौर : आकाशा आंतु ॥४८९॥

इतक्यांत हळूहळू चंद्रप्रकाश होऊं लागला--

कीं आकाशाचीए वोपे आंतु : कैलास प्रतिबिंबतु
कीं मन्मथाचा गदुर[1] स्वेतू : कापडीला क्षीरोदकें ॥४९६॥

कीं भूगोलकाचां प्रासादीं जैसा : गाळीवा अमृताचा आरीसा
तेथ श्रीकृष्णाचा बींबला ठसा : कळंक नव्हे तो ॥५१३॥

कीं गोपिनाथ जोडावेया नोवरा : स्वर्गीचीया मीनलीया आपसरा
गगनगंगें मोतियाचा वाळुसरा : पूजीला नीलोत्पलीं ॥५०४॥

अशा प्रकारें वरील वर्णनांतून कवीने सुंदर कल्पनांचा व गोड उत्प्रेक्षांचा पाऊस पाडला आहे.

पुढे सुदेव ब्राह्मणाला बोलावणें, श्रीकृष्णाला पाठविण्यांत आलेली प्रेमपत्रिका व विनंति, सुदेवाचें द्वारकेला गमन, श्रीकृष्णाचें सुदेवासह कुंडिनपुरास आगमन, इकडे शिशुपाळादिकांचें कुंडिनपुरांत येणें, व सीमांतपूजनादि विधि, कृष्ण एकटेच गेले असें पाहून बळरामाचें सैन्यासह आगमन, अंबिकेच्या दर्शनास रुक्मिणीचें आपल्या सख्यांबरोबर गमन, रुक्मिणीहरण, युद्धप्रसंग, रुक्मीचा सोहळा, रुक्मिणीचें चार दिवस लग्न, वधूवर द्वारकेला येणें, इत्यादि अनेक प्रसंग कवीने तेवीस प्रकरणांत वर्णिलेले आहेत. त्यांचें विस्तारानें वर्णन करणें शक्यहि नाही व इष्टहि नाही.

पृथका-कारें सांघतां मज : परि कथे विलोप पडैल सहज
म्हणौनि मुद्रित परिसतु काज : पुढां थोर असे ॥

---

१ पांढरा डेरा, राहुटी.

या नरेंद्र कवीच्या उक्तीप्रमाणे विस्तृत वर्णन करण्यास लागलें तर सभेच्या कार्याला 'विलोप पडेल' म्हणून कथेच्या वर्णनाचा प्रकार येथेच थांबवून इतर कांही गोष्टींकडे थोडक्यांत नजर देऊन हें प्रकरण आटपतें घेऊं.

१५. कांही वेळेला वर्णनाच्या भरांत मुक्तेश्वरासारखा कवि वर्तमान काळाचा रंग भूतकालीन घटनेंत मिसळून काव्याला एक प्रकारची गोडी आणतात. प्रस्तुत कवि रामदेवराव जाधवाच्या वेळचा असल्याने त्या काळाचें प्रतिबिंब त्याच्या काव्यांत दिसून येणें अशक्य नाही. गायन, शिल्पकला, सैन्याची छावणी, निरनिराळे दरबारांतील प्रसंग इत्यादि गोष्टी कवीच्या नजरेस पडल्याने तो आपल्या काव्यांत योजल्याशिवाय राहणार नाही. पण अजून इतकें सूक्ष्म वाचन झालेलें नाही. म्हणून कांही प्रमुख गोष्टींच्या उल्लेखांचा येथे विचार करावयाचा आहे.

१६. (अ) किन्नराने निरनिराळया देशांचें व राजांचें वर्णन केलें, व तें निरनिराळे राग आळवून केलें. त्यांत शुद्ध, श्रीराग, धानाश्री, मल्हार, गौडी, गुजरी, दशांगे इत्यादि रागांचीं नांवें आलीं आहेत.

दावीत **शुधेयाचे आंग** : ताळ-वप्रबंध-वोडव-खडांग
ग्राम-जाति-मूर्छना-राग-रागांग : गात निर्दोषपणें ॥१८२॥

गायनांतील 'साळांक मार्ग' म्हणून एक पुढीलप्रमाणे उल्लेख आहे—

सात ताल चारी साळांकें : पन्नास रूपकें आठ आंगें
तीन वर्ण दोन्ही ध्रुपदांगें : च्यारि अभंग ॥१८५॥

ऐसा **साळांग मार्ग** दाविला : तीही मार्गी गीतसड भणीतला
छंदा गाउनि ताळ ठेविला : ध्रुपदावरी ॥१८६॥

**(आ) देशांचीं व राजांचीं नांवें**—

स्वयंवरासाठी आलेले त्यावेळचे महाभारतकालीन राजे यांचीं नांवें काव्यांत आहेतच, पण त्याजबरोबर इतरही कांही नांवें दिसतात.

**महाराष्ट्राचा उल्लेख** पुढीलप्रमाणें आहे.

अरीराये गजदंताचां कोदंडी । वाणी मेघाची मोतिये पाडी
मैत्रे मुरारी लागीं पाउड धाडी । तो **रत्नायुध** महाराष्ट्रीचा ॥

वरील उल्लेखावरून असा प्रश्न मनांत येतो की, रत्नायुध या नांवाचा कोणी राजा महाराष्ट्रीय यादवांचा मित्र होता काय ? व तो यादवांना कांही खंडणी देत होता काय ?

**म्लेंच्छांचा उल्लेख**—

**म्लेंछमंडळयवन** : जो दक्षिणराये काळदमन
**तुडकानाचा वज्रादिगहन** : असिवार सिंधू ॥२२६॥

तुर्कांचें घोडदळ त्यावेळीं प्रसिद्ध होतें काय, असें मनांत येतें.

त्यांच्या प्रतापाचें वर्णन—

जयाचेनि प्रतापे खरागले : देवांचे हातियेर आटले
तया लोहाचें तळें बांधलें : **खुरासनासि** ॥२२७॥

वंग देशाचा समुद्रसेन, कोसाचा गरुडध्वज, मणिपूरचा रत्नेश्वर, अयोध्येचा विरहज्वाळ, अभीरकार्तीयेचा रोहितक, डाकद्राक्षेरामीं शंकरशेखर, कावेर कैरल–कर्नाट येथील विजय–सुभद्र–सुभट, श्रीशैलींचा चंडविक्रम, द्रवीड देशींचा भाचवंत, मल्लवाळचा विक्रमकेतु, उज्जैनीचा वृंदानुवृंद, माहिष्मतीचा महानीळ, नेपाळींचा कार्तिदेव, काश्मीराचा नादमूर्ति इत्यादि नांवें भारतकालीनच आहेत की नाहीत यांचा संशय येतो.

(इ) **शस्त्रास्त्रें**—युद्धवर्णनांत वायव्यास्त्र, मेघास्त्र, इत्यादिक अस्त्रांचा मुळीच उल्लेख नाही. वीरांचीं शस्त्रें यादवकालीन वाटतात.

(ई) पुढील रणसमुद्राचें रूपक मोठें बहारीचें आहे—

ऐसा रणसमुद्र डहवळला : तारुवाचा जवटू पूरला
तैसा रहंवराचा भाऊ चालीला : क्षत्र उदीम मीषें ॥२२६४॥

तेथ रथ तेचि **तारुवें** : सारथि तेचि **नीजावे**
माहारथी तेचि **वनिजारे** सुहावे :
करिती उदीम सौराष्टतीचा (?) ॥२२६५॥

वारु तेचि **नावडे** : ध्वजास्तंभ तेचि **शीडें**
ऐसे रणसमुद्रींचें **प्रव्हाण** अतिपाडें । चालीले दीसे ॥२२६६॥

तेथ **पानवुडे** चक्ररक्षक तबकें : बुडी देउनी पांती मोतिये माणिकें
**केणें** भरावेया कवतिकें : तिये समुद्रींचें ॥२२६७॥

नर कपाळाची कवटी । **तिया शक्तिसंपुटी**
माणिकें मोतीयें दीसतीं गोमटीं ।
पडीलेया वीरांचीये मुगुटींचीं ॥२२६८॥

रुधिराचे **कल्लोळ** लोटले : तेणें माणीक मोती वाहावले आले
ते नरकपाळांचां संपुटीं थारले : ते काढिती बुडी देउनी ॥२२६९॥

कीं तें रणसागरीचें **भरतें** आलें : तैसें **रुधिराचें पूर** लोटलें
तेणें **बाण मासे** उफराटे चालिले :
सीसाळाचें आवीस घेयावया ॥२२७०॥

तेणें भरीते सागराचा तुंब फुटला : कीं नदी वाहाळा पूर आला
तेथ दिसे का दऊ कोंडला : मेदमांसाचा ॥२२७१॥

केश डोइचे तोचि **शेवाळ** : हाडाचीए चुरीची ल्हान **केवाळ**
कां सवें तीरताती हळुहळु : **वोडणाची** ॥२२७२॥

**अर्धचंद्र कऱ्हाडे बाण** : तेचि **मगर सुसर** जाण
ते आवीस घेयावेया तीरति आपण : कबंधाचें ॥२२७३॥

ऐसा रणसागरू हेलावला : तेणे माहानदी पूर लोटला
तो येतु मर्यादा होकरीला : यादव सेनेचीया ॥२२७४॥

**(उ) छावणीचा तळ पुढीलप्रमाणे वर्णिलेला आहे—**

गाडे भोई लवकरी : **दसें**[1] उभारिताति परोपरीं
**गरुडटकेयाचीयां**[2] हारी : ताणीलीया ॥२५७२॥

भंवती **बलाळतार्टीयेंची**[3] कुसरी : दीसे ऊचा शीरीं :
लोहाचेया खुटेयाची हारी परोपरी : बांधत **तनीयां**[4] ॥२५७३॥

---

१ डेरे. २ निशाण. ३ कोट, भिंत. ४ ताणाचे बंद.

कापडचौकिया **गुढंर**[1] घातले : कोरीव **वोवरे**[2] उभीले
जगझंप मंडप ताणिले : राजेमेचूचे ॥२५७४॥

पुढां उभील **राजमांडवी**[3] थोरू : **वीणे**[4] दीसती सविकारू
**सावरी**[5] घातली अपार : कापुरकेळीची ॥२५७५॥

तेथची सींपणारे घातलें लवलाहे : परिमळ वाहाळ दीसत आहे
नाना ते वाखाळी पाहे : वसेतरावो ॥२५७६॥

ऐसी उभीली उभवणी : वरी कळसाची दाटी मिरवे गगनीं
नाना ते प्रकाशातें जिंकौनि : दीसती आदित्य जैसे ॥२५७७॥

राउळ आले म्हणौनि झडकरी :
घातलीया हातवटीया चोहेट चौबारी
वाणीये वेवसायी परोपरी : करिती विकरा ॥२५७९॥

**(ऊ) शिल्पकलेचा नमुना--दामोदराचें (धारागृहाचें) वर्णन--**

तेथ वोलेया चंदनाचे **खांब** : **चौकटी फलेथरू नीखंब**
बहु **बाळाना** चढली भांब : **कळाशास्त्राची** ॥४१८॥

कैसी **गवाक्षें** खणोखणीं : तैसीचीं विचित्र **बाळाणी** ।
तेथ विसावे राणी : श्रीमंताची ॥४१९॥

एकीकी भुमिकेची बरव : आगराचे **उंबरे** घडीव
दारवंठा द्वारशृंखळा कांडारीव : कंदर्प केळीचें ॥४२०॥

अवघा खणीं आणिक सरी : वोले शिरीखंडाचीं कवाडें द्वारीं
**बाउलीं** ठेविलीं सविकारी : **नाटारंभीं** ॥४२१॥

कमळकळिकाची **गुंठीवा** : चहुकडे **मोहटीया** बहुवा
**मदलसा पुतळीया** स्वभावा : कनकजांबूचिया ॥४२२॥

---

१ डेरा. २ खोल्या, ओवरी. ३ मोठा मंडप. ४ कचेरीची जागा. ५ ताटी.

आंत सोने केतकीचे **आल्हाटे** : उदकाचे **हाती** ठेविले तेथे
पाणीयाचीया धारा सुटती परहाथें : तोंडीं एकमेकांचा ॥४३०॥

### (ऋ) पुरुष व स्त्रिया यांचे अलंकार व वस्त्रें—

कंठीं डाउ, कर्णीं रत्नाचे झळंब, करीं कडगीया, साकळीया, दु-सरे (दोन सर ज्यांस आहेत ते), आंगुलीयां हिरे, कर्णयुगीं उकलीवे ताडवने (स्त्रियांच्या कानांत), सोनेसळा, क्षीरोदक पाटोळा, फुटा, कांचोळी, इत्यादि.

इतर काव्यांमधून वस्त्रांचा, भूषणांचा, खाण्यापिण्याच्या पदार्थांचा जो लांबलचक शब्दकोश योजिलेला असतो, तसा या काव्यांत सापडत नाही. मात्र वृक्षांचीं नांवें अथवा फुलझाडांचीं नांवें फार आहेत.

१६. कसेंहि असो, हें काव्य श्रेष्ठ प्रतीचें असून प्राचीन मराठी काव्यांत याला उच्चपद देणें अवश्य आहे. जेव्हा हें काव्य मुद्रित होऊन सर्वांना घाचावयास मिळेल तेव्हाच त्याचा खरा आनंद लुटावयास सापडेल. आजचें काम म्हणजे वाचकांची उत्सुकता वाढविण एवढेंच आहे.

# ७. सैह्याद्रवर्णन किंवा सैह्याद्री-माहात्म्य*

१. **महानुभावीय प्रसिद्ध सप्तकाव्यें**—हा पंथ सुरू झाल्यापासून आरंभीच्या कालांत पहिल्या शतकामध्ये (शक ११९५ ते १२९५) हीं सप्तकाव्यें प्रसिद्ध झालीं अशी परंपरेची माहिती आहे. त्यांपैकी **वत्सहरण** व **शिशुपालवध** कै. भावे यांनी उजेडांत आणलीं. श्री. यशवंतराव देशपांडे यांनी **ऋद्धपूरवर्णन** प्रसिद्ध केलें. **ज्ञानप्रबोध** व **उद्धवगीता** (म्हणजे एकादशस्कंध) हीं दोन काव्यें, नेहमीच्या बाळबोधलिपींत, पण केवळ महानुभाव अनुयायी लोकांसाठी, **माहूरचे** महंत दत्त लक्षराज यांनी अगोदरच छापविलीं होतीं; पण महानुभावेतरांना त्या दोन काव्यांची, प्रसिद्ध झाल्याबद्दलची, माहिती नव्हती. यांपैकी **उद्धवगीता** हें काव्य प्रो. कोलते यांनी पुन्हा प्रसिद्ध करून तें लोकांच्या पुढे आणलें. अशा प्रकारें लोकांना अभ्यासासाठी वरील पांच काव्यें पूर्णपणे उपलब्ध झालीं. यानंतर **नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराचा** परिचय करून देणारा एक निबंध प्रस्तुत लेखकाने भा. इ. सं. मंडळाच्या एका सभेंत वाचला. तो त्या मंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झाला आहेच. त्यानंतर गेल्याच महिन्यांत प्रो. कोलते यांनी **रुक्मिणीस्वयंवर** वाचकांना सादर केलें आहे. आता राहिलें **सह्याद्रीवर्णन** या काव्याचा थोडासा परिचय, नागपूर येथील संशोधन मंडळापुढे २४-११-१९४१ रोजीं प्रस्तुत लेखकाने वाचला. तोच निबंध जास्त माहिती मिळवून आज भा. इ. सं. मंडळाच्या सभासदांना सादर करीत आहें.

२ **'सह्याद्रिवर्णना'बद्दल पूर्वी येऊन गेलेली माहिती**—श्री. भावे यांनी महाराष्ट्र सारस्वताच्या पहिल्या भागाच्या तिसऱ्या

* भारत इतिहास संशोधन मंडळाचें त्रैमासिक, वर्ष २३, अंक ४.

आवृत्तींत (इ. स. १९२४), पान १८१-१८२ वर, यासंबंधी माहिती थोडक्यांत चटकदारपणें दिली आहे. ग्रंथांतील ओव्यांची संख्या, रचनाकाल, हिरांबा हिचा या ग्रंथाशीं संबंध कोणता, इत्यादि माहिती देऊन नमुना म्हणून त्या काव्यांतील ५-६ ओव्या दिल्या आहेत. प्रस्तुत काव्याविषयी अशीच माहिती आप्पासाहेब देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या ग्रंथांत पानें ३७ व ५० यांवर आली आहे. **रवळो** व्यास (राघो पाध्ये) यांनी हें काव्य केलें असून, रचनाकाळ शक १२५४ दिला आहे. चक्रधर-जानोपाध्ये-कमळांबा-हिरांबा-रवळो व्यास (राघो पाध्ये), अशी गुरुपरंपरा देऊन कै. भावे यांनीच दिलेल्या ओव्या (३९, ४३, ४५, ४७, ४८) या नमुना म्हणून त्यांनी दिल्या आहेत. श्रीयुत पांगारकर आपल्या मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत (सन १९३२) इतर सहा ग्रंथांविषयी जरा विस्तृत माहिती देतात, पण या काव्याबद्दल ते कांहीच बोलत नाहीत.

सारांश रवळो व्यास व त्यांची गुरुपरंपरा, काव्याचा विषय दत्तात्रयवर्णन, परंपरेचा लेखनकाल शक १२५४, मासल्यासाठी दिलेल्या पांच ओव्या, इतकीच माहिती वाचकांना उपलब्ध आहे. भावे यांनी या काव्याची ओवीसंख्या ७२९ दिली आहे, ती बरोबर नाही. मला ज्या चार पोथ्या पाहाण्यास मिळाल्या त्यांपैकी कोणत्याहि पोथींत ७२९ ओव्या या काव्याच्या नाहीत. तसेंच ग्रंथ कोणत्या वेळीं रचिला गेला याविषयी माहिती देणारी शेवटची ओवी मला उपलब्ध झालेल्या एकाहि पोथींत नाही. एवढेंच नव्हे, तर सप्तकाव्याच्या मला ज्या पोथ्या पाहाण्यास मिळाल्या त्यांपैकी कोणत्याच पोथींत, तें काव्य केव्हा रचिलें गेलें याविषयी निर्देश करणाऱ्या ओव्या आढळल्या नाहीत. प्रो. कोलते यांनी **उद्धवगीता** प्रसिद्ध केली, त्या वेळीं व्यक्तिगत वादाच्या धुरोळ्यांत ही महत्त्वाची बाब लोकांच्या नजरेआड झाली. केवळ **भानुभट्ट बोरीकरांच्या,** एकादशस्कंद किंवा शिशुपालवध यांच्याच शेवटी लेखनकालदर्शन-तिथि नाही, एवढेंच नव्हे, तर इतर काव्यांच्या शेवटीं देखील तशीच तिथि नाही, ही महत्त्वाची गोष्ट आहे. ज्याप्रमाणे 'सच्चिदानंद बाबा लेखकु जाहला' ही ओवी मूळ ज्ञानेश्वरींत नसून मागून जोडली गेली, तशीच पद्धति येथेहि असेल असा

तर्क केल्यास चुकीचें होणार नाही. पण मागून ओवी घातली गेली म्हणून तीमध्ये दिलेली माहिती चुकीचीच असली पाहिजे हा तर्कहि बरोबरच असतो, असें मात्र नाही. या ग्रंथाच्या ओव्या ७२९ नसून ( निदान मला ज्या चार पोथ्या उपलब्ध झाल्या त्यांत ) ५१७ आहेत. **सैह्याद्रिवर्णन** या नांवाबद्दल 'सैह्याद्रमहात्म' असेंहि काव्याचें नांव आढळतें. सप्त-काव्यांच्या पोथ्या व त्यावरील टीपग्रंथ यावरून हें काव्य ५१७ ओव्यांचेंच आहे असें ठरतें. तेव्हा ज्यांत लेखनकाल आहे व ज्यामध्ये ओवीसंख्या ७२९ आहे अशी पोथी जर कोणा संशोधकास सापडली तर त्यांनी मला अवश्य कळवावें अशी सप्रेम विनंती आहे. भावे यांच्या कवि–काव्य–सूचींत खळो व्यासांच्या ( खळो व्यास राघोपाध्याय पाथरीकर यांच्या ) नांवावर सैह्याद्रीवर्णन आहे, पण ओव्या ७२९ दिल्या आहेत.

३. **निबंधाची सामुग्री**—मला निरनिराळया वेळीं एकंदर ४–५ पोथ्या या काव्याच्या मिळाल्या. दोन टीपग्रंथ पाहाण्यास सापडले. लीळा-चरित्रांत दत्तात्रयासंबंधी 'सैह्याद्री लीळा' म्हणून सात[1] लीळा आहेत. श्री-चक्रधरोक्त सूत्रपाठ यांत दत्तात्रयासंबंधी कांही वचनें आहेत. **स्मृति-स्थळांत** या काव्यासंबंधी थोडी माहिती सापडते. काव्याच्या उपलब्ध पोथ्यांपैकी दोन पोथ्यांवर पोथीचें लेखन केव्हा झालें त्याचा काल आहे. [' एवं सैह्याद्रमहात्म्यें ग्रंथ समाप्त : शके १७०१ वीकारी संवत्सरे : चैत्र वद्य पाडवा : शुक्रवार : सिवराज महानुभाव, नागापूरकर तत्शिष्य राजमुनी : जरि म्हणाल लीहीलें कोठ : **इंदापुर** देश श्रेष्ठ : तया मध्य ग्राम वरिष्ठ : **सेळगांव** नांव तयाचें : ']

दुसरी पोथी—'सह्याद्रमहात्म्य समाप्तमगमत् । शके १६२५ शुभाननाम संवत्सरे : चैत्र मासाभ्यान्तरीं : कृष्णपक्षीं शुक्रवारीं : तीथ पंचमी चतुर्थ प्रहरी : पुस्तक संपूर्ण केले **नांदूरी** : आंकुलनेरकर, कृष्ण-राज : तत्सुत शिवमुनि :' **टीप ग्रंथ शेवट** : एवं सैह्याद्रवर्णनाचा

---

१ श्री दत्तात्रय प्रभु ज्ञानकरण, मेरुवाळा जळक्रीडा, अलर्कांभेटी, शंकराचार्यवरप्रदान, सहस्रार्जुना वरप्रदान, परशरामागमनीं श्रीदत्तात्रय प्रभु आचार्यत्वानुवाद, मार्गादि मूळकारण, अशा या सात लीळा आहेत.

शोधनीचा टीप समाप्त : वोवी संख्या ५१७ : हा ग्रंथ खळो व्यासाचा : जीर्ण टीप : प्रमाण पुरुषाचे **दोन** : आणि **तीसरा चोरयाचक अनंत-राजाचा** : जाणावा : ऐसें ती टीपाचें करून : सोधून लिहिली ग्रंथ व्याख्या : जरि म्हणाल कवणा कवणें : तरि कवीश्वर आम्नाये **कपाटे** जाणे : उपनाम **मराठे जनार्दने** : तत्सुत दत्तुनें.

**प्रस्तुत काव्याचे लेखक राघोपाध्याय किंवा खळो व्यास.**

खळो व्यासासंबंधी दिलेली माहिती सामान्यतः बरोबर आहे, असें समजण्यास हरकत नाही. परंपरेचे एकंदर उल्लेख पाहिले, तर खळो व्यास हे 'पाथरीकर' आहेत. ( हें गाव वऱ्हाडांत आहे. ) एकंदर पंथांतील तेरा आम्नायांपैकी उपाध्ये आम्नायांतील ( देशपांडे, महानुभावीय वाङ्मय, पान १०४ ) बळहेग्राम येथील **जानोपाध्ये**, यांची पुतणी **कमळाइसे** ( हिला शके १२२४ मध्ये नागदेवाचार्यांपासून बोध झाला, ) तिची शिष्या **हिराइसे**; व हिराइसेपासून शके १२५४ चे सुमारास राघोपाध्ये यांना उपदेश झाला असावा. **जानोपाध्ये** हे चक्रधराचे शिष्य होते. त्यावरून खळो व्यास तिसऱ्या पिढींतले होतात. तेव्हा दर पिढीला वीस वर्षें याप्रमाणे काळ धरल्यास, (चक्रधर प्रयाण ११९४-९५ + ६० वर्षें = १२५५) परंपरेचा शक १२५५ हा साधारणपणें बरोबर समजण्यास हरकत नाही. व त्याप्रमाणे कोणीतरी शिष्याने ओवी तयार केली व ती परंपरेंत रूढ झाली असली तर त्यांत आश्चर्य नाही. शक १२७५ व शक १२८५ या काळांत खळो व्यासांनी **सकळा** व **सुंदरी** या सांकेतिक लिपी सुरू केल्या. त्यावरून असें म्हणतां येईल की शक १२७५ पर्यंत महानुभावीय वाङ्मय व्यवहारांतील नित्याच्या बाळबोध लिपींतच होतें. सध्या ज्या पोथ्या आढळून येतात त्या बहुतेक 'सकळा' लिपींत असतात. अगदी बाळबोध लिपींत अशी पोथी अपवाद म्हणून सापडते.

**४ अन्तःप्रमाण**—प्रस्तुत काव्याचा आरंभ व शेवट पाहिला म्हणजे वरील गोष्टींपैकी कांहींना पुष्टि मिळते.

## काव्याचा विषय

जो नित्य तेजें अधिष्ठाता : स्वयंप्रकाश आनंदसविता :
तो उदैला चैतन्याचळ माथा : तया नमु श्रीचक्रपाणी :॥१॥:
जो मोहांधकाराची अवधि तोडी : देवतानंद निर्माल्य गंध फेडी:
जीवपशुवांचे बंध सोडी : प्रकट प्रबोधें: ॥२॥
जयाजेनि ज्ञानतेजांशें : सकळही पदार्थत्व दीसे :
तो उपासीलया असे : परलाभ थोर: ॥३॥
जो अवतारांतु गुरुवा : दैवी सुंदर्य बरवा :
तया वेधला सुहावा : गुरुदेव देखा: ॥४॥
तया श्रीचक्रपाणीचेन : वर प्रसादें मी करीन
**मुर्तलीळावर्णन** : श्रीदत्तात्रयाचें: ॥५॥

× × ×

तिये[1] सह्याचळीं आथिकां : असे सकळनिधीचा नायक :
तयाचा आश्रो करूनि साधक : साधनीं रिगाले ॥१६२॥
सकळ मोहाचा निधि दातारु :
म्हणौनिचि माता म्हणीजे ईश्वरू ॥१६५॥
तेव्हेळी सैह्याद्रपर्वती कैसी : अनुसया गर्भरत्नेंसी
भेटी रेणुकानंदनासी : जाली देखा ॥१७३॥
कीं चैतन्यकनकाचा लांबणदीवा : आत्रीवंश-आनंद कुळैवों[2]
कीं स्वयंप्रकाश अखंड लाखैवों[3] : जीवोद्धरणाचा ॥२३॥

वरील ओव्यांवरून या ग्रंथाचा विषय अनसूयेच्या गर्भी उत्पन्न झालेल्या दत्तात्रयाच्या लीलांचें वर्णन व दत्तात्रयाच्या मूर्तीचें वर्णन, असा आहे, हें स्पष्ट होतें. लीलाचरित्रान्तर्गत ज्या 'सैह्याद्रीलीळा' त्याच विस्तृत

---

१ हा भाग म्हणजे दत्ताचें स्थान, माहूर (मातापुर). हें निजामच्या हद्दींतील एदलाबाद जिल्ह्यांतील गांव होय. २ कुळदीपक. ३ लक्ष दिवे अखंड जळावे त्याप्रमाणें.

२८२२५ १११ ९१५२

रूपाने या काव्यांत वर्णिल्या आहेत. विशेषतः मातापूर (माहूर) या स्थानाचें व त्याभोवतालच्या प्रदेशाचें यांत वर्णन आलें आहे. तेव्हा सैह्याद्री म्हणजे मातापूरजवळचा सैह्याद्रीचा फाटा येथे विवक्षित आहे.

'उद्धवगीतेच्या' आरंभी दत्तात्रयाला नमन करिताना जी ओवी आहे त्यामध्ये 'सैह्याचळ' हा शब्द याच अर्थाने वापरला आहे. **सैह्याचळाचिये** चुळुके । जेयाचें प्रभामंडळ फांके । तो श्रीदत्त ललाटफलकें । नमस्करितु असे ॥१॥

## ग्रंथकर्त्याचें नांव

ग्रंथाच्या शेवटच्या पुढील ओव्या पाहिल्या म्हणजे ग्रंथकार कोण तें ध्यानांत येईल.

मागिला अपराधा करावी क्षेमा । प्रस्तुतिचेया न करावी सीमा ।
हे आयकैं वीनति पुरुषोत्तमा । **हीरांबिका म्हणे** ॥५१५॥

तीये[1] हीरांब्रिकेचा सुतु[2] । **राम** यैंणं[3] नामें विख्यातु
**तेणें निर्मिला हा ग्रंथु । वीतरागांसि** ॥५१६॥

ऐसेया ग्रंथातें जें पाठ करिती : तथा भावपूर्वक आयिकती ।
ते वाचकही मंगळरूप होती : **म्हैंणताय[4] रामु** ॥५१७॥

वरील ओव्यांत 'हीरांब्रा' इचें नांव आलें असलें, तर तें गुरुस्थानीं असलेल्या व्यक्तीचा मान दाखविणारें आहे. हीरांब्रेच्या प्रसादामुळे शिष्य **राम** (राघोबा) याने हा ग्रंथ केला आहे. दामोदर पंडित यांनी 'वत्सहरण' काव्यांत, 'म्हणे केशिराजु' असें आपल्या प्रेमाचें द्योतक म्हणून 'केशिराज' यांचें नांव 'अभंगीं घातलें',[5] पण शेवटची ओवी आपल्या नांवाचा निर्देश करणारी लिहिली, तशीच ही हकीकत आहे.

---

१ तीये. २ शिष्य. ३ येणें. ४ म्हणताये.

५ कृष्णमुनीचें अन्वयस्थळ यांतील मजकुरावरून तीच गोष्ट सिद्ध होतें.

५. राघो व्यासांनी सुंदरी लिपि व सैह्याद्रवर्णन केल्याबद्दल इतर ठिकाणींहि उल्लेख सापडतात.

(अ) चरित्र-आम्नाय (शक १८६२) यांत पुढील उल्लेख आहे.

सुंदर लीप हे : सैह्याद्र वर्णन : **रवळो** व्यासाने संबंधीलें ॥१७४॥

(आ) कृष्णमुनीच्या अन्वयस्थळांत पुढील उल्लेख आढळतो.

हिराइसा शिष्य रवळोव्यासा वित्पन्न : सैह्याद्र वर्णन : ग्रंथ केला ॥१९१॥<br>आणि दाहा ठाये : केले पै नामाचे : लीपकृत्य त्याचे नागरिक<br>॥१९२॥

साठी चौपदीया : पंडिताचे (दामोदर पंडिताचें) कृत्य :<br>वछाहरण ग्रंथ केला तेंही ॥७०॥

केशवा वियोगी : पंडितासि दुःख झाले सविशेख : स्नेहवशें ॥७१॥<br>यानंतरें ग्रंथ : वत्साहरण केलें : **अभंगीं घातलें केशवातें** ॥७२॥<br>सौजन्य करुनि : केशराजमुनी : अभंगीं घालुनि :<br>ग्रंथ केला ॥७३॥

आंतीचां आभगीं : दामोदर जाणा : घातली नामना :<br>पंडीताची ॥७४॥

सारांश, सैहाद्रवर्णन या ग्रंथाचा कर्ता, हिराईसेचा शिष्य रवळो व्यास ऊर्फ राघो व्यास हा असून, त्याने सुंदरी लिपी निर्माण केली, या परंपरेच्या गोष्टीला पुष्कळ आधार सापडतात. त्यावरून हा ग्रंथ शक १२५५ चे सुमारास झाला असल्याची ओवी, जरी कोणी मागून केली असली, तरी ती सत्यकथा असावयाचा बराच संभव आहे.

६. महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधनाला जोरांत सुरुवात होऊन १६-१७ वर्षें झालीं, तरी या काव्याकडे लक्ष न जाण्याचें महत्त्वाचें कारण म्हणजे या काव्याची भूमिका बरोबर न समजणें, हें होय. या काव्यांत आलेले संदर्भ बरोबर न कळल्याने गैरसमजूत होऊन हें प्रकरण काय आहे तें स्पष्टपणें कळलें नाही. काव्य या दृष्टीने तें इतर सहा काव्यांपेक्षा जरा कमी प्रतीचें आहे. हें काव्य पूर्वी वाचलें त्यावेळीं मधून मधून वाचल्यानें

एकंदर म्हणणें काय तें ध्यानांत येईना. सैह्याद्री व दत्त यांचा संबंध काय, मूर्तिवर्णनाच्या ओंव्या दोन प्रसंगीं कां याव्या, दत्ताचा विरह कोणाला झाला, 'हिरांबिका म्हणे', 'राम म्हणे' यावरून लेखक कोण, असे अनेक प्रश्न घोटाळा उत्पन्न करीत. त्यांतच पुढील अवघड शब्दांची अडचण होत असे—घोणाटारा, वयनामोदें, ब्राटिकार, देवांग, बगटें, खीरडैला, लाखैवा, नासाभंग, हातसुटी, ब्राटी इत्यादि. दत्तात्रय व चक्रधर यांचा संबंध काय, वगैरे अनेक प्रश्न गोंधळ उडविणारे होते. ओंव्या १६–१७ या वाचल्या, तर संशोधक घोटाळ्यांत खास पडला म्हणून समजावें. गैर-समज कसा उत्पन्न होतो याचें वरील ओंव्या चांगलेंच उदाहरण आहे.

पहिल्या 'पंचकृष्णांच्या' नमनाच्या ओंव्या झाल्यावर, पुढील ओंव्या येतात.

> नमस्करुं तया पूर्वजा : **जनार्दनादिका** योगीराजा :
> जे चक्रेश्वराचेया चरणांबुजा : अळिउळ जाले ।।१५।।
>
> तया सन्निधानपरा अशेखा : ज्ञानिया भक्ता नामधारका :
> नमस्करुं निजसेवका : श्रीचक्रस्वामीचेया ।।१६।।

हे **जनार्दनस्वामी** कोण ? एकनाथांचे गुरु नव्हेत ना ? हे **नामधारक** कोण ? सरस्वती गंगाधराच्या 'गुरुचरित्रां'तील नव्हेत ना ? नरसिंह सरस्वती शक १३८०, व जनार्दनस्वामी अनुग्रह शक १४५३ (भावे, भाग १ ला, आवृत्ति तिसरी, पान २१८–२१९). वरील मंडळींचा दत्तात्रेयाशीं संबंध होता; तेंव्हा चक्रधराशीं कांही तरी बादरायण संबंध लावून देऊन महानुभाव कवीने कांही गडबडगुंडा केला नाही ना ? पण परंपरेचे ग्रंथ वाचण्यांत आले, तर मात्र सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळून, प्रसन्न मनाने काव्य पूर्णपणें वाचलें, तर हा ग्रंथहि सप्तकाव्यांत गणला गेला हें योग्य आहे, व काव्य या दृष्टीने तो उत्तम नसला, तरी मधून मधून उत्कृष्ट स्थळें त्यांत निःसंशय आहेत, असेंच ठरेल.

लीळाचरित्र, चक्रधरसूत्रें, मूर्तिज्ञान, गोविंदप्रभु चरित्र, स्मृतिस्थळ, टीपग्रंथ, इत्यादि पोथ्यांचें वाचन झाल्याने हा ग्रंथ नीट उलगडतां येतो.

उदाहरणार्थ, वरील १६-१७ ओव्यांवर टीपग्रंथांत खुलासा केला आहे व त्याला इतर ग्रंथांचाहि आधार आहे. जनार्दन म्हणजे जानो पाध्ये उर्फ उपाध्ये बास हे चक्रधरांच्या शिष्यांपैकी आहेत. नामधारक म्हणजे परमेश्वराचें जे केवळ नामस्मरण करितात त्यांना महानुभाव 'नामधारक' म्हणतात.

लीळाचरित्र (एकांक) यांमध्ये पहिल्याच लीळेंत चक्रधरांच्या गुरूंचे गुरु म्हणजे रिधपूरचे गुंडम राउळ यांचे गुरु चांगदेव राउळ द्वारावतीकार, यांना माहूर (मातापूर) येथे श्री दत्तात्रयाने व्याघ्र वेषाने भेट देऊन अनुग्रह कसा दिला याचें वर्णन आहे.

लीळाचरित्रांत (भाग ४ था, पूर्वार्ध, खंड ३ रें, पान २८ पाहा) चक्रधर 'पंचाळेश्वर' येथे गेल्याचें वर्णन आहे. 'हें देखिलें गा : दत्तात्रय प्रभुचें गुंफास्थान' इत्यादि. अलर्क राजाचे त्रिविध ताप नाहीसे करणें; रेणुकेला आपल्या वडिलांच्या सांगण्याप्रमाणें मारून टाकल्यावर परशुरामाचें माहूर येथे आगमन व तपश्चर्या, ( हैहयवंशी ) सहस्रार्जुनाला वरप्रदान; इत्यादि दत्तात्रयासंबंधीच्या लीळा तर प्रख्यात आहेतच. लीळाचरित्रांतील 'सैह्याद्रलीळां'मध्ये हा कथाभाग येतो. श्रीदत्त हे या पंथाचे मूळ कारण आहेत, असें चक्रधरांच्या सूत्रांत आलें आहे. तेव्हा अशा प्रकारें उत्पन्न झालेल्या शंका दूर झाल्याशिवाय हा ग्रंथ वाचूनहि नीट समजत नाही. सुयोगाने वरील सर्व सामुग्री उपलब्ध झाल्याने या ग्रंथाची सुसंगतता पूर्णपणें पटते. लेखकाने मोठया भक्तीने दत्तात्रयाचें वर्णन ठिकठिकाणीं केलें आहे.

तया श्रीचक्रपाणीचिन : वरप्रसादें मी करीन  
मूर्तलीळा वर्णन : श्रीदत्तात्रयाचें ।।५।।  
म्हणे तुमचैन प्रसादें पवित्रें : बोलैन श्रीदत्ताचीं चरित्रें  
जयाचेनि श्रवणमात्रें : जीव चोखाळति :।।२०।।:  
ऐसा अवतरौनि सृष्टि : राज्य करी सैह्याद्रमुकुटीं  
जीव उद्धरी कृपादृष्टि : स्वामि नागार्जुनाचा ।।२६।।

७. ग्रंथांतील विषयनिरूपणाचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे—

दत्त व चक्रधर यांना नमन व मूर्तिलीळावर्णनाची उत्कंठा (ओ. १-१३); श्रीकृष्ण, नागदेवाचार्य, जानो पाध्ये (जनार्दनस्वामी), इत्यादिकांना

नमन (ओ. १४-१७); कमळांबा-हिराइसा यांना नमन (ओ. १८); श्रवणमात्रें जीवाला पवित्रपणा येतो (ओ. १९-२० ); देवाच्या मूर्तीचें वर्णन, अंगकांति, अवयव इत्यादि (ओ. २१-५१); उत्तम संगति व उद्धार (ओ. ५१-५२); दत्तमूर्तिवर्णन (ओ. ५१-१२५); अलर्कराजा, कार्तवीर्य (ओ. १२६-१५०); परशुरामाचें माहूर येथें जाणें व तपश्चर्या (ओ. १५१-१७५); सैह्याद्रपर्वत व एकवीरा यांचें वर्णन (ओ. १७६-१८०); विज्ञानेश्वर व आत्मतीर्थ, पंचाळेश्वर (ओ. १८१-१८६); श्रीप्रभु गुंडम राउळ यांना शक्तिदान (ओ. १८७); चक्रधर-चरित्र (ओ. १८८-१९४); श्रीमूर्ति-वर्णन (ओ. १९७-३१०); गुणवर्णन, बोधशक्ति, वेधशक्ति, दानशक्ति, उद्धरणशक्ति (ओ. ३११-३६३); असंनिधानधर्म (ओ. ३३८ -३९१); कलियुगाचें वर्णन (ओ. ३९१-४०४); कलियुग व उद्धरणसामर्थ्य (ओ. ४०५-४०७); गुरुद्रोह हें महापातक (ओ. ४०८-४२६); चक्रधर-निर्याण व भक्ताची विरहावस्था (ओ. ४२७-४९८); नागार्जुन, कमळांबा, हिराईसा यांचा कृपाप्रसाद ( ओ. ४९८-५१४ ); ग्रंथसमाप्ति (५१५-५१७).

८ **काव्यांतील रमणीय वर्णनें**—ग्रंथाचा आरंभ व शेवट; अवयव-वर्णन (ओ. २३-२७; ३५-४०; ५१-५८; ५८-६६); हीन व उत्तम यांची संगति ( ओ. ६६-७५); श्रीकंठ ( ओ. २६१ ); मुकुट ( ओ. ११९ ); सैह्याचळ वृक्ष ( ओ. १५५ ); चक्रधर-विरह (ओ. ४३६-४६१ ); उपमा देण्याची पद्धति ( ओ. ८०-८७), यांपैकी कांही अवतरणें पुढे मासल्यासाठी दिलीं आहेत. अवघड शब्दांचे अर्थ टीपग्रंथांतील दिले आहेत.

**प्रारंभीचें वर्णन** (पृ. ८१ वर ह्या ओव्या आल्या आहेत.)

जो नित्यतेज अधिष्ठाता : स्वयंप्रकाश आनंद सविता :
तो उदेला चैतन्याचळमाथा : तया नमुं श्रीचक्रपाणी ॥१॥

जो मोहांधकाराची अवधि तोडी : देवतानंद निर्माल्यगंध फेडी :
जीवपशुवाचें बंध सोडी : प्रकट प्रबोधें ॥२॥

**टीपग्रंथांत** या ओव्यांसंबंधी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण असून, निरूपणपद्धति लक्षांत घेण्यासारखी आहे. वरील ओव्यांतील रूपक टीपकाराने स्पष्ट केलें आहे.

'श्रीपरेशाय नम : । सैह्याद्रवर्णन : जो नित्यतेज अधिष्ठाता भणीजे प्रतीष्ठाता : तो आमुचे गोसावी (श्रीचक्रधर) : जो नित्य भणीजे सृष्टी सृष्टीचा ठाइं : तेज भणीजे प्रेम : तथा ज्ञान : स्वयंप्रकाश भणीजे आपुलिया आपण प्रकाशिता : आनंद सवीता भणीजे सूर्य जैसा पूर्वाचळीं नीगे : तैसें चैतन्याचें पुर (शरीर) : तल्लक्षण अचळ भणीजे पर्वत : तेथें अवतरला : ते आमचे गोसावी : तेया नमन : पांचा वोवीयांसि ब्रोलीजे : १ : तरि सूर्योदयें काइ काइ होए : ना : आंधकारु जाए : आणि देवतांचीं प्रातःकाळीं नीर्माल्यें फुलें फेडिती : तर : नीर्माल्य भणीजे फेडिती आधीले दीसीं वाइली होती : ते गंधरहीत : भणीजे : परिमळ रहित : सीळी जाली भणीजे फेडितीं : आणि पशूचे बंध सुटति : तैसें अवतार तल्लक्षण सूर्यो : तेणें मोहो भणीजे आज्ञान : तल्लक्षण आंधकार फीटे : आणि देवता गंध निर्माल्य : भणीजे : सकळ देवतांची पांचा प्रकारचीं कार्यें वर्तत होती : ते संहार जालीया (संहारकाळीं) सीळावलीं होती : तीया कार्यासि आणिलीया : तल्लक्षण निर्माल्यगंध फेडिती : जीव : तल्लक्षण : पशु : बंध भणीजे अविद्या : सोडी : भणीजे : नासीती : प्रकट भणीजे प्रसीध, प्रबोध ज्ञानें :'

**श्रीदत्ताचें स्तवन** (पृ. ८१ वर २३ वी ओवी आली आहे).

कीं[१] चैतन्यकनकाचा लांव्रणदीवा : आशीवंशआनंद कुळैवो[२] :
कीं स्वयंप्रकाश आखंड लाखैवो[३] : जीवोद्धारणाचा ॥२३॥
कीं सर्वशक्तींचां मेळीं : परज्ञानचक्रगोंदळीं :
आनंद प्रकटला भूतळीं : जीवा उदो[४] करीतु ॥२४॥
कीं अनुसया-गर्भ-गगनीं तापनाशक : उदैला आनंद मृगांकें[५] :
त्रीभुवन धवळिता[६] एकु : तृप्त जीवचकोरा ॥२५॥

---

१ कीं : दुसरी उपमा. २ कुलदीपक. ३ लक्ष्मी दीवा जळे : तो नित्य पाजळलाची असे : तैसा. ४ उदयोकाळ : भाग्योदय (१ गोंधळांतील उदो; २ भाग्यकाळ). ५ चंद्र. ६ श्वेत चांदणें करिता.

कीं[१] सर्वांगमाचार्यों अत्रिपत्रीं : ब्रह्मविद्याबीज मंत्र पवित्रीं
उद्धारिलें शांभवयेंत्रीं : जीवा सिद्धपुज्य ॥२६॥
कीं मायाशक्त हवनकुंडीं : कृपामंत्राहुतीचीया प्रौढी :
चीदानंद मूर्ति प्रकटली चोखडी : वरद स्थावरजंगमा ॥२७॥
ते श्रीमूर्त चांपेगौर : कवणा वर्णवे सुंदर :
जीयचें नांवचि उदार : ते सगुण बोलों कैसी ॥२८॥
जेथ पुराणा विवाद : षडदर्शना उरोध :
आगमा नव्हेचि अनुवाद : निगमें नेति भणीतलें ॥२९॥

**मूर्तिवर्णन करणें हीं गोष्ट कठीण आहे.**

जऱ्ही[२] संध्यारागाचे सदा : काले[३] दीजति जांबुनदा :
तऱ्ही **तीय** आंगकांतीसीं कदा : उपमुं न ये[४] : ॥३१॥
कनक गीरीचा गाभा सोलुनि : वर सूर्यप्रकाश संचेरौनि[५] :
ओपा सारिजैल घोंटाळुनि[६] : तऱ्ही उपमा नव्हे ॥३२॥
घेउनि पद्मरागाचें[७] तत्त्व : काढुनि सोनै चांपेयाचें सत्त्व[८] :
कनक केतकीचीयां[९] द्दति[१०] एकत्त्व : कीजैल जऱ्ही ॥३३॥
परि हे उपमा पाबळी[११] : **करणीय**चि नुरे पारबाळी[१२] :
श्रीदत्ताची अंगकांति अगळी : सहज म्हणौनि ॥३४॥

---

१ सर्वांगमाचार्य तो पत्रावर येत्र लिहुन दे : आणि तयाचें पूजन केलेया सिद्धि बाणती : तैसा अव्यक्त परमेश्वर : तो सर्वांचा आचार्या : जीव : देवता : अवताराचाही : तेणें अत्रि लक्षण पत्रांचा ठाईं : ब्रह्मविद्या : लक्षण : मंत्रबीज रहस्यरूप : जो मंत्र तेणें करुनि लिहिलें. २ 'उपमा देउनि दुषिजे : आणि : पदार्थ निर्धारणा की जे :' अशी जी **श्लेषाची** व्याख्या 'लक्षणरत्नाकर' या ग्रंथाच्या टीकेंत आहे, त्याचें, हा परिच्छेद उत्तम उदाहरण आहे. निरनिराळ्या उपमा देऊन, त्यामुळे बरोबरी कशी होत नाही, असें दाखवीत, दत्तात्रयाच्या अंगकांतीचें वर्णन येथे केलें आहे. ३ पुढे. ४ ये. ५ पुढे देउनि. ६ घोटुन. ७ प्रातःकाळचा लाल रंग. ८ रस. ९ सोनकेवडा. १० सार उदक. ११ तुच्छ. १२ परीक्षे उतरेना.

पाणी करुनि वीजुची खोटी[१] : परतौनि[२] संध्याराग एकवटी :
पुर्णचंद्रे[३] वळघैल उटी : तऱ्ही सरी न पवे ॥३५॥

तया आति कळांतुटी[४] : आस्तों[५] जाय सेवटीं :
चकोरा उपवासपाठीं : होय अंधकारु : ॥३६॥

म्हणौनि **दत्ताचिय*** चंद्रांगकांति : उपमा नाहीं त्रिजगतीं
जीवचकोरा नित्यतृप्ती : मोहांधकारा ठाव नाहीं ॥३७॥

## चरण-कमळाचें वर्णन

रंगाळ कुंकुमाचा ठसा : भरिला मानकुळ रसा :
तऱ्ही श्रीचरणेसीं सरिसा : करूं न यें[६] ॥४२॥

## भक्त सेवा कशी करितात ?

. . . । आनंदाश्रु जळाचां तुषारीं :
नयनांची चीपोळी[७] वेऱ्ही : सींपीती देखा: ॥४७॥
कंपादिभावाचा विजने[८] वारा : जाणवीताति नीरंतरा :
ते श्रीचरण सुकुमार : बोलैन कैसे ॥४८॥

## सव्यभागीं असलेला ध्वज

आतां सव्यभागें ध्वज दीसे[९] : तो जैसा परमार्ग पढियासे :
कीं संसारखायि वीझवत **यंत**[१०] असें : गंगौघ जीवसगरांवरि[११] ॥५१॥

---

१ गोठलेले. २ भाजून. ३ पूर्णिमेचा चंद्र. ४ कळेसी क्षयो. ५ **माळवे** (मावळे नव्हे) *वरील उताऱ्यांत '**तीय** (तीये)'; **करणीय** (करणीये); **दत्ताचिय** (दत्ताचियें) हीं रूपें चिंतनीय आहेत. प्रस्तुत पोथींत असलीं रूपें पुष्कळ आहेत. तेव्हा तो हस्तदोष आहे असें समजणें इष्ट नाही. '**तीये**-तीय-त्या' याच्या सांखळींतील हा मधला दुवा नव्हे ना ? ६ ये. ७ चिरकांडी. ८ गात्रें कापति : तल्लक्षण वीजण वारा. ९ भासे. १० येत. ११ जीवलक्षण सगर.

कीं स्वधर्मंतरी[1] चालिता भवार्णवीं : तो तार्गो[2] अंतराय थर्वी :
कीं सुखसाम्राज्य नगरीचा दैवी : कीर्तिस्तंभ ॥५२॥

## हीनाच्या संगतीने काय होतें ?

हीनाचें टाकिलेया उत्तमांग : मुक्तें[3] हों आली नासाभंगी[4]
गळेया झोंब्रिली वेगीं : तऱ्ही हारींचि पडिलीं ॥५८॥

आणि कुटिलसंगसरें : ढाळ पाणिपद उतरे :
मुक्तें हें नांवहि नुरे : जग जाळि[5] म्हणे ॥५९॥

पाप ताप **भरतीय गंगे** : सखोलपणें आली वोघें :
खारजा[6] मीनली तेथ जग : चुळ न भरीजे : ॥६६॥

## मुकुटवर्णन

मूर्ति देउळाचा कळसु : कीं ब्रह्मरस वोतीव तेजसु
जेथ कैवल्य नीळकीर्णा विकाशु : तो श्रीमुकुट देखा ॥१२९॥

## चरणकमळें

आता सुरंगें चरणकमळें : सांगों सुहावीं सकोमळें :
जें पुरवीतु भक्तभृंगाचे डोहळे : आनंदामोदें ॥२२०॥

## दोर्दंड*

जीव संसार-कुऱ्हाँ[7] पडिले : तयाला दोर्दंड लांब्रले :
**जैसे कां पारांबे निगाले : कैवल्यवटासि** ॥२५८॥

---

१ जहाज. २ वाटेसी आंतर पडे तें सांगे जहाजावर. सीड, तैसा फरारा, ध्वज. ३ नाकांत मोती घालण्याची चाल येथे स्पष्ट दिसते. ४ मुक्त हें नाम जाउनि नासाभंग भणीजे नासीभंगार हें नाम जालें : बेवार : तथा मोरणी : भावें नथ. ५ मोती नांव जाऊन जाळि हें नांव आलें. ६ क्षार-समुद्र.

* या ओवींतील उत्प्रेक्षा फारच बहारीची आहे.

७ आड.

**श्रीवदन**

राहोचेनि धाकें हीपुटी[1] : चंद्र जाला कळातुटी :
तो हळु हळु सेवटीं[2] : नाहीचि जाला ॥२६४॥
परि तेणे श्रीवदनचंद्रामृतें : **सतरावीय** केलें[3] पुरतें :
म्हणौनि कळाचें आलें भरितें : ते सागरीं न **समायचि** ॥२६५॥
तैं लागौनि पूर्ण मयंक[4] जाला : सुधाकर होउनि ठेला :
हालाहालें तृप्त निवाला : चंद्रमौळी : ॥२६६॥

**सैहाद्र पर्वताचें वर्णन***

तंव तो देखिला पर्वतु : जो कुळाचळामाजि विख्यातु :
तेथ असे क्रिडतु : अत्रीनंदनु : ॥१५२॥
कायि सांगौ तेथिचीं झाडें : तीयें पाहुनि सुरतरु बापुडे :
तया फळभोग जोडे : श्री दत्तदर्शन : ॥१५५॥
कल्पतरूसीं स्पर्धा करीतु : तैसे दीसती गगनचुंबीतु :
ते द्विजकुळीं सेवीजत : साय[5] म्हणौनि : ॥१५६॥
मयुराचिया केका[6] : षट्पदांचे झंकार आयिका :
पंचमाळाप शुकसारिका : कोकिळाचे ॥१५७॥
जेथ सरोवरीं बहुवस : चक्रवाक राजहंस
तयाचे कळरव[7] सुरस : कायि सांगों ॥१५८॥
ऐसें पंचमाळापीं नीरंतर : **गाजताय** अंब्रर :
ते जै स्तुति करिते द्विजवर : श्रीदत्तात्रयाची ॥१५९॥

---

१ हृदय फुटे. २ आमवसेचा दिवसीं. ३ श्रीमुख चंद्राचीया कळा पुरतीया केलीया. ४ चंद्र.

* वरील वर्णन पाहून, महानुभावपंथ हा मुसलमानधार्जिणा पंथ आहे, की हिंदूंचे हिंदुत्वाचा आत्मा त्यांत आहे, याची परीक्षा होईल. ज्याने सुंदरी ही सांकेतिक लिपी केली तोच कवि हें वर्णन करीत आहे.

५ सायाचे वृक्ष. ६ टाहो लांडोराचा. ७ शब्दध्वनि.

ऋषींचिया प्राणकुटिकां[1] : वेदशास्त्राचे निर्घोके[2] :
निरूपताति एकमेकां : उपनीषदर्थ ॥१६०॥

**तीय** सैह्याचळीं आयिक : असे सकळनिधीचा नायक :
तयाचा आश्रो धरुनि साधक : साधनी रिगाले ॥१६२॥

तेथिचीया परमाणुची थोरी : ब्रह्मादिकां न बोलवे कव्हणी परी :
कृपाकटाक्ष झटके जयावरि : श्री दत्तात्रयाचा ॥१६३॥

८. उतारे जेवढे द्यावे तितके थोडेच. तेव्हा तो मोह आवरून टीप ग्रंथांतील कांही शब्दांचा अर्थ पाहूं.

उसासी-मोसकणें; हातसुटी-दातृत्व; बगडे-माना; देवांगें-देववस्त्र; मुडप-भुजा; पारवाळ-परीक्षण; ठक-वेध; खीरडैला-जळाला; बाटी-सुकलेलें फूल; घोनाटारा-वेळुवाचिए कांबीचा कडा : भावें : ताटवा : तो देउळासि अथवा पटिसाळेसि आड लाविती; टाळें-कुलुप; कुची-किल्ली; अवधि-वेली; वयनामोदें-वयन (ज्ञान) : त्याचा आमोद : हो काज-मज पांतां; मला वाटतें कीं, इत्यादि.

९. ज्या जुन्या पोथींतून उतारे दिले आहेत. त्याविषयी थोडी माहिती सांगणें जरूर वाटतें. या पोथीचा शक १६२५ आहे. तेव्हा भाषेच्या दृष्टीने ज्या कांही विशेष गोष्टी यांत दिसतात तिकडे आपण वळूं.

**(अ) अक्षरवटिका**—अक्षरांच्या आकारांतील बदल दाखविण्यास तशा आकाराचा टंक नाही, म्हणून शब्दवर्णनाने कांही कल्पना देतों. टला वरच्या बाजूस रेघेपाशीं अर्धा तकार जोडून ट्; हच्या वरील उभ्या रेघेस आणि ध च्या खालच्या रेघेस वर्चे पोकळ शून्य जोडणें म्हणजे व्ह आणि ध्व, इत्यादि.

**(आ)** उच्चाराच्या दृष्टीने लेखन—रुषीवंशी (ऋ); निकलंक (निष्कलंक); पदस्त (स्थ); शतृसीं (शत्रुसीं); आनंदाश्रु (श्रु).

**(इ)** वाक्प्रचार-दळें बांधणें (पाडाव करणें); अंधकार फेडणें (नाहीसा करणें).

---

१ पर्णकुटिका. २ निर्धारेसी धोक करिती.

(ई) कांही अव्ययें-वेन्ही (नें अशा अर्थी); साठी (मुळें); पासौनि (पेक्षां); दोषें (उद्देशें); भक्ता **देयावयादोषें** (ओ. १०१).

(उ) ज्ञानेश्वरीप्रमाणे कांही शब्द-पावळी, मौवाळ, सेजार (शय्यागृह), झणें, वासिपे, जाणवितति, **टांकिले** (**ठाकिलें**), वोरकली, तेजिठें, निचनवी (नित्यनवी), इत्यादि

(ऊ) १ बोलैन, बोलवैल, खुपैल, कीजैल, स्मरैन, बोलैन-भविष्यरूपें;

२ माझां मनीं; दत्ताचां नामीं; हृदय-कमळाचां शेजारीं जळाचां तुषारीं; इत्यादि ठिकाणीं 'च्या' जागीं 'चां';

३ नामा **एकाचेनि** बळें; **जयाचेनि** ज्ञान तेजांशें; **ग्रंथाचेनि** मीषें; जयाचेनि श्रवणमात्रें.

(ऋ) पुढील रूपें विशेष लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

पोथींतील शब्द

| | | | |
|---|---|---|---|
| कराव**या** | ( करावेया ) | विज्ञवित **यत** असे | (येत) |
| दत्ताचि**य** अंगकांति | ( दत्ताचिये ) | वोघ | (ओघ) |
| उपमुं न **य** | (न ये) | जी**य**सि | (जीयेसि) |
| योगी**य** चिंतिती | (योगिये) | भी**य** | (भीये) |
| होयिल | (होइल) | देयि | (देइ) |
| खायिं | (खाइं) | | |

असलीं रूपें पोथींत किती तरी आहेत. श्रीयुत वा. ना. देशपांडे हे 'महदंबेच्या धवळयां'त असें म्हणतात की, या मात्रा चुकीने गेल्या असतील व म्हणून त्यांनी धवळयाच्या संहितेंत तेथे मात्रा योजिली आहे. मला वाटतें की ती महदंबेच्या धवळयाची पोथी शके १६२५ च्या मागेपुढे लिहिण्यांत आली असावी, म्हणून अशीं रूपें तेथेहि विपुल दिसतात. ज्ञानेश्वरकालीन कांही रूपांत कसा फरक पडत गेला याचें हें एक गमक आहे.

होइ-होए-होय; जयाचेनि-जयाचनि-ज्याच्याने; आइकावया-आयिकावया-ऐकावया; राहोचेया-राहोच्या; भीए-भीये-भीय-भी; ओघ-वोघ; यावरून वरील प्रकारच्या रूपांत, बदलत्या ओघाचा एक दुवा दिसतो,

असें वाटतें. तेव्हा हे लेखकाचे **हस्तदोष** नसून ती **सतराव्या शतकांतील** रूपेंच आहेत, असें वाटतें.

१०. हीं सप्तकाव्यें केवळ गमतीखातर किंवा मनोरंजनाचें साधन म्हणून उत्पन्न झालीं नसून, श्रीचक्रधराच्या अमृतस्रावी वाणींतून जीं सूत्रमय वचनें निघालीं, त्यांचें हें लौकिक स्वरूप होय. श्रीचक्रधर-सिद्धांत-सूत्रांचे पडसाद या काव्यांतून पावलोपावलीं दिसतात. पुढे कांही उदाहरणें नमुना म्हणून दिलीं आहेत.

वाचा मारांके[1] जैसी : जे शब्दवेधीपणें उसांसी[2] :
जीयेचीया धायांसि[3] : ब्रर्नों पाटाचि नाहीं ।।३४६।।
[चक्रधरसूत्रः—वर्म स्पशार्पासि : वर शिरच्छेद चांग.]

अन्यवार्तेचे अनेग : कुशब्दाचे तोडुनि संग
श्रवण नियमिळें चांग : श्रुतिव्रळें ।।३४५।।
[चक्रधरसूत्र—अन्यवार्तेपसि निद्रा चांग !]

जो गुरुहुनि उंचपणें वर्तला : म्हणौनि कान्हाचा पींडु नासला :
लोहाचां गोवींदचंद भस्म जाला : विपरीताचि साटीं[1] ।।
[ चक्रधरसूत्र—'गुरुपसि अधिक न वर्तावें.' ]
आणि सृष्टि आंत पाहा पा : ब्रह्मादि देवतां नाहीं कृपा :
मा कवणें करावी अनुकंपा : पतन होता : ।।१४३।।

[चक्रधरसूत्र—सृष्टीमध्यें कव्हणें करणें ( कोणत्याहि साधनाने ) मुचीजेना : एक परमेश्वरेंवीण : ]

११. येथे दत्तात्रय-मूर्तीच्या वर्णनांत तीन तोंडें नाहीत, किंवा हाताची संख्या दोहोंपेक्षा अधिक नाही. तसेंच दत्तात्रय-चरणांकित स्थानांत मातापूर, पंचाळेश्वर, मेरु, व्राळा इत्यादि स्थानें आहेत, दत्तांचा व्याघ्रवेषाने प्रसाद देण्याची रीति आहे, तसेच मांसाची कावड, वगैरे वेष

१ महात्मक, क्रूर. २ भोसकणें. ३ उदार. ४ औषध. ५ पट्टा; ज्या घायाला औषधपाणी, कांही चालत नाही, इतकी मर्मभेदक वाणी.

याचाहि उल्लेख येतो, पण तीन तोंडें (ब्रह्मा-विष्णु-महेश), गाणगापूर, नरसोबाची वाडी इत्यादि स्थानांचा निर्देश त्यांत नाही. या गोष्टींवरून दक्षिणेंतील 'सरस्वती गंगाधराच्या वर्णनांत असलेला' दत्तसांप्रदाय सुरू होण्यापूर्वी हा पंथ निघाला ही गोष्ट सिद्ध होते. तसेंच अनसूया व अत्रि यांचा मुलगा, अलर्क, परशुराम व कार्तवीर्य यांना पावणारा व मातापुरचा (माहूरचा) हा दत्त होय, यांतहि शंका नाही.

१२. अशा प्रकारें, महानुभाव पंथ, मराठी भाषा व दत्तसंप्रदाय यासंबंधी कांही गोष्टींवर प्रकाश पाडणारा हा ग्रंथ असून काव्यदृष्टयाहि त्यांत रमणीय स्थळें आहेत असें वाचकांना सादर करून हा परिचय संपवितों.

---

# ८. स्थानपोथी*

देशान् पुण्यान् संश्रयेत मद्भक्तैः साधुभिः श्रितान् ।
भागवत, ११, २९-१०.

तैसेंचि गंगेचां उभयकुळीं । नांदीजे अवतारीं सकळीं ।
वरी परमेश्वराचां चरणकमळीं । जालीं महातीर्थं ।।
आतां संमिश्रें असती अपार । वाराणसी संह्याद्रि लोणार
प्रतिष्ठान त्र्यंबक येळोर । उभयकुळीं गौतमी ।।

वांकीमहात्म्य, कविडिंभ, अध्याय २, ओवी २७, ३२.

१. **पूर्व माहिती**--श्री. आप्पासाहेब देशपांडे यांनी 'महानुभावीय मराठी वाङ्मयां'त, पान ४०-४१ वर, प्रस्तुत 'स्थानपोथी'ची थोडीशी माहिती दिली आहे. **कुमरे आम्नायांतील मुनिव्यास** (पूर्वाश्रमींचे पंडित कमळाकर अयाचित) यांनी, महानुभाव पंथांतील पूज्य तीर्थस्थानांची नोंद करून, जीर्ण अवशेषांची सुधारणा केली. हें कार्य शके १२७५ च्या सुमारास झालें. कै. भावे यांच्या 'कविकाव्यसूचींत' (पान २२ पाहा) ही नोंद केली आहे. यासंबंधी अधिक माहिती, 'नारोब्रहाळे' कृत 'ऋद्धपुर-वर्णन' या काव्याच्या प्रस्तावनेंत, ऋद्धपूर(रिधपूर)संबंधी माहिती देतांना श्री. अप्पासाहेब देशपांडे यांनी दिली असून, त्या गावासंबंधी विविध स्थळांची माहिती देणारा 'स्थानपोथीं'तील विस्तीर्ण उतारा 'परिशिष्टां'त त्यांनी दिला आहे. तसेंच 'शारदाश्रमवार्षिक' मध्ये 'श्रीचक्रपाणीचरित्र' याच्याविषयीं माहिती देतांना 'फलटण'चें वर्णन देणारें 'अवतरण' त्या

* 'द. वा. पोतदार गौरव-ग्रंथ', पृ. १९–२८.

ठिकाणीं दिलें आहे. प्रस्तुत 'स्थानपोथीं'त इतकें विस्तृत वर्णन नाही. हा उतारा ज्या पोथींत आहे, त्या पोथीची प्रत मला पाहाण्यास मिळाली. तींत 'मातापूर' (माहूर) वर्णन व 'फलटणवर्णन' असून इतर 'स्थानपोथीं'त आढळणारी माहितीहि आहे.

२. '**लीळाचरित्र व स्थानपोथी**'--लीळाचरित्राचा अभ्यास करतांना, 'स्थानपोथी'कडे माझें विशेष लक्ष गेलें. महामहोपाध्याय प्रि. मिराशी यांचें 'रामटेक'विषयक संशोधन, तसेंच हैद्राबाद (दक्षिण) येथे उपलब्ध झालेल्या यादवकालीन ताम्रपटाचें त्यांचें संशोधन, यांत आलेल्या स्थळांची माहिती पुष्कळशी 'स्थानपोथीं'तील माहितीशी जमली. श्री. गुप्ते, पुणें, यांनी 'सिन्नर' येथील प्राचीन माहिती देतांना केलेले उल्लेख, भिल्लममठ व इतर देवळें, यांची माहिती 'स्थानपोथी'ला पोषकच आहे हें पाहून, 'नेवासें भिलममठ' यासंबंधी माहिती देणारा लेख 'भारत इतिहास संशोधक मंडळा' पुढे मी वाचला. तसेंच 'लोणार' येथील 'धारे' संबंधी कोर्टात वादविवाद चालू असतांना कमिशनपुढे 'स्थानपोथी'वरून, तें स्थान अनेक वर्षांपासून हिंदूंचें कसें आहे, याविषयी साधार साक्ष दिली. तसेंच वऱ्हाडांतील अळजपुर (एलीचपूर), 'पातूर' वगैरे स्थळांची माहिती प्रत्यक्ष गोळा केलेली, 'स्थानपोथी'शीं जुळती आहे, हेंहि माझ्या अनुभवास आलें. 'लीळाचरित्र' वाचनास या पोथीचा निःसंशय फायदा झाला. त्यामुळे सर्व पोथीचा उतारा सांकेतिक लिपींतून सरळ बालबोध लिपींत करून त्याचा अभ्यास चालू केला. स्थळांचा नकाशा करणें हें काम महत्वाचें वाटून त्याला प्रारंभ केला. पण हें काम वाटलें तितकें सोपें नाही, असा अनुभव आला. त्यामुळे 'स्थानपोथी' प्रसिद्ध करून बाकीचें नंतर करावें असें ठरविलें.

प्रि. मिराशी, पुण्याचे डॉ. दीक्षित, शंकरराव जोशी, महामहोपाध्याय पोतदार इत्यादिकांनी या कामीं प्रोत्साहन दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. महंतांनी पोथ्या दाखवून, त्या वापरण्याची परवानगी देऊन उपकृत केलें, म्हणून त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

३. '**स्थानपोथी'चीं जुनीं हस्तलिखितें**--गेल्या दहा वर्षांत या पोथीच्या निरनिराळया जुन्या हस्तलिखित प्रती १५-२० तरी पाहिल्या असतील. त्यांतील ३-४ पोथ्यांवर लेखनकाळ होता. एक पोथी पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांतील होती, व आज ज्या पोथीवरून मी निबंध तयार करीत आहें, ती शके १५६५ मधील आहे. तिची लिपी 'सकळा' नामक सांकेतिक असून, पाठोपाठ पानें ६२ आहेत. प्रत्येक पानांत सामान्यतः १७ ओळी असून, प्रत्येक ओळींत ८-९ शब्द आहेत. या पोथींत शब्दांचे संकेत अनेक असल्याने व 'लीळाचरित्रां'तील लीळांचे व स्थानांचे अनेक उल्लेख यांत येत असल्याने, पोथीचें वाचन व अभ्यास जरा त्रासाचेंच काम आहे.

४. **प्रस्तुत हस्तलिखिताचा लेखनकाल**-- 'शके १५६५ विक्रम संवत्सरे : श्रावणमासे : कृष्णपक्षे : वार सोम : तिथी बारसी : दोन प्रहरीं लेखन संपूर्ण जालें : हस्ताक्षेर कपाटीया मंडळ सुत साइदमुनि : तयाचे जाणिजे : वाचीता वीजया हो : ' वरील सूक्ष्म कालदर्शक माहिती-वरून पोथी **तीनशें वर्षांची** जुनी आहे. अक्षरवटिका, कागद व विशिष्ट बांधणी, यांवरून वरील गोष्टीस दुजोराच मिळतो.

५. **पोथीचा आरंभ व शेवट**—'श्री परेशाय नमः । फलेठाणीं कऱ्हाडेया ब्राह्मणांचा घरीं अवतार स्वीकारु :॥६॥: मातापुरीं दोही देवा भेटि :' **फलटण** गावीं कऱ्हाडे ब्राह्मणाच्या कुलांत श्रीचक्रपाणी अथवा श्रीचांगदेव राऊळ यांनी अवतार धारण केला; कांही वर्षांनी ते माहूर येथे गेले; तेथे 'श्रीदत्तात्रय प्रभु' यांची व्याघ्रवेषाने भेट होऊन, श्रीदत्ताचें वरदान त्यांना मिळालें. प्रकाशित 'लीळाचरित्रा'चा 'एकांक' भागांतील आरंभाचा मजकूर वाचल्यास, वरील भागांतील उल्लेख स्पष्टपणे कळून येईल. पोथींतील प्रकरणें संपताना मधून मधून 'एवं पूर्वार्धस्थानें संपूर्ण' 'एवं उत्तरार्धस्थानें संपूर्ण' व शेवटीं 'एवं ऋद्धपूरस्थानें संपूर्ण' असे उल्लेख येतात. त्यावरून 'लीळाचरित्र' व 'श्रीगोविंदप्रभुचरित्र' यांतील स्थानें प्रस्तुत पोथींत आहेत, हें दिसून येईल.

६. **स्थानपोथींतील गावांची संख्या**--एका 'स्थानपोथी'च्या शेवटीं पुढील उतारा आहे. 'गंगातीरीं[१] आमुचेयां गोसावीयांचे[२] गांव : एकांके[३] :२१: वराडी[४] गांव :३६: गंगे उत्तरे मेहंकारा-येळापुरामध्ये[५] गांव :३८: तल्हाटी[६] : ९ आता रावसगावो त्रिअंबकु उभे थडी[७] : ८१ बालेघाटं :२६: खालाटी बीडं बेलापूरं :२३: एवं आमुचेया गोसावीयांचे गांव :२३६[१०]: आता ८ गांन दोही[११] देवाचे[११]: श्री प्रभुगोसावीयांचे[१२] गांव :३६: आमचेया गोसावीयांचे गांव :२३६: एवं दोही देवाचे गांव[१३] :२६९: इति समग्रस्थानें संपूर्ण : '

'**शारंगर भोजने**' यांच्या 'तीर्थमालिका' स्तोत्रावरून पाहतां हीं गावें एकंदर २२५ च्या सुमारास येतात. त्या प्रत्येक गावांतील 'वंदनीय' स्थळांचीं नोंद पाहिल्यास ती संख्या मोठीच भरते. सारांश, 'स्थानपोथीं'त आलेल्या २००-२२५ गावांवरून, पूर्वीच्या 'महाराष्ट्रा'ची कल्पना येण्याजोगी आहे. 'उभयगंगातीर' या शब्दाचा अर्थ 'गोदावरी'चा उभयकाठ, असा करावयास पाहिजे, असें श्री. महामहोपाध्याय पोतदार यांना नम्रपणे सुचवावेंसें वाटतें.

हीं गावें झाडीमंडळ, नागपूर, वऱ्हाड, पूर्व खानदेश, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, इत्यादि भागांतील आहेत. गावांचीं नांवें देऊन जागा आडवत नाही.

७. **कांही गावांचीं नांवें**--कांही गावांचीं नांवें इतक्या दीर्घ काळांत बदललीं असल्यास नवल नाही. हिवरळी (जालना), डोमेग्राम (कमालपूर), देवगिरी (दौलताबाद), पुरी (शहागड), इत्यादिकांत वरील

१ गोदावरी. २ श्रीचक्रधर. ३ श्रीचक्रधर एकटे हिंडतांना. ४ वऱ्हाडांतील. ५ वऱ्हाडांतील बुलढाणा जिल्ह्यापासून तों 'दौलताबाद वेरूळ' यांच्यामध्ये. ६ पायथ्याला. ७ गोदावरीच्या उभय तीरांवर. ८ सातपुड्यामधील. ९ सोलापूर, अहमदनगर पूर्वभागीं. १० बेरीज २३४ पाहिजे. ११ श्रीचक्रधर व त्यांचे गुरु, श्रीगोविंदप्रभु. १२ श्रीगोविंदप्रभु. १३ बेरीज २७२ येते.

म्हणण्याची प्रतीति येते. कांही नांवांचा उच्चार बदलत बदलत आला आहे; जसें : पैठण (प्रतिष्ठान), देगांव (देहगांव), देवग्राम, भामाठाण (भामस्थान), नेवासें (निधिवास), पेहरासंगम (प्रवरासंगम), काचराळा (येथे 'काचरेश्वर' आहे), लाखेपुरी (येथे 'लक्ष्मणेश्वर' आहे), वामोरी (वामपुरी), अळजपूर (अळकेपूर), मेहकर (मेघंकर), कोळेश्वर (येथे 'कोडेश्वरा'चें देऊळ), **विंझ**वासिनी (**विंध्य**वासिनी), नेऊरगांव (नेपुरग्राम), रामटेक (भोगराम, सिंदुरगिरि), इत्यादि. मराठी व्युत्पत्तीच्या दृष्टीने गावांच्या नांवांचा विचार करण्याजोगा आहे.

८. **मूळ पोथीचा काल**—मला उपलब्ध झालेल्या कोणत्याहि 'स्थानपोथीं'त शेवटीं मूळ पोथीचा लेखनकाल किंवा रचणाऱ्याचें नांव दिलेलें नाही. पण पोथींत मधून मधून पुढील उल्लेख येतात; जसें : 'वासना,' 'एकीवासना,' 'एक म्हणति,' 'एक महानुभव म्हणति,' 'शोध,' 'मार्गरूढी,' रामेश्वर व्यास, परशुराम व्यास, हिराइसा, इत्यादि. श्री. वामन नारायण देशपांडे यांनी प्रसिद्ध केलेल्या 'स्मृतिस्थळा'च्या प्रस्तावनेंत कालनिर्देशाची चर्चा करतांना, पान ७-१० यांवर, यांचें स्पष्टीकरण आलें आहे. त्यावरून 'स्थानपोथीं'त अधिक भर पडत गेली असावी, असें दिसतें. लीळाचरित्राचे 'संशोधनकार' व स्थानपोथीचे संशोधनकार एकच असले पाहिजेत. पुढे स्थानपोथींतील एक विस्तृत 'अवतरण' दिलें आहे, त्यावरून लीळाचरित्रांतील 'लीळा' व 'स्थानपोथी' यांचा कसा घनिष्ठ संबंध आहे, हें कळून येईल.

श्रीचक्रधराचें 'उत्तरापंथे गमन' परंपरेप्रमाणे शके ११९४-९५ मध्ये झालें. श्रीगोविंद प्रभु यांचा निर्याणकाळ शके १२०८-०९ आहे. श्रीनागदेव शके १२२४ मध्ये 'काळधर्मास' गेले. श्रीचक्रधरांचें वियोगदुःख सहन झालें नाही, म्हणून 'रिधपूर' येथे श्रीगोविंद प्रभूकडे सर्वजण आले. तेथेच श्रीनागदेव यांच्या नजरेखाली 'महानुभाव वाङ्मया'च्या आरंभींच्या घटना घडल्या. श्रीगोविंद प्रभु यांचा निर्याणकाल झाल्यावर, मनाला आराम वाटावा म्हणून, श्रीनागदेव, महदाईसा, आऊसा, भाईदेव व्यास,

वगैरे तीर्थाटनास निघून निरनिराळ्या ठिकठिकाणीं ते कसे गेले, यांची स्थूल कल्पना 'स्मृतिस्थळ' या ग्रंथांतील पुढील अवतरणावरून येईल.

'भटो वासा : भक्तजनां : थोर दुःख जालें : मग तेणेंचि दुःखें भटोवास गंगातीरासि आले : सरिसे लक्ष्मीधरबा[1], भाईदेवबा[2], माहादाईसे[3], कोथळोबा[4], पोमाईसें[5], साधें[5], मुख्य आणिकेंही : ऐसें **रावस-गांवापासौनि डोमेग्राम** वेन्हीं थडी नमस्करिली : **प्रतिष्ठानी** पंचरात्रीं घातलीं : अवघें नगरसख्य घालौनि नमस्कारिलें : **मग वृधासंगमा जोगेश्वरीहुनि खडकुळिये** आल : मग **पेहरा** संगमा **नेउरगांवीहुनि छिन्नपापासि** आले : मग भटोवास सर्व शिष्यांसहित **डोंबे-ग्रामांतु** आले. : जगतीचा दारवंठा दंडवत घातले :'–स्मृतिस्थळ.

वरील गोष्ट १२०८ ते १२१० च्या सुमारची आहे.

लीळाचरित्राच्या एका पाठांत असाच तीर्थाटनासंबंधी उल्लेख आहे. नागदेवाचार्यांच्या आज्ञेने भाईदेवबास, पंडितबास, केशिराजबास हे तीर्थाटन करून आले. सारांश, चक्रधरचरणांकित पवित्र स्थळांची तीर्थयात्रा करण्याची 'प्रथा' पडून ती चालू होती हें स्पष्ट दिसतें. त्यानंतर दक्षिणेंत यादवांची सत्ता जाऊन मुसलमानी अंमल चालू झाला. अशा काळांत कमळाकर अयाचित कोठी यांनी तीर्थस्थानांची पुनः दुरुस्ती केली, असा उल्लेख, 'अन्वय स्थळांत' व इतरत्र सापडतो. 'स्थानपोथी'च्या पोथ्या 'सकळा' लिपींत आढळतात. तेव्हा परंपरेच्या माहितीवरून तेराव्या शतकाच्या शेवटीं 'स्थानपोथी'ला विशिष्ट स्वरूप येणें शक्य आहे. तसेंच 'लीळाचरित्रा'चा मूळ खरडा हरवल्यावर केलेले संशोधनाचे प्रयत्न हे तेराव्या शतकाच्या अखेर व चौदाव्याच्या पूर्वार्धांत, रामेश्वरबास, परशुरामबास, इत्यादींकडून झाल्याने, स्थानपोथींत 'शोध' 'मार्गरूढी', 'रामेश्वरबास', 'हिराइसा', इत्यादि शोधदर्शक शब्द आल्यास

---

१. लक्ष्मीद्र्व्यास. २. 'पूजावसर' कर्ते भाईदेव व्यास. ३. 'धवळें' करणारी महदंबा. ४. श्री. गोविंदप्रभु शिष्य; कोथळोबांना 'चक्रधरांनी' गीता सांगितली. ५. श्रीचक्रधरांच्या शिष्यिणी.

नवल नाही. कसेंहि असो. मला उपलब्ध झालेल्या कोणत्याहि हस्तलिखितांत, स्थानपोथी मूलतः अमक्याने, अमुक वेळीं लिहिली असें नमूद केलेलें नाही. परंपरेचा कालशक शके १२७५ आहे. पण त्यामध्ये चौदाव्या शतकापर्यंत संशोधनानुसार थोडी भर पडत गेली.

९. 'सूत्रपाठ' व 'स्थानपोथी'ची तात्त्विक भूमिका— "परमेश्वर भज्य : संबंधु वंद्य :' (आचार, सूत्र १८५), 'एथचेया संबंधा गेले ते तुले वोटे गोटे तुम्हां नमस्करणीये कीं गा :' (आचार, सूत्र १८६), "संबंध व्यक्त : व्यक्तसंबंधी प्रसन्नता परमेश्वरू निक्षेपिती : मग आपुला संबंधु देति : म्हणौनि संबंधु वंद्य :' (आचारमालिका, सूत्र १३०), स्थान, प्रसाद, वासनिक, भिक्षु, परमेश्वराचें स्मरण करतांना, परमेश्वरी अवतारभूत व्यक्तीच्या संबंधांत, त्यामध्ये परमेश्वरी प्रसन्नतेचा व कृपेचा निक्षेप संचार झाल्याने, त्या त्या वस्तू, त्या त्या व्यक्ती, तीं तीं स्थानें, वंदनीय, स्मरणीय, पूजनीय मानावीं, असा श्रीचक्रधरांचा उपदेश आहे. तसेंच 'स्मृतिस्थळां'तहि स्थानांचें महत्त्व वर्णिलें आहे; 'जया तीर्था जाईजे : तेथचिया लीळा आठवीजती : तेथ तें स्मरण' (स्मृतिस्थळ, ३९). अशा रीतीने तीर्थयात्रेची सोय करणारी, तीर्थांचा नामनिर्देश करणारी पोथी तयार झाली असावी लीळाचरित्रांतील लीळा वाचत असतां, बऱ्याच ठिकाणी ते ते स्थानदर्शक उल्लेख अजून पुष्कळ सापडतात. 'स्थानपोथीं'त केवळ स्थाननिर्देश केला आहे, इतकेंच नव्हे, तर कोणता प्रसंग घडला, कोण व्यक्ती होत्या, कोणत्या स्थानीं त्या गोष्टी घडल्या, त्या स्थळाची खूण काय, वगैरे सूक्ष्म वर्णन तेथे येतें. सविस्तर लीळा, लीळाचरित्रांत उपलब्ध आहेत. सारांश स्थानांना महत्त्व देऊन थोडक्यांत प्रसंगाची नोंद लीळाचरित्राच्या आधारें, स्थानपोथींत केली आहे. शब्द व शब्दसमूह जवळ जवळ तेच आहेत. याचा अर्थ असा की, लीळाचरित्रावर जशा अनेक पोथ्या अधिष्ठित झाल्या, तीच स्थानपोथीची गोष्ट आहे.

१०. स्थानपोथींतील पुढील अवतरण 'नाशिक' विषयक आहे. हें स्थान पुष्कळांना परिचयाचें असल्याने 'स्थानपोथी' काय म्हणते, व निरूपणाची पद्धति कशी आहे, हें वाचकांना कळून येईल.

## नाशिकसंबंधी अवतरण

मग गोसावी श्रीनगरीहुनि[1] बीजें[2] केलें[2] : नासीकासि : पंचवटीयें : अवस्थानें[3] : दीस २० : **रामनाथा** अग्ने गुंफा दोनि : एकि पूर्वाभिमूख : ।: एकि उत्तराभिमूख :।: आंगणी मादनेस्थानें[4] : जगतीचों[5] दारवठा[6] पूर्वाभिमूख :।: गुंफेसि दक्षिणे परिश्रएस्थानें[7] :।: रामनाथाचे देऊळ पूर्वाभिमूख : रामनाथा उत्तरे **आदीत्याचें देऊळ** : पूर्वाभिमूख :।: **महालक्ष्मीचें** देऊळ पूर्वाभिमूख :।: गणेशाचें देऊळ उत्तराभिमूख :।: जगतीचा दारवठा[6] पूर्वाभिमूख :।: **शोर्ध**[8] आदीत्याचीए जगती आंतु **सोमनाथाचें** देऊळ उत्तराभिमूख :।: मध्ये विनायकाचें देऊळ : एवं वीहरणं[9] स्थानें : रामनाथा नैऋत्यकोनी मार्गी[10] उजवीया हाता आंग्रा : तेथ आसन : नाथोबां[11] स्त्रीकेशदर्शनी विस्मयो :।: **कपाळेश्वराचें देऊळ** पश्चिमाभिमुख : तयासि आग्ने गुंफा पूर्वाभिमूख : उत्तरे देउळी पूर्वाभिमूख : पूर्वे खीडकी[12] : **शोधु** : एक म्हणती **वरुणासंगमीं** गोसावी चरणचारी उभे[13] असति : **गंगा** उतरुनि : **चासां**[14] **पैलाडि** आसन : **शोध** चासा पैलाडि आसन : **शोध डोहा**पसिमे लींगा[15] जवळि चरणचारी उभे असति : बाइसें निबूंजली[16] : **जळसेन : जळसेनाचा घाट** : जळसेनुनि बीजें करणें : **सुंदरासि**[17] : **सुंदराचें** देऊळ पूर्वाभिमूख :

---

१ सिन्नरहून. २ गमन केलें. ३ वाहणें. ४ स्नान करण्याची जागा. ५ भिंत. ६ दरवाजा. ७ परसाकडे जाण्याची जागा. ८ यानंतर नवीन माहिती. ९ अटन करण्याची जागा. १० रस्ता. ११ लीळाचरित्र प्रसंग, नाथोबा हे चक्रधरांचे शिष्य; ( लीळाचरित्र, भाग २, पूर्वार्ध खंड १ लें, पान ५७ पाहा ). चक्रधरांचे दोन शिष्य, नाथोबा व डखले चांगदेव भट. चांगदेवांनी संन्यास घेतला नसल्याने, त्यांना केस होते. नाथोबा व चांगदेव सारखेच दिसत. तेव्हा नाथोबांना नित्य पाहाणाऱ्यांना आश्चर्य वाटलें की नाथोबांचे इतके केस एकदम कसे वाढले. १२ मोठ्या भिंतीला असलेला लहान दरवाजा. १३ पायांवर उभे; बसले नव्हते. १४ नदीचा तास. १५ महादेवाचें लहान देऊळ. १६ गंगेंत बुडकुळी घेतली ( लीळाचरित्र, भाग २, पूर्वार्ध खंड १ लें, पान ५४ ). १७ सुंदर नारायण.

जगतीचा दारवठा : पूर्वाभिमूख : खीडकी[१२] उत्तरे : दुसरा दारवठा दक्षिणे ।ः **पंचायत्नीं**[१] आसन : । : पंचायत्न पूर्वाभिमूख : जगतीचा दारवठा पूर्वाभिमूख : गांवांतु **काळीकेचा देउळी** वसति : **काळिकेचें देऊळ** पूर्वाभिमूख : **शोध** : त्रिरात्रि अवस्थान : एक म्हणति : **शाळांक** तीर्थी आसन : नाशीकीचीं स्थानें: ३० : ।।.।।

११. **अवतारणाचें सूक्ष्म अवलोकन**--लीळाचरित्राच्या पूर्वार्धाच्या पहिल्या भागांत पान ५४ ते ५८ नाशिक पंचवटीच्या लीळा वर्णिल्या आहेत. तेथे ते आपल्या शिष्यांसह 'सिन्नर'कडून 'भीलम-मढा'-हून आले होते. नंतर थोडा मुक्काम झाल्यानंतर, 'गोवर्धन-त्र्यंबक-अंजनी' असे जाऊन परत नाशिकास आले.

नाशिक पंचवटीच्या गुंफेंत राहिले होते. राहण्याचे प्रकार अनेक, त्याप्रमाणे शब्द वेगवेगळे. नुसतें कांही वेळ उभे असले तर 'चरणचारी', खाली बसून कांही अधिक वेळ राहिले तर 'आसन', त्याहून अधिकतर 'वसति' किंवा 'कुडी वसति', हें राहणें एक रात्र किंवा दोन रात्रींचें असलें तर 'वसति', म्हटली जाते पण यापेक्षा अधिक काळ गेला तर 'अवस्थान' शब्द वापरतात. येथे मुक्काम वीस दिवस होता, म्हणून 'अवस्थान' शब्द वापरला. 'रामाच्या' देवळाच्या नैऋत्य कोनीं थोडे बसलें तेव्हा 'आसन' शब्द योजला. 'वरुणा संगमा' जवळ 'चरणचारी' होते; तेथे 'आसन' नव्हतें. 'पंचायतनाच्या' देवळांत 'आसन' झालें, पण 'वसति', 'अवस्थान' वगैरे नाही. गांवांत 'काळिकेच्या' देवळांत 'वसति' झाली. सारांश, मुक्कामाचा वेळ किती, त्यावरून निरनिराळे शब्द वापरले जातात, इतकी सूक्ष्मता यांत दिसते.

गुंफा होती, तर तिचें मुख कोणत्या दिशेला, कोणत्या भागाजवळ, तेथे कशाकशाची सोय होती, याचा बारीक विचार केलेला दिसतो. मुख्य

---

१ पंचायतनीं (लीळाचरित्र, भाग २ रा, पूर्वार्ध, खंड १ ला, पान ५४). चक्रधरांनी औदास्य स्वीकार केला. ते भक्तजनांवर रागावले व नदीकडे गेले. तेव्हा बाईसा तिकडे गेल्या. पण नदीचें पाणी अधिक असल्याने बाईसा बुडूं लागल्या. मग चक्रधरांनी त्यांना वर काढलें.

रामनाथाचें देऊळ, त्याच्या आग्नेयेस गुंफा. गुंफा दोन होत्या. त्यांचीं तोंडें निरनिराळ्या दिशेला. गुंफेच्या अंगणांत स्नानाची जागा (मादनें स्थान); देवळाला भोंवतालीं भिंत (जगती) होती, तिचा दरवाजा (दारवठा) पूर्वाभिमुख होता. गुंफेच्या दक्षिणेला 'परिश्रय' स्थान ('परसाकडे'ची जागा) होतें. इतकें सूक्ष्म वर्णन सांप्रतच्या लीळाचरित्रांत नाही, त्याचा अर्थ असा की, 'स्थानपोथी' रचना झाल्यावर 'लीळाचरित्र' उतरून घेतांना या स्थान-वर्णनाच्या बारकाव्याची जरूर वाटली नाही. 'रामनाथा'च्या बाजूला असलेलीं देवळें म्हणजे, आदित्य, महालक्ष्मी, गणेश, यांची; यांना 'विहरण' स्थानें म्हणून म्हटलें आहे. येथे श्रीचक्रधर गेले असावेत; कारण हीं स्थानें गुंफेपासून जवळ आहेत. 'लीळाचरित्रां'त यांचा निर्देश नाही. कारण येथे कांही घटना झाली नसावी. पण भक्तजन जेव्हा यात्रेस जात, तेव्हा त्या ठिकाणीं हीं देवळें त्यांना आढळली; व त्यांचा निर्देश पोथींत घातला गेला.

पुढे 'शोध' शब्द येतो. याचा अर्थ असा की, एक महत्त्वाची पंथीय व्यक्ति त्या स्थळीं गेली असता, 'आदित्याच्या' देवळाच्या भोंवतालच्या भिंती आंत 'सोमनाथ' व 'विनायक' यांची देवळें आढळून आलीं. तोहि निर्देश लिहिला गेला.

रामनाथाच्या नैऋत्य दिशेला मार्ग म्हणजे 'वाट' होती. तेथे उजव्या बाजूस आंब्याचें झाड होतें. भक्तजनांना तीर्थयात्रा करतांना ज्या 'खुणा' दिसल्या, त्या त्यांनी 'लिखित' केल्या. पण लीळाचरित्राचा 'उतारा' करतांना त्या महत्त्वाच्या असल्याशिवाय उतरल्या नाहीत.

'नाथोबा केशदर्शनी, स्त्री विस्मयो' हें छोटें वाक्य लीळाचरित्रांतील प्रसंग वर्णन करणारें आहे. एक बाई नदीवर नेहमी येत असे, तेव्हा 'श्रीचक्रधरांच्या शिष्यापैकी चांगदेव भट, ज्यांचें मुंडन केलें होतें ते, तिला

---

१. 'स्मृतिस्थळ', प्रस्तावना, पान ८–१० पहा. संस्करणकारांची परंपरा म्हणजे कवीश्वर व्यास, परशाराम व्यास, पेठे हरिव्यास, अचळ मुरारी, गुर्जर शिवबास अशी आहे.

दिसत. एके दिवशीं चांगदेव गावाला गेला होता. त्याच दिवशी त्याचा जुळा भाऊ 'नाथोबा' चक्रधरांकडे आला. त्याने संन्यास घेतलेला नव्हता. त्याच्या डोक्यावर केस होते. हे दोघे भाऊ अगदी एकसारखे एक दिसत. बाईला हें माहित नव्हतें. तेव्हा ती आपल्या मैत्रिणीला म्हणाली, की 'काल पाहिलें तर डोकें मुंडित होतें, आणि आज एकदम इतके केस कसे वाढले ?'

लीळाचरित्राचें वाचन नसल्यास, हें प्रकरण काय आहे, याचा उलगडा होणार नाही. त्यामुळे केवळ स्थानपोथी वाचणें अवघड वाटतें.

कपाळेश्वराचें देऊळ, त्याच्या अग्नेयेस गुंफा, उत्तरेस लहान देऊळ, पूर्वेच्या बाजूला 'खिडकी (आवाराच्या भोवतीं भिंत असली म्हणजे त्याचा मुख्य दरवाजा असतो, पण कधी कधी अगदी लहान 'दार' आंत येण्यास असतें; त्याला 'खिडकी'[1] म्हणतात).

या बाजूकडे येतांना चक्रधरांची उदास वृत्ति होती. हे आपल्या शिष्यगणावर रागावून निघाले होते. ते 'वरुणासंगमाकडे' 'डोहाजवळ' गेले. त्यांची पट्टशिष्यीण बाईसा; त्यांना वाटले की चक्रधर डोहांत उडी घेतात काय; म्हणून बाईसा चक्रधरांच्या मागोमाग निघाल्या. नदीचें पाणी अधिक लागले व त्या बुडू लागल्या, तेव्हा 'बाबा' म्हणून ओरडल्या. मग चक्रधरांची दृष्टि तिकडे गेली व त्यांनी बाईसांना वाचविलें. 'कपाळेश्वरीं' जाऊन भिजलेलें वस्त्र सोडून कोरडे वस्त्र त्या नेसल्या.

ही घटना घडली कोठे ? 'रामाच्या देऊळीं असतांना' असें 'परशरामबासें'[2] म्हणतात. 'पंचायतनाच्या देऊळीं' असे 'रामेश्वरबासें'[3] म्हणतात.

---

१. उमरावतीच्या तटास, अशा खिडक्या म्हणजे 'लहान प्रवेश द्वारें' आहेत. अंबाबाईच्या देवळाकडे 'माता खिडकी' आहे. खिडकीचा आधुनिक अर्थ हा नाही.

२. लीळाचरित्राची शोधनी करणारे.

३. हे देखील लीळाचरित्राचे शोधनकार आहेत. हे समकालीन होते. नाहीसें झालेल्या चरित्राचें शोधन चालू असतां, प्रस्तुत घटना कोठे झाली, याविषयी दुमत होतें.

'जळसेन, जळसेनाचा घाट, सुंदराचें देऊळ याचा उल्लेख लीळाचरित्रांत नाही तेव्हा डोहाजवळ हा घाट आहे की काय, अशी शंका येते.

यानंतर 'पंचायतना'च्या देवळांचा उल्लेख असून गांवांत 'कालीकेच्या देवळीं' चक्रधरांनी 'वसति' केली, असें दिसतें. तेथे ते 'तीन रात्र' होते. 'एक म्हणति' म्हणजे कोणी महानुभाव म्हणतात की, 'शाळांक' तीर्थीं श्रीचक्रधर थोडा वेळ बसले होते. 'शाळांक' तीर्थाचें नांव लीळाचरित्रांत नाही.

लीळाचरित्रांतील घटनांच्या अनुक्रमाच्या दृष्टीने 'केशदर्शनी विस्मयो' ही घटना नंतरची असून, बाईसा 'कपाळेश्वराच्या' पाशीं बुडत होत्या. ही घटना अगोदर आहे. पण 'स्थानपोथींत' उलटापालट झालेली दिसते. किंवा उतारा करितांना चूक झालेली दिसते. निरनिराळया 'स्थानपोथ्या' एकत्र आणून वाचल्याशिवाय हा उलगडा होणार नाही.

सारांश, लीळाचरित्रांतील घटनांच्या दृष्टीने, रामाचें देऊळ कपाळेश्वराचें देऊळ पंचायतनाचें देऊळ, वरुणासंगम, डोह, हीं स्थानें महत्त्वाचीं आहेत.

आज नाशिक येथे या गोष्टी आहेत की नाहीत, हें 'नाशिक'कर जाणतील. सुंदराचें देऊळ, सुंदराचा घाट, आज अस्तित्वांत आहे की नाहीं हें माहित नाही. आंब्याचें झाड केव्हाच नष्ट झालें असेल, 'घाट' अजून आहे की तेथें दुसरें कांही आहे हें सांगतां येत नाही. 'सिन्नर'हून येतांना प्रथम 'रामनाथ' लागतो की 'पंचायतना'चें देऊळ लागतें हें माहीत नाही. वरुणासंगम, कपाळेश्वर व सुंदराचा घाट, ही एकमेकांपासून कोणत्या दिशेला व किती अंतरावर आहेत हें कळत नाही.

वरील उदाहरणांवरून 'स्थानपोथी'च्या अर्थाच्या आड किती गोष्टी आहेत याची कल्पना येईल. त्या त्या गांवच्या लोकांनीच ही खटपट केली, तरच हें कार्य लवकर होईल. या दृष्टीने प्रस्तुत पोथींतील गांवें व त्यांचें स्थूलवर्णन, लोकांना उपलब्ध झाल्याशिवाय वरील गोष्ट घडणें शक्य नाही. एवढें मात्र खरें की महानुभाव पंथांतील लोकांनी या जुन्या पोथ्या इतक्या चेंप संभाळून ठेवल्या, म्हणून त्यांना धन्यवाद देणें इष्ट आहे. तसेंच त्यांना ज्या गोष्टी आढळल्या, त्या सरळ रीतीने त्यांनी 'लिखित' करून ठेवल्या आहेत. आता त्याचा अर्थ लावणें एकट्याचें कार्य नाही.

**१२. स्थानपोथींत येणाऱ्या कांही गोष्टी**—' पैठण, डोमेग्राम, नेवासें, जोगेश्वरी' इत्यादि ठिकाणीं 'श्रीचक्रधर' होते, तेव्हा त्यांच्या आसपासच्या गांवचे लोक तेथें येत असत, त्यावरून तीं तीं गांवें कोठे आहेत याचा अंदाज येण्यासारखा आहे. नरसिंह, आदित्य, ब्रह्मदेव यांचीं देवळें विशिष्ट गांवीं सापडल्यास, त्यांचें कारण शोधण्याजोगें आहे. आदि. त्यांची नांवें 'मुधादित्य, 'उग्रादित्य', 'निंबादित्य', अशीं कां पडलीं, याचा विचार केला पाहिजे. कांही ठिकाणीं अंतर, किती आहे, हें दाखविण्यास 'पांड', 'आऊड' व 'नेतन' अशीं मापें येतात. कांही ठिकाणीं नदीच्या घाटाच्या, देवळाच्या विहीरीच्या पायऱ्या किती आहेत यांची संख्या दिली आहे. बोडनवावी, सिंदूरवावी, कापूरवावी, जळमांडवी इत्यादि विहिरींची नांवें असून त्यांना आंत शिरण्याची वाट कोटून आहे, याची नोंद कांही ठिकाणीं सापडते. गौतमाळें, देवकीआळें, आंबाळें, इत्यादि तळयांची नांवें आढळून येतात. गांवांचे जवळ टेकडी, नदी, घाट, स्मशान, पार, अग्निष्टिका, वेदिका, वट, पिंपळ, बकुळा, आंबा इत्यादि अनेक वर्षें राहणारीं झाडें, वाळवंट, नदीच्या वाळवंटांत असणारें देऊळ, 'वाट' दोन गांवास जात असेल तर त्याची नोंद, गोदरी, विदी, राजबिदी (लहान आळी, मोटी आळीची वाट, मोठा रस्ता), बाजारांतील रांधवण, हाट ( शिजलेल्या पदार्थांचीं दुकानें ), नगराला दरवाजे अथवा वेशी किती आहेत, 'सीमोल्लंघना'साठी कोणत्या दरवाजांतून जातात, देऊळ नदीच्या कोणत्या काठाला आहे, नदी किंवा टेकाड गांवाच्या कोणत्या दिशेला आहे, देवळांची, महाद्वारांची, वेशींचीं तोंडें कोणत्या दिशेला आहेत, अमूक जागेपासून देऊळ किती 'पांड' आहे, 'महारवाडा' वसति कोणत्या दिशेला आहे, नदीचे संगम कोठे आहेत, कोणत्या रानांत चोरांचें भय आहे, कोणत्या ठिकाणीं आंब्याचें वन आहे, द्राक्ष, महाळुंग यांच्या वेली कोठे आढळल्या, ओहोळ, नाले, नागझऱ्या कोठे आहेत; जैन, बौद्ध यांची स्थानें म्हणजे विहार, वसई, लेणीं, कोठे आहेत; देऊळ नाहीसें करून त्या जागीं मशीद कोठे दिसते, कोणतें देऊळ मोडकें होऊन भंगलेलें आहे, व्याघ्रदर्शन कोणत्या जागीं घडलें, धाकटें सुकीयाणें व मोठें सुकीयाणें ( गांवांचीं नांवें ), भुजंगाचे वटनेर ( म्हणजे वटनेर गंगाई नव्हे ), जुनें नागमठाण ( म्हणजे नवीन

नव्हे), जळगांव (लाडाचें), मातखेड–ईटखेड, एळापुर अथवा वेरूळ येथील राजविहार, धुमाळांचें लेणें, गोमटदेव, चतुर्विधाचा मठ, ईशाळुवांचें लेणें, महावसई, काटे वसई (जैनांचे विहार), भिवाडाउवाचे राजूर, पोटफोडयाचा गणेश, जखीणीचें धावें, अदंडीनाथाचा मळा; एकवाट 'मात्रा कवळी' जाए, एक जांबुखेडा जाए, असें मार्गदर्शन; अशा अनेक प्रकारच्या 'खुणा' या पोथींत आहेत. पण या सर्व गोष्टी 'लीळाचरित्रांतील' घटनांशीं संबद्ध पाहिजेत, हें मुख्य धोरण विसरून चालत नाही कांहीं गावांचीं नांवें समान असतात. त्या वेळीं तर हें धोरण निश्चित ठेवलें पाहिजे. संदुरजना, पिंपळगांव, अष्टी, अशा प्रकारचीं गांवें अनेक ठिकाणीं असूं शकतात. पण लीळाचरित्रांतील घटनांप्रमाणे अंतर–काळ–व्यक्ति यांच्याशीं ज्या गावांचीं नावें जुळतील तींच व्यावयास पाहिजेत. त्यामुळे या गावांचा नकाशा करण्याचें काम सोपें वाटतां वाटतां अवघड होत आहे. पण साधारणपणे जरी नकाशा तयार झाला तरी त्याचा उपयोग लीळाचरित्राचे उद्घाटन होण्यास मार्गदर्शक होईल, व जुन्या भौगोलिक क्षेत्रांत नवीन दालन उत्पन्न होईल. हें नकाशाचें काम चालू आहे.

१३. घर व इमारती यांच्या वर्णनांत अनेक नवीन शब्द सापडतात. वृंदावन (सहा खणांचें), पौळी, जगती; नांदेयाचे साजे (उंच चौथऱ्यावर नंदी), गरुडाचें खातें (भिंतींत अगर कोनाडयांत देउळी), दादर (जिना), गाभारा, शुकनासी (मोरी), पन्हिवा (गदळ पाण्याची मोरी), दारवठा (दरवाजा), उंबरवठा (उंबरा), कवाडें, द्वारशाखा (दरवाजाच्या चौकटीच्या दोन बाजू), मदलसा (गच्ची), बाळाणा (कटघर), वोसरी, उपरी (माडी), ओवरी, पटिशाला, दुर्ग (तट), अवार, कीर्तिस्तंभ, खांब, सांडोवा, वेस विहार, वसई; मठ, मंडप, चौकी, देव्हारचौकी, न्हाणी, दोन घरांतील संदी, गुंफा, रायांगण, पटांगण, अंगण, आवार; चौबारा (चारी बाजू मोकळया असें राहण्याचें स्थान), पाणीवारें; तसेंच थडी, तट, पाणंदी, आडी, दरडी, टेक, खडकाळी, खालाटी, तल्हाटी, लवणी, ओहळ, वोत, नाकझरी, संगम; घाट, पायऱ्या, विहीर, रवणी (विहिरीच्या काठाची जागा),

पुष्करणी, वावी, वापी, विहीर, तळें; ओटा, सोंडी (पुढे आलेला सुळक्या-सारखा भाग), सीहाडा (दरवाजाच्या दोन्ही बाजूला बाहेर बसण्याची जागा); वेदिका, अग्निष्टिका, कामठ, हाटवटी, रांदवणहाट इत्यादि शिल्प-शास्त्रांतील अनेक शब्द येतात. त्या त्या शब्दांच्या अर्थाची निश्चिति इतर ग्रंथ पाहून करणें हेंहि महत्वाचें काम आहे. संदर्भानें अर्थ लावतांना कांही वेळा गमतीच्या चुका होत असतात, म्हणून इतर ग्रंथांतील त्या शब्दांच्या उपयोगाकडे तुलनात्मक लक्ष देणें अवश्य आहे.

## १४. कांहीं महत्त्वाचीं गावें

**नागपूर**—भोगराम (रामटेक), भंडारा (भानदरा), कांति (काटोल).

**वऱ्हाड**—रिधपूर, अळचपुर (एलिचपूर), मेघंकर (मेहकर), लोणार, राहाटगांव, थूगांव, वाकी, बेलोर, सिराळा, पुसदा, देऊळवाडा, सेंदूर्जना, तिवसा, आखतवाडा.

**धुळें**—वाघळी, कनासी, भडेगांव, सिवाळा, पाचोरा, सेंदुर्णी, चांगदेव, सावळद्वार.

**नाशिक**—नाशिक, पंचवटी, गोवर्धन, आंजनेर, त्र्यंबक, आडगांव, सुकेणा, निफाड, नांदूर, हतनुर, पैठण.

**अहमदनगर**—घोगरगांव, डोमेग्राम, संवत्सर, कोपरगांव, कुंकुमठाण, पुणतांबा, हिंगणी, मिरजगांव, भिंगार, बामोरी, नेवासें, टाकळी, चाचरमुदी, पिंपळगांव, चिंचोडी, येळी, भोकरी, बेलापूर.

**औरंगाबाद**—फुलंबरी, वेरूळ, मातखेड, ईटखेड, लासूर, नागमठाण, बागडी, मात्राकवळी, गांगापुर, फुलसेवरा, नेऊरगांव.

**बीड** - बीड, पाली (मैराळ), निंब, पाटवधा, रामदरा, अष्टी, सिरसाळा, वाकी, देवळाना.

**इतर**—फलटण, भरवस (भडोच), द्वारावती (द्वारका), मातापूर (माहूर), पंचाळेश्वर, वोरंगळ, आपेगांव, राक्षसभुवन, बळहेग्राम.

१५. निबंधाची मर्यादा राखली पाहिजे, तेव्हा हात आवरणें अवश्य आहे. स्थानपोथींत कोणत्या प्रकारची माहिती आहे, तिचा अर्थ लावतांना कोणत्या गोष्टी लक्षांत घेणें अवश्य आहे, व महाराष्ट्राच्या प्राचीन भूगोलाच्या दृष्टीने त्या पोथीला कोणतें स्थान आहे, इत्यादि गोष्टी जर या निबंधाने वाचकांना पटल्या, तर माझें काम झालें असें मी समजेन.

---

# ९. अन्वयस्थळ व वृद्धाचार*

१. महानुभावी परमांडल्य आम्नायाचे गोपाळ पंडित अथवा आणो व्यास यांच्या लक्षणरत्नाकराविषयी मी भा. इ. सं. मं. च्या २३ वें संमेलनप्रसंगीं थोडीशी माहिती दिली होती. आज या शाखेंत झालेल्या प्रमुख ग्रंथांची व शिष्यांची हकीकत देणारा **अन्वयस्थळ** हा छोटासा ग्रंथ उपलब्ध झाल्याने त्याची माहिती देण्याचें योजिलें आहे. त्यावरून पूर्वीच्या माहितीवर आणखी प्रकाश पडण्यासारखा आहे.

२. रा. रा. यशवंत खुशाल देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङ्मय' पुस्तकाच्या १०९–११० पानांवर जी वंशवेल दिली आहे, तीबद्दल जास्त माहिती प्रस्तुतच्या छोटयाशा प्रकरणावरून मिळेल. तसेंच इतर उल्लेखांवरून कांही गोष्टींना आणखी बळकटी येते.

३. पारमांडल्य आम्नायाचा मुक्तपाठ, दृष्टांत, पूजावस्वर, नामाचे दाहा ठाय, स्मृतीच्या आदी[१], चरित्राच्या आदी, इत्यादि प्रकरणें या पोथींत आहेत. पोथी नेहमीप्रमाणे महानुभावी बांधणीची असून, सांकेतिक लिपींत आहे. अक्षर सुवाच्य व वळणदार आहे. शेवटीं लेखनशक वगैरे कांही नसलें तरी पोथी निदान १००–१५० वर्षांहून जुनाट असावी, असें कागद व अक्षरांचें वळण यांवरून वाटतें. ही पोथी माहूरचे महंत दत्तराज माहूरकर यांचेकडे पाहावयास मिळाली. हीशिवाय आणखी एक दोन पोथ्या इतरत्र मिळाल्या.

४. या प्रकरणाचा आरंभ 'श्रीपरेशाय नमः' असा नमनपूर्वक 'केसीराज व्यासी भटां[२] विद्यमान द्वादशप्रकरणवचनपाठान्वयो[३] लावीला'

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष १७, अंक २.

१ आरंभींचा मथळा. २ नागदेवाचार्य-भटोबास. ३ चक्रधरोक्त सूत्रपाठ पहा.

असा आहे. शेवटीं 'ऐसे वागुड चाह्या वासाचे कृष्णो वास सांप्रति ।। एवं अन्वयस्थळ समाप्तिः' असें वाक्य आहे, अखेरीस 'वृद्धाचार' म्हणून एकपानी प्रकरण आहे. या सर्वांची प्रत निबंधाला जोडली आहे.

५. नागदेवाचार्यांच्या हयातींत केशिराज वासांनी[1] चक्रधरसूत्रांच्या प्रकरणांचा नीट अन्वय लाविला, तो 'खाल्सेयाचिये धाडिसी गेला' म्हणजे नाहीसा झाला. नागदेवाचार्य हे गेल्यानंतरच्या काळांतील देवगिरीवरील मुसलमानांची स्वारी म्हणजे अल्लाउद्दीनाचा विश्वासू सरदार मलिक काफूर याची होय. त्याने इ. स. १३०८ मध्ये देवगिरीच्या रामदेवराजाला कैद करून दिल्लीस पाठविलें. तेव्हा 'खालसेयाची धाडि' म्हणजे 'खिलजीची स्वारी' असावी असें वाटतें. इ. स. १३२१ मध्ये खिलजी घराण्याचा शेवट झाला. सारांश, नागदेवाचार्यांच्या निधनानंतर (इ. स. १३०२, शके १२२४) दक्षिणेंत झालेली स्वारी म्हणजे मलिक काफूरची. ती १३०८ मध्ये झाली. यावरून केशो वासांनीं तयार केलेला 'सूत्रपाठ' या 'धाडींत' नाहीसा झाला. पण देशांत शांतता झाल्यावर भास्करभट बोरीकर अथवा कवीश्वर वास, परशराम वास व रामेश्वर वास या तिघांनी मिळून एके ठिकाणीं बसून स्वतःला कंठगत असलेल्या भागाचें नीट संकलन केलें. पुढे हाच 'सूत्रपाठ' कवीश्वर आम्नायांत रूढ मानला गेला व याचेंच स्पष्टीकरण करण्यासाठी पुढे अनेक महानुभावी ग्रंथ त्यावर रचिले गेले. सध्या विशेष मान याच सूत्रपाठाला दिला जातो.

६ कवीश्वर आम्नायांतील ही गोष्ट पाहून, पारमांडल्य आम्नायांतील प्रवर्तक गोपाळ पंडित अथवा आणो वास यांचे शिष्य **नागनाथ वास** यांनी आणो वासांना विनवणी केली, 'जैसा कवीश्वर आम्नायिं द्वादशप्रकरणासि अन्वयो असेः तैसा तुम्ही लावावाः तुम्हांसि गोसावियांचे[2] वरदें[3] असे.' ही विनंति स्वीकारून आणो वासांनी 'नवां[4] प्रकरणां अन्वयो

---

[1] रत्नमालास्तोत्राचे कर्ते. [2] श्रीचक्रधर. [3] वरदान, आशीर्वाद. [4] चक्रधरसिद्धान्तसूत्रें प्रस्तावना पहा; आचार, विचार, दृष्टान्त इतकीं प्रकरणें आनेराज वासांनी 'अन्वय' करण्याचीं राहून गेली. एकंदर प्रकरणें १२.

लावीला’ यानंतर आणो व्रासांनी ‘लक्षणरत्नाकरांत’ वर्णिलेली ‘द्वात्रिंशल्लक्षणें’ रचिली, “**बत्तीस लक्षणें** : गोसावी (चक्रधर) महाराष्ट्रभाषा : माइभटांप्रति (लीळाचरित्रकार) : नीरुपीलीं होती. : तीयें संस्कृतें केलीं.” म्हणजे **बत्तीस लक्षणें श्रीचक्रधरांनी म्हाइभटाला मराठींत वर्णन करून सांगितलीं होतीं तीं आणो बासांनी संस्कृतांत केलीं.** पूर्वीच्या निबंधांत केलेल्या विधानाला चांगलीच बळकटी येते.

७ यानंतर ‘आचार व विचार’ ही प्रकरणें तयार करण्यासाठी आणो व्रासांनी लीळाचरित्रांतून वचनें निवडून काढलीं होतीं; पण ‘अन्वय’ लावण्यास ते जगले नाहीत. अशा प्रकारें आनेराज पंडितासंबंधी माहिती यांत सापडते.

८ यापुढे **वाणाइसाचे** शिष्य **हरी बास** यांनी ‘बेळोपूर चरित्र’ सीधांतसाखळि, मांडणी, मूलसंचरण, या प्रकरणाचा ‘अन्वय’ लावल्याविषयी उल्लेख आढळतो.

९ त्यानंतर हरि व्रासाचे **तळेगांवकर दत्तो बास** यांनी हीराइसा रामेश्वर, परशुराम यांचीं मतांतरें लक्षांत घेऊन व हिराइपाठाला विशेष मान देऊन श्रीकृष्णचरित्र, गोविंदप्रभूचें चरित्र, श्रीचक्रधराचें चरित्र (पूर्वार्ध, उत्तरार्ध, अज्ञातलीला) इत्यादि एक करून तयार केली. लीळांच्या आरंभाचे मथळयांची नोंद केली कांही **‘प्रमेय’** ग्रंथ तयार केले. केशिराजांच्या दृष्टांतस्तोत्रावरून ११४ श्रीमुखदृष्टांतांचा अन्वय लाविला. आणो व्रासांनी निवडलेल्या वचनांचा अन्वय लाविला.

१० पुढे दत्तो व्रास जिवंत असतांनाच नागनाथ व्रासाचे शिष्य **कवि मालो बास** यांनी स्मृति, वृद्धाचार, रत्नमाळिकास्तोत्रांतील तुटलेला सांधा, पंगुस्तोत्र, नामावळि स्तोत्र, इत्यादि ग्रंथ केले; इतक्यांत त्यांचें देहावसान झालें.

११ यानंतर, वत्सहरणकर्ते दामोदर पंडित यांच्यासारख्या चौपद्या करणारे व **वामन बासाचे** शिष्य **शिवमुनि** यांची ग्रंथरचना येते. “तेहीं पंडीताचीया (दामोदर पंडित) चौपदीया सारीखीया साटी चौपदीया

केलीया : तेथ **अभंगीं** पारमांडल्य हेंचि नाम :' या ठिकाणीं **अभंग** शब्दाचा अर्थ नीट लक्षांत ठेवण्यासारखा आहे. 'चौपदीच्या शेवटच्या ओळींत नांव घालणें' असा निदान वरील ओळीचा तरी अर्थ आहे.

१२ आणो बासापासून ज्यांना उपदेश झाला असे पैठणचे **हिरण्य-गर्भ वास** अथवा हयग्रीवाचार्य यांनी केलेल्या 'गद्यराज' या **काव्याचा** नंतर उल्लेख आलेला आहे. 'गद्यराज' हें निर्यमक काव्य आहे. त्यांत स्रग्धरा, वसंततिलका, मालिनी, शार्दूलविक्रीडित इत्यादि वृत्तांचा उपयोग केला असून, काव्यवर्णन श्रीकृष्णाच्या अवतारांसंबंधीं आहे.

१३ एका पोथींतील शेवटची ओळ पुढीलप्रमाणे आहे : 'हें अन्वयस्थळ दाम बासाचे : केशोबा चाउरकर : त्यापासौनि लिहीलें.'

१४ यानंतर बागुड चाह्या बासांच्या संबंधी माहिती आहे व शेवटीं थोडासा वृद्धाचार म्हणजे नंतरच्या मंडळीविषयी जी परंपरेने माहिती मिळाली ती दिली आहे.

१५ वर वर्णन केलेल्या ग्रंथांपैकी, आनो बासांचा 'मुक्तपाट' 'संस्कृत 'लक्षणरत्नाकर' व हयग्रीवाचार्यांचा 'गद्यराज' या पोथ्या प्रत्यक्ष वाचावयास मिळाल्या.

१६ आता अन्वयस्थळ व वृद्धाचार यांचें मूळ येथे देतों.

## अन्वयस्थळ

केसीराज बासीं भटां वीद्यमान द्वादशप्रकरणवचनपाठान्वयो लावीला : तो **खालसेयाचिये धाडिसी** गेला : मग : **कवीश्वरीं परशराम बासीं : रामेश्वर बासीं** : द्वादशप्रकरणवचनपाठान्वयो लावीला : तो कवीश्वरआम्नायिं प्रवर्तला : तें देखौणि **नागनाथ बासीं आणो बासातें** प्रार्थिलें : जैसा कवीश्वरआम्नायिं द्वादशप्रकरणासि अन्वयो असे : तैसा तुम्ही लावावा : तुम्हांसि गोसावियांचे वरद असे : ते आणो बासीं मानिलें : मग आणो बासीं : पूर्वी-पंचकृष्ण-नवां प्रकरणां अन्वयो लावीला :। : बत्तीस लक्षणें : गोसावी : महाराष्ट्रभाषा : महाइभटाप्रति : निरुपीलीं होतीं : तीयें संस्कृतें केलीं : सुभाषीत स्तोत्र केलें : प्रमाणांचें

व्याख्यान केलें : मग आचारस्थळ :।: वीचारस्थळ : अन्वयो लावावेया : चरीत्रांतुलें वाक्यें वेगळीं नीवडीलीं : अच्युतगोत्रेसिं परमप्रीति करावी : या वचनापासौनि : श्रेष्ठत्व नष्टत्व न प्रकाशे : येथपर्यंत एकवटलीं : तीयें पारिमांडल्याम्नायीं प्रवर्तलीं : इतुकेनि आणो बासांचें देहावसान जालें : आणो बासांची बानाइसें : त्याचे हरी बास : तेहीं बेलोपुरीचीं चरीत्रें नीवडुनि सिधांत पाठाचें नीरुपण :।: सीधांत साखळी :।: मांडणी : मुलसंचरण : अन्वयीं लावीलें : ते पारिमांडल्य आम्नायीं प्रवर्तलें : इतुकेन तयाचें देहावसान जालें : तया हरि बासाचे तळेगांवकर दत्तो बास : तेंही **हीरंबापाठ** प्रधान करुनि : परशराम बास : रामेश्वर बास : आणिकही आचार्यें तयाचीं वासनांतरें एकवटुनि पुर्वार्धचरीत्रें : उत्तरार्धचरित्रें : द्वापारचरित्रें : ऋधपुरचरित्रें : अजातचरीत्रें : अन्वयीं लावीलीं : सकळचरित्राचीया आदि टांचिलीया : चतुर्वीधस्मरण : चहुं पदार्थांचें ज्ञान : मुंडज्ञान : एणें नामें **प्रमेयें** केलीं : डोंबेग्रामीचें तीन्ही पुजावसर अन्वयीं लावीले : दृष्टांतस्तोत्राचेनि अनुक्रमें श्रीमुखदृष्टांत अन्वयीं लावीले :।: आणो बासीं अन्वयो लावावेया जो वचनपाट नीवडला होता : तयाचा अन्वयो लावीला : तो ऐसा : आणो बासीं प्रमाणाचें व्याख्यान केलें होतें : तेथ आचार द्वीध बोलिला होता : अनुसरण : त्यागुभेदा : त्यामाजिं अनुसरण शब्दाचें : अनुसरण स्थळ केलें : आणि : त्यागभेद शब्दाचें त्यागभेद स्थळ केलें : त्याचिपरी आणो बासीं प्रमाणाचें व्याख्यान केलें होतें : तेथ वीचार द्वीध बोलिला होता :।: संबंध :।: साधन :।: त्यामाजिं संबंध शब्दाचें संबंधस्थळ केलें :।: साधन शब्दाचें साधनस्थळ केलें : ऐसीं तळेगावकर दत्तो बासीं पाठाचीं चारीं स्थळें अन्वयीं लावीलीं : मग : या चौ स्थळाचीया अर्थाचीं साधकें :।: पाठवचनें : एकवटलीं : तो **मुक्तपाठ** :।: या उपरी दत्तो बासाचा विद्यमानीं नागनाथ बासाचें सीख्य कवी मालो बास : तेहीं स्मृति :।: वृद्धाचार : केसो बासाचीया रत्नमाळामाजिं तुटी होती ते सांदिली : पुढारें साधावें तव अवकाश न पुरेचि : पंगुस्तोत्र केलें : नामावळि स्तोत्र केलें : **स्मृतिसंस्कृता करित** होते ते **साटी** श्लोक केले : एक

म्हणती : **सवाशें** : तवं देहावसान जालें : बामन बासाचें विश्वनाथमुनि : तेहीं पंडिताचीया चौपदीया सारीखीया साठी चौपदीया केलीया : तेथ **अभंगीं** पारमांडल्य हेंचि नाम : येंचि वर्तमानीं आणोबा बासाचें सीख्य **हीरण्यगर्भ वासीं पैठणीं भोगनारायणीं** गद्यें केलीं : ऐसा पारमांडल्य आम्नायीं शास्त्रान्वयो लावीला :॥:

हें अन्वयस्थळ दाम बासाचे केशोबा चाउरगांवकर : त्यापासौनि लिहीलें : ॥ शोध ॥ :

## वृद्धाचार

तळेगांवकर दत्तो बास : त्याचें गोंदाओ बास : त्याचें उफाळे चाह्या बास : तेहीं वीज्ञानविशेषावाचक : अपरावाचक : ऐसीं सुभाषित अंताक्षेरीची टीका केली : ते वागुड चाह्या बासीं सोधीली असे :।: वीनाएक बासीं केसो बासाचीया रत्नमालामाजि आधिक नीरुपण होतें : तया नीरुपणाचे श्लोक **हीरांबापाठामाजि** ठाइं ठाइं लीहीलें असत : जगदात्मा : सर्वकर्ता : जगदेश्वर : एवमादिक गोसावीयाचीं नामें अर्थवसें लीहीलीं असत : तेणें तो पाठ भीन्न जाला असे : **ऐसे वागुड चाह्या बासाचें कृष्णो बास** सांप्रति : एवं अन्वयस्थळ समाप्ति ।

ईश्वरु परमार्गिं नागार्जुनभट आचार्य : त्यापासौनि दोनि आम्नायें पारमांडल्यआम्नाये : कवीश्वरआम्नाये :।:

पारमांडल्यआम्नायीं : आणो बास : त्यांचीं बाणाइसें : त्याचें हरी बास : त्याचें दत्तो बास : त्याचे भानु पंडीत गोंदावो बास : त्याचे उफाळे चाह्याव बास : त्याचे विनाएक बास : विनाएक बासाचे तीघे शिष्य : बाऊबास : दीवाकर बास : बागुड चाह्या बासाचे जैतावो बास : त्याचे चाह्या बास ॥०॥

आता देव बासाचे तुकावो बास : त्याचे भाया बास : त्याचे गोपाळ बास : त्याचे मंडळीक बास :॥०॥ आतां बाउ बासाचें केसो बास : त्यांचे महादेवो बास : **एवं वृद्धाचार समाप्ति** :॥:

# १० कृष्णमुनींचें अन्वयस्थळ*

१. 'अन्वय' म्हणजे 'वंश' व 'स्थळ' म्हणजे 'ज्यांत विवेचन केलें जातें तें', 'जेथे विस्तार करून सांगितलें असतें तें' (उद्धवगीता, पान ४१ पाहा). येथे कृष्णमुनि अथवा कवि डिंभ याने महानुभावीय पंथाच्या वाङ्मयाची व ज्ञानपरंपरेची माहिती २९८ ओव्यांमध्ये थोडक्यांत वर्णिली असून वर्णनाच्या ओघांत महानुभावांचे प्रमाणग्रंथ, प्रमाणव्यक्ति, शाखोपशाखा, शास्त्रीय वादविवादांतील पक्षकार व त्यांच्या खुणा, मधून मधून ग्रंथावरील थोडक्यांत अभिप्राय, अशा रीतीने कांही महत्त्वाची माहिती दिली असल्याने या प्रकरणाचें महत्त्व विशेष आहे.

२. हें प्रकरण ज्या जुन्या हस्तलिखित पोथ्यांत आढळलें. त्यांमध्ये **पंचाळेश्वर वर्णन, चरित्र आबाब** (लीळाचरित्राविषयी माहिती) व **अन्वयस्थळ** अशीं तीन प्रकरणें सापडलीं. आतापर्यंत अशा तीन पोथ्या उपलब्ध झाल्या,† त्यांपैकी दोन सांकेतिक लिपींत असून, एक प्रचलित मराठींत बाळबोधीमध्ये आहे. कोणत्याहि पोथीमध्ये शकाचा निर्देश नाही; तथापि मंडळासमोर असलेली पोथी कागद व अक्षरवटिका ह्यावरून १००-१५० वर्षांची तरी जुनी असावी. कांही अक्षरांचें वळण लक्षांत ठेवण्यासारखें आहे; जसें--ट्र (ह), त्र (र), व्र (कु), ष्ट (वृ), न्ह (न्ह), ध्या (ध्या), मृ (मृ), ष्ल (ष्ण), ड्र (ड्र), न्व (न्व), इत्यादि.

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष २०, अंक २.

† यांपैकी सर्वांत जुनी असलेली पोथी निबंधवाचनाचे वेळीं (भा. इ. सं. मंडळाचें पंचविसावें संमेलन) आणलेली होती. या पोथीचा उतारा पुढे दिला आहे.

३. कृष्णमुनिसंबंधी अन्तर्गत प्रमाण पुढीलप्रमाणे सापडतें:—

'इत्यादि अन्वयो : सकळ शास्त्राचा : वर्णीयला वाचा : **कृष्णमुनी** ॥२९८॥

अशी शेवटची ओवी आहे. आरंभाच्या 'नमना'नंतर पुढील ओव्या आढळतात, त्यांहीवरून कांही माहिती मिळते. 'प्रणीपात केला : आपणया येरा : मार्गपरंपरा : नमीयेला ॥११॥ उपाध्ये आन्माये : **कमळंवा योगीनी** : ते नमीली साजणी : भक्तीभावें ॥१२॥ उभये आन्माये : दोहीस्तंभे धीर : तो **अचळवंकार** : नमीयेला ॥१३॥ **धारासीव पीढी** : ज्ञानाचा मयंके : तो नमीला : आइक : **वंकेराज** ॥१४॥ ऐसा अनुक्रमें : केला प्रणीपात : नमीला अनंत : परंपरा ॥१५॥ **कोल्हेकर वील्हे** : **दामेराज**सुत : नमीला महंत : **सीवेराज** ॥१६॥ **सीवराज**-सुत : **वल्लाळ** वीख्यात : तया प्रणीपात : पुनः पुन्हा ॥१७॥ ब्रल्लाळ-प्रसादें : **आन्वयो माळीका** : सांघैन आइका : परंपरा ॥१८॥ मज मति नाही : बोलावया आतां : **वल्लाळप्रसंता** : **वोळलीसे** ॥१९॥ प्रसंता वोळली : आन्वयो ज्ञानाचा : बोले **डींभ** वाचा : अल्पमति ॥२०॥' ह्या ओव्यांवरून दामेराजसुत शिवराज, व त्याचा सुत ब्रल्लाळ, आणि त्याची कृपा डिंभ कवीला' असें दिसतें.

४. कृष्णमुनि किंवा डिंभ कवि या नांवाच्या आणखी कांही ग्रंथकारांचा निर्देश महानुभावीय वाङ्मयांत आढळतो. [रा. देशपांडे, महानुभावीय वाङ्मय., पान ९२-९३; हा कवि, कवीश्वर-आम्नायांतील दिवाकरमुनीचा शिष्य; सतरावें शतकाचे अखेरीचा. पान ९० वरील कवि डिंभ हा उपाध्याय-आम्नायामधील असून मयंकराज-शिष्य आहे. याचा 'रुक्मिणी स्वयंवर' ग्रंथ शके १५२४ मधील आहे. पान ७६२-७६५, मराठी वाङ्मयाचा इतिहास-पांगारकर.] पण 'धाराशिव ओंकारा'चें विशेष स्तवन करणारा व दामेराज-सिवराज-वल्लाळ या परंपरेंतला 'कृष्णमुनि' कोणता, याविषयी

---

१ पंथांतील एका शाखेचें नांव. २ पक्षकाराची खूण, दोन उभ्या रेषा. ३ चंद्र.

माहिती लागत नाही. तेव्हा अंतर्गत प्रमाण हेंच एक अनुमानाला साधन होय.

तेरा आम्नायां(शाखां)पैकी 'उपाध्ये' आम्नायाला कवीचा प्रणिपात आरंभींच्या ओव्यांत आढळतो (ओ. ११×१५). तेव्हा तो, उपाध्ये आम्नायांतील असावा. 'पाथरी' गावीं वंकराजशिष्य सिद्धांते हरिराज व 'अचळाचे' शिष्य गुर्जरशिवव्रास या दोघांनी मिळून, चोवीस पक्षकारांचा समन्वय केला, त्याचें वर्णन कवीने विशेष प्रकारें केलें आहे. (उभये संवादें : सोधोनी नीबंध : लावीला संबंध : तोही स्थळा ॥२५४॥) 'पातरीये' ग्रामी : सोधोनी नीबंध : स्थळासी संबंध : लावीयेला ॥२९०॥ रवळोव्रासांची : लीप नागरीक : लेहुनी पुस्तक : प्रती केल्या ॥२९१॥' पाथरी गांवीं सर्व पक्षकारांचा समन्वय करून, रवळोव्यासांनी केलेल्या सांकेतिक लिपींत पोथी तयार केली गेली, असा वरील ओव्यांत उल्लेख आहे. कवीनें शास्त्राच्या अन्वयाचा विचार येथपर्यंत करून ग्रंथ संपविलेला आहे. तेव्हा गुर्जरशिवव्रासानंतर कृष्णमुनींचा काल असला पाहिजे असें ठरतें (गुर्जरशिवव्रास, तिन्हीस्थळबांधणी, शके १३२५, पान १०८, महानुभावीय मराठी वाङ्मय, देशपांडे).

ज्या ग्रंथकारांचें वर्णन कवीने केलें आहे, त्यांमध्ये शेवटचे ग्रंथकारांत 'पारमांडल्य' आम्नायांतील दत्तोव्रास तळेगांवकर, मल्लेकोयाव्रास यांचा निर्देश (ओ. २२३) आहे (दत्तराज तळेगांवकर, शके १३२५, म. म. वाङ्मय, पान ११०). पल्होव्रास, मुधोव्रास यांचा निर्देश, ओ. २१७, ओ. २२२ मध्ये दिसून येतो (पान १०६, म. म. वाङ्मय, देशपांडे, मालोव्यासाचे शिष्य मुधोव्यास). यानंतरच्या ग्रंथकारांचा उल्लेख या ग्रंथांत कवीने केलेला नाही; त्यावरून चौदाव्या शतकाच्या नंतर 'कृष्णमुनि' झाला असावा असें वाटतें.

५. 'अन्वयमाळिके'मध्ये आरंभीं कवीने महानुभावांच्या 'पंचकृष्णांना'[1] नमन केलें आहे. श्रीकृष्ण, दत्तात्रय, द्वारावतीचे चांगदेव राउळ,

---

१. चक्रधर सिद्धांतसूत्रें, पान १ पाहा (भवाळकर–नेने प्रत).

श्रीगोविंदप्रभु अथवा गुंडमराउळ, व चक्रधर अथवा चांगदेव राउळ असे हे पंचकृष्ण आहेत. कै. चांदोरकर यांचा एतद्विषयक तर्क अगदीच निर्मूलक आहे, असें अलीकडील उपलब्ध माहितीवरून ठरत आहे. पंचकृष्णांच्या नमनानंतर, नागदेवाचार्य ( पंथसंस्थापक ), म्हाइंभट ( लीळाचरित्रकार ), माहादंबा ( धवळे करणारी ), आबाइसें ( नागदेवांची माता ), एल्हो ( गोविंदप्रभूंच्या प्रसादाला पात्र झालेली), कमळंबा योगिनी (उपाध्ये आम्नायांतील), दामेराज-सिवराज-बल्लाळ (कविडिंभाची गुरुपरंपरा) इत्यादिकांना ग्रंथकाराने प्रणिपात केला आहे. ओव्या २१ ते २८ मध्ये 'परमार्गांतील' (महानुभाव पंथांतील) पुरुषांना प्रमाण कोणतें याचें विवेचन आढळतें. श्रीचक्रधरांची वचनें **श्रुतितुल्य**, भटोबास (नागदेवाचार्य) व केशिराज यांचें म्हणणें **स्मृतितुल्य**, परशरामव्यास, रामेश्वरव्यास, हर्दमुनि, हीरांबा व नागांबा अशा पांचांच्या म्हणण्याला 'वृद्धाचार', असें म्हटलें जातें, व अचळमुरारी, धाराशिवकर, सिधांते हरिराज व गुर्जरशिवबास यांची 'मार्गरूढी', अशा रीतीने श्रुति-स्मृति-वृद्धाचार-मार्गरूढि अशीं चार प्रमाणें येथे प्रतिपादिलीं आहेत. यांखेरीज इतर प्रमाणें म्हणजे 'स्वोक्तिसंचार' आहे व तो प्रमाण नव्हे हें मत येथे निर्दिष्ट केलें आहे. गुर्जरशिवबासानंतर पंथांतील ' मतामतांचा गलबला ' कवीने पुढीलप्रमाणे वर्णिला आहे, ' यानंतरें पुढे : कांही जीव हेत : जाला संचरीत : अभीमान ॥२९॥ म्हणोनीया च्यारी : प्रमाणें मार्गासी : श्रुतिमुख ऐसी : प्रतीष्टीली : ॥३०॥ : चहुं वीरहीत : प्रमाण बोलती : तेथ अधमति : युक्तित्रय ॥३१॥ ' ' ओव्या २९० ते २९४ मध्ये याच विचाराची आवृत्ति दिसून येते.' एकंदर संशोधन करून, 'पाथरी' गावीं, गुर्जरशिवबास व सिद्धान्ते हरिराज यांनी शास्त्राचा 'समन्वय' केला, व त्यांत पुढे घोटाळा होऊं नये म्हणून 'खळो' व्यासांनी केलेल्या सांकेतिक[1] लिपींत ते ग्रंथ प्रमाणभूत म्हणून लिहून ठेवले व 'यावेगळें

---

१ सांकेतिक लिपीचा उपयोग कां केला गेला, यासंबंधी वरील प्रसंग विचार करण्यासारखा आहे. ' शास्त्रीय ज्ञानांत ढवळाढवळ होऊं नये ' हें कारण महत्त्वाचें दिसतें.

शास्त्र : अर्थ अर्थादिक : नव्हे प्रमाणीक : अवीहीत ॥२९४॥' असा दंडक घातला गेला.

याप्रमाणे 'शास्त्रान्वय' सांगितल्यावर, यासंबंधी प्रमाणभूत ग्रंथ कोणी कोणी केले याचें वर्णन आलेलें आहे.

लीळाचरित्रकार माहींभट, सूत्रांचा अन्वय लावणारे केशिराजव्यास, वत्सहरणकर्ते दामोदर पंडित, उद्धवगीता करणारे भानुभट्ट बोरीकर, लक्षणरत्नाकराचे निर्माते आनेराज, गद्यराजाचे लेखक हयग्रीवाचार्य, रुक्मिणीस्वयंवर लिहिणारे नरेंद्रकवि, ज्ञानप्रबोधकार विश्वनाथ, सांकेतिक लिपीचे कल्पक 'रवळोव्यास' इत्यादि अनेक ग्रंथकारांची माहिती १५७ पासून २५० ओवीपर्यंत दिलेली आढळते. शेवटीं 'इत्यादि अन्वयो : सकळशास्त्राचा : वर्णीयला वाचा : कृष्णमुनी ॥२९८॥ एवं अन्वयो **वोवीया** दोनसें आठयानेउ संपूर्णमीती' असें आहे.

६. वरील वर्णनाच्या ओव्यांत आलेल्या कांही महत्वाच्या गोष्टींकडे वाचकांचें लक्ष वेधणें जरूर आहे.

(अ) ग्रंथाचे शेवटीं 'अन्वयाच्या' एकंदर २९८ ओव्या संपूर्ण झाल्या असें म्हटलें आहे. वास्तविक पाहातां हा छंद अगदीं 'अभंगा'-सारखा दिसत आहे. 'देवाचीये द्वारीं, उभा क्षणभरीं' या हरिपाठ अभंगाच्या चालीवर ह्या 'ओव्या' आपण म्हणूं शकतों. तथापि वोवी' म्हणून येथे निर्देश केला आहे.

(आ) 'वत्सहरणा'विषयी माहिती देतांना, ग्रंथकार म्हणतो, 'केशवा वीयोगीं : पंडीतासी[1] दुःख जालें सवीशेख : स्नेहवशें ॥७१॥ यानंतरें ग्रंथ : वछाहरण केलें : **अभंगी घातलें : केशवातें** ॥७२॥ सौजन्य करुनि : केशवराजमुनी : **अभंगी घालुनी** : ग्रंथ केला ॥७३॥ **आंतीचा अभंगी** : दामोदर जाणा : पातली नामना : पंडीताची ॥७४॥' वरील उताऱ्यांतील ' अभंगी घालणें ' या वाक्प्रचाराचो[2] प्राचीन अर्थ लक्षांत

१ दामोदरपंडित. २ ' अभंग ' शब्दाची ' प्रतिभा ' मासिकांतील चर्चा पहा.

ठेवण्यासारखा आहे. ‘ वत्सहरण ’ काव्यामध्ये ज्या ज्या वेळीं एखादा वर्णनीय भाग संपत आला आहे असें आपणाला दिसतें, त्या त्या ठिकाणीं ‘ म्हणे मुनी केशिराजु ( उदाहरणार्थ, ओवी ६, वत्सहरण ) हे शब्द येतात. वास्तविक अशा वेळीं ‘दामोदर’ हें नांव पाहिजे, पण स्नेहाकरिता कवीने ‘केशिराज’ असें अंतीं घातलें आहे. ‘वत्सहरणाचा’ छंद, ओवी आहे, पण तेथे प्रत्येक प्रकरणाच्या अंतीं ‘केशिराज’ नांव घातलें गेलें असून, शेवटीं देखील केशिराजाचें नांव कवीने घातलें, पण आपल्या पत्नीच्या विनवणीवरून आपलें नांव शेवटीं जोडलें.

(इ) म्हाइंभटाचें लीळाशोधन ( ओ. ३३–३८ ) झाल्यावर पुढे ‘खालस्याच्या धाडींत’ तो ग्रंथ नाहीसा कसा झाला, व त्यानंतर, परशराम, रामेश्वर, उपाध्ये–आम्नायांतील हीरांबा यांनी त्या ग्रंथाचें पुनः संशोधन कसें केलें याची हकीकत १३६ ते १४६ मध्ये वर्णिली आहे. त्यावरून म्हाइंभट, हीरांबा, रामेश्वर, परशराम व शेवटीं गुर्जरशिवबास हे लीळाचरित्राचे संकलनकार आहेत असें दिसतें. गुर्जरशिवबासांच्या पाठाला ‘पिढीपाठ’ म्हणतात, व पारमांडल्य आम्नायांतील पाठाला ‘नागनाथपाठ’ म्हणतात ( ओ. २९५–२९७ ).

(ई) कवीश्वरांच्या–भानुभट बोरीकर यांच्या शिशुपाळवधासंबंधी पुढील विधानें महत्त्वाचीं आहेत. ग्रंथ वोवीबद्ध : शीशुपाळ केला : भटा दाखवीला : वाचुनीया ॥१६८॥ भटीं म्हणीतलें : ग्रंथ नीका जाला : रसवृत्ती भला : प्रवृत्तासि ॥१६९॥ परि नीवृत्तासी : योग्य नव्हे ग्रंथ : बहु रस वृत्त : वोडवला ॥१७०॥ **एक म्हणताति : भाई देवोबासी : योग्य प्रवृत्तासी : म्हणीतीलें** ॥१७१॥ यानंतरें दुजा : **यकादश** केला : तो उपयोगीक जाला : नीवृत्तासि ॥१७२॥ ’ ह्या उताऱ्यावरून ‘शिशुपाळवध’ ग्रंथ तयार झाल्यावर, तो भटोबासांना म्हणजे नागदेवांना प्रथम दाखविला गेला, अशी ग्रंथकाराची माहिती परंपरेची आहे; पण त्याच वेळीं ‘ तो ग्रंथ ‘भाइदेवबास’ यांना प्रथम दाखविला ’ असेंहि जें मत त्या वेळीं प्रचलित होते, त्याची नोंद प्रामाणिकपणे दिलेली आहे. प्रो. कोलते यांनी कवीश्वर भानुभट बोरीकर यांच्या चरित्रांत शिशुपाळ-

वधासंबंधी केलेल्या विधानाला, प्रतिकूळ असा हा पुरावा आहे, हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

(उ) महानुभावपंथाचा मराठीविषयी अभिमान पुढील ओव्यांत प्रकट झालेला दिसतो. केशिराज व्यास संस्कृतमध्ये रचना करण्याची आज्ञा मागत असतां नागदेवाचार्यांचें म्हणणें पुढीलप्रमाणे वर्णिलेलें आहे. (ओवी ५० ते ५७). 'रत्नमाळास्तोत्र' पाहून नागदेवांनी केशिराजांची प्रशंसा केली 'जोडीलीं माणीकें : हेमावरी ॥४८॥' पण पुढे ते म्हणाले, तुझी वाणी जरी चांगली असली, तरी संस्कृत शब्द अवघड आहेत. त्यांचा अर्थ प्राकृतांना कळणार नाही. शिवाय 'परमार्गाचीया : आइया बाइया : नागवती तीया : न कळता : ॥५२॥ संहस्कृत शब्द : आती आवघड : ते वेडेबागडें : काइ जाणें : ॥५३॥' तेव्हा यानंतर केशवपंडित 'सैल-भाषा' आपले ग्रंथ रचूं लागले. व हा 'दण्डक' पुढे परंपरेने पाळण्यांत आला.

(ऊ) सिद्धान्ते हरिराज व गुर्जरशिवबास यांनी जो बावीस पक्षकारांचा समन्वय केला त्यांचीं नांवें ओव्या २५८-२६६ यांमध्ये वाचकांना आढळतील. त्याचप्रमाणे निरनिराळे पक्षकार कोणत्या खुणेने ओळखले जातात याचें विवेचनहि त्या ओव्यांत उपलब्ध होईल.*

(ऋ) अचळ व धाराशिवकर वंकेराज या दोघांमध्ये कांही कारणाने गैरसमज कसा उत्पन्न झाला, व पुढे तो नाहीसा होऊन, त्यांनी शास्त्राचा अन्वय नीट कसा लावला यांचें वर्णन ( ओ. २२६-२४८ ) कवीने सविशेष केलेलें आहे, तेंहि परंपरेच्या दृष्टीने महत्त्वाचें आहे.

७. सारांश, महानुभावीय वाङ्मयांतील महत्त्वाच्या व्यक्तींची व ग्रंथांची स्थूल माहिती थोडक्यांत या प्रकरणांमध्ये आली असल्याने या पोथीचें महत्त्व फार आहे हें निराळें सांगणें नको.

---

* यासंबंधी विशेष माहिती, **आचारस्थळ** (ह. ना. नेने यांनी संपादिलेलें, त्यागप्रकरण, प्रस्तावना, पृ० ४-५ पाहा.)

## अन्वयमाळिका

श्रीपरेसाये नम : ॥ : प्रथम नमन : **श्रीरंग सावळा :**
कैवल्ये पुतळा : चक्रवर्ती : १

नमीयेला सखा : **आत्रीचा नंदन** : आमोघ दर्शन : दत्तात्रयो : २

प्रणीपात केला : **श्रीप्रभु गोविंदा** : कुंमी ब्रह्मपदा : पावनीता : ३

**द्वारावती सीद्धा : बावनासी दाता** : तया श्री अनंता :
प्रणीपात : ४

उधरण हेतु : जीवाचें वेसन : तो नमीला ब्राह्मन : **चक्रधरु** : ५

चक्रधर वरू : दीधला जयासी : तया **नागींदासी** : दंडवत : ६

सहस्त्रपोटळी : भंगीली प्रतापें : तो नमु ज्ञानदीप : **म्हाइंभट** : ७

परमार्गा रक्षण : नीमीत्य कारण : ते नमीली सगुण : **माहादंबा** : ८

श्रीप्रभुसेवेची : लाधली प्रसंता : ते नमीयेली **माता**
**नागींद्राची** : ९

नखू दाढ फोडी : प्रसाद लाधली : ते **येल्हवा** नमीली : मनोभावें : १०

प्रणीपात केला : आपणया येरा : मार्ग परंपरा : नमीयला . ११

उपाध्य आम्नाये **कमळंवा** योगीनी : ते नमीली साजणी :
भक्तीभावें : १२

उभय आम्नाये : दोहीस्तंभ धीर : तो **अचळवंकार** :
नमीयला : १३

**धारासीव** पीढी : ज्ञानाचा मयंक : तो नमीला आइक :
**वंकेराज** : १४

ऐसा अनुक्रमें : केला प्रणीपात : नमीला अनंत : परंपरा : १५

कोल्हेकर वील्हे : दामेराजसुत : नमीला महंत : **सीवेराज** : १३

सीवराजसुत : **बल्लाळ** वीख्यात : तया प्रणीपात : पुनःपुन्हा : १७

बल्लाळप्रसादें : आन्वयोमाळीका : सांघेन आइका : परंपरा : १८

भज मति नाहीं : बोलावया आतां : बल्लाळ प्रसंता : बोळलीसे : १९
प्रसंता बोळली : आन्वयो ज्ञानाचा : बोले **डींभ** वाचा : अल्पमती : २०
परमार्गीचीया । पुरुषा लागुन : बोलीली **प्रमाण : चतुर्वीध** : २१
श्रुत पै संस्मृती : तीजा वृद्धाचार : चवथी सुंदर : मार्गरूढी : २२
ईश्वरें श्रीमुखें : केलें नीरोपण : श्रुत पै गहन । बोलीयेले : २३
भटां वीद्यमानीं : **केशराज** वर्तन : ते संमुर्ति प्रमाण : बोलीयेली : २४
**प्रसराम** आणी : दुजा **रामेश्वर :** तीसरा सुंदर : हर्दमुनी : २५
**हीरांबा नागंबा** : मुख्य पाचजण : याचें वर्तमान : वृद्धाचार : २६
**आचळ मुरारी** : **धारासीवकर** : सीधांत सुंदर : **हारीराज** : २७
**सीवाख्या गुर्जर** . मुख्य मार्ग फार : चोघाची सुंदर : मार्गरूढी : २८
यानंतरें पुढें : काही जीवहेत : जाला संचरीत . अभिमान . २९
म्हणोनीया च्यारी : प्रमाणें मार्गासी : श्रुतिमुख ऐसी : प्रतेष्टीली : ३०
चहु वीरहीत : प्रमाण बोलती : तेथ अधमति : युक्तत्रये : ३१
आतां परीयेसा : आन्वयो ज्ञानाचा : बोलवीन वाचा : अल्पमती : ३२
म्हाइंभटी केली : लीळेची शोधूनी : भटा दाखउनीं : तीन्हीरूपें : ३३
अनुभवीच्या लीळा : ज्या श्रुत जयासी : सोधीलें तयासी . म्हाइंभटी : ३४
सात पाच अथवा : एक लीळा श्रुत : सोधुनि तयातें . लेहीएल्या : ३५
नागदेव दृष्टी : लीळा दाखउनि : वीहीत करुनि : लीहीएल्या : ३६
ऐसा म्हाइंभटी : लीळेसी संबंध : लावीला नीबंध : भटदृष्टीं . ३७
तीन्हीरूपें लीळा : श्रुती नीवडुनी . काढील्या तेथुनी : कवणे ठाइं : ३८
भटा वीद्यमानी : **केशव पंडीती** : नीवडील्या श्रुती : लीळेमाजी : ३९
पुर्वी पंचकृष्ण : नवही प्रकर्णें : भटा संबंधुन : दाखवीली : ४०
दोन शतें नऊ : वचनें **आचार** : संबंध सुंदर : लावीयेला : ४१
दोनशें पंच्याशी : **विचार**वचनें : संबंध गहन : लावीयेला : ४२
चौदोत्तर शत : श्रीमुखदृष्टान्त : दृष्टांतासहीत : लापणीक : ४३

ऐसा श्रीमुखासी : संबंध लाउनि : भटा दाखउनि : वीषेशीला : ४४
इत्यादि अन्वयो : केशव पंडीतीं : लावीला नीगुती : श्रीमुखासी : ४५
श्वसुरा बंधनीं : केल्यारूपें दोन्ही : चौदाशें मांडनी : **रत्नमाळा** : ४६
आणीक दृष्टांत : स्तोत्र करूनीया : भटा वाचोनीया दाखवीलें : ४७
भटीं आइकीलें : प्रशंसापुर्वक : जोडीलीं माणीकें : हेमावरी : ४८
प्रशंसापुर्वक : आइकोनी भावें : काइ नागदेवें : म्हणितीलें : ४९
नागदेवो म्हणे : केशवपंडीता : वाणी हे आमृता : ऐसी तुझी : ५०
परि अवघड : शब्द संहस्कृत : न कळे शब्दार्थ : प्राकृतासी : ५१
परमार्गीचीया : आइया बाइया : नागवती तीया : न कळता : ५२
संहस्कृत शब्द . आती अवघड : ते वेडबागडें : काइ जाणे : ५३
यानंतरें पुढें : केशवपंडीत : राहीले करीत : **सैल भाषा** : ५४
सकळशास्त्राशी : संबंध संस्कृत : लावावा हा हेत : केशवाचा : ५५
त नीराकारण : केला नागदेवें : सकळासी होआवें : शास्त्रज्ञान : ५६
या हेतु नागणें : संस्कृत बोलणें : केलें नीराकणें : केशवासी : ५७
ज्ञानकळानीधी : स्तोत्र एक केलें : तेंही दाखवीले : नागदेवा : ५८
इत्यादी संबंध : केशवें लावीला : तो उपयोगा जाला : परमार्गा : ५९
नागदेवामुखें : अन्यत्र बोलणें : न ये हा बाबने : वर दील्हा : ६०
भटां वीद्यमान : अन्वयो सुंदर : लावीला चतुरें : केशराजें : ६१
ऐसे आठ ग्रंथ · केशव पंडीतीं . केले भटाप्रती : शोधुनीया : ६२
नागदेव आख्या : जाली वेधवंती : आला नाथपंथी : दर्शनासी : ६३
नाथ जाणे ऐसा : तेणें प्रश्न केला : तो पंडीताही केला : नीरुत्तर : ६४
नवनाथ जाण : तेचि नाथपंथ : हे चौपदी पंडीत : बोलीयेले : ६५
मग प्रस्ता इका : साटी चौपदीया : पंडीती केलीया : नाथवाणी : ६६
सीवा चौपदीया : ऐकुनीया भावें : काइ नागदेवें : म्हणीतीलें : ६७
भटी म्हणीतलें : पंडीत केशव : माझे हे आव्येय : मुख्यनेत्र : ६८

**पंडितं[1] केशवें[2]** : माझे दोन्ही नेत्र : प्रसन्न वगत्र (वक्त्र) प्रशंसीले : ६९
साटी चौपदीया : पंडिताचें कृत्य : **वछाहरण** ग्रंथ : केला तीहीं : ७०
केशव वीयोगीं : पंडीतासी दुःख : जाले सवीशेख : स्नेहवशें : ७१
यानंतरें ग्रंथ : वछाहरण केलें : **अभंगी घातलें** : केशवातें : ७२
सौजन्य करूनी : केशवराजमुनी : अभंगी घालुनी : ग्रंथ केला : ७३
आंतीचा अभंगीं : दामोदर जाणा : पातली नामना : पंडीताही : ७४
ऐसा वछाहरणी : ग्रंथ केला नीका : आरता आइका : नवपदी : ७५
रीधपुरलीळा : स्तोत्र नवश्लोक : केले वीरहे दुख : पंडीताही : ७६
नामावळी स्तोत्र : नव श्लोक केले : पंडीताचें जालें : कृत्य ऐसें : ७७
ऐसीं पांच वाक्यें : काव्यें पंडीताचीं : नामना तयाची : दामोदर : ७८
**सारंगपंडीत** : श्रीप्रभुभेटीसी : आले दर्शनासी : रिधपुरा : ७९
**हृदय भज** ऐसा : श्लोक म्हणीतला : प्रणीपात केला : श्रीप्रभुसी : ८०
**उधत परिमळ** : आरती बरवी : केली **रामदेवीं : आकाइचां** : ८१
दाहा दशकाच्या : केल्या आरतीया : तीया बोलीलीया : म्हाइंभटीं : ८२
**चरण शरण** : मुख्य पांच श्लोक : केलें कवतुक म्हाइंभटीं : ८३
पाच श्लोक आणी : धवळ करुनी : माहादंबें लागुनी : घोकवीती : ८४
माहादंबें करवी : श्रीप्रभु भवरी : धवळाची परी : गाववीली : ८५
इत्यादी हें कृत्य : लीळारूपें तीन्ही : केलीसे सोधनी : म्हाइंभटीं : ८६
म्हाइंभट कृत्य : लीळाबंध केला : तो अवचीता गेला **धाडीमाजी** : ८७
उंबरवटाचें : पात्र पै थोरलें : धाडी माजी गेलें : तेंही देखा : ८८
थोरला जो होता : दाढेचा वीशेक : प्रसाद अणीक : चौथा भाग : ८९
इत्यादीक होते : **बोल्हाइसा** पासीं : वेवस्था तयासी :
ऐसी जाली : ९०
प्रसाद मात्रेचें : चार भाग केले : चौ ठाया दीधलें : प्रशरामें : ९१ :

---

१ दामोदर पंडित. २ केशीराजव्यास.

क्षेपणीका पुरुषा : होए अलींग्रन : दीधलें म्हणून : चहु ठाइं : ९२
वस्त्र प्रासादाचे : वीशेख दाढेचे : भाग केले त्याचे : च्यारी तेही : ९३
वीशेक जो होता : दाढीचा थोरला : प्रसाद दीधला : चतुर्भाग : ९४
लीळाग्रंथ आणी : इत्यादी वंदन : **बोल्हाइ** घेउन : जात होती : ९५
**खालस्याची** धाडी : आली होती जही : नाही जाली तेही :
इत्यादीकें : ९६
ऐसा एक भाग : धाडी माजी गेला : प्रसाद उरला : तीन भाग : ९७
मार्गींद्र आचार्यां : उपाध्य ग्रासास : **दादो दादो** ऐसे : आळवीती : ९८
माग देवा आधीं : ग्रोध उपाध्यासी : म्हणोनि तयासि : मान देती : ९९
उपाध्याची धाडी : कमळांग्रा साजनी : शीष्य ही म्हणोनि :
होती तया : १००
तीये उपाध्याइ : भटा संपादीली : तेची जया जाली : नामना ते : १०१
यालागी उपाध्ये : कमळांग्रा म्हणती : वडीलाचा देती : मान तया : १०२
म्हणोनि आइका : प्रसरामग्रासी : भाग कमळांग्रेसी : दोल्हा एक १०३
यालागी धाकुटा : दाढेचा वीशेक : श्रीप्रभुचें नख : दील्हे तया : १०४
मुर्त नीष्ट दोनी : दीधले विशेक : प्रसाद अणीक : भाग दुजा : १०५
ऐसा चतुर्भाग : कमळांग्रे दिधला : तो परंपरा आला : **वंकराजा** : १०६
देहावधी केले : प्रसादसेवन : धारासीर्वां तेणें : **वंकेराजें** : १०७
वंकेराजा पाठीं : शिष्य **येल्हाइसें** : दुजी पद्माइसें : होती देखा : १०८
तीसरी नोमाबा : जोमाग्राइ वती : चौघीपासी होती : देवपुजा १०९
चौघी ग्राइयासी : **गुर्जर सीवबासी** : भ्रमतुची ऐसी : भेट जाली : ११०
भेटी जाल्यावरी : **अचळ नंदन** : सारीलें वीधान : वीधी युक्ती : १११
जालीया वीधान : चौघी ग्राइयास : आटण उद्रस : उपनळा : ११२
**सीवबासा** पासी : वंदन ठेउनी गेल्या चौघी जणी : आटनासी : ११३
सोळाही स्थडीलें : वस्त्र प्रसादीक : दाढेचा वीशेक : ठेवीयेला : ११४

वंदन ठेउनी : आटना लागुनी : गेल्या चौघी जणी : वीदेशासी : ११५
उत्कर्षे आटन : केलें आकर्षुन पाडीलें शोकुन : चौघी जणी : ११६
दोघी फीरोनीया : आल्या एक वेळी : प्रसाद नीडळी : लावीयेला : ११७
प्रसाद वंदनी : गुर्जरा भेटोनी : वंदन ठेउनी : गेल्या तीया : ११८
फीरोनीया दोघी : गेल्या आटनासी : तीयाही देवासी : पावलीया : ११९
प्रसाद वीशेक : आचळ पीढीसी : सीउब्रासा पासी : राहीला तो : १२०
आणीक प्रसाद : वीशेक नखाचा : तो होता ठाइचा : सोने ब्रेपें : १२१
सोनाइसापासी : नखाचा वीशेक : प्रसाद आणीक : होता काही : १२२
धारासीव पीढी : जाउळे वील्हेसी : आला परीयेसी : वीशेक तो : १२३
तीसरा जो होता : वीशेक दाढेचा : वस्त्र प्रसादाचा : भाग तीजा : १२४
कवीश्वर ब्रासी : धाडी नागाइसें : दीधला तीयेस : भाग तीजा : १२५
तोही भाग आला : सीउब्रा पीढीये : ऐसें भाग्यद्वयें : आले तेथें : १२६
चवथा धाकुटा : दाढेचा वीशेक : वस्त्र प्रसादीक : चतुर्भाग : १२७
चतुर्भाग आणी : सेंद जे कर्पुरा : ते दीधली कुमरा : रेमाइसा : १२८
ऐसा चौथा भाग : **कुमर** पीढीसी : आला परीयेसी : परंपरा : १२९
**साधीं** देहा आंतीं : परशरामासी : दील्हे वीशेकासी : दाढेचीया : १३०
ब्राहुटा दीधला : उंब्ररवटाचा : अन्वये मुळीचा : ऐसा असे : १३१
उंब्ररवटाची : एकी पातुरली : **चक्रपाणी** आली : **आमनाइ** (आम्नाइ) : १३२
महेश्वरसुत : चक्रपाणी देखा : नातु होता सखा : नागदेवा : १३३
भट्राचेनि नावें : तेही भीक्षा केली : म्हणोनि दीधली : कवीश्वरीं : १३४
दुसरी पातुरली : होती ते आइका : काइ जाली देखा : नेणीजे ते : १३५
ऐसा हा वंदना : अन्वये मुळीचा : सांघीतला वाचा : येथास्थीत : १३६
**म्हाइंभटोबासीं** : लीळाबंद केला : तो धाडीमाजी गेला : सकळही : १३७

उपाध्य **कंजाख्या** : तयाची नंदनी : हीरांबा योगीनी : प्रज्ञावंत : १३८
एकसंदी प्रज्ञा : होती हीरांबेसी : सोधनी लीळेसी : केली तेही : १३९
लीळेचा संबंध : म्हाइंभट कृत्य : सकळही श्रुत : हीराइसा : १४०
सकळही श्रीमुख : होते मुखपाट : प्रज्ञा पै आचाट : एकसंधी : १४१
लीळा तीन्ही रूपें : हीरांबा शोधनी : पुस्तकें लीहुनी : बंद केला : १४२
तीया लीळाधारें : आदी तीन्ही रूपें : केल्या ज्ञानदीपें : **प्रशरामें** : १४३
आणीक एकशत : दुसरा **आचार** : **स्वातंत्री** उच्चार : प्रथमत्री : १४४
तैसाची दुसरा : वीत्तारवचनें : एकसत ज्ञान : त्रेताळीस : १४५
**ज्ञानमोचक** हा : उच्चार प्रथम : ऐसें प्रशरामें : शोधीयेले : १४६
आणीक प्रमयें : नीर्वचन केलें : तेंची बोलीयेलें : आस्तीपर : १४७
थोर मुर्तज्ञान : दृष्टांत प्रमयें : इत्यादी अन्वय : प्रशराम : १४८
**चैतन्य मूर्तीका** : द्वादश वचनें : केलें उद्धरण : आस्तीपर : १४९
ऐसे आठ बंध : प्रशराम केलें : आन्वइ लावीलें : ज्ञानदीप : १५०
ऐसा प्रशराम : मयंक ज्ञानाचा : दीपक कुळीचा : उभयेता : १५१
तीसरा आचार : प्रथम उच्चार : प्रतीती सुंदर : वीशेषीली : १५२
एकशत आणी : संख्या त्रेताळीस : तीजा आचारास : अन्वये तो : १५३
तैसाची तीसरा : सातीया वचनाचा : आन्वयो वीचाराचा : लावीयेला : १५४
प्रथम वचनीं : शोधक बोलीला : हा संबंध लावीला : रामेश्वरें : १५५
तीसरी शोधनी : रामेश्वरें केलीं : ते परंपरा आली : मारगासी : १५६
इत्यादी श्रीमुखा : आधार लीळेचा : जेथें परावाचा : आश्राइत : १५७
लक्ष्मींधर भट : देउळ वाडाचें : कृत्य पै तयाचें : स्तोत्र एक : १५८
ज्ञानकळानीधी : स्तोत्र होतें केलें : तें सगडी घातलें : भटोबासी : १५९
वीरह्या पुर्षासीं : जाती अंतःकरणें : म्हणोनि दहन : दील्हे तया : १६०
**मग या नंतरें** : दुजें स्तोत्र केलें : नांव ठेवीयेलें : ज्ञानभानु : १६१

**ज्ञानभास्कर** हें : स्तोत्र पै तयाचें : देउळ वाडाचें : लक्ष्मीधर : १६२
**नीर्वचन स्तोत्र** : अठरा श्लोकांचें : बोलीयेले वाचे : कवीश्वर : १६३
**पुजा अवसर** : सत्तावीस श्लोक : आणीक प्रास्तावीक :
चाळीस ते : १६४
नीर्वाळा पै स्तोत्र : नीळांबोज केला : भास्कर बोलीला : कवीश्वर : १६५
अवतार सकट : सातपाच श्लोक : आष्टकें आणीक : तीन केली : १६६
जीराष्टक आणी : दुजे वीराष्टक : तीजें श्रीयाष्टक : संहस्कृत : १६७
ग्रंथ वोवीबद्ध : शीशुपाळ केला : भटा दाखवीला : वाचुनीया : १६८
भटीं म्हणीतलें : ग्रंथ नीका जाला : रसवृत्ती भला : प्रवृत्तासी : १६९
परि नीवृत्तासी : योग्य नव्हे ग्रंथ : बहु रसवृत्त : वोडवला : १७०
एक म्हणता : भाइदेवोबासी : योग्य प्रवृत्तासी : म्हणीतीलें : १७१
यानंतरें दुजा : **येकादश केला** : तो उपयोगीक जाला :
नीवृतासी : १७२
ऐसे बारा बंद : कवीश्वरी केले : ते प्रमाणीक जाले : प्रमार्गासि : १७३
पारमांडल्यें पै : आनेराजबास : **लक्षणें** बत्तीस : बोलीयेले : १७४
आणि संहस्कृत : आंता अक्षेरी केली : तेही बोलीयेली : आनेराजे : १७५
तयाचाचि सीष्यीं : वासुदेव भटीं : कवीश्वराप्रती : प्रश्न केला : १७६
आणि धाकुटया : **हारी गर्व बासी** : संबंध **गद्यासी** :
लावीयेला : १७७
पुजा अवस्वर : बारा श्लोक केलें : राघोबा बोलीले : भट सीष्यें : १७८
आणीक गीतेची : अर्थ टीका केली : तेही बोलीयेली : राघोबासी : १७९
वोवीबंध केले : पुजा अवस्वर : वोवीया सुंदर : साती संख्या : १८०
इत्यादी हें कृत्य : **राघवपंडीतीं** : आन्वयें पद्धति : ऐसी असे : १८१
**नरींद्रवासाही** : ग्रंथ व्यवहारी : केला देवगीरी : नरींद्र तों : १८२

**ज्ञानप्रबोध** हा : केला **वीश्वनाथें** : सीवराजसुतें : वाडेग्रामीं : १८३
तत्काळी आचळ : मल्लेराजसुत : **बाहाळे** वीख्यात : नारायण : १८४
**नारोबासी** केलें : रीघोर वर्णन : संबंध लाउन : मनोहर : १८५
साइलो गारुड : वर्त डंक वेली : इत्यादीक केली : नारायणें : १८६
**फुलते बरवी** : ऐसी हो आरती : केली पै व्युत्पत्ती : नारायणें : १८७
**आचळ दायंबा** : नीर्वेद बोलीले : तीस श्लोक केले : गद्येचाली : १८८
आणीक बोलीले : आरतीया दोन : इत्यादी करण : दायेंबासी : १८९
रीधौर माहात्में : **महेश्वरपंडीत** : नीर्वेद वीत्पत : केलें तेही : १९०
हीराइसा शीष्य : **रवळोबा** वीत्पन्न : सैह्याद्र वर्णन : ग्रंथ केला : १९१
आणी **दाहा ठायें** : केले पै **नामाचे** : लीपकृत्य त्याचे :
नागरीक : १९२
धारासीवकर : वोंकारबासाही : स्मृती केल्या तीही : पाचशतें : १९३
आणीक वीगोवा : कृत्य पै तयाचें : बोलीयेला वाचे : वंकेराज : १९४
पाठ सांप्रदाइ : पुजा अवस्वर : बोलीले सुंदर : हरीराज : १९५
आठा दृष्टांताची : प्रमयें बोलीले : मुर्तज्ञान केले : आर्ध पान : १९६
आर्ध पानावरी : प्रसाद सेवना : बोलीली वीत्पन्ना : **हारीराज** : १९७
**सीधांत** नामना : जयासी शोभली : इत्यादीकें केली : **हरीराजें** : १९८
कवीस्वराचीया : नागंवें आइनें **माळीका लक्षणें** : केली तेही : १९९
**शयापाळनेचा : दुर्भग दृष्टान्त** : नागाइसीं कृत्य :
चारी देखा : २००
चहु प्रमयातें : माळीका जे होती : **दाये भागवती** : दवडील्या : २०१
**राजुर लक्ष्मीधरीं** : भटाचें शोधनें : केलीं पै लक्षणें :
प्रकर्णाचीं : २०२
**नांदेडकर मुनी** : **बास** ज्या माळीका : बोलीले आइका :
त्याही केला : २०३

उपाध्ये आम्नाइ : **हर्दमुनीबास** : तेही माळीकास : बोलीयेले : २०४
आमुर्त मवले : केलें **मुर्तज्ञान** : इत्यादी कारण : हर्दमुनी : २०५
**कुमरमुनीबा** : माळीका केलीया : त्या दोनी आलीया :
परमार्गी : २०६
**माहावाक्य प्रमयें : सीउवासीं** केलें : तेचि बोलीयलें :
आस्तीपर : २०७
पाचाही पुर्न्यांचें : केलें मुर्तज्ञान : स्वमत संचरण : केलें तेही : २०८
आणीक थोरली : प्रसादसेवना : पीढीपाठ जाणा : चरीत्राचा : २०९
सकळही पाठ : शोधुनी शीवबासी : आन्वयो लीळेसी : लावीयेला : २१०
**पीढीपाठ** ऐसें : नांव ठेउनीया : शोध शोधनीया : मांडीयेला : २११
इत्यादीक ऐसी : शीवाची शोधनी : आणीक मांडणी : प्रमयाची : २१२
दुर्योधन नीमीत : आचळ मुरारी : केली अस्तीपरी : कापराची : २१३
चीधाइक दृष्टांत : संख्या पंचावन्न : ब्रल्हो आत्मज्ञान : संनिपात : २१४
ग्रहणादानाचा : ब्रल्हो संचरणाचा : ऋषीही शृंगाचा : ऐसे पांच : २१५
पाच ब्रल्हो आणी : वर्त वीहारासी : **पेठे हारीबासी** :
सात केली : २१६
पल्होबासी केलें : दृष्टांतप्रमयें : ऐसा आनवये : आला असे : २१७
आणीक दृष्टान्त : प्रमये बोलीले : **हेतुस्थळ** केले : न्यायेबासी : २१८
लाहानें मुर्तज्ञान : प्रसाद सेवना : एकत्र ती चौपाना : वरी असे : २१९
आणी श्लोकबंध : पुजा अवस्वर : केले **बीडकर : मुधोबासी** : २२०
वृक्षाची चौपदी : तीची टीका केली : इत्यादी बोलीली : मुधोबासी : २२१
तीसरा **नागनाथ** : पाठ चरीत्राचा : **पारमांडल्याचा** :
नागोबासी : २२२
**तळेगांवकर : दत्तोबा** वडील : तेहीं एक केलें : मुर्तज्ञान : २२३
**मल्हेकोयाबासी** : पुजा अवस्वर : केले पै सुंदर : श्लोक सात : २२४

**आचळबासाही** : रत्न वीकावया : पाठवीले तया : धारासीवा : २२५
**वंकेराजे** रत्नें : वीकोनीया द्रव्य : पाठवीले सर्व : **आचळाचें** : २२६
**आचळा** अंतरी : वीकल्प जनला : कांहीं अभीलाप केला :
हीरण्याचा : २२७
द्रव्य अभीलाशीलें : धारासीवकरी : हा संशयो अंतरीं :
**आचळाचा** : २२८
ते वार्ता श्रवणीं : ऐकीली **वंकारे** : धैर्यांचा सागर : नुचंबळे : २२९
धैर्याचा समुद्र : न लंघी मर्यादा : काही अनुवादा : न करीति : २३०
मग काळांतरीं : उपाध्ये आइया : भ्रमत आलीया : पाथरीसी : २३१
पाथरीये ग्रामीं : **आचळबासासी** : उपाध्या आइयासी :
भेटी जाली : २३२
कवीश्वर आया : होत्या तीये ठायीं : तेही गाइयेली वोवी :
**आचळासी** : २३३
आचळावरी **वोवी** : गाइली सुंदरी : आभीलाश तोडरी : मुरारीचा : २३४
ते वोवी ऐकीली : उपाध्ये आइयाही : गाइयेली तेही : वोवी ऐसी : २३५
आभीलाश मळ : न लगे अळुमाळ : तो **वंकार** निर्मळ :
जाण सये : २३६
वोवी ऐकियेली : आचळ मुरारी : वीकल्प अंतरी : नीवर्तला : २३७
वोवी आइकीता : गेली वीषमता : भेटीची अवस्था : उपनली : २३८
**वोंकारा** भेटीची : आपक्षा **आचळा** : आले तीये वेळा :
धारासीवा : २३९
धारासीवी भेटी : जाल्या परस्परें : उपाध्ये कवीश्वर : उभयेता : २४०
उभयता दोनी : **वंकार आचळ** : जाला भेटकाळ : परमप्रीति : २४१
परस्परें पाड : ईश्वरभेटीचा : जाला आनंदाचा : पर्वकाळ : २४२
समस्त मार्गासी : मंगळकाळ जाला : उछावो वर्तला : उभयेता : २४३

खानपानादीक : वस्त्र पालटाचें : वीधान भेटीचें : वीधीयुक्त : २४४
ऐसें परस्परें : सारीलें वीधान : चर्चाही मथन : शास्त्रादीक : २४५
शास्त्रादी मथनें : कथावार्तादीक : चर्चा सुकौतुक : पक्षपाती : २४६
ऐसा मंगळाचा : जाला भेटकाळ : वंकार आचळ : उभयेता : २४७
उभये आम्नाये : दोन्ही आधीकर्णे : मार्ग या आधीन :
समस्तही : २४८
**सीधांते हरीराज** : वंकेराजा शीष्य : शीष्य आचळास :
सीवेराज : २४९
उभयेता सीष्य : **हारी सीउवास** : मानोत्तर असे : येक याचे : २५०
समान श्रुतता : उभयेता दोन्ही : हरीराज आणी : सीवेराज : २५१
वंकार आचळ : गेले देवाभेटी : यानंतरें पाठीं : परीयेसा : २५२
पाथारीए ग्रामीं : उभयेता दोन्ही : सीउव्रास आणी : हरीराज : २५३
उभये संवादें : सोधुनी नीबंध : **लावीला संबंध** :
**तीही स्थळा** : २५४
बावीस प्रमाणें : शोधीले नीबंध : स्थळी पक्षभेद : मांडीयेले : २५५
बावीस प्रमाणे : तेचि पक्षभेद : नामना प्रसीद्ध : परीयेसा : २५६
म्हाइभट[१] आणि : उपाध्ये[२] जाणीजे : तीसरा बोलीजे आनेराजे[३] : २५७
राजुर[४] लक्ष्मीधर : कवीश्वरे[५] बास : गोपाळबा[६] पक्ष : बोलीयेला : २५८
मयंक आमृते[७] : उपाध्ये कमळांबा[८] : कुमर रेमाबा[९] : ऐसी नव : २५९
दोहाडी नागांबा[१०] : नाति नागाइसें[११] : आणि हीराइसें[१२] :
हदंमुनी[१३] : २६०
प्रसराम[१४] बास : आणि रामेश्वरे[१५] : धारासीवकर : वंकेराजे[१६] : २६१
कुमर मुनीबा[१७] : पेटे हरीबास[१८] : आणि आबाइसें[१९] : म्हांबणीची : २६२
पातुरवंकोर[२०] : फर्यटेचा पक्षे[२१] : ऐसे एकवीस : पक्ष जाले : २६३
मुनीबास पक्षे[२२] : नांदेडकराचा : ऐसा बावीसाचा : **तपशील** : २६४

हारीबांस[२३] आणी : सीवराँज[२४] दोन्ही : चोवीस येथोनी : पक्ष जाले : २६५
उपाधीये आणी : आनेराजन्रास : या दोहीचे पक्ष : **दुरेघीया** : २६६
उपाध्यासी त्रोध : श्रीमुखें लाधला : देवें वर दील्हा : आनेराजा : २६७
म्हणोनि दोहीच्या : दुरेघ्या असती : पक्ष त्रोलीजती :
**स्थळा**माजी : २६८
राजुरकराचें : जाणीजे **लक्षण** : मुद्रीत म्हणोन : माडीयेलें : २६९
**दुसरें लक्षण** : थुआडी नागांत्रेचें : **मध्यें दुरेघीचें** :
**मेळवीलें** : २७०
रेमांत्रे आइची : **उभी एक रेशा** : अमरत्व परेशा :
म्हणोनिया : २७१
**दुसरी एक रेशा** : अवछेदादीक : आइका आणीक : पक्षभेद : २७२
आमृते मायांत्रा : पक्ष **धोंगडे याचा** : जाणीजे तयाचा :
मांडीयेला : २७३
**स्तंभ** मांडीयेला : पेटे हरीत्राचा : दुजा **आंकुशाचा** :
पक्ष जाला : २७४
**दोहीकडे शुन्यें : मध्यें उभी रेशा** : तो स्तंभ परियेसा :
आत्रेसाचा : २७५
**आतां हे माळीका** : ऐसें जेथ असे : ते कुमर मुनीत्रास :
ओळखीजे : २७६
**आरंभी माळीका** : तथा **पे माळीका** : तो हर्दमुनी नीका :
ओळखीजे : २७७
**फुली** ती जाणीजे : हीरांत्रे आइची : अर्थ मर्यादेची : मांडीयेली : २७८
**तीसरे लक्षण** : शोधीचें बोलीलें : ते सीउत्रासी आपुलें :
मांडीयेलें : २७९
सीधांते हरीत्राची : **चौरेघी** जाणीजे : पक्ष वोळखीजे :
स्तंभा माजी : २८०

कमळांवा पासौनि : चौथें मानोत्तर : चौरेघी सुंदर : म्हणोनिया : २८१
ऐसे **तेरा पक्ष** : मांडीयेलें जाण : प्रसीध नामना : आकराची : २८२
म्हाइंभटे[1] आणी : कवीश्वरं[2] व्यास गोपाळें[3] बा पक्ष : पष्ट असे : २८३
कमळांवाँ[4] आणि : नात नागाइसें[5] : परशराम[6] बास : रामेश्वर[7] : २८४
बासपक्ष ऐसा : वोंकार[8] बासाचा : पष्ट नामनेचा : मांडीयेला : २८५
पातुरवंकार[9] : नांदेडकर मुनी : फर्वट[10, 11] येथोनी : येकादश : २८६
ऐसीया आकरा : पष्ट नामसंज्ञा : प्रसीधता जाणा : मांडीयेली : २८७
चोवीसा प्रमाण : संबंध **स्थळाचा** : लावीला **तीहीचा** :
उभयेता : २८८
उभयेता दोनी : संवाद करूनी : संबंधीली तीन्ही : स्थळें देखा : २८९
**पातरीये** ग्रामी : सोधोनी नीबंध : **स्थळासी** संबंध :
लावियेला : २९०
**रवळोबासाची** : लीप नागरिक : लेहून पुस्तक : प्रती केल्या : २९१
ऐसा हा संबंध : स्थळासी लावीला : तो परंपरा आला : प्रमाणासी : २९२
यावेगळे शास्त्र : अर्थ अर्थादिक : नव्हे प्रमाणीक : अवीहीत : २९३
प्रथम शोधनी : केली **हीराइसी** : अन्वये लीळेसी : लावीयेला : २१४
दुसरी शोधनी : पीढी पाठ केला : आन्वये लावीला :
**सीउबासी** : २९५
**नागनाथ पाठ** : जाणीजे तीसरा : हा आन्वये परंपरा :
आला असे : २९६
इत्यादि अन्वयो : सकळशास्त्राचा : वर्णीयला वाचा : **कृष्णमुनी** : २९७
एवं अन्वयो वोवीया : दोनसे आठयानेउ* संपूर्ण मीती.

---

* वरील ओव्यांत जी एकच ओवी कमी आहे ती असलेली पोथी मिळणें अवश्य आहे.

# ११. हयग्रीवाचार्यकृत 'गद्यराज'*

१. 'ग्रंथमाला' मासिकाच्या ११५ व्या अंकांत 'एक जुनें मानभावी काव्य†' असें प्रकरण कै. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेलें होतें. त्याचे आरंभींचे १८ श्लोक व शेवटचे २६८ ते ३०० पर्यंतचे श्लोक पहिल्या वेळीं सापडले नव्हते. नंतर पेशावरचे महंत दत्तराज आराध्ये यांच्यापासून मिळालेल्या पोथीवरून ते श्लोक पुढे ग्रंथमालेंत कै. राजवाडे यांनीच प्रकाशित केले. या काव्याचें नांव **गद्यराज** असून, त्याचा कर्ता **वोपदेवशिष्य भीष्म-मुनी** असें पोथीच्या शेवटील श्लोकावरून असावें असें कै. राजवाडे म्हणतात. आज ज्याबद्दल चर्चा केली जाणार तें **गद्यराज** काव्य वरील काव्य नसून **हयग्रीवाचार्य** यांचें 'गद्यराज' नांवाचें दुसरें काव्य होय.

२. कै. राजवाडे यांनी प्रकाशित केलेल्या 'गद्यराजा'तील शेवटचा श्लोक व समाप्तिसूचक वाक्य पुढीलप्रमाणे आहे.

'चक्रेशा नागदेवा प्रणतपरभवा भावमोका स्वभावा ।
कंजाव्हायोगिनीसी नतविभुपुरुषीं पौष्यसंज्ञेवरेसी ॥
न्यायाख्या-मंगसूरी-प्रणत मम वरी शुंगयोगींद्र सूरी ।
गोपेंद्रा नागदेवा प्रणतपरभवा वोपदेवा सदैवा ॥३००॥

इति श्रीमहोपाध्यायाम्नायदीक्षितविराटमहामुनिश्रीवोपदेवमहात्म-मदाचार्यशिष्यभीष्ममुनिविरचितो गद्यराजः समाप्तः'

---

* भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक, वर्ष १८, अंक ३.

† कै. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेलें 'गद्यराजकाव्य' संकीर्णलेख-संग्रहांत वाचकांना पहावयास मिळेल.

वरील श्लोकावरून राजवाडे यांनी केलेले तर्क, प्रस्तुत उपलब्ध झालेल्या महानुभावीय वाङ्मयाच्या माहितीवरून, चुकीचे ठरतात. वरील श्लोकांत आलेलीं नावें व रा. रा. य. खु. देशपांडे यांच्या 'महानुभावीय मराठी वाङ्मय' या पुस्तकांतील पान १०५-१०६ यांवरील 'उपाध्य-आम्नाय' हा वंशवृक्ष, ताडून पाहिल्यास, कमळाइसा (कंजाख्या योगिनी), न्यायव्यास ('हेतुस्थळ' कर्ते), मंगेशाचार्य (मंगसूरी), शुकदेवमुनि (शुंग-योगींद्र), गोविंद (गोपेंद्र), नागेंद्र (नागदेव), इत्यादि नावें सारखींच असल्याने प्रस्तुत भीष्माचार्य हा **तिसरा भीष्माचार्य** (श. १५६३) आहे असें स्पष्ट दिसतें. पहिल्या भीष्मचार्यांचा काल श. १२६०, व दुसऱ्या भीष्माचार्यांचा काल श. १४६० हा लक्ष्यांत घेतल्यास व शिष्य-परंपरेंतील नांवें पडताळून पाहिल्यास, कै. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेलें काव्य पहिल्या भीष्माचार्यांचें नव्हे. म्हणून 'एक जुनें मानभावी काव्य' या प्रकरणांतील तिसऱ्या परिच्छेदांतील कै. राजवाडे यांनी केलेले अंदाज व दिलेली माहिती चुकीची ठरते. तथापि महानुभावीय संशोधनाविषयी कै. राजवाडे यांनी या प्रकरणांत प्रकट केलेल्या सर्वसामान्य विचारांचें महत्त्व अजूनहि कायम आहे हें वाचकांना मान्य करावें लागेलच. (परिच्छेद ४-५, 'एक जुनें मानभावी काव्य', संकीर्णलेखसंग्रह, पाहा.)

३. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेल्या 'गद्यराज' काव्याची पोथी अजून-पर्यंत आम्हांला उपलब्ध झालेली नाही. कै. भावे व रा. रा. आप्पासाहेब देशपांडे यांनीहि भीष्माचार्यकृत गद्यराजाची कोठेहि माहिती दिलेली नाही, त्यामुळे या काव्याबद्दल आज विशेष चर्चा करण्याचें कारण नाही. महानु-भावीय लोकांना विशेष मान्य असलेला गद्यराज म्हणजे हयग्रीवाचार्यांचा गद्यराज असून त्याच्याविषयी चर्चा, प्रस्तुत निबंधांत, करण्याचें योजिलें आहे.

४. या काव्याच्या एकंदर पांच पोथ्या आतापर्यंत आमचे पाहण्यांत आल्या. त्यांपैकीं तीन सांकेतिक 'सकळ' लिपींतील असून, दोन बाळबोध मराठींत आहेत. बाळबोध लिपींतील दोन पोथ्यांत 'पृष्ठमात्रा' आढळतात. त्यांचा उतारा (श्लोक ८२-८३) सोबत जोडलेला आहे. मूळ पोथी मंडळा-

कडे पाहाण्यासाठी पाठवितां यावी असा प्रयत्न चालूं आहे. तथापि ही पोथी 'मध्यप्रांत–संशोधक-मंडळां'तील सभासद, प्रो. मिराशी, प्रि. दामुअण्णा ओक, व प्रो. बापूसाहेब भवाळकर, यांनी पाहिलेली असल्याने संशय घेण्याचें कारण नाही.

याशिवाय या काव्याची एक छापील प्रत पाहाण्यास मिळाली. सोलापुरचे श्री. वा. दा कानडे यांनी इ. स. १९०४ मध्ये सच्चिदानंद छापखान्यांत ती प्रसिद्ध केली आहे. पुस्तक बरेंच अशुद्ध असून, शब्द न तोडल्याने महानुभावेतर वाचकांना, हें पुस्तक उपलब्ध होऊनहि वाचणें कठीण जाईल ही छापील प्रत सांकेतिक लिपींत नसून, बाळबोध लिपींत आहे. तथापि ही प्रत इ. स. १९०४ मध्ये केवळ पंथीयांसाठीच छापल्याने हीहि प्रत आज दुर्मिळ आहे.

५. या काव्यांत एकंदर २७१ श्लोकसंख्या असून ( २८० नाही ) वसंततिलका, मालिनी, स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित, मंदाक्रान्ता, उपेंद्रवज्रा, इंद्रवज्रा, हीं गणवृत्त त्यांत आढळून येतात. बऱ्याच श्लोकांत अंत्य यमक नाही. संस्कृताप्रमाणे ह्या काव्यांतील श्लोक बहुतेक नियमक आहेत. तेव्हा गणवृत्तांचा प्रघात मराटींत केव्हा सुरू झाला या प्रश्नाच्या दृष्टीने प्रस्तुत गद्यराज काव्य महत्त्वाच आहे हें निर्विवाद होय.

६. **काव्याचा कर्ता व काल**—प्रस्तुत काव्य हयग्रीवाचार्य यांचें असून त्यांच्याबद्दलची सामान्य माहिती, कै. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वतां'त ( आवृत्ति तिसरी, भाग १ ला, पान १८२–८४ पाहा ) व रा. रा. देशपांडे यांच्या 'महानुभावीय वाङ्मयां'त ( पान ३५ ) वाचकांना आढळून येईल.

हिरण्यगर्भ अथवा हयग्रीवाचार्य हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून त्यांचा जन्म ( भावे यांच्या मतें ) शक ११९७ किंवा (रा. देशपांडे यांच्या मतें) शक ११८७ गोदावरीचे काठीं पांचाळेश्वराजवळच्या राक्षसभुवनास झाला. हे मोठे विद्वान असून कृष्णभक्त होते. भागवताच्या दशमस्कंधाचें रोज वाचन केल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. आनोबास अथवा

गोपाळपंडित यांचें शिष्यत्व शक १२३१ मध्ये यांनी स्वीकारलें. मग पैठण येथे राहून दशमस्कंधाची मराठी श्लोकबद्ध टीका त्यांनी तयार केली. तेंच गद्यराज हें काव्य होय हे कवि पैठण येथे शक १२४६ मध्ये वारले.

हयग्रीवाचार्यासंबंधी भावे व देशपांडे यांनी ज्या आख्यायिका दिलेल्या आढळतात, त्यांना पुढील माहितीवरून दृढत्व येतें असें दिसून येईल.

(अ) वृद्धाचार पोथी (पोथी लेखन शके १५४६, रक्ताक्ष संवत्सरे, मास भाद्रपद, तिथी नवमी, शुक्लपक्ष, वार बृहस्पति) लीळा १६ वी—

कवीश्वरा[१] : हरुगर्वभट[२] उद्ग्रहणीके[३] : कवीश्वरीं अन्नोवासा[४] प्रकाशणें :॥: हरगर्व ते विद्वांस : एक म्हणति : राक्षसभूवनीचे एकुदीसीं : ते कवीश्वरव्यासासि भेटले : थोरि उघाणी[३] केली : परि भेद अवबोधा न येचि[५] : ते **वाराणसी** जात होते : मग **हरगर्वी** म्हणीतलें : आतांचि ये वेळे चर्चा असों देवों : वाराणसीहुनि **येउनि**[६] मग मागौतें तुमचें **दर्शन**[६] **घेउनि** : कविश्वरव्यामीं म्हणीतलें : हो कां : जाल . तरि **पारीसनाथाचेया सीरपुरा** वरुनि जा : तेथ आमुचे गुरूभाऊ **अन्नोवा**[४] असत : तयांसि भेटावें : मग सामोरें[७] जावें : तेन्हळीं ते **श्रीपुरासि** आले : अन्नोवासांची भेटि जाली : भेटी सरीसीचि उघाणी प्रवर्तली : जीयेंचि वाक्यें कविश्वरव्यासीं उचारिलीं : तेचि हेतु : तियेंचि वाक्यें : तेचि मांडणी : सारिखीचि वीत्पति : परि : तेथ प्रत्या न एचि : आणि एथ **अन्नोवासाचेनें** प्रत्या आले : जीवेश्वरूविभेद मानिला : मग वाराणसीं जातां राहिले : एतुलेन **अन्नोवासातें** म्हणीतलें : आतां तुम्हीं आपूला धर्म सांघावा : **अन्नोवासीं** म्हणीतलें : तुम्हांसि जे प्रथम भेटले

---

१ भास्करभट बोरीकर ('शिशुपालवध' कर्ते). २ हयग्रीवाचार्य. ३ उद्ग्रहणीक–उघाणी–वादविवाद. ४ गोपाळपंडित आनेराजव्यास. ५ फरक लक्षांत येईना. ६ आम्ही येऊं व दर्शन घेऊं. ७ पुढे, काशीकडे. ८ आनेराज व्यासांच्या मुळे अनुभव आले.

ते आमचे वडिल गुरुबंधु : तयांपासि चाला : मा[1] : तयांकरवि सांघउनि[2] : भणौनि : अन्नोबास हरगवेंवंडीतातें आसटोये[3] घेउनि आले : भेटी जाली : कवीश्वरबासातें म्हणीतलें यांसि धर्मू सांघावा : भणौनि मागील सांघीतलें : कवीश्वरबासीं म्हणीतलें : यांसि तुमचेनि मूळें होआवें : हे तुमचेचि अधिकार्ये : जेहींचि युक्तीं तुम्हीं बोलिलेति : तियाचि युक्तीं आमसीं उबाणी जाली : परि आमचेन याचेया प्रत्या न एचि : आणि : तुमचेचि अधिकारी : ऐसें तयांचे प्रत्या आणिलें : मग अन्नोबासीं तयांसि धर्म श्रवण केलें : तैसीचि भिक्षा केली : मग : तया नांव हरिबा ऐसें म्हणति : हे बासुदेवभटाहुनि धाकुटे : मग एहीं **प्रतिष्ठानीं**[4] राहुनि : भोगनाराएणीं[5] **गद्यें**[6] **केलीं** :॥: तेथचि प्रतिष्ठानीं देहावसान जालें : **आठवर्षे** प्रतिष्ठानीं होते : ऐसी मार्गरूढि : ॥१६॥ :

( आ ) स्मृतिस्थळ (लीळा ११३)—प्रस्तुत लीळेंत 'नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराची' आख्यायिका सांगितलेली असून, शेवटीं पुढील माहिती दिलेली आहे. "मग तैहुनि रुक्मिणीसैवरग्रंथु मार्गासि आला : मग भटोबासामागां : केतुलेया एकां काळां : **अनोबासाचां हरगवीं** भिक्षा केलेयां हें आवघें आइकौनि : भणीतलें : सकळा कविपरिस हा कवि[7] चतुर : मग : आपणहि **श्लोकबद्ध**[6] **गद्य केलें** :

**दुसरा पुरावा**—(श्रीनागार्जुनविरचितस्मृतिसमुच्चय व वृद्धाचार) २८ वी लीळा–प्रस्तुत पोथीचा वृद्धाचार हा भाग महाराष्ट्रसाहित्यपत्रिकेंत प्रसिद्ध झाला आहे.

कवीश्वरीं हीरण्यगर्भमहावाक्यव्याख्यानीं तद्हृदयानवगमे वाराणसी-गमनकथनीं आनोबा भेटि घेऊनि रा म्हणणें :॥:

---

१. मग. २ त्यांच्याकडून सांगवून. ३ गावाचें नांव. ४ पैठण. ५ भोगनारायणाचें देऊळ. ६ गद्यराज काव्य केलें. ७ नरेंद्रकवि.

हीरण्यगर्भ ते वीद्वांस : एक म्हणति : ते राक्षसभुवनीचे : **एकवेल :** ते : कवीश्वरव्यासासि भेटले : थोर **चर्चा** केली : कवीश्वरव्यासीं ते खंडीले : मग कवीश्वरव्यासांपासि हीरण्यगर्भ हरीव्राएं भीक्षा केली : कवीश्वरव्यास तयांप्रति धर्मनीरूपण करूनि **माहावाक्य वाखाणीत होते** : तें तयाचीया हृदया न एचि : मग हीरण्यगर्भ हरीव्राएं म्हणीतलें : कवीश्वर हो : मीं आतां वाराणसीसि जाईन : हें माझेया **हृदयासि न ये** . कवीश्वरव्यासीं म्हणीतलें : ज्ञाल तरि पाठीसनाथाचेया सीरपुरावरूनि जा . तेथ आमचे गुरुभाउ आनोव्रा असत : तयासि भेटावें : मग सामोरें जावें : तेव्हळीं ते श्रीपुरासि गेले : आनोव्रासासि भेटि जाली : मागील क्षेमवार्ता सांघीतली : तेव्हळीं आनोव्रायें **महेश्वर व्याकरणें करूनि महावाक्य तयाचीया हृदयासि** आणीलें : तेव्हळी वाराणसी जातां राहीले : मग आनोव्रासीं म्हणीतलें : आतां तुम्ही आपुलीया गुरुपासि जा : म्हणौनि : कवीश्वरव्यासापासी पाटवीले : ते आष्टीये कवीश्वरव्यासापासि आले : भेटि जाली : कवीश्वरव्यासापासि मागील व्यवस्था सांघीतली : मग : कवीश्वरव्यासीं म्हणीतलें : तुम्ही कां आले तुम्हांसि गोसावी जयाचेनि मूखें ज्ञान दीधलें : तेचि तुमचे गुरु : तुम्हीं तयांचेचि अधीकारी : तुम्हीं तयांपासि जा : म्हणौनि : पाठवीले : ते मागौते श्रीपुरा आनोव्रासांपासि आले : मग तया नांव हरीया ऐसें म्हणति : ते वासुदेवभटाहुनि धाकुटे : ॥२८॥ : नरींद्रकवीरुक्मिणीस्वयेंवरदर्शनी कवीप्रशंसा करूनि हीरण्यगर्भ हरीव्रायें असीकें पाहीलें : आणि : तोखोनि म्हणीतलें : एरां कवीपरीस हा कवि चतुर : मग आपण प्रतिष्टानीं राहुनि **भोग नाराएणीं** गद्यें केली : प्रतिष्ठानी हीरण्यगर्भ हरीव्राचें देहावसान जालें : आठवरूषें प्रतीष्ठानीं होते ऐसी मार्गरूढि : ॥२९॥

वरील उताऱ्यांवरून हयग्रीवाचार्यासंबंधी भाले व देशपांडे यांनी सांगितलेल्या हकीकतीला बळकटी येते; त्याचप्रमाणे **स्मृतिस्थळ** व **नाग-**

दुसरी टीप—आतां दुसरा श्लोकीं **यदुकुलतिलक** :।: तयाचे पवाडे : **कैसा देखै कृपाळु** : या श्लोकापासौनि **कृःगारायाचरीत्रें** येथपर्यंत : ॥२२८॥ : दोनिशतें आठविसा श्लोकीं असति : तथापि पुर्वार्धी बाळक्रिडा : तीसां श्लोकीं वर्णीताय : ॥ * ॥ **कैसा देखे कृपाळु** : तरि कैसा देखै : भणीजे : कैसा हा विरुद्ध धर्मीया परमेश्वरु पाहा : भणोनि : तयाचा सामर्थ्यप्रभाव पाहा : श्रोतयातें दाखवितायं[1] : तोचि ऐसा : स्वानंद-घन आत्मरमण निःकाम निर्गुण निराकार परि कृपाळु : भणौनि : तेणें : जीवोद्धरणवेसनीयें : सजळघनतनू स्वीकरीली : तरि : सजळ भणीजे जळेसह वर्तमान : ऐसा जो घन : तरि घन : १ द्रोण २ पवन ३ पांगुळ ४ हे च्यारी मेघ तया चौघाचे च्यारिवर्ण : कृष्ण १ मंजिष्ट २ पित ३ शुक्ल : तयांत घन तो कृष्णवर्ण : आणि : वर्षाधारीं उदार : येणें अंशें श्रीमूर्तिसीं उपमिला : भणौनि : मेघश्याम : तरि तनु भणीजे शरीर : एवं चैतन्यवपु : स्विकरीली भणीजे प्रकृतिवशें आंगिकरिली : येणें विज्ञानशक्तीचेनि प्रधानत्वें नवरसपुर्वका सकळ लीळाचा अद्यंत सुचिला :।: मग जन्मतांचि माते-पितेयासि चतुर्भुजरुप दाखउनि : गोकुळगमनाचा वीधि सांगौनि : मागौतें बाळत्व आंगिकरीलें : यथौनि : जीवाचीया यथाकणवा : प्रवृत्ती अनुरुप तैसतैसे रस अवतरौनि : परमेश्वर क्रीडा कारिति : तथाहि : * जे देव रासक्रीडा खेळीनली : तै मूर्ति**शृंगार** जाला : गोळणीं वीनोदें नाचवीला : तै **हास्यरसु** : यशोदा भेडाविला तैं **करुणारस** उठावला : विखार काळीया जींतिला : तैं **रुद्र** झाला : मातें श्रीमुख दाखविलें तैं **अद्भुता** रूप जालें : विश्वरूप प्रगटीलें तैं **भयानक** : दैत्या करी संहारु तैं **वीभछ** (बीभत्स): आणि **विरु** (वीररस) : **शांति** तो निरंतर तेथचि असे : ।।६।। यणें उपलक्षणें सकळ लिळाचा ठांइं नवरस जाणावें · मग : भेद : एकी

---

१ दाखवीत आहे. * वत्सहरण ( दामोदर पंडित ) ओव्या ५१ ते ५४ पहा.

मराठी
क्रमांक


लीळे एकरस प्रधान : आणिक आनुषंगिक : आणि : संपूण रस वर्तेति : ऐसीया ही एकी लीळा : यथा : रंगीं उभा मुरारी : ।। एवं सजळघनतनु स्विकरीली : तदनंतरें परेशें भणीजे मायापती जो तेणें : बाळघ्ने पुतनेतें भणीजे बाळकातें वधीती ऐसी जे पुतना : नामें : राक्षेसीणी : तियेतें प्रहरुनि : भणीजे स्तनपानमीषें मारुनि : सकट भणीजे गाडा : कथांतरें शकटरूपी दैत्य : तो अंघ्रिघातें भणीजे श्रीचरणघातें : करुनि : । भंजिला भणीजे मर्दीला : ।। : आणि माता जे यशोदा : तीनें अंकीं भणीजे कडेसि : जैं मुरारी घेतला : होता : तत्समै तृणावर्त दैत्य वायुवेषें आला जाणौनि : राउळें अतिघनवटपण स्विकारीलें : तेणें सघनवटपणें देवाचा भार माता साहों न शकेचि : भणौनि : रंगणीं भणीजे अंगणीं : तयातें बैसवी : तत्समै : अवर्ता वायुवेषातुर : तृणावर्ता नामा दैत्य झंझ वाताचेनि रूपें आला : ऐसा जो **असुर भणीजे रजस्तमाची ऊर्मि थोर** भणौनि त्याचें मरण भणीजे मृत्यु : रुपा भणीजे अंगीकृत रोखें करुनि मुरारिनें ब्रजजनासि दाखविलें : । : दुसरेनि पाठें : तरि : मरण भणीजे तयातें मारुनि : नगर-जनासि आश्चर्य दाखविलें : ।। : ये श्लोकीं तीन लीळा : पुतनाशोखण :१: शकटभंजन : २ : तृणावर्त मारणें ३ : ।। ४ ।।

सारांश, दोन्ही टीपांत पूर्वापरसंबंध दाखवणें, उल्लेख स्पष्ट करणें, शब्दार्थ व भावार्थ देणें, इत्यादि टीपकारांच्या क्रिया स्पष्ट दिसून येतात. विशेषतः वरील टीपांपैकी दुसऱ्या म्हणजे थोरल्या टीपेची उपलब्ध पोथी, शक १५७४ (इ. स. १६५२) मध्ये लिहिलेली आहे हें महत्त्वाचें आहे.

१०. आता काव्याच्या स्थूलरूपाकडे आपण वळूं. आतापर्यंत वाचकांना उपलब्ध असे, या काव्याचे केवळ ७९ ते ८२ हे, चारच श्लोक उपलब्ध होते (पान ३५, महानुभावीय मराठी वाङ्मय). पण आता समग्र काव्य पाहाण्यास सापडणें शक्य झाल्याने त्याविषयीं मत बनवितां येईल.

११. या काव्याचा विषय म्हणजे भागवताचा दशमस्कंध होय. पहिल्या दोन श्लोकांत 'पंचकृष्णांना' (दत्तात्रय, कृष्ण, द्वारकावतीकार चांगदेव राउळ, गोविंदप्रभु व चक्रधर) नमन आहे. काव्याचा आरंभ पुढीलप्रमाणें 'वसंततिलका' वृत्तांत असून कविता निर्यमक आहे.

श्रीचक्रपाणिचरणांबुजसेवका **श्री-**
नागार्जुना कृत मिया शिरसा प्रणा**मू** ॥
वाचा म्हणैन शुभ नाम तुझे पवा**डे**
षड्वर्ग-दुर्ग नवनाथपतीनना**था** ॥ १ ॥

काव्यांतील शेवटचा श्लोक 'स्रग्धरा' वृत्तांत आहे. व तोहि निर्यमक आहे.

लीळा उच्चार जीवा निजपति अथवा आइकै कर्णपूटीं
नाना गोष्टीसि मीठी देउनि करपुटीं दास्य चक्रेश्वराचें ॥
ग्रामातें लंघिना तूं नचलतचि बहु आठवीं चक्रपाणी
निर्वाणीं क्षेमदाता मिळविल त्वरिता स्वामि नागार्जुनाचा ॥२७९॥

श्लोक ४ ते २३१ पर्यंत **श्रीकृष्णचरित्र** वर्णिलें असून, २३२ ते २३६ श्लोकांत **श्रीदत्तात्रय**चरित्राचें वर्णन आहे, २३७ ते २४१ श्लोकांत **द्वारावतीकार चांगदेव राउळ**-ज्यांना श्रीदत्तापासून बोध झाला-त्यांच्या लीळा वर्णन केल्या आहेत. २४२ ते २४६ मध्ये **रिधपुरचे गोविंदप्रभु** अथवा गुंडम राउळ (श्रीचक्रधरांचे गुरु) यांच्या बद्दलच्या लीळा वर्णिल्या आहेत. २४७ ते २६४ मध्ये श्रीचक्रधरांच्या लीळा कवीने गायल्या आहेत. यानंतर २६५-२७८ मध्ये चक्रधरांच्या मूर्तीचें वर्णन, त्यांचें जीवोद्धरणव्यसन, लीळागानाची फलश्रुति इत्यादि सांगून, २७९ व्या श्लोकांत कवीने 'निर्वाणीचा क्षेमदाता श्रीचक्रधरच आहे, त्याची वारंवार आठवण कर' असें सांगून काव्यसमाप्ति केली आहे.

१२ आता काव्यांतील कांही मासले देऊन हें प्रकरण आटोपतें घेऊं.

**(अ) कृष्णाचें माती खाणें व यशोदेला विश्वरूपदर्शन.**

**स्रग्धरा**—कृष्णाला घालु[1] रामें सहित सवंगडां घालितां नंदजाया
कोपे हार्थी धरीतु म्हणत मम मुखीं मृत्तिका पाहि पां तुं।
मुखामध्यें दिसाळी[2] प्रचुरगिरी[3] शिळीं[4] भूतळीं[5] ब्रह्मगोळा
गोकूळामाजि नंदु स्वसुत सह जनी दाखुनी भूलवीली ॥८॥

(आ) अघासुरवधाचें वर्णन कवि पुढीलप्रमाणें करीत आहे.

**स्रग्धरा**—माहाव्याळें अघें जें ग्रसन पशुशिशू देखतां कृष्णराया
केलें तें पोट फोडे अरिदळ विघडें आपुलीं राखिलीं तें।
गोपाळां देवदैत्यां सकळजनचयां देखतां मोक्षु दील्हा
तेजोराशी पदाब्जीं विलसत जमुने दुष्टदर्पघ्नु आला ॥१३॥

(इ) कंसाकडे प्रातःकाळीं जात असतां, वाटेंत महाद्वारांत कुवलय हत्तीशीं झोंबी व त्याचा वध याचें वर्णन कवीने सुरस केलें आहे.

**स्रग्धरा**—प्रातःकाळीं निनादें कुवलय[6] सरळे गर्जतां[7] सिंहनादें[8]
नानावाद्यंत्र शब्दें प्रकुपित वसुधे चालतां कंपु आला ॥
केला कैवार्ड पूढा प्रकुवलयापिडीं[6] वेझें[9] देतां[10] सुगाढीं
त्याच्या मोडूनि दाढा गिरिगज रगडीं[11] माल्लखंडीं[12] प्रवेशे ॥२५॥

(ई) मल्लरंगीं श्रीकृष्ण कोणाकोणाला कसकसा भासला याचें वर्णन पाहून भागवतांतील मूळ श्लोक वाचकांच्या नजरेसमोर येईल.

रंगीं ऊभा मुरारी सकळ पुरचरीं देखिला तेथ नारीं
कंदर्पू काळवैरी शिशुवत पितरीं ईशसूरी समस्तीं।
भक्ता स्वात्मप्रतीती, नृपवर नृपती, ज्ञानिया ज्ञानमूर्ति
विद्यावंता स्वयुक्तीं, पुरुष इति मती पौरजातासि भिन्ना ॥२६॥

अशाप्रकारें ज्याचा जसा भाव, तसा ईश्वर लोकांना दिसला.

---

१ घालु घालणें—लाबकै घालितां ( गान्हाणें केलें असतां ). २ गगनचुंबित. ३ अष्टकुळाचळ. ४ भैरवस्थानें. ५ सप्तसमुद्र, सप्तपाताळ, सप्तद्वीपें ऐसा ब्रह्मगोळा. ६ प्रकुवलयपींड नामा गजु. ७ मेघगर्जे. ८ सिंहनादु. ९ झोंबतां. १० मेघगंभीर. ११ पर्वतासम हस्तीतें विदारितां. १२ मल्लरंगीं.

(उ) पुढील श्लोकांतील रणगंगेचें वर्णन सरस आहे.

वाये वोभाति कैसें,[1] हरकत महिसे, भूंकती खर जैसे
जैसे फूत्कार सर्पा, भुडभुड उद्का, कुंथ हुंकार जैसा ।
एका अंबोधि गर्जू गिरितडके[2] उजू, विंजु नीनाद मेघीं
अंगीं लोंढे अशुद्धे जलचर विविधा देखती वीर गंगे ॥५०॥

कुर्मांचा वेपु[3] शीरा, झषसदृश करा, साम्य सोंडा अपारा
सर्पाकारा गजाच्या सुसरअ उद्रें, तारुवें पैं रथाचीं ।
मुक्तालंकार वाळू, करंगळि कजळु, केश सेवाळु वाचे[4]
आवर्ता कार्मुकाचे जळकेळि विचरे[5] यक्षिणीक्षेत्रपाळा ॥५१॥

(ऊ) सुदेवाबरोबर दिलेली रुक्मिणीची विनंतिपत्रिका पुढीलप्रमाणे आहे.

स्वस्ती श्री वसुदेवनंदन परा श्रीकृष्ण चक्रवती
साष्टांगीं प्रणिपातपूर्वक तुम्हां लोटांगणीं श्रीपती ।
रुक्मीणी तुज सांघते विनवणी श्रीचक्रपाणी प्रभू
आर्तत्राणपरायणा तव गुणीं[6] मालाथिले[3] चित पती ॥८५॥

**वसंततिलका**–बंदीजनीं[7] तव लिळा कथितां मुरारी
तापत्रिकूट[8] गिरिवज्र विदीर्णकारी ।
सौंदर्य सींधु हरुनि सकळ प्रकारीं
मातें स्वकींकर करी तरि जीवनाथा ॥८६॥
हें जन्मदान[10] तुज देइन चक्रपाणी
धावे क्षणीं विरहिणीत्रय[11] तुच्छ जाणे ।

१ ज्या शब्दां धीरवीर भीति, ऐसे. २ आकाशीहुनि पडीला गीरीचा ठाईं विद्युत्पात. ३ तेचि रणनदी कैसी : जेथ शीरा कुर्मांचा वेपु : इत्यादि ...ऐसी भासती. ४ भासे. ५ आरंभीं, ऐसीए वीरगंगे एक्षिणी क्षेत्रपाळा जळकेळि विरचे, आरंभे ६ हे पती, तव गुणीं मम चित (चैतन्य) मालाथिले (लाचाविलें) म्हणौनि पत्रिकेचें प्रयोजन. ७ कल्याण कीर्ति नामें बंदीजन (भाट . ८ गुणधर्म–सामर्थ्य–प्रकाशक चरित्ररूपा : कथिता तीया : आइकिलीया तीया : ९ शिखर. १० सकळही दास्य हेतुत्रीण कीजे तें जन्म देणें. ११ काळकुळलोक हें तुछ.

ऐसे म्हणौनि धरणीवरि देह वाचे
सांचें त्यजीन तनु ते तुजकारणें जी ॥८७॥

मीं सौच्य दास करितां तुज लाज पाही
आर्तांसि धावसि कही जरि तूं नरेशा ।
ते आंकणें[1] स्मरउनि जरि पावसी श्री-
चक्रेश्वराशरण मी [2]अनमीतदानीं ॥८८॥

तूझी म्हणौनि जनके कृतनिश्चयो पैं
रुक्मी निषेध करुनी शिशुपाळ मानी ।
जंबूक सिंहबळि घेउनि जेवि जाये
वीपायें[3] नव्यसि जरी तरि लाज[4] कोणा ॥८९॥

**मंदाक्रान्ता**-मेघश्यामा कमलनयना पाव तूं स्वात्मरामा
तुम्हां मी जी सकळ त्यजुनी कांकरीं सर्वभावीं ।
निर्धारुनि जरि मम मनीं पाव सर्वज्ञनाथा
आर्तासिंधू दमघोषसुतां बूडतां हात देइ ॥९०॥

१३. आतापर्यंत दिलेल्या उताऱ्यांवरून काव्यदृष्टीने देखील हें प्रकरण उत्कृष्ट आहे हें वाचकांचा ध्यानांत येईल. २७९ श्लोकांपैकी शृंगाररसाचे श्लोक १०-१२ च सांपडतील. कंस व श्रीकृष्ण, रुक्मी व श्रीकृष्ण यांच्यांतील संवादांत वीररसाचा उत्तम परिपोष झालेला असून ते चटकदार आहेत. मल्लयुद्धें वर्णितांना मनोविकारांची हावभावासह कवीनें रेखाटलेलीं शब्दचित्रें मनोवेधक आहेत.

सारांश, ज्या काव्याच्या एकापेक्षा अनेक प्रती उपलब्ध असून, ज्यावरील जुने टीपग्रंथहि अजून सापडतात, ज्या काव्याच्या कांहीं प्रतींत पृष्ठमात्रा व जुन्या वळणाचीं अक्षरें आढळून येतात, जुनीं रूपें, जुने वाक्प्रचार, जुने शब्द हे ज्यामध्ये विपुल असून जेथे मंदाक्रान्ता, स्रग्धरा, मालिनीसारखीं गणवृत्तें आहेत व जें काव्य संस्कृत श्लोकाप्रमाणे बहुतेक

---

१ आर्तदानी हें लक्षण, १ उपक. २ निरपेक्ष दुःखापासुनि रक्षिता. ३ अवचट. ४ संभावनीकासि अपकीर्ति मरणापासौनि असह्ये.

नियमक आहे, असें हें हयग्रीवाचार्यांचें 'गद्यराज' काव्य म्हणजे प्राचीन मराठीच्या रसिक वाचकांना एक उत्कृष्ट मेजवानीच होय असें म्हणण्यास हरकत नाही.

हयग्रीवाचार्य यांच्या वरील 'गद्यराज' काव्यांतील मूळ पोर्थीतील ८२–८३ श्लोकांचें यथातथ्य प्रतिलेखन.

> ॥८१॥ आाठसात्विकवाष्यमुष्यकुमरीत्ताान्टस्छयाावर्णताकंपस्वे–
> दसद्‌गदादिकरत्तारोमचगात्रस्छित्ता ॥ अनंदाश्रुपरिपुल्लत्तासुभरि–
> ताश्रीमंताावद‌र्भितरुक्मीवाक्कुठारभिन्नत्हृदयाजााणानिाबाल–
> द्वीजु ॥८२॥ मात्तनुंश्रुत्तदु:खदारुणरणंचीताग्रसीत्ताद्दुत्तातााताश्रीप
> रामस्वरुयंदुंपंत्तीश्रीकृष्णजिणात्तनें ॥ चिंतासागरुत्तारीलें V यंदुंपंत्ती
> त्वरीत च त्तोश्रीर्कुष्लक्रपाणी फुड विडाादउनि पाठंवी जननीय आणिनाापजा
> पुंढा ॥८३॥

**पृष्ठमात्रा** प्रत्यक्ष कशा दिसतात, याची सामान्य स्थूल कल्पना येण्यासाठी वरील भागाचा उपयोग होईल

॥८१॥ आठै सात्विक भाव मुष्य (मुख्य) कुमरी ताटस्थ्य वैवर्णता
कंपस्वेदसद्गदादिकरता रोमच गात्रस्थिता ।

आनंदाश्रु परिपुल्लता सुभरिता श्रीमंत वैदर्भि ते
रुक्मीवाक्यकुठारभिन्नहृदया जाणौनि बोले द्वीजु ॥८३॥

माते तुं श्रुतिदु:खदारुणरणचींताग्रसीताद्‌भुता
ताता श्री परमेस्वरु यदुपती श्रीकृष्णजिणें तेनें ।
चिंतासागरु तारील **त्वरित** तो **श्रीचक्रपाणि** फुडे
विडा देऊनि पाठवी जननीय आणिन पैजा पुढां ॥३॥

यंदुंपंती } याचा अर्थ 'हीं अक्षरें गाळून टाकावीं'
वरती टिंबें देणें म्हणजे 'तो भाग गाळणें' असें दर्शविणारीं चिन्हें.

V } ही खूण, गळलेलीं म्हणून बाजूस लिहिलेलीं अक्षरें या ठिकाणीं आहेत, असें दाखवितें. उदाहरणार्थ 'त्वरित' 'च'

वरील दोन श्लोकांत "आठै, वैवर्ण्यती, वैदर्भि, ते, जाणौनि, बोले, मातेपरमेश्वरु, तेने, फुडें, देउनि, पैजा" अशा प्रकारें बारा शब्दांत पृष्ठमात्रा सापडतात, हाच प्रकार सर्व श्लोकांत आहे. पण या पृष्ठमात्रांत व शिलालेखांतील पृष्ठमात्रांत एक फरक दिसतो. दोन पृष्ठमात्रा शिलालेखांत नसतात. दोन मात्रांपैकी एक पूर्वी व एक अक्षराचे डोक्यावर असें असतें. येथे दोन्ही मात्रा मागेच दिल्या आहेत.

# १२. गोपाळ कविकृत रुक्मिणीस्वयंवर*

१ *प्रस्तुत हस्तलिखित पोथी रिधपूरचे महंत गोपिराज यांच्या भांडारांतील आहे. या पोथीला १३८ नंबर दिलेला असून, त्यांत 'रुक्मिणी-स्वयंवराचे' पांच प्रसंग (अध्याय) आले असून, ओव्या एकंदर ६४६ आहेत, बाकीचे प्रसंग उपलब्ध नाहीत. तसेंच याच पोथींत कवि 'केमा' याचें 'सीमंतक-हरण' हें काव्य आहे. त्यासंबंधी पुढे केव्हा तरी पाहूं.

२ उमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक डॉ. मा. गो. देशमुख यांनी 'युगवाणी' मासिकांत (एप्रिल १९४७) 'मराठीच्या साहित्यशास्त्रावर नवा प्रकाश' म्हणून लेख लिहिला आहे. त्यांत त्यांनी ज्या ग्रंथाचा आधार घेऊन आपलें विवेचन केलें आहे, तो ग्रंथ म्हणजे आजच्या प्रतिपाद्य विषयाची दुसरी प्रत होय. त्यांनी दिलेल्या वर्णनावरून आम्हाला उपलब्ध झालेली प्रत तीच नसून निराळी आहे, असें स्पष्ट दिसतें. 'क्रमांक१४२ च्या......पोथींतील एका महत्त्वाच्या उताऱ्याचा या छोट्या लेखांत विचार करावयाचा आहे' असें ते लिहितात; त्यांत लेखन शक १६५८ दिला आहे, पण आमच्या आवृत्तींत तो नाही. तसेंच 'गोपाळ कवि नामक एका अज्ञात कवीने रचलेले, 'दृष्टांतबोध' व 'रुक्मिणीस्वयंवर' ऊर्फ 'भागवती कथा' हे दोन ग्रंथ या पोथींत लिहिले आहेत.' आमच्या पोथींतील दुसरें प्रकरण हें 'केमा' कवीचें आहे. असो. या ग्रंथांतील दुसऱ्या प्रसंगांत वर्णिलेली काव्यमुद्रेचीं **पंचवीस तत्त्वें** घेऊन, केवळ त्याचेच आधाराने डॉ. देशमुख यांनी आपल्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे. बाकी इतर गोष्टींसंबंधी त्यांनी मुळीच उल्लेख केलेला नाही. तेव्हा त्यांच्या

---

* ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ (भा. इ. सं. मं.) पृ. ३१-४०

विषयाचें अतिक्रमण या निबंधांत केलें, असें वाटण्याचें कारण नाही. त्यांनी न उल्लेखिलेल्या भागांवर या निबंधांत विवेचन केलें आहे.

३ महानुभाव–काव्यसूचींत (पान ९ पाहा) या ग्रन्थाचें नांव आहे. पण या ग्रंथाचें स्वरूपवर्णन किंवा माहिती कोठेहि आलेली नाही.

४ 'रुक्मिणीस्वयंवर' या प्रकरणावर अनेक कवींनी आपलीं काव्यें केलीं असतां, पुन्हा कशाला काव्य केलें, असा आक्षेप घेऊन कवि म्हणतो :

ग्रथन रुक्मिणोस्वयंवराचें । बहुत असती पूर्वे कवीचे
तरि मागुतें विस्तारावयाचें । कवण काज ॥१९॥

मागा केलें सिंधुमथन । आतां काई न करावें(वें?) घुसळण ।
अथवा मशकें न कीजे गमन । गरुडें केलें म्हणौनियां ॥२०॥

× × ×

तैसें माहाकविराज : ग्रंथु आईकौनिया प्रबंधराज
मनोर्थ उपजला मज : काव्यकरणीं ॥२२॥

द्वारके पंथें चाले फेंगडें : कृष्ण कृष्ण म्हणे बोबडें
तया वचना मुळें वेडे : म्हणति जाणा ॥२३॥

जन्म जालिया कविकुळीचें : तरि सार्थक होआवया जीवाचें
वर्णन करावें श्रीकृष्णाचें : मतीसारखें ॥२५॥

जीवासि द्यावा भक्ति उपदेशू : देहासि सीकवावा योग अभ्यासू
इंद्रियांसि लावावा अध्यासू : श्रीकृष्णसेवेचा ॥२६॥

नयनीं लक्षावी श्रीमूर्ति : श्रवणीं आइकावी गुणकीर्ति
प्राणें आघ्रंसावी वासहृति : श्रीचरणपद्मींची ॥२७॥ इत्यादि.

[कवीचें कुळव्रत श्रीकृष्णसेवा, ती कशी आहे याचें वर्णन कवि करितात.]

जो चकोर कुळीचा जाला : तेणें चंद्रचि अभ्यासिला
चातकें एकवर्ति आळविला : एकुचि मेघराजु ॥३४॥

राजहंसाचें कुळव्रत : मानस सरोवरींचि रमत
कोकिळा कुंज न करित : वसंतेविण ॥३५॥

अशा प्रकारें परिहार देऊन कवि म्हणतो कीं, इतरांनी ज्या कथा सोडल्या त्यांचें वर्णन मी विशेषतः करणार आहे.

'आतां रुक्मीणिसैंवरमीसिं : कथा सांगेन बहुवर्सी
ज्या सांगतां राहिल्या कविसि : इतिहासमतें ।।७४।।

'पूर्वि महाकवि बोलता : इतिहासु राहिलिया कथा ।
तीया **गोपाल** सांगता : आइकतु श्रोतें ।। ३१५ ।।'

अशा प्रकारें कवीने आक्षेपाचें निरसन करून आपलें काव्य केलें आहे..

५ चवकशी केली असतां असें कळलें, की या कवीच्या या काव्याचे पहिले पांच प्रसंग (अध्याय) उपलब्ध आहेत.* या ग्रंथाचे २५ अध्याय असून, ओव्या ३००० आहेत, अशी आख्यायिका आहे. कवि शके १५०६ च्या सुमारास झाला असावा, असें कळतें. मला एकंदर दोनतीन हस्तलिखितें पाहावयास मिळालीं, त्यांत 'पांचच' प्रसंग दिलेले आहेत. कांही पोथ्या सांकेतिक लिपींत तर एक सरळ बाळबोध लिपींत आहे. प्रस्तुत पोथी सरळ बाळबोध लिपींत आहे.

६. ग्रंथाच्या पांच अध्यायांवरून कवि मोठा ग्रंथ लिहिण्याच्या योग्यतेचा आहे असें दिसतें. प्रास्ताविक अध्याय अगदी लहान पण मोठया थाटांत लिहिला आहे. 'ॐकार प्रणवा उद्भवो । आदिसृष्टि मूळ प्रभवो । तो वंदिला देवाधिदेवो । श्रीचक्रधरु १' अशा प्रकारें श्रीचक्रधराचें स्मरण करून, शारदेचें नमन कवीने केलें आहे.

'जे सकळधर्मा मूळबीजा । परावर उभय व्रजा ॥
कृपादि गुण सारजा । नाम जियेचें ।।७।।'

यानंतर बोधदात्या गुरूचें वंदन कवि पुढीलप्रमाणें करीत आहे—

सांगतां श्रीगुरूचे उपकार : शब्दब्रह्मीं नाहीं उच्चार
जेणें दाविला महापंथु थोर : परमार्थ ऐसा ।।१२।।

---

* महंत गोपिराज यांना माहिती विचारली.

जात्यंध वर्नी चुकले : जीववन्हीवणव्रा गवसले
ते जेणें काढुनि लावीले : महाब्रह्मपंथीं ॥१३॥

× × ×

क्षेराक्षेर अतःपर : तत्त्वमसि पासौनि सार
महावाक्याचा उच्चार : करविला जेणें ॥१६॥

× × ×

तया वंदूनि श्रीगुरुगोता : सांगतां रुक्मिणीसैंवरकथा
सावधान देयावें श्रोतां : म्हणे **गोपाळकवि** ॥१८॥

अशा रीतीने केवळ १८ ओव्यांत पहिला प्रसंग संपला आहे.

७. दुसरा प्रसंग १९ ओवीपासून सुरू होऊन ७२ ओवीला समाप्त झाला आहे. पण या अध्यायांत आलेल्या मजकुराच्या आधारें 'युगवाणीं'त डॉ. देशमुख यांचा लेख आल्याने, त्याचा थोडक्यांत विचार करून पुढे जाऊं.

यामध्ये कवीने हा ग्रंथ कां लिहिला, खऱ्या कवीने काव्यमुद्रिकेचीं पंचवीस तत्त्वें कशीं पाळलीं पाहिजेत, मराठी भाषा सर्वांत श्रेष्ठ कशी, महाराष्ट्राचें महंतपण कसें, याविषयी लिहून, अशा **प्रकारच्या मराठींत** मी काव्य करीत आहे, असें कवि सांगतो.

काव्यमुद्रिकेचीं पंचवीस तत्त्वें कवीने पुढीलप्रमाणें दिलीं आहेत—

'जे नवरस आणि सोळा आंगें : तें काव्य महापवित्र सांगें
पंचविस तत्त्वें चाले मार्गें : सीद्धांत ठाया ॥३७॥

× × ×

अद्भुत रुद्र श्रृंघरु : भयानक बिभत्स विरु
कारुण्य हास्य शांत हा प्रकारू : नवरसाचा ॥३९॥
ळळीत[1] अर्थ आणि गौरव : साहित्य सगीत श्रृंघार टेव
पदें आणि सीद्धांत भाव : दृष्टांत न्यायादिक ॥४०॥

---

१ लालित्य.

वर्णक[1] उपमा श्लेशन : समयोचित प्रकरण
ऐसें पंचवीस तत्विं बंधन : काव्यमुद्रेचें ॥४१॥

८. सर्व त्रिभुवनांत श्रीकृष्णाचे पोवाडे गाइले जात आहेत, प्रत्येक देशांत त्या त्या भाषेंत श्रीकृष्णकथा काव्यांत वर्णिली जाते, असें वर्णन करून, महाराष्ट्र देशांत, 'प्रतिष्ठान' च्या महापवित्र भाषेंत मी ग्रंथ लिहीत आहें, असें कवि वर्णन करीत आहे.

'सर्व सिद्धांताची कसवटी : महाअर्थीची रहाटी
म्हणौनि नांव मऱ्हाटी : प्रसीद्ध जगीं ॥६२॥

संस्कृत शब्द उच्चार : सर्व जगीं न घडे व्यापार
जैसें मार्गि आडीचें नीर : तृषावंतासि ॥६३॥

तैसी नव्हे मऱ्हाटी गंगा : ते मुक्तजीवन सर्व जगा
आणि पापक्षाळणिं प्रसंगा : पवित्रपणें ॥६४॥

अव्ये वा (अवयवा? ) रूप नासिक : शृंगारासि शोभा तिलक
तैसी मऱ्हाटी अधिक : सर्वभाषांवरि ॥६५॥

ते मऱ्हाटी बोल माहा गोड : वरि सीद्धांता करि निवाड
म्हणौनि वेदार्थि चाड : मऱ्हाटियेसी ॥६६॥

× × ×

त्या मऱ्हाटिया परिकर : सांघेन रुक्मिणीमेंवर
तें आइकावें श्रोते नर : म्हणे गोपिनाथु ॥७२॥

९. अशा प्रकारें पहिल्या ७२ ओव्यांत दोन अध्याय संपवून ६४६ ओव्यांपर्यंत बाकीचे तीन अध्याय आले आहेत. अध्याय संपला तरी, नवीन ओवीची, मागील अध्यायाच्या शेवटची ओवी घेऊन, संख्यागणना करावयाची अशी या पोथींत विशेष पद्धत आहे. तसेंच अध्यायाला नांव 'प्रसंग' असें आहे.

---

१ उपमाश्लेशवर्णक : इहीं रंजऊं सकळैक लोक
पोवाडे संसारमोचक : वानूं मुकुंदाचें ॥ (वत्सहरण, पान १) पाहा.

'बाकीच्या कवींनी ज्या कथा गाळल्या, त्या मी सांगेन' असें म्हणून कवि आपल्या ग्रंथाचा विशेष दाखवितो.

ही कथा 'भागवती' असल्याने, भागवत ग्रंथ कोणाला कोणी सांगितला याचीच 'पूर्वपीठिका' कवीने या 'प्रसंगां'त सांगितली आहे, 'मीच भागवतकर्ता' असा व्यासांना एकदा अहंकार झाला, तेव्हा त्यांचें तोंड वाकडें झालें, हें शुकांनी ओळखून, त्यांना निरनिराळया ऋर्षींकडून हिंडवून आणलें, व मार्कंडेय, रोमहर्षण, हंस, बकदाल्भ्य, असे अनेक कल्पांपासून भागवत कसें आलें, याची ओळख व्यासांना देऊन त्यांचा अहंकार नष्ट करून, व्यासांचें तोंड पुनः नीट व्यवस्थित केलें. ही कथा सांगितल्यावर शुकांना परीक्षितीला हें पुराण सांगण्याचें कारण काय झालें, याची माहिती कवीने दिली आहे. पुराण सांगणारा वक्ता कसा असावा, याचें वर्णन देऊन कवि म्हणतो —

रावो म्हणे योगिराया : संदेहेआवर्ति पडलेयां
जोडलासि आम्हां तारावया : संसारसागरिं ॥१२५॥

गुरु–उपदेश भांडवलें : सिष्यासि भक्ति–उद्यमबळें
जोडे पवित्र मुख आगळें : सर्व आनंदाचें ॥१२६॥

उपजलिया संशयो-रोगा : श्रीगुरु अमृतघट चांगा
संसार नाशावया अभंगा : थोर श्रीकृष्णनाम ॥१२७॥

तया श्रीकृष्णाचे पवाडे : समूळ सांग पां निवाडें
जेणें उघडति कवाडें : मुक्तिद्वारिंचीं ॥१२८॥

ऐसा **परिक्षिती** प्रेरणू करी : **सूक** उलासला अंतरीं
जैसा पिता संतोषे शरीरिं : आळि[1] बाळकांचा ॥१२९॥

शिष्यवत्स प्रश्न हुदकणा[2] : गुरुधेनु अधीकपान्हा
प्रसन्नता चाटी मोहदुणा : वोरसें पै ॥१३०॥

---

१. मुलांच्या आग्रहामुळे. २ वत्साचें आपल्या माथ्याने गाईला हुंदडणें.

अशा प्रकारें शुकमुनि प्रसन्न होऊन, परीक्षिती राजाचे संदेह फेडूं लागला. त्यानंतर परीक्षितीने चार प्रश्न विचारले. 'कृष्ण योगशास्त्राचें महत्त्व सांगतात व गृहस्थाश्रम कसे पत्करतात ?, देव सांगतात उपदेश अहिंसेचा, आणि इकडे 'दैत्यहनन' हिंसा करतात; अष्टविध ब्रह्मचर्याचा नियम उपदेशितात व आपण सर्व उपभोग घेतात; स्त्रियांनी असें कोणतें विशेष पुण्य केलें की ज्यामुळे त्यांचा श्रीकृष्णाशीं संबंध विशेष आला. त्यांचीं उत्तरें कवीने पुढे दिलीं आहेत. त्यांतील एक उत्तर नमुना म्हणून देतों. दैत्याशीं युद्ध करावयाचें कारण म्हणजे त्यांचा राक्षसी स्वभाव बदलून त्यांना 'दैवी प्रकृतीचे' बनविण्याची परमेश्वराची धडपड होय.

> जैसिया टांकिया अयोग्य धोंडी : कर्ता फोडी घडींविघडीं
> गर्भस्तासि मूर्त घडी : ते करि पूज्येमान ॥१४१॥
>
> अमंगळ कठिण हीण : त्यासि आणि पवित्र देवपण
> मग कल्पिले मनोर्थ ग्रहण : पूर्वि सेवितयाचें ॥१४२॥
>
> तैसा श्रीकृष्ण बाण झोडी : तीहिं प्रकृतीचीं देहें फोडी
> पवित्र सगुण देह घडी : दैवी प्रकृतीचे ॥१४३॥

ज्यांच्या पोटीं पुढे श्रीकृष्ण अवतारधारी झाले, त्या वसुदेव-देवकीची पूर्वपीठिका सांगतांना, ते पूर्वी 'सुतप' व 'सुतपा' होते व त्यांनी अत्यंत कडक तपश्चर्या करून वरदान कसें मिळविलें, याचीहि कथा कवीने सांगितली आहे. तें सांगत असतां, चक्रधरांनी जो महानुभावांना 'आचार-धर्म' सांगितला, त्या धर्तीवर त्यांच्या तपाचें वर्णन केलें आहे.

> 'नित्य करीति भिक्षाटणें : निरसें विरसें सेवितीं अन्नें
> आहार चतुर्भाग उणें : स्वभावो तोडिलें ॥१६३॥
>
> घरोघरिंचिया चिंधिया : परावर्ण करिती धांदिया
> ज्या सर्वजना देखिलिया : विकृति वाटे ॥१६४॥
>
> विविक्त आहार उणेंपणें : पाठी पोट एक वाटणें
> तेणें चौदा इंद्रियां ठावो सांडणें : सहजचि जालें ॥१६६॥

त्या तपाचा परिणाम, त्या तपोवनावर झाला.

आधि स्थान रम्य सात्त्विक : वरि आले तप यौगिक :
सामर्थ्यें वर्तलें आणिक : तें आईक राया ।। १७० ।।

अवकळा फुलले तरुवर : पुष्पघोषिं आले महुर
रितुविण फुल्ले अंकुर : वनस्पतिसिं ।। १७१ ।:

पर्वता पाझर फूटले : पक्षजात निर्वैर जाले
सात्त्वीक भाव प्रकटले : भूतजातांसि ।। १७२ ।।

ती बातमी ऐकून मथुरेच्या राजाने वनांत येऊन विनंती केली.

तुम्ही मथुरा नगरा येईजे : जन कृपादृष्टि अवलोकिजे
आम्हां सुकृता मेळवीजे : आपुलेनि संगें ।। १७७ ।।

दुर्भाग्यासि निधान जोडे : साधनेंवीण मोक्ष सांपडे
तरि संताचें दर्शन घडे : ग्रहस्थांसि पै ।। १७८ ।।

राजाने ‘ सुतप–सुतपां यांच्यासाठी ’ जी ‘ पटिशाळा ’ बांधली, तीच पुढे अनेक वर्षांनी ‘ बंदिशाळा ’ झाली.

राज्यभ्रष्ट वसुदेव पुढे मथुरेस कसा आला, गुप्तरूपाने कसा राहिला; कंसाची कृपा त्याने कोणत्या प्रसंगामुळे संपादन केली, अशा प्रकारें देवकी-विवाहापर्यंत हकीकत कवीने आणली.

एकदा उत्तर देशाच्या राजाने मथुरेवर स्वारी केली, त्यावेळीं वसुदेवाने पुढाकार घेतल्याने, उग्रसेन बंदीतून सोडविला गेला. त्यावेळीं वसुदेवाने नागरिकांना कसें प्रोत्साहित केलें, याचें कवि वर्णन करितो :

वसुदेवो दैत्यांसि म्हणे : ज्यांची खाइजती खानपाणें
त्यासि प्राण वंचिजे निर्वाणें : हें नवल चोज ।। २५८ ।।

ज्याचेनि महिमानें लाहिजे : त्यासि निर्वाणीं चुकिजे
**तया परिस संग्रामी मरिजे** : तें महानिकें ।। २५९ ।।

त्याचा परिणाम असा झाला की वसुदेवाला मुख्य सेनापतिपद दिलें.

रुधिरें नदि वाहत : चातुरंग जालें समाप्त
रणि धरिला त्वरित : राजा सैन्यसिंधु ।। २६८ ।।

रावो उग्रसेन सोडविला : वसुदेवो यशवंतु जाला
सैन्य सींधु मथुरे आणिला : थोरें सन्मानेसीं ॥ २६९ ॥

अशा प्रकारें तिसरा प्रसंग, देवकी विवाह सांगून ३१५ व्या ओवीच्या शेवटीं समाप्त झाला आहे.

१०. चौथा प्रसंग ओवी ३१६ ते ४९२ असून, पांचवा ४९३ ते ६३६ आहे. चौथ्या प्रसंगांत, कंसांनी मारलेलीं सात बाळें म्हणजे पूर्वीचीं कोण होतीं, देवकीच्या विवाहकालीं आकाशवाणी कशी झाली, वसुदेव-देवकींना बंदिशाळेत कसें ठेवलें, इत्यादि गोष्टी साद्यंत श्रीकृष्णजन्मकथा सांगून त्यांना गोकुळांत नंदाच्या घरीं कसें ठेवण्यांत आलें, याचें वर्णन आहे.

वसुदेवाने श्रीकृष्णाला गोकुळांत यशोदेजवळ ठेवतांना त्याच्या मनांतील विचार कवीने पुढीप्रमाणें दिले आहेत :—

प्राणासि प्राण क्रमीतां : किं आत्मा देहावेगळा करितां
तैसें बाळ यशोदेपुढें ठेवितां : वाटे वसुदेवासि ॥ ४३६ ॥
किं बंदिखानीं जोडलें निधान : हें झणि कंसराया होईल श्रवण
तें गोकुळांत ठेविलें चोरुण : ठाईं यशोदेचां ॥ ४३७ ॥
किं ते सर्व जोडी सर्वजणाची : मज परदैवें जोडिली साची
आस धरूणि जतन होआवयाची : ठेविली यशोदेघरीं ॥ ४३८ ॥
किं तें **दैत्यकंसाचें मरणबीज** : पर दैव थोर जोडलें मज
तें वाढवावया ठेविलें सहज : एशोदे पुढां ॥ ४३९ ॥
किं ते आपुली परम संपत्ति : झणि वेदादिक देखती
ते गोकुळीं ठेविली गुप्ति : घरिं येशोदेचां ॥ ४४० ॥

अशा प्रकारें कथा सांगत, गोकुळांतील आनंदाचें वर्णन करून, चौथा प्रसंग कवीने संपविला आहे.

११. यानंतर पांचव्या प्रसंगांत यादवांची पूर्वपीठिका कवीने दिली आहे. तसेंच कंसाची कुलकथा सांगितली आहे आणि द्वारका कशी निर्माण झाली यांच्या कथा सांगितल्या आहेत.

मागधाशीं लढतांना कृष्ण, बळिराम यांना देवांनी रथ पाठविला त्याचें वर्णन पुढीलप्रमाणे आहे :

देविं केलें समुद्रमंथन : चौदा रत्नें जाली उत्पन्न
तेथ रथ जाला निर्मान : षड्मुखाचा ।। ६३९ ।।

अनुष्टें अभोज्य अमळें : अमृतसागरींचीं दिव्यकमळें
लाखौलि गुंफौनि वैजयंती माळे : नाना दिव्य परिमळीं ।। ६४० ।।

ते माळ ध्वजीं विलंबत : दिव्यशस्त्रें सर्वयुक्त
रथ ठेविला काळ बहुत : माहाविष्णू क्षीराब्धिरायें ।। ६४१ ।।

तया दीसे सुमन गुढरू : पाहोनि समयो अवसरु
पाठविला उचित प्रकारु : श्रीकृष्णांलागि ।। ६४२ ।।

अशा प्रकारें द्वारकामाहात्म्य, मागधाशीं युद्ध इत्यादि कथा सांगून कवीने पांचवा प्रसंग पुढीलप्रमाणे समाप्त केला-

शूकाची अनुहात वाणी : अनुवादे कथावचणिं
ते आइकावि श्रोतां श्रवणिं : म्हणे **गोपिनाथु** ।।६३६।।

१२. प्रस्तुत कवि सोळाव्या शतकाच्या अगदी आरंभींचा कां वाटतो, याचीं कारणें आता पाहूं—

(अ) यांत यावनी शब्द नाहीत.

(आ) चतुर्थी व द्वितीया यांचा **ला** प्रत्यय कोठेहि ६४६ ओव्यांत आढळत नाही.

(इ) 'विनविलें पाहिजे' ही वाक्यरचना, जी एकनाथांच्या काव्यांत अनेक वेळां आढळते, ती एकदा देखील आढळत नाही.

(ई) तो म्हणाला 'की' या प्रकारचें 'की' यांत नाही, त्या जागीं 'जे' येतें.

(उ) पूर्वीच्या विभक्ति व त्यांचे प्रत्यय यांत विशेष बदल नाही. **याचेनि हातें** (याच्या हाताने); '**आमचेनि दैवें** जोडला

ऐसा' (आमच्या सुदैवानें हा आम्हांला लाभला); ऐसा विवेक करावा : **तुम्हीं सकळीं जनीं** (तुम्हीं सर्वांनी); त्याहिं-त्यांनी (तृतीया एकवचन); विचित्रां भेदीं (निरनिराळ्या प्रकारें);

(ऊ) 'झणि' नकारात्मक; प्रकट जालि जरि याची वाणी : तरि हा **झणि** जाईल येथौनि : (तर हा येथून जाईल बरें !);

(क) 'झाला' असें रुप न येतां 'जाला' असें रूप येतें.
'ऐकतु' च्या जागीं 'आईकतु' असें रूप येतें.

१३. प्रस्तुत कवीचे इतर अध्याय आज उपलब्ध नसले, तरी तो बहुश्रुत असून, त्याने अनेक कथा वाचल्या होत्या असें दिसतें. उदाहरणार्थ, 'द्वारका' समुद्रांत कां निर्माण केली, यासंबंधी ४-५ कथा त्यांनी दिल्या आहेत. तेव्हा त्याने पुराणें स्थलवर्णनें, स्थलमाहात्म्य, असे ग्रंथ वाचले असावे. तसेंच कोणाचीहि 'पूर्वपीठिका' सांगण्याची त्याला हौस दिसते. तसेंच ' मऱ्हाटी ', ' द्वारका ', 'प्रतिष्टान' यावरील त्याची उपपत्ति वाचून, नांवावर कोटी करण्याची त्याला हौस होती, किंवा कोणी तसें केलें असल्यास, तें लक्षांत ठेवून योग्य स्थळीं उपयोग करून घेण्याची प्रवृत्ति होती. मराठी, महाराष्ट्र, प्रतिष्ठान यांचा त्याला अभिमान होता. तो मराठीभाषाप्रभु होता व कोणताहि विचार उचित शब्दांत व्यक्त करण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आहे. कांही कांही नवीन पण व्यवहारांत नित्य आढळून येणाऱ्या उपमा तो मधून मधून देतो ' रचना-कौशल्य ' या दृष्टीने विचार करूं लागल्यास, या पांच अध्यायांवरूनच तें ठरवणें जरा कठिण आहे. पंचवीस अध्याय असतील, तर सावकाशपणें एक एक पूर्वपीठिका सांगितली तरी चालेल; पण पांच अध्याय होऊन रुक्मिणीस्वयंवराच्या कोणत्याहि भागाला प्रारंभ झाला नाही. जणु काय तो **भागवतच** सांगत आहे, असा ग्रंथांचा विषय वाटतो. तेव्हा कोणती कथा, किती द्यावी, त्या कथेचा बादरायण संबंध आहे की जवळचा संबंध आहे, याचा विचार न करितां, ' पूर्वीं कवींनी सांगितल्या नाहीत,' म्हणून कथा सांगित सुटणें, हें उचित वाटत नाही. प्रसंगाला अनुरूप अशी गोष्ट असून ती सांगितल्यामुळे

कथेचा रंग वाढेल, शोभा येईल व अनुचित असें न वाटेल, तर त्या कथा सांगण्याचा उपयोग. या दृष्टीने सारासार विचार कवीला जरा कमीच, असें या पांच अध्यायांवरून वाटतें. तथापि तो बहुश्रुत असल्याने, कांही-तरी अज्ञात अशी गोष्ट तो सहज ओघांत सांगून जातो. जसें, 'काव्य-मुद्रेचीं पंचवीस तत्त्वें'; या दृष्टीने इतर अध्याय उपलब्ध झाल्यास, कलाविषयक, विद्याविषयक, इतिहासविषयक कांही उल्लेख सापडण्याचा संभव आहे. हे अध्याय जरी सापडले नाहीत, तरी या पांच अध्यायांत कवीने आपला प्रभाव, आपला भाषाभिमान, आपली बहुश्रुतता दर्शविली आहे. निदान मऱ्हाठी म्हणजे ज्या भाषेंतून सर्वांना '**राहाटी**', व्यवहार, अर्थप्रकाशकौशल्य सहज दाखवितां येतें, ती 'मऱ्हाठी' भाषा ही कल्पना अजूनहि मननीय आहे. ग्रंथकारांनी आपले ग्रंथ सामान्य जनतेला जितके अधिक प्रमाणांत समजतील अशा लोकभाषेंत लिहावे, व आपला ग्रंथ कांही व्यक्तींच्या साठी एखादी विहीर म्हणून न राहतां, सर्वांना स्नान करितां येईल, अशी ती लोकगंगा असावी, ही कवीने वर्णिलेली कल्पना व ध्येय नेहमीं डोळ्यांसमोर ठेवण्याजोगें आहे.

# १३. प्रश्नार्णव*

१. कवीश्वर आम्नायांतील 'प्रमेय'कार 'मुरारीमल विद्वांस महानुभाव' यांचे नगर येथील शिष्य, **गोपीभास्कर** यांच्या 'प्रश्नार्णव' ग्रंथासंबंधी परिचय करून देण्याचें आज योजिलें आहे.

२. मुरारीमल्ल शके १५२७ मध्ये 'ईश्वर दर्शनास गेले. अहमदनगरचे पेशवे मुधोपंत देशपांडे यांचा पुत्र गोपीभास्कर, यांनी मुरारीमल्लांच्या कडून दीक्षा घेतली होती. गोपीभास्करांचा काळ, शके १५१५ ते १६००, असा दिलेला आहे (श्रीयुत य. खु. देशपांडे, महानुभाव वाङ्मय, पान ७०). कै. भावे यांच्या 'महानुभावग्रंथसूचीं'त प्रस्तुत ग्रंथाचा नामनिर्देश आहे. गोपीभास्कर यांच्या 'राजभद्र' व 'श्रीमद्भगवद्गीताटीका' यांची माहिती कै. भावे व श्रीयुत य. खु. देशपांडे यांनी आपल्या ग्रंथांतून दिली आहे. प्रस्तुत ग्रंथाविषयी, नांवाशिवाय, परिचय कोठेहि अजून आला नाही. म्हणून ही माहिती नवीन आहे असें म्हटलें तरी चालेल.

३. श्रीसर्वज्ञ चक्रधर यांच्या निरूपणाची पद्धति कशी असे, याविषयीं वर्णन करणाऱ्या महानुभाव वाङ्मयांत अनेक हस्तलिखित पोथ्या आहेत. त्यांपैकी 'बत्तीस लक्षणांची टीप' (द्वात्रिंशल्लक्षण) हा ग्रंथ 'यशोदाचिंतामणी ट्रस्ट' यांच्या कृपेने पूर्वी प्रकाशित झाला आहे, तो वाचकांच्या परिचयाचा आहे. त्यापेक्षा थोडा निराळ्या प्रकारचा आजचा ग्रंथ आहे; पण विषय मात्र श्रीचक्रधरांच्या निरूपणपद्धतीविषयीच आहे.

---

* ऐतिहासिक संकीर्ण निबंध-खंड ६ (भा. इ. सं. मं. त्रै.) पृ. ४०-४६.

४. पट्टाधिनिष्ठित महदाचार्य श्रीनागराज महानुभाव पंजाबी यांचे शिष्य रामचंद्र बाबा महंत, यांच्या संग्रहांतून उपलब्ध झालेली ही पोथी रिधपूरचे महंत गोपिराज यांचेकडून मिळाली. तसेंच, दुसरी एक पोथी महंत गोपिराज यांनी दिली. अशाप्रकारें दोन हस्तलिखित प्रती पाहावयास मिळाल्या. त्यांपैकी एक नीट असल्याने तिच्यावरून माहिती देत आहे. दुसऱ्या प्रतीचा आधार संदिग्ध अक्षरें स्पष्ट करण्यासाठी घेतला आहे. प्रस्तुत ग्रंथ 'सकळा' नांवाच्या सांकेतिक लिपींत लिहिला आहे. या ग्रंथाचीं पानें पाठपोठ २५० च्या वर आहेत. प्रत्येक पानावर १३ ओळी असून अक्षर स्पष्ट आहे. प्रकरणाचा शेवट असेल तेथे तांबड्या शाईचा उपयोग केला आहे व शेवटीं समाप्तिदर्शक शक लिहिला आहे. 'सके १६८५ : शुभना नाम संवत्सरी : वद श्रावणा भीतरी : तीथ तेरसे सोमवारी : पुस्तक संपूर्ण हस्ताक्षेरी : सारंगधराचे हस्ताक्षेर :॥: सारांश शारंगधर लेखकाने या ग्रंथाची प्रत शके १६८५ मध्ये श्रावण वद्य त्रयोदशी, सोमवार, या दिवशीं केलेली आहे; म्हणजेच ग्रंथकर्त्याच्या हयातीनंतर ८५ वर्षांनी लिहिलेली ही प्रत आहे.

५. **ग्रंथाचा आरंभ** : 'श्रीप्रेशायन्मा (श्रीपरेशाय नमः ?) :॥: ईश्वरीची[1] नीरोपणी[2] दोन परी : एक बंधरूप : तयाचें पांच[3] भेद : वचन : १ : वाक्य : २ : प्रक्रण (प्रकरण) : ३ : महावाक्य : ४ : भर : ५ : एक नीरोपणाची मोकळीक : एकदोन लीळेमध्ये जन्मली : तीए लीळेचे भेद दोन : एक ज्ञानरूप लीळा ते निर्वच : एक नमुधीं लीळा : तीएचा नीर्वच नव्हे : तीए लीळे आंत आवच्छेदरूप तें वचन : एक लीळेचे शब्द :॥: तया वचनाचे भेद पांच : आर्थ : यांत **प्रण्ण** : तयाचे भेद तीन : आक्षेप : आडणी : वीरोध :॥: अनुक्रमें असत : एक मोकळीं असत : ते

---

* मोडक जंत्री–सुभानु संवत्सर. बाकी बरोबर म्हणजे सप्टेंबर ५ इ. स. १७६३.

१ श्री चक्रधर; २ निरूपणपद्धति ३ पंचवार्तिक (श्री. मो. स. मोने–संग्राहक), पान २७–२९ पाहा.

ज्ञानवंती जेथील तेथ लावीजेती : **या स्थळाचें नांव प्रष्णार्णव :** ...इत्यादि.

वरील आरंभावरून श्रीसर्वज्ञ चक्रधरांच्या निरूपणाची पद्धति व त्यांत निरनिराळे प्रश्न, संदेह, यांचा परिहार कसा केला जातो याचें वर्णन, आलें आहे, असें दिसतें. **स्थळ** म्हणजे जेथे साधक-बाधक चर्चा केली जाते, असा ग्रंथ. यांत प्रश्नाचे तीन प्रकार सांगितले आहेत. 'आक्षेप : आडणी : वीरोध' याचें स्पष्टीकरण पुढील चर्चेत आहे. [आक्षेप म्हणजे अन्य अर्थाशीं बाधा; आडणी-अर्थ मांडणें; विरोध म्हणजे एक दोनी अर्थ. ]

'ईश्वरें निरूपिलें[1] शास्त्र : तयाचीं ३२ लक्षणें[2] : तयांत प्रस्नें म्हणीजे पुसि[3] : तयाचे भेद तीन : आशंका : आक्षेप : वीरोध : याचा परीहार ज्ञान दृष्टी :।: तया ज्ञानाचें मूळ लीळा[4] : तीये आंत आवच्छेद-रूप ते वचन : वाक्य : प्रकरण : तयाचीं बारा[5] प्रकरणें : तयाचे उपन्यास : आडणी : पाठी आर्थी : तयाचें उपलवण[6] : एथार्थाचा ज्ञात निर्वचीं : म्हणीतलें : ज्ञान : भक्ति : जीवीं भावली असे : पा : शब्दाचें ज्ञान करी कां ते चातुष्टयरूप : बोध : भक्ति : पदार्थाचें ज्ञान करी : जीवीं ज्ञान भक्ति वैराग्य बींबली असे : म्हणौनि प्रश्नार्थ होए : वीरोधार्थी विप्रयो दे : वचन भाषा जाणे : आर्थाचे गर्भ जाणे : कां पाठा आर्थाची वीत्पत्ती जाणे : ज्ञानीया शास्त्र चाली जाणे : तीया कैसीया : **संदेह** म्हणीजे पदार्थाचें अज्ञान : १ : **संशय** म्हणीजे होए कीं नव्हे : २ : **आशंका** म्हणीजे यथार्थेसी बाधा : ३ **आक्षेप** म्हणीजे आन्येथार्थासी बाधा : ४ : **प्रश्न** म्हणीजे पुसि : ५ : **विरोध** म्हणीजे एकी दोनी अर्थ : ६ : **आडणी** म्हणीजे अर्थ मांडणें : ७ : **चर्चा** म्हणीजे नेणौनि बाधा : ८ :

---

१. सूत्रपाठ. २. 'बत्तीस लक्षणांची टीप' (पंडित आनेराज यांची). ३. विचारणें, पृच्छा. ४. लीळाचरित्र (श्रीचक्रधरांचें जीवनचरित्र). ५. अन्यथावृत्ति, संसरण, इत्यादि. सूत्रपाठ पाहा. ६. अधिक स्पष्टीकरण, उलगडा.

**जीज्ञासा** म्हणीजे जाणौनि बाधा : ९ : **मथन** म्हणीजे अर्थ दृढकरण : १० : **उपन्यास** म्हणीजे अर्थ उडवणें : ११ : **उद्घाटन** म्हणीजे अर्थ निरधार : १२ : **संकेत** म्हणीजे सीधांत : १३ : **पक्ष** म्हणीजे एथार्थ दीसे : पर सीधांत नव्हे : यथा दीवली : १ : **विपक्ष** म्हणीजे दुसरेया स्थळ कीजे : २ : **पूर्वपक्ष** म्हणीजे एक अर्थ होए : यथा मंजिष्ट : ३ : **सीधांत** म्हणीजे जया पुरता अर्थ होए : पदार्थ पीत : सीधांत सुवर्ण : **आतां प्रश्नान्वयोकार गोपीभास्कराचा** तथा **प्रश्नार्थ उपलवणें** : तेही तयाचें चि अन्वयकाराचें' इत्यादि.

वरील उताऱ्यावरून गोपीभास्करांच्या मनांत कोणते प्रश्न उपस्थित होऊन त्यांनी ग्रंथ केला असावा याची कल्पना येईल. 'प्रश्न करावया चार प्रकरणें : **परपक्ष दुषावया** : १ : स्वपक्ष साधावया : २ : वीरोध धर्म घाडावया: ३ : महंतत्व उमटावया : ४ : "

६. **ग्रंथाचा शेवट** : ग्रंथ संपवितांना पुढील ओव्या समाप्तिदर्शक आढळतात।

मोकळी मोतीए पसरली । तैसीया प्रश्नाचीया चाली
ते एथास्थीती वोवीली : पाहीजे ज्ञानांतरी ॥ १ ॥

**आशंका आक्षेप वीरोध** : ऐसा प्रश्न त्रीवीध :
पाठी असे वीवीध : ज्ञानदृष्टी ॥ २ ॥

परावर प्रश्न माळीका : आन्वयेकारवछ जननी बाळका
**भास्कर** उपनाम संज्ञीका : आसे तया ॥ ३ ॥

**बत्तीस लक्षणें शास्त्राची** : आशंका आक्षेप संशयाचीं
लक्षुनीया अर्थ गर्भीची : आनुवर्तवीली ॥ ४॥

पाहुनि शास्त्रसर्वळा : हे बोलिली प्रश्नमाळा
सौपान सखोला लीळा : उपन्यास ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
अनुक्रम २२२८ दि. ....

उभए राहाटीचा ज्ञानमार्ग : तयांत दीसे आर्थभंग
परीहार दिसे अभंग : आर्थ साधकाचा ॥ ६ ॥

**देखीलेया आक्षेप आडणी : तयाची आर्थ घडवणी**
**आर्थाची उदाहरणी : करुनिया** ॥ ७ ॥

परावर ज्ञात : असे **प्रश्नहेतु**
**तयाचा करी अर्थ : विशेष ज्ञानीया** ॥ ८ ॥

जालीया संजात बोध : शास्त्र परीसीले वीवीध
**तो प्रश्न परिहार संबंध : लाऊं जाणे** ॥ ९ ॥

प्रकरणें पर अनंत : पाठीं आर्थ वीचीत्रापरी आर्थ
नीर्वचीता जाले चकीत : संदेहाचा ॥ १० ॥

एकाचें आसे आज्ञान : एकाचे आसे संशयात्मक मन
एका अर्थाचें आनुवर्तत : करूं न लभे ॥ ११ ॥

संदेहीं पडला चौथा ज्ञानीया : संदेह असती तया
मी काए जाणे मूढमतीया : ज्ञानसीध परमाण ( प्रमाण ) ॥१२॥

सर्वत्र लाधले अज्ञानबुधी : तैसीची जाली देहलब्धी
आभ्यास रहीत कुबुधी : संग न करीची ज्ञानाचा ॥ १३ ॥

इति प्रश्नार्णव आपार । आन्वयेकार **गोपीभास्कर**
**लेखिक बल्लाळ पाळेकर** । ज्ञाने सूध करीती ॥१४॥

वरुणाळत्र आवर्त वळसे । तैसे सवीध कळेचे उपन्यास
ईश्वर ज्ञानी वीद्वांस । रीग नीग जाणती ॥ १५ ॥

वरील ओव्यांवरून अन्वयकार गोपीभास्कर यांचा 'प्रश्नार्णव' ग्रंथ लेखक 'पाळेकर' यांनी उतरला असून, त्यामुळे प्रश्नाच्या अर्णवाच्या लाटांतून, 'आवर्तवळसे', यांना टाळून आंत शिरून, बाहेर कसें निघावें,

यांचें ज्ञान वाचकांना होईल, असें दिसतें. शास्त्राभ्यास म्हणजे काय, तो कसा करावा, ज्ञानदृष्टी म्हणजे काय, कसोट्या कोणत्या आहेत, स्पष्टीकरण किती प्रकारें होतें, संशय-आशंकादिकांचें परिहरण कसें करावें, इत्यादि गोष्टींचें ज्ञान, या ग्रंथानें व्हावें, असा ग्रंथकाराचा उद्देश आहे.

७ **ग्रंथांतील विषयाचें स्वरूपः**—लीळाचरित्रांतील लीळा ही मुख्य आधाराची जागा; मोकळें व स्फुट निरूपण निराळें, पण वचन, वाक्य, प्रकरण, महावाक्य, भर, या पांचांनी निबद्ध तें निरूपण निराळें; नंतर लीळा किती प्रकारच्या, याचें उत्तर, १ आचारपर, २ विचारपर, ३ औदास्यपर, ४ प्रसन्नपर; ५ सहेतुक, ६ निर्हेतुक, ७ खंतीची, ८ कणवेची, असे **आठ** प्रकार ग्रंथकारांनी दिले आहेत. जिचा 'निर्वच' नाहीं ती नुसती लीळा, व जिचें 'निर्वचन' होतें ती ज्ञानरूप लीळा; त्या लीळेंत अवच्छेदरूप तें वचन; मग **वचनाचे भेद** वर्णिले आहेत; १ प्रकरणपरत्वें निरूपिलें तें; २ अर्थ म्हणजे स्थळापुढील वचन; ३ उपसंहार म्हणजे प्रकरणाच्या अंतीचें; ४ वचनभाषा व 'काक्वादि' चतुष्टय (काकु-कक्षा-भावार्थ-प्रकरण); त्यानंतर वचनसमूह कसा असतो, तें सांगतात; १ 'एक दो विश्रांतीचें वचन'; २ वाक्य दो चौ शब्दाचे; ३ प्रकरण : सातापांचा विश्रांतीचें; ४ महावाक्य म्हणजे बारा प्रकरणांचा समुच्चय; ५ भर म्हणीजे अठरा **विश्रांति** पर्यंत सकळ शास्त्राचा **आवाका.** ६ वचनाचें व्याकरण-दृष्टीनें प्रकार पहा; दो ती **पदाचें** तें **वचन,** चौ वरुते बारापर्यंत **वाक्य;** बारा पदांचा समुच्चय तें **प्रकरण;** बारा वरुतें चोवीस पर्यंत पदाचें **महावाक्य;** बारा प्रकरणाचा समूहो ती **पेंढी;** सकळ शास्त्राचा आवाका, तें **भर** (पंचवार्तिक, श्री. मोने, पान २८ पाहा).

आता **अर्थभेद** सांगतात : १ **लक्षणार्थ** म्ह० ईश्वर-हेतु; व वचन-हेतु; २ **उपलवण** म्ह० कांही वचनार्थ; ३ **वीतपत्ती** म्ह० बहुत अर्थकरण; ४ **प्रमय** म्ह० आर्थ जाती सांघीतलीया वचनें; ५ **पक्ष** म्ह० एक अर्थ होए; ६ पूर्वपक्ष म्ह० सीधांत अर्थ नव्हे; ७ **विपक्ष** म्ह० विपर्यायें अर्थ; ८ **उपराळा** म्ह० मागील प्रकरणांचा; ९ **व्याप्ती** म्ह० सर्व स्थल भीडवणें; १० **अतिव्याप्ति**-आणीक अर्थ तयांत मोडणें; ११ **सर्वव्याप्ती**

म्ह० आचारी विचार सांगणें, विचारीं आचार सांगणें; १२ **तात्पर्यार्थ** म्ह० तोकडा अर्थ; १३**मतीतार्थ** म्ह०घडावणी करूनि अर्थ; १४ **तत्वार्थ** म्ह० सारार्थ; १५ **सूचिकार्थ** म्ह०भविष्यार्थ; १६**सीधार्थ** म्ह० सीधांतार्थ; १७ **नीर्णयार्थ**–नीर्धारिला अर्थ; १८ **वीनयोगार्थ** म्ह० यथा, प्रयत्नीं देवाचें साहाय्य; १९ **कल्पीतार्थ** म्ह० न घडता **अर्थ**, एया आकाशा फुल; २० **सीधा अर्थ** म्ह० मागीलासी सांदा; २१ **आन्वयो** म्ह० पुढीलासी सांदा; २२ **सांखळी** म्ह० वचनाची, प्रकरणाची, अर्थाची, पक्षाची लापणीक; २४ **साहीत्यार्थ** म्ह० वेव्हारें परमार्थ; वित्पत्ति म्हणीजे आणीक अर्थ योजणें; **वीत्पन्नता** म्हणजे सकळ स्थळ अनुवर्तवीजे. अशा प्रकारें निरनिराळया अर्थांचें 'निर्वचन' ग्रंथकाराने केलें आहे.

यानंतर **जीव, देवता, परमेश्वर व प्रपंच** या चतुष्टयाच्या बाबतींत वरील प्रकारें अनेक प्रकारचे प्रश्न उत्पन्न करून त्याचीं उत्तरें ग्रंथकाराने दिलीं आहेत. त्यांतील कांही नमुने पाहूं.

(अ) लीळाचरित्रांत, 'वसति', 'अवस्थान' असे शब्द येतात, त्याचें स्पष्टीकरण पुढीलप्रमाणें; संबंधमात्र म्हणजे 'जेथे चरणचारी : उभे' म्हणजे एखाद्या गावाला पोचलें, तर क्षणमात्र, न बसतां उभें राहाणें; त्या गावांत राहिले, असा अर्थ नाहीं, '**वसति**' म्हणजे एक रात्र राहाणें; **कुडीवसति** म्हणजे दोन दिवस राहाणें; **अवस्थान** म्हणजे तीन दिवसांवर बारा वर्षें-पर्यंत; **माहाअवस्थान** म्हणजे शतसहस्र वर्षें.

(आ) दोन वचनांतील भेद कोणता ? सूत्रपाठांत दोन प्रसंगीं दोन वचनें आहेत. 'खोटें बोलू नये, सत्य बोलावें' असा त्याचा साधारण अर्थ आहे. 'एथ हासतांही लटीकें न बोलीजे'; 'भटो, ऐसा सत्यार्थही न बोलीजे' या दोन वाक्यांवरून खरें बोलावें की नाही, असा संदेह उत्पन्न झाला; त्याचें उत्तर पुढीलप्रमाणें आहे.

"हासतां लटीकें : एथ प्रसवाची चाल (कार्याची वाढ) नीराकरीली; आणि भटो, ऐसा सत्यार्थ-..." एथ पुढीलाचा मरणीं प्रवेशे : तर : सत्यही न बोलावें : मागीलें वचनी 'लटके : राभस्य : नीराकरिलें : पुढीलें वचनीं : एस लटीक बोलौनि पुढीलाचें पाप चुकवीलें : मागील वचन : सत्याची हे पूर्वावस्था : सांगितली : पुढीलें वचनीं सत्याची उत्तरावस्था सांगीतली : मागीले वचनीं असत्याची पूर्वावस्था सांगितली : दुसरे वचनीं प्रसवाची उत्तरावस्था सांगितली.'

वरील निरूपण वाचीत असतां, संस्कृतमधील 'सत्यं ब्रूयात्, प्रियं ब्रूयात्, न ब्रूयात् सत्यमप्रियम्!' या वचनाची आठवण होते.

(इ) श्रीचक्रधरांनी आपल्या शिष्यांना, वचनें घोकण्यासंबंधी पुढील उपदेश दिला आहे. १ 'काळें करूनि उपयोगा जाये;' २ 'पाठीं अनुभवें जाणाल;' तर यांत भेद कोणता, असा प्रश्न केल्यास, पुढील उत्तर आहे. 'मागीले वचनींचा काळांतरीं **आपणयासि उमटे** : म्हणीजे : मनन करितां : शास्त्र आवर्तितां : उमटे : आणि पुढीलें वचनीं **संयोगें उमटे** : म्हणीजे : दुसरीया बोलता : चर्चा मथन करितां : उमटे :'

८. 'प्रश्नार्णव' ग्रंथांत वरीलप्रमाणें १५०० पेक्षा अधिक प्रश्न आहेत महानुभाव तत्त्वज्ञानाचा ज्यांना दृढ परिचय आहे, त्यांना शंका, संदेह, विसंगतिभास, वचनांतील भेद, विशेष शब्द वापरल्याबद्दल समर्थन, अशा अनेक गोष्टी कळतील; पण इतरांना निदानपक्षीं इतकें दिसून येईल की **सतराव्या शतकांत मराठी भाषेंत** 'शब्दाचा व्यापकपणा, सूक्ष्मपणा, वेचकपणा, सयुक्तिकता,' इत्यादि गुणांची वाढ महानुभावांनी किती कळकळीने व आस्थेने केली होती; आणि 'प्रश्न व त्याचें समाधान' याला शास्त्रीय स्वरूप दिलें होतें.

९. शेवटीं, '**वादः प्रवदतामहम्**' या वचनावर श्रीज्ञानेशांनी आपल्या ज्ञानदेवींत केलेली टीका या दृष्टीने आपल्या नजरेसमोर आणून हें प्रकरण संपवितों.

' अगा बोलतयाचिया ठार्यी : वादु तो मी पाहीं :
जो सकलशास्त्रसंमतें कहीं : सरेचि ना ।। ९-६७

जो **निर्वचुं** जातां वाढे । आइकतया उत्प्रेक्षे सळु चढे ।।
जयावरी बोलतयांची **गोडे । बोलणीं** होतीं ।। ९-६८

शब्दाचें ' निर्वच ' करणें म्हणजे काय, शंका-आक्षेप, निरसन-परिहार यांच्या लहरीवर लहरी उसळून, वाद रंगांत कसा येतो, वादरूपी हिऱ्याचे निरनिराळे पैलु पाडून रसिक व मार्मिक प्रेक्षक विविध रंगाच्या खोल छटा पाहून समाधानाने मान कसे डोलवतात, इत्यादि गोष्टींचें प्रतिपादन कोणत्या शास्त्रीय पद्धतीच्या आधाराने हे महानुभाव करीत होते, याची सामान्य रूपरेषा आपणांला आली म्हणजे या लेखाचें काम संपलें.

समाप्त

मराठी ... ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 24228 दि: ...
क्रमांक ...9952... नों: दि: 30/12/95

# परिशिष्ट

## कै. प्राचार्य हरि नारायण नेने यांचे संशोधनपर ग्रंथ व लेख

### ग्रंथ

१ शिक्षणकला आणि मानसशास्त्र (१९३१).

२ चक्रधरसिद्धान्तसूत्रें ( प्रा. नी. ब. भवाळकरांच्या साहाय्याने ) (१९३२).

३ दृष्टान्तपाठ ( प्रा. नी. व. भवाळकरांच्या साहाय्याने) (१९३७).

४ चक्रधरोक्त सूत्रपाठ, मूल (१९३४).

५ चक्रधरोक्त सूत्रपाठ, सटीप (१९३९).

६ नित्यादीनीलीळा (१९३६).

७ आचारस्थळ (१९३७).

८ लक्षणरत्नाकर व बत्तीस लक्षणांची टीप (१९३९).

९ रत्नमालास्तोत्र (पूर्वार्ध) (१९४८).

१० रत्नमालास्तोत्र (उत्तरार्ध) (१९५०).

११ लीळाचरित्र भाग १ (एकांक) (१९३६).

१२ लीळाचरित्र, भाग २ (पूर्वार्ध–खंड १) (१९३६).

१३ लीळाचरित्र, भाग ३ (पूर्वार्ध–खंड २) (१९३७).

१४ लीळाचरित्र, भाग ४ (पूर्वार्ध–खंड ३) (१९३७).

१५ लीळाचरित्र—(उत्तरार्ध) (१९५०).

## लेख*

१ दासबोधांतील एका ओवीवर नवा प्रकाश (१९३३), विश्ववाणी.

§२ ज्ञानेश्वरकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण (१९३४), श्रीज्ञानेश्वरदर्शन, भाग १.

३ तेराव्या शतकांतील शिमग्याचा सण (१९३४), भा. इ. सं. मं. त्रै., व. १४.

४ गोष्ट जुनीच पण गोडी कायम (१९३४), विहंगम.

५ महाराष्ट्र शब्दकोशांतील एक नजरचूक (१९३५) प्रतिभा, व. ३.

६ यादवकालीन एक सामाजिक दृश्य (१९३५), भा. इ. सं. मं. त्रै., व. १५.

§७ नरेंद्रकवीच्या रुक्मिणीस्वयंवरावर अधिक प्रकाश, (१९३५), भा.. इ. सं. मं. त्रै. व. १५.

§८ राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व (१९३६), भा. इ. सं. मं. त्रै., व. १५.

§९ अन्वयस्थळ व वृद्धाचार (१९३६), भा. इ. सं. मं. त्रै., व. १७.

१० लक्षणरत्नाकर (१९३६), भा. इ. सं. मं. त्रै. व. १७.

§११ हयग्रीवाचार्यकृत 'गद्यराज' (१९३६), भा. इ. सं. मं. त्रै., व. १८.

§१२ महाराष्ट्र काव्यदीपिका (१९३६), भा. इ. सं. मं. त्रै., व. १८.

---

* खालील संक्षेप योजिले आहेत.

भा. इ. सं. मं त्रै.—भारत इतिहास संशोधक मंडळाचें त्रैमासिक.

म. सा. प.—महाराष्ट्र साहित्य पत्रिका.

व.—वर्ष.

§ या चिन्हाने अंकित लेख प्रस्तुत पुस्तकांत घेतले आहेत.

§१३ श्लेष शब्दाच्या अर्थावर नवीन प्रकाश (१९३७),
भा. इ. सं. मं. त्रै., व. १९.

१४ तेराव्या शतकांतील नेवासें (१९३७) भा. इ. सं. मं. त्रै., व. १९.

१५ पंचोपाख्यान (१९३७) भा. इ. सं. मं. त्रै. व. १९.

§१६ कृष्णमुनीचें अन्वयस्थळ व अन्वयमाळिका (१९३८),
भा. इ. सं. मं. त्रै., व. २०.

§१७ पंचोपाख्यानाची महानुभावीय प्रत, (१९४०),
भा. इ. सं. मं. त्रै., व. २१.

§१८ सैह्याद्रवर्णन किंवा सैह्याद्रीमाहात्म्य (१९४३),
भा. इ. सं. मं. त्रै., व. २३.

१९ चौदाव्या शतकांतील एक महानुभावी काव्य ( १९४६ ),
युगवाणी, नागपूर.

§२० ज्ञानेश्वरींतील 'कातले चारी' (१९४७) युगवाणी, नागपूर

§२१ ,, ,, (१९४८) युगवाणी, नागपूर

२२ महानुभावांचा आचारधर्म ( परीक्षण ) ( १९४९ ),
युगवाणी, नागपूर

§२३ स्थानपोथी (१९५०), म. म. पोतदार गौरव ग्रंथ.

२४ मुकुंदराजाचा काल व भाषिक दृष्टि ( १९५३ ),
म. सा. प., व. २५.

२५ विष्णुदासनाम्याचें द्रौपदीस्वयंवर ( १९५४ ),
म. सा. प. व. २७.

§२६ गोपाळकविकृत रुक्मिणीस्वयंवर ( १९५५ ),
ऐतिहासिक संकीर्ण निबंध खंड ६ (भा. इ. सं. मं)

§२७ प्रश्नार्णव (१९५५), ऐ. सं. नि., खं. ६ (भा. इ. सं. मं.).

ग्रंथ संग्रहालय
८२८९

# सूची

अचळ वंकार १४८, १४९, १५३.
अन्नोबा (आनेराज वास) १७१.
अन्वयमाळिका १४९,१५४–१६७.
अन्वयस्थळ (दामबासकृत) १४१–१४६.
अन्वयस्थळ (कृष्णमुनिकृत) १११, १४७–१६७.
अमृतानुभव ५९.
अल्लाउद्दीन १४२.
आउसा १२९.
आनोबास १४३, १४४, १५१, १७२, १७४.
आवाइसें १५०.
आसटी १७२.
उद्धवगीता ४८, १०६, १४७.
उपाध्यास आम्नाय १४८, १४९, १५२.
ऋद्धपुरवर्णन ६०, ६३, १०६, १२५.
एकनाथ ४.
एकनाथी भागवत ५.
एल्हो १५०.
कमळाकर अयाचित १२५
कमळांबा ( कमळाइसे ) १०७, १०९, १४८, १५०.
कवीश्वर आम्नाय १४२.
कवीश्वर व्यास १४२, १७३.
कादंबरी ५८.
काव्यालंकार ६२.
कुमरे आम्नाय १२५.
कृष्णदास, संतोषमुनि ५४.
कृष्णमुनि १११, १४७–१६७.
केशिराज वास १११, १३०, १४१, १४२, १५१, १५२.
कोंकण ९८.
खालसेयाची धाडी १४२, १४४, १५२.
गद्यराज (भीष्ममुनिकृत) १६८.
गद्यराज (हयग्रीवाचार्यकृत) १४४, १५१, १६८.
गाथासप्तशती ३९.
गुर्जरशिववास १४९, १५०, १५२, १५३.
गोपाळकवि १८४–१९५.
गोपाळ पंडित १४२.
गोपीभास्कर १९६–२०४.
गोविंदप्रभु १२९, १४३, १५०.

चक्रधर ८९, ११३, १२९, १४३, १५०.
चरित्र आबाव ११२, १४७.
जनार्दन स्वामी ११३, ११४.
जानोपाध्ये १०७, ११४.
डिंभ कवि १४८, १५०.
दत्तो वास १४३, १४९.
दामोदर पंडित १११, ११२, १४३,१५१, १५२.
द्वात्रिंशल्लक्षण टीका ६०, ६३.
नरेंद्र कवि ८२–१०५, १५१, १७३.
नागदेवाचार्य ८४, ८८, ९०, १२९ १४२, १५०, १५३.
नागदेवाचार्यचरित्र ८३, १७३, १७४.
नागनाथ वास १४२, १४४.
नागो उपाध्ये ९१.
नामधारक ११३.
पद्मपुराण ८७, ९४.
परशराम बास १४२, १४३, १४४, १५२.
पल्होबास १४९.
पंचकृष्ण १४९.
पंचतंत्र (मराठी) ३१, ७२–८१.
पंचाळेश्वर ११४.
पंचाळेश्वरवर्णन १४७.
पंचोपाख्यान ६७–८१.
पारमांडल्य १४१, १४४, १४९.
पाहुडदोहा ३८.
पूजावस्वर १४१.
पैशाची भाषा ३२.
प्रतिष्ठान १७२, १९४.
प्रमेयग्रंथ १४३.
प्रश्नार्णव १९६–२०४.
बत्तीस लक्षणें १४३, १९६.
बागुडचाह्या बास १४२, १४४, १४६.
बाणाइसा १४३.
भाईदेव बास (व्यास) १२९, १३०, १५२.
भागवत ८७, ९४.
भानुभट्ट बोरीकर १०७, १५१, १५२.
भामह ६२.
भास्करभट्ट बोरीकर ९४, १४२.
भीष्मराज १६८, १६९, १७५.
भोगनारायण १७३.
मलिक काफूर १४२.
महदाईसा (महदंबा) ८९, १२९, १५०.
मार्गरूढी १५०.
मालोबास १४३, १४९.
महानुभावीय गीता ५०.
महाराष्ट्र १०१.
माहींभट (म्हाईंभट) ९१, १४३, १५०, १५१.

मुक्तपाठ १४१, १४४, १४५.
मुक्तेश्वर ४.
मुक्तेश्वर भारत ५.
मुधोवास १४९.
मुनि व्यास १२५.
मुरारीमल्ल १९६
रत्नमालास्तोत्र १५३.
रवळो व्यास (राघो पाध्ये) १०७–१०९, ११२, १४९, १५१.
राजभद्र १९६.
रामदेवराव यादव ८४, १४२.
रामेश्वर वास १३०, १४२, १४३, १५२.
रुक्मिणीस्वयंवर (नरेंद्रकृत) ४९, ६३, ६४, ८२–१०५, १७३.
—(कृष्णदासकृत) ५४.
—(डिंभकृत) १४८.
—(गोपाळकृत) १८४–१९५.
—(एकनाथकृत) ५०.
लक्षणरत्नाकर ६०, १४३, १५१.
लीळाचरित्र ८९, ९१, ११३, ११४, १२६, १२७, १३४–१३६, १५१, १५२.
वत्सहरण २९, ३१, ६२, १०६, १११, १५१.
वंकेराज १४८, १४९, १५३.
वामनवास १४३.
विद्यानगरी ९५.
विश्वनाथ १५१.
वृद्धाचार १४४, १४६, १५०.
शिवमुनि १४३.
शिशुपाल वध ४९, ५१, ५२, ५५, ९०, ९२–९४, १०६, १५२.
श्रीगोविंदप्रभुचरित्र १२७.
श्रीपुर १७१, १७३.
श्रीमद्भागवतटीका १९६.
सकळा लिपी १०९, १३०.
सिद्धांते हरिराज, १५०, १५३.
सुंदरी लिपी १०९.
सूत्रपाठ १३१, १४२.
सैहाद्री वर्णन ७१, १०६–१२४.
स्थानपोथी १२५–१४०.
स्मृतिस्थळ ८३, १३०, १७३.
हयग्रीवाचार्य ( हरगर्व ) १४४, १५१, १६८–१८३.
हरिराज १४९.
हरीबास १४३.
हिरण्यगर्भवास १४४, १४६, १७३.
हिराइसा (हिरांबा) १०७, १०९, १११, १३०, १४३, १५२.
हेमाडपंत ८४.
ज्ञानप्रबोध १०६, १५१.
ज्ञानेश्वरी १–३३, ४६–५६.
ज्ञानेश्वरी ( राजवाडे प्रत ) ३४–५७, ६४, ६५, २०३.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकीय.
अनुक्रम २४२२९ दि. ...

REFBK-0009285